म. ग्र. सं. ठाणें
विषय भू प्रवास
सं. क्र. ६०९

# दक्षिणेतील थंड भूमी

ले. – श्रीपाद जोशी

REFBK-0023131

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

24 MAY 1981
7 JUL 1981
2 AUG 1981
29/10
25 NOV 1981
21 FEB 1982
30 MAY 1982
6 DEC 1984
1 DEC 1985

( क्र. मा. प. )
५०००-४-८०

६०९
२३१३१
संदर्भ
१९/३/

# दक्षिणेतील यक्षभूमी

( कूर्ग : देश आणि लोक )

लेखक

श्रीपाद जोशी

REFBK-0023131

पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन

१७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

प्रकाशक :
प. भ. कुलकर्णी
एम एससी इजि /जर्मनी/एफ. टेक/लडन/
पुणे विद्यार्थी गृह प्रकाशनासाठी
१७८६, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

प्रथमावृत्ती : फेब्रुवारी १९७९

© श्रीपाद जोशी

किमत : १२ रुपये

मुद्रक :
त्रि स लाटकर
कल्पना मुद्रणालय
‘ शिव पार्वती ’,
४६१/४ टिळक रस्ता,
पुणे ४११ ०३०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
3939
भू-प्रवास

माझ्या कन्येच्या सासूबाई
**श्रीमती कोकणमाडा कार्यप्पा पूवव्वा**
यांना सादर समर्पित

**— श्रीपाद जोशी**

# भूमिका

'दक्षिणेतील यक्षभूमी' हे एक वेगळ्या प्रकारचे पुस्तक आहे. त्याच्या पूर्वार्धात एका अद्भुत समाजाची ओळख करून देण्यात आलेली असून उत्तरार्धात त्या समाजाचे निवासस्थान असलेल्या नयनरम्य प्रदेशाचे प्रवास-वर्णन आहे. लोक व त्याची भूमी या दोहोंसबंधी अशी एकत्रित माहिती देणारी पुस्तके माझ्या तरी वाचनात नाहीत.

भारताचे माजी सरसेनापती जनरल करिअप्पा व जनरल थिमय्या, हॉकीपटू गोविंदा व गणेश, राजकीय पुढारी श्री सी एम् पुनाचा (मध्यप्रदेशाचे राज्यपाल) वगैरे काही प्रसिद्ध नावे जेव्हा आपण ऐकतो तेव्हा ते 'कूर्गी' लोक आहेत, एवढेच आपल्याला माहीत असते. परंतु हे लोक इतर भारतीयांपेक्षा धर्म, भाषा, संस्कृती, संस्कार वगैरे सर्वच बाबतींत अगदी वेगळे असतील याची आपल्याला कल्पनाही नसते. त्यांच्या प्रत्यक्ष संपर्कात आल्यानंतरच आपल्याला ती गोष्ट माहीत होते.

माझ्या मुलीच्या विवाहामुळे मला या समाजाची जवळून ओळख करून घेण्याची संधी मिळाली. ती ओळख झाल्यावर मला तरी तो समाज अगदीच अद्भुत वाटला. म्हणून मराठी वाचकाना ती ओळख करून देण्याचा प्रयत्न मी या पुस्तकात केला आहे.

इंग्रजीमध्ये या समाजाविषयी जे साहित्य यापूर्वी प्रसिद्ध झाले आहे त्याची मी मुक्तहस्ताने मदत घेतली आहे. अशा पुस्तकांची

सूची शेवटी दिली आहे. त्या सर्व ग्रंथाच्या लेखकाचा मी अत्यंत आभारी आहे.

भाषावार प्रांतरचना होण्यापूर्वी कूर्ग हे एक छोटेसे केंद्रशासित राज्य होते. त्यावेळी त्या राज्याचा कारभार आदर्श समजला जात असे. त्याला उद्देशून सरदार पटेलानी असे म्हटले होते की, "कूर्ग हे रामराज्य आहे." पंडित जवाहरलाल नेहरू यानी एकदा असे उद्गार काढले होते की, "कूर्गने भारतीय सेनेला थोर सेनापती दिले आले आहेत. कूर्गची स्वादिष्ट कॉफी प्रख्यात आहे; आणि त्याच्या या वैशिष्ट्यामध्ये आणखी एका गोष्टीचा उल्लेख मी करू इच्छितो. ती म्हणजे कूर्ग हा आपल्या सुरेख व देखण्या स्त्रियाबद्दलही प्रसिद्ध आहे."

अशा या प्रदेशाची ही काहीशी ओझरती तोंडओळख मराठी वाचकाना आवडेल, असा मला विश्वास वाटतो. माझी कन्या चि. सौ. कीकणमाडा सुब्बय्या राज्यश्री ही आता पूर्णपणे कोडव बनली आहे तिने या पुस्तकाचे [illegible] वाचून उपयुक्त अशा सूचना केल्या. माझे जावई डॉ. की. का. सुब्बय्या याच्याशी व त्याच्या मित्रमंडळींशीही या विषयावर भरपूर चर्चा करण्याची मला संधी मिळाली. त्याच्यापैकी श्री सी. सी. उत्तैया, एन्. वी. भीमय्या व के. बी. विश्वनाथ याचा आभारपूर्वक उल्लेख केला पाहिजे. श्री विश्वनाथ यानी पुरविलेल्या छायाचित्राचाही मला खूप उपयोग झाला. कूर्गचे राजकारण व साहित्यकारण यांसंबंधी श्री. बी. डी. गणपती याच्याकडून पुष्कळच महत्त्वाची माहिती मिळाली. त्याच्या व्यक्तित्वाने मी खूपच प्रभावित झालो. कोडव साहित्यिकाचे प्रतिनिधी या नात्याने त्याचा सविस्तर परिचय या पुस्तकात समाविष्ट करण्यात आला आहे.

पुणे विद्यार्थी गृहाचे संचालक श्री. प. भ. कुलकर्णी यांनी हे पुस्तक प्रकाशित करण्याचे ठरविले; आणि त्याचे सहकारी श्री रा. ल शेटे यांनी तो संकल्प कृतीत उतरविला याबद्दल मी त्याचे मन:पूर्वक आभार मानतो. चित्रकार श्री पराडकर व मुद्रक श्री. चिं. स. लाटकर यानी या कामात जे सहकार्य दिले, त्याबद्दल मी त्याचाही आभारी आहे.

'श्रीरघुवंश' पुणे ४

२६ जानेवारी, १९७९

—श्रीपाद जोशी

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १ | कूर्ग आणि कोडव | १ |
| २. | कोडव कोण आहेत? | १२ |
| ३. | कोडवांचा धर्म | २३ |
| ४. | कोडव घरी | ३२ |
| ५. | कोडवांचे सण | ४६ |
| ६. | कोडवांचे संस्कार | ६२ |
| ७. | काही श्रद्धा व समजुती | १०४ |
| ८. | कोडगूचे साहित्य-सेवक | ११४ |
| ९. | बिरुनाणीतील चार दिवस | ११९ |
| १०. | मरकारा | १२८ |
| ११. | भागमंडल ऊर्फ भगंडेश्वर क्षेत्र | १३५ |
| १२. | जय कावेरी! | १४१ |
| | संदर्भ सूची | १५१ |

■

# १

# कूर्ग आणि कोडव

कूर्गमधील विशिष्ट जमातीच्या ज्या लोकाना आपण चुकीने कुर्गी असे म्हणतो ते स्वत ला कोडव म्हणवितात. त्याच्या भाषेलाही आपण गैरसमजाने कुर्गी म्हणतो. पण कुर्गी असा शब्द खरोखरी अस्तित्वातच नाही. कोडव लोक आपल्या भाषेला व प्रदेशालाही कोडवच म्हणतात. इंग्रजीत या दोहोंसाठी व कूर्ग प्रदेशासाठी ‘ कूर्ग ’ हा एकच शब्द वापरला जातो. कन्नड भाषेत कूर्गच्या भाषेला ‘ कोडगु ’ असे म्हणतात. ’ कूर्गचा प्रदेश व तेथील लोक याना उद्देशूनही कन्नडमध्ये ‘ कोडगु ’ हाच शब्द वापरला जातो. हा सर्व घोटाळा टाळण्यासाठी आम्ही प्रदेशाचे नाव कूर्ग, तेथील विशिष्ट जमातीच्या लोकाना कोडव आणि त्याच्या भाषेला कोडगू असे म्हणावयाचे योजिले आहे.

### भारतीय वेल्स

कर्नाटक व केरळ यांच्या सरहद्दी जेथे एकमेकाना स्पर्श करतात तेथे सुमारे १५९० चौरस मैल ( ४११० किलोमीटर ) क्षेत्रफळाचा एक लहानसा प्रदेश आहे. त्याचे नाव कूर्ग. उत्तरेस हेमवती नदीपासून दक्षिणेस ब्रह्मगिरी पर्वतरांगे-पर्यंत त्याची लाबी ६० मैल असून पश्चिमेस सपाजे व पूर्वेस कुशालनगरपर्यंत त्याची रुंदी ४० मैल आहे. एकूण लोकसंख्या १९७१ च्या शिरगणतीप्रमाणे ३,७८,२९१ असून त्यापैकी कोडव जमातीचे लोक फक्त ७५,००० च्या आसपास आहेत. इतर जमातींपैकी गौडा ( ओक्कलिग ) लोक महत्त्वाचे असून बहुसंख्य लोक केरळ, तामिळनाडू व दक्षिण कानडा या भागांतून आलेले शेत-मजूर आहेत. ३५ टक्के लोक कन्नड भाषा बोलणारे, ३० टक्के कोडगू बोलणारे

व इतर तामिळ, मल्याळम्, तेलुगु, वगैरे भाषा बोलणारे आहेत. पारसी लोकाप्रमाणे अत्यल्प लोकसंख्या असून भारतीय समाजजीवनावर आपला ठसा उमटविणारे लोक म्हणून कोडव्यांचा उल्लेख केला जातो.

भारताच्या पश्चिम किनाऱ्यापासून थोड्याच अंतरावर उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत जी एक पर्वतमाला पसरलेली आहे तिला पश्चिम घाट असे म्हणतात. याच घाटाच्या पूर्वेकडील उतरणीवर कूर्ग वसलेला आहे. उंचसखल डोंगरदऱ्या व दाट अरण्ये या त्याच्या वैशिष्टयामुळे इंग्रजाना या प्रदेशाचे आकर्षण वाटले; आणि त्याला त्यांनी भारतातील वेल्स असे नाव दिले. कूर्गच्या क्षेत्रफळातील सुमारे ५२० चौरस मैलाचा प्रदेश जंगलानी व्यापलेला आहे. त्यामुळे लोकसंख्या पुष्कळच विरळ आहे. (दर चौरस मैलाला सुमारे २०० ) पाऊस भरपूर पडतो. वार्षिक पर्जन्यमानाची सरासरी १५० इंच आहे. यामुळे सर्वत्र हिरवीगार वनराजी वर्षभर पाहावयास मिळते; आणि हवाही बरीच थंड असते. ५० ते ९० अंश फॅरनहीटच्या दरम्यान येथील हवामान वर्षभर राहाते. भात, कॉफी, वेलदोडे, सत्री, मिरी वगैरे येथील मुख्य पिके आहेत. सिंहांखेरीज बहुतेक सर्व वन्य पशू येथील जंगलात आढळतात. त्याची शिकार करणे हा येथील लोकांचा षोकही आहे व त्यांच्या आहारात मासाला प्राधान्य असल्याने शिकार ही जीवनावश्यकही समजली जाते. येथील थंड हवेला मध फार मानवतो. त्यामुळे मधमाशीपालनाचा व्यवसायही मोठ्या प्रमाणावर चालतो. रोजच्या आहारात मधाचा समावेश असणारे भारतात बहुधा फक्त कोडवच असावेत. डुकराचे—रानडुकराचे व गावठी डुकराचे—मांस कोडवाना फार आवडते. त्यामुळे शूकरपालनही मोठ्या प्रमाणावर केले जाते. मद्याचा वापरही कोडव्यामध्ये खूप केला जातो. मद्य, मांस, मध व भात हा कोडवांचा प्रमुख आहार आहे. यामुळेही इंग्रजाना ते अधिक जवळचे वाटले असावेत. कदाचित गोरेपान व धिप्पाड कोडव आणि त्यांच्या लावण्यवती स्त्रिया, त्यांचे शिष्टाचारसंपन्न जीवन, शौर्य व आदरातिथ्य, फूटबॉलसारख्या मैदानी खेळाची आवड, शिकारीचा षोक यामुळे ते इंग्रजाना विशेष प्रिय झाले असावेत.

उच्च जीवनमान टिकवून ठेवण्याच्या बाबतीत पारश्यासारख्या काही निवडक जमाती वगळल्यास कोडवांची बरोबरी करणारे लोक इतर समाजात फारच थोडे आढळतील. या त्यांच्या वृत्तीमुळे त्यांच्याजवळ धनसंग्रह असा क्वचितच झाल्याचे आढळले.

## कुडुमलैनाड

कूर्ग हे नाव कसे आले ? ते 'कोडगू' शब्दाचे इंग्रजी रूपांतर आहे, हे स्पष्टच आहे. पण 'कोडगू' शब्द तरी कसा बनला ? कोणी म्हणतात, तो 'कुडुनाड'पासून बनला आहे. कुडु किंवा कोडी म्हणजे पश्चिम आणि नाड म्हणजे देश. यापासून कुडुमलैनाड किंवा कोडिमलैनाड हा शब्द बनला. मलै म्हणजे डोंगर किंवा डोंगराळ प्रदेश. ('मलनाडु' हा शब्द मैसूरच्या पश्चिमेस असलेल्या प्रदेशाला उद्देशून वापरीत असत.) यापासून 'कुडगुमलेनाड' हा शब्द बनला. अग म्हणजे आतल्या बाजूस. कुडगु म्हणजे पश्चिमेस आतल्या बाजूस असणारा. सारांश 'पश्चिमेच्या बाजूस, असणारा डोंगराळ प्रदेश' किंवा लेफ्टनंट कोन्नोर यांनी म्हटल्याप्रमाणे 'शेकडो टेकड्यांचा देश' या अर्थाने कोडगू हा शब्द प्रचलित झाला असावा.

'कोड' म्हणजे मध या कन्नड शब्दापासून मधाचे आगर असलेल्या प्रदेशाला 'कोडगू' असे नाव मिळाले असेल काय ? 'कोडिगेमान्य' (तलाव बांधण्यासाठी दिलेली करमुक्त जमीन), 'कोडुगल्लु' (डोंगरावरील ठळक दगड) किंवा 'कोडु' (थंडी) वगैरे शब्दापासूनही कोडगूची व्युत्पत्ती लावता येण्याची शक्यता आहे.

त्यापूर्वी कावेरी पुराण वगैरे पुराणांत या भागाला उद्देशून 'मत्स्य देश', 'क्रोड देश' व 'ब्रह्मक्षेत्र' ही नावे वापरण्यात आली आहेत असे म्हणतात. महाभारतातील 'मत्स्यदेशा'चा उल्लेखही कूर्गला उद्देशूनच केला गेला असल्याचे काही लोक मानतात, आणि 'क्रोडदेश'पासून 'कोडगू' हा शब्द बनला असल्याचेही काही लोक सांगतात.

## भूतकाळाचा अभेद्य पडदा

नवव्या शतकापर्यंतचा कूर्गचा इतिहास जवळ जवळ अजूनही अज्ञातच आहे. नवव्या शतकापासून सोळाव्या शतकापर्यंतचा इतिहासही काहीसा अस्पष्टच आहे गंग, चोळ, होयसळ वगैरे ज्या घराण्यांनी शेजारच्या मैसूरवर राज्य केले त्यांनी वेळोवेळी कूर्गवरही आधिपत्य गाजविले. त्यांच्याच शाखा असलेल्या चेंगाळ्व व कोंगाळ्व यांनी कूर्गच्या वेगवेगळ्या भागावर विभिन्न कालखंडात राज्य केले. विजयनगरच्या सम्राटाचे मांडलिकही कूर्गवर सत्ता गाजवून गेले. या

काळात लहान-लहान नायक सरदार व पाळेगार (पाळेयगार) आपापल्या जहागिऱ्या सांभाळून होते. यापैकी चेंगाळवासारखे अनेक राजे प्रारंभी जैन धर्माचे अनुयायी होते परंतु नंतर त्यांनी लिंगायत धर्म स्वीकारला. पुढे सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात बेदनूरच्या नायक घराण्यातील एक पुरुष जंगम स्वामी (लिंगायताचा धर्मगुरू) म्हणून कूर्गमध्ये आला, आणि मरकाऱ्यापासून पाच मैलावर असलेल्या हालेरी या गावी राहिला. त्याने लोकांकडून कर वसूल करण्यास सुरुवात केली; आणि हळूहळू तो प्रबळ बनत गेला. अखेर त्याने हालेरी व आसपासच्या प्रदेशावर आपले स्वामित्व प्रस्थापित केले, आणि आपसात भांडणाऱ्या सरदाराच्या दुहीचा फायदा घेऊन आपण स्वत:च 'वीर राजा' हे नाव धारण करून राजा बनला. वीर राजानंतर त्याचा नातू मुद्दू राजा (१६३३-१६८६) याने कूर्गच्या मोठ्या प्रदेशावर ५३ वर्षे राज्य केले. त्याने १६८१ साली हालेरीहून आपली राजधानी मरकारा (मडिकेरि) या ठिकाणी हलविली. ती आजतागायत कायम आहे. मुद्दूराजाचा मुलगा दोड्डवीरप्पा मोठा शूर व उत्तम प्रशासक होता. त्याने १६८७ पासून १७३६ पर्यंत कूर्गवर राज्य केले. दोड्डवीरराजाच्या कारकीर्दीत मलबार व मैसूरच्या राजांनी कूर्गवर अनेकदा हल्ले केले. पण दोड्डवीर राजाने ते यशस्वीपणे परतवून लावले. त्याने कूर्गचा प्रदेश ३५ नाडांमध्ये विभाजित केला. नाड हा आपल्या कडील तालुक्यासारखा परंतु त्याहून खूपच लहान महसूल विभाग असतो. त्यात काही खेड्यांचा समावेश असतो. प्रत्येक खेड्यावर एक तक्क किंवा गाव-प्रमुख असतो. दोड्डवीरप्पा (उर्फ वीर राजा दुसरा) याच्या नंतर कूर्गच्या गादीसाठी यादवी सुरू झाली. त्यावेळी त्या यादवीत अयशस्वी झालेल्या लिंग राजाने मैसूरच्या हैदर अलीची मदत मागितली. त्याने ती मदत देऊन त्याला गादीवर बसविले, आणि त्याच्या मृत्यूनंतर १७८० साली त्याच्या मुलांचा अज्ञान पालक म्हणून कूर्गवर स्वत:चे आधिपत्य प्रस्थापित केले. त्याने लिंग राजाच्या अज्ञान मुलांना नेऊन कैदेत ठेवले, आणि मरकारा येथे आपले सैन्य ठेवून जुन्या राजवटीच्या एका अधिकाऱ्याला आपल्या वतीने राज्यपाल म्हणून नियुक्त केले.

### कोडवांचे बंड

या वेळेपर्यंत कोडवांना कूर्गच्या इतिहासात फारसे प्राधान्य मिळालेले नव्हते.

वेगवेगळ्या सरंजामदारांच्या हाताखालीच ते काम करीत होते. अर्थात वेगवेगळ्या राजांना गादीवर बसविण्याच्या कामी कोडवाची नेहमी मदत होत असे. ते स्वतः राजे बनले नाहीत, तरी इतरांना राजे बनवीत मात्र होते. यामुळे त्यांना 'किंगमेकर' असे म्हटले जाते. आजही त्यांची हीच भूमिका असावी असे वाटते. परंतु हैदराची मुस्लिम राजवट त्यांना मुळीच आवडली नाही त्यांनी हैदराविरुद्ध बंड पुकारले. यावेळी हैदरअली इंग्रजांविरुद्ध लढण्यात गुंतला असल्याने त्याला कोडवाच्या बंडाकडे लक्ष देता आले नाही. इ. स १७८२ साली कोडवांनी हैदराच्या सैन्याला कूर्गमधून पिटाळून लावले. हैदराच्या मृत्यूनंतर १७८४ साली टिपूने आपले सैन्य कूर्गवर पाठविले. त्याचाही कोडवांनी चांगलाच पराभव केला.

## टिपूने केलेला विश्वासघात

लष्करी सामर्थ्याचा काही उपयोग होत नाही असे पाहून टिपूने कपटाचा व विश्वासघाताचा मार्ग अवलंबिला. त्याने तहाची बोलणी करण्यासाठी सर्व कोडवांना तलकावेरी ( कावेरीचे उगमस्थान ) आणि भागमंडल ( कावेरी संगम ) याच्या जवळील देवती परंबू या ठिकाणी बोलावून घेतले. त्याच्या शब्दावर विश्वास ठेवून कोडव लोक आपापली शस्त्रास्त्रे न घेताच तेथे गेले. त्याठिकाणी दबा धरून बसलेल्या टिपूच्या सैन्याने त्यांना घेरले व कैद केले. एखादा कसाई गुरांचा कळप कत्तलखान्याकडे नेतो त्याप्रमाणे टिपूने सर्व पकडलेल्या कोडवांना त्यांच्या बायकामुलांसह फरफटत श्रीरंगपट्टणला नेले. तेथे त्याने सर्व कोडव पुरुषांची सुंता करून त्यांना सक्तीने इस्लामची दीक्षा दिली.

वस्तुतः कोडवांनी टिपूवर एवढा विश्वास ठेवायला नको होता. कारण हैदराच्या काळात त्यांना मुस्लिमांच्या क्रूरपणाचा फार वाईट अनुभव आलेला होता. हैदराने मलबार पुनः जिंकून घेण्यासाठी जाताना कूर्गवर अकस्मात हल्ला करून अनेक कोडवांची कत्तल केली होती. कोडवाच्या एका मुंडक्याला पाच रुपये असा दर त्याने जाहीर केला होता. अशी सातशे मुंडकी त्याच्यासमोर ठेवण्यात आली. त्यावेळी त्या चेहऱ्याचा देखणेपणा पाहून तो थक्क झाला आणि त्याने ती कत्तल थांबविली, असे लेविस राइसने आपल्या 'मैसोर अँड कूर्ग' ( ए गॅझेटियर कम्पाइल्ड फॉर दि गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, मैसोर गव्हर्नमेंट प्रेस, १८७७ ) या पुस्तकाच्या खंड १ पृ. २६७ वर म्हटले आहे. हैदर काय किंवा टिपू काय

काळात लहान-लहान नायक सरदार व पाळेगार (पाळेयगार) आपापल्या जहागिऱ्या सांभाळून होते. यापैकी चेंगाळवांसारखे अनेक राजे प्रारंभी जैन धर्माचे अनुयायी होते. परंतु नंतर त्यांनी लिंगायत धर्म स्वीकारला. पुढे सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात वेदनूरच्या नायक घराण्यातील एक पुरुष जंगम स्वामी (लिंगायताचा धर्मगुरू) म्हणून कूर्गमध्ये आला, आणि मरकाऱ्या—पासून पाच मैलावर असलेल्या हालेरी या गावी राहिला. त्याने लोकाकडून कर वसूल करण्यास सुरुवात केली; आणि हळूहळू तो प्रबळ बनत गेला. अखेर त्याने हालेरी व आसपासच्या प्रदेशावर आपले स्वामित्व प्रस्थापित केले; आणि आपसात भांडणाऱ्या सरदाराच्या दुहीचा फायदा घेऊन आपण स्वतःच 'वीर राजा' हे नाव धारण करून राजा बनला. वीर राजानंतर त्याचा नातू मुद्दू राजा (१६३३-१६८६) याने कूर्गच्या मोठ्या प्रदेशावर ५३ वर्षे राज्य केले. त्याने १६८१ साली हालेरीहून आपली राजधानी मरकारा (मडिकेरि) या ठिकाणी हलविली. ती आजतागायत कायम आहे. मुद्दूराजाचा मुलगा दोड्डवीरप्पा मोठा शूर व उत्तम प्रशासक होता. त्याने १६८७ पासून १७३६ पर्यंत कूर्गवर राज्य केले. दोड्डवीरराजाच्या कारकीर्दीत मलबार व मैसूरच्या राजांनी कूर्गवर अनेकदा हल्ले केले. पण दोड्डवीर राजाने ते यशस्वीपणे परतवून लावले. त्याने कूर्गचा प्रदेश ३५ नाडामध्ये विभाजित केला. नाड हा आपल्याकडील तालुक्यासारखा परंतु त्याहून खूपच लहान महसूल विभाग असतो. त्यात काही खेड्याचा समावेश असतो. प्रत्येक खेड्यावर एक तक्क किंवा गाव-प्रमुख असतो. दोड्डवीरप्पा (उर्फ वीर राजा दुसरा) याच्या नंतर कूर्गच्या गादीसाठी यादवी सुरू झाली. त्यावेळी त्या यादवीत अयशस्वी झालेल्या लिंग राजाने मैसूरच्या हैदर अलीची मदत मागितली. त्याने ती मदत देऊन त्याला गादीवर बसविले, आणि त्याच्या मृत्यूनंतर १७८० साली त्याच्या मुलांचा अज्ञान पालक म्हणून कूर्गवर स्वतःचे आधिपत्य प्रस्थापित केले. त्याने लिंग राजाच्या अज्ञान मुलांना नेऊन कैदेत ठेवले, आणि मरकारा येथे आपले सैन्य ठेवून जुन्या राजवटीच्या एका अधिकाऱ्याला आपल्या वतीने राज्यपाल म्हणून नियुक्त केले.

## कोडवांचे बंड

[illegible] कूर्गच्या इतिहासात फारसे प्राधान्य मिळालेले नव्हते.

वेगवेगळ्या सरंजामदारांच्या हाताखालीच ते काम करीत होते. अर्थात वेगवेगळ्या राजांना गादीवर बसविण्याच्या कामी कोडवाची नेहमी मदत होत असे. ते स्वत. राजे बनले नाहीत, तरी इतराना राजे बनवीत मात्र होते यामुळे त्यांना 'किंगमेकर' असे म्हटले जाते आजही त्यांची हीच भूमिका असावी असे वाटते. परतु हैदराची मुस्लिम राजवट त्यांना मुळीच आवडली नाही. त्यांनी हैदराविरुद्ध बड पुकारले. यावेळी हैदरअली इग्रजाविरुद्ध लढण्यात गुतला असल्याने त्याला कोडवांच्या बंडाकडे लक्ष देता आले नाही. इ. स. १७८२ साली कोडवानी हैदराच्या सैन्याला कूर्गमधून पिटाळून लावले. हैदराच्या मृत्यूनतर १७८४ साली टिपूने आपले सैन्य कूर्गवर पाठविले. त्याचाही कोडवांनी चागलाच पराभव केला.

## टिपूने केलेला विश्वासघात

लष्करी सामर्थ्याचा काही उपयोग होत नाही असे पाहून टिपूने कपटाचा व विश्वासघाताचा मार्ग अवलंबिला. त्याने तहाची बोलणी करण्यासाठी सर्व कोडवाना तलकावेरी ( कावेरीचे उगमस्थान ) आणि भागमंडल ( कावेरी संगम ) याच्या जवळील देवती परंबू या ठिकाणी बोलावून घेतले. त्याच्या शब्दावर विश्वास ठेवून कोडव लोक आपापली शस्त्रास्त्रे न घेताच तेथे गेले. त्याठिकाणी दबा धरून बसलेल्या टिपूच्या सैन्याने त्यांना घेरले व कैद केले. एखादा कसाई गुराचा कळप कत्तलखान्याकडे नेतो त्याप्रमाणे टिपूने सर्व पकडलेल्या कोडवाना त्याच्या बायकामुलासह फरफटत श्रीरंगपट्टणला नेले. तेथे त्याने सर्व कोडव पुरुषाची सुंता करून त्याना सक्तीने इस्लामची दीक्षा दिली.

वस्तुत कोडवांनी टिपूवर एवढा विश्वास ठेवायला नको होता. कारण हैदराच्या काळात त्याना मुस्लिमाच्या क्रूरपणाचा फार वाईट अनुभव आलेला होता. हैदराने मलबार पुन' जिंकून घेण्यासाठी जाताना कूर्गवर अकस्मात हल्ला करून अनेक कोडवांची कत्तल केली होती. कोडवाच्या एका मुडक्याला पाच रुपये असा दर त्याने जाहीर केला होता. अशी सातशे मुंडकी त्याच्यासमोर ठेवण्यात आली. त्यावेळी त्या चेहऱ्याचा देखणेपणा पाहून तो थक्क झाला आणि त्याने ती कत्तल थाबविली, असे लेविस राइसने आपल्या 'मैसोर अँड कूर्ग' ( ए गॅझेटियर कम्पाइल्ड फॉर दि गव्हर्नमेंट ऑफ इडिया, मैसोर गव्हर्नमेंट प्रेस, १८७७ ) या पुस्तकाच्या खंड १ पृ. २६७ वर म्हटले आहे. हैदर काय किंवा टिपू काय

दोघानाही कोडवाबद्दल भयकर द्वेष व तिरस्कार वाटत होता, असे दिसते. बहुधा या घटनेचे विस्मरण अजूनही कोडवाना झालेले नसावे, असे त्याच्या उद्गारा-वरून वाटले.

## टिपूने पकडलेले कोडव

टिपूने किती कोडवाना विश्वासघाताने पकडून नेले यासंबधी एकवाक्यता नाही. 'इंपीरियल गॅझेटियर ऑफ इडिया' (भाग ११ पृ. १३) मध्ये ही संख्या ७० हजार असल्याचे नमूद करण्यात आले आहे, तर लेविस राइस ही संख्या ८५ हजार होती असे सागतो. श्री एन्. चिन्नप्पा 'पट्टोले पळम' या आपल्या पुस्तकात ही संख्या १ लाख १० हजार असल्याचे सागतात. श्री डी. एन्. कृष्णय्या याच्या मते परत आलेल्या कोडवाची संख्या १२ हजार होती. यावरून पकडून नेलेले लोक वीस हजाराच्या आसपास असावेत असे वाटते.

टिपूच्या पराभवानतर परत आलेल्या कोडवांचे काय झाले, यासंबधीही मतैक्य आढळत नाही. सुमारे १० हजार कोडव परत आले असावेत. त्याची परत हिंदू धर्मात येण्याची विनती स्थानिक कोडवानी मान्य करून त्याना शुद्ध करून घेतले, असे काहीजण म्हणतात. तर त्याना शुद्ध करून घेण्यास कोडवानी नकार दिला असे इतराचे म्हणणे आहे. कूर्गमध्ये व कूर्गच्या बाहेर स्वत ला कोडव समजणारे व कोडव संस्कारांचे पालन करणारे काही मुसलमान आढळतात. यावरून टिपूच्या या सक्तीच्या धर्मांतरानंतर काही कोडवांनी मुसलमान राहणेच पसंत केले असावे असे दिसते.*

---

* १८४० साली कोडवांची सख्या फक्त १७ हजार होती १८५४ साली ती २५ हजार झाली १८७१ साली ती २६, ३८९ होती, तर १९२१ साली ४१ हजार होती. यावरून कोडवाच्या सख्येत इतर भारतीयाच्या मानाने फारच अल्प वाढ होत गेली असे दिसते (ही वाढ एक टक्काही भरत नाही) त्यानतरच्या ४० वर्षांत झालेली लोक-सख्या वाढ मात्र (७५ हजार) बरीच म्हणजे अडीच टक्के आहे पण तीही इतराच्या मानाने खूपच कमी आहे मध्यतरीची अल्पवाढ ही तेथील मलेरियाच्या प्रादुर्भावामुळे झाली असण्याची शक्यता आहे. डॉ. के. के. सुब्बय्या यांच्या मते ही सख्या ८० हजार असावी.

## टिपूविरुद्ध इंग्रजांना साह्य

टिपूने पळवून नेलेल्या राजपुत्रांपैकी वीर राजेंद्र हा सहा वर्षे तुरुंगात काढून इ. स १७८६ साली शिताफीने निसटला, आणि कूर्गमध्ये परत आला. यावेळपर्यंत टिपूने कूर्गवर आपली पकड मजबूत केली होती. मरकाऱ्याचे नाव बदलून त्याने त्याला जाफराबाद असे नवे नाव दिले होते; आणि स्वत ला कूर्गचा बादशहा म्हणून घोषित केले होते. सर्वत्र मुस्लिम अधिकारी नेमले होते; आणि जेथे जेथे एखादा कोडव सापडेल तेथे तेथे त्याला ठार मारून टाकण्याची आज्ञा त्याना दिली होती. त्यामुळे कोडवाची संख्या फारच कमी झाली होती. परंतु वीर राजा सुटून परत आल्याचे समजताच ते पुन एकत्र येऊन त्याच्या पाठीशी उभे राहिले. हळूहळू वीर राजाने आपले बस्तान बसविले आणि मुस्लिम सरदाराचा पराभव करून तो १७८९ साली कूर्गच्या गादीवर बसला. यावेळी इंग्रजाना टिपूविरुद्ध लढणारे लोक हवेच होते. म्हणून त्यानी कूर्गच्या राजाशी दोस्तीचा तह केला. त्या तहान्वये कोडव लोकानी टिपूविरुद्ध लढण्यास इंग्रजांना साह्य केले. वीर राजाने दोड्ड वीर राजेंद्र हे नाव धारण करून १८०९ पर्यंत कूर्गवर राज्य केले. त्याला मुलगा नव्हता; म्हणून आपली मुलगी देवम्माजी हिला राज्य मिळावे अशी त्याची इच्छा होती. आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात दोड्ड वीर राजेंद्रचा मानसिक समतोल बिघडून त्याने बरीच क्रूर कृत्ये केली असे म्हणतात. १८०९ साली तो वारला तेव्हा देवम्मा फक्त दहा वर्षांची होती. तिचा चुलता लिंगराजा याने अनेक लटपटी खटपटी करून कूर्गचे राज्य बळकावले व १८२० पर्यंत राज्य केले. लिंगराजाने राज्य मिळविण्यासाठी वाममार्गाचा अवलब केला असला तरी त्याने राज्यकारभार मात्र फार उत्तम प्रकारे केला. त्याच्या कारकीर्दीत कूर्गचे पहिले भूमापन व जमाबदी १८१२ साली करण्यात आली. त्याने १८११ साली मरकाऱ्याचा किल्ला बाधला आणि १८१९ साली ओंकारेश्वराचे भव्य मदिर उभारले. तो कार्यक्षम असला तरी फार संशयखोर होता. त्याने आपले गुप्तचर सर्वत्र पेरून ठेवले होते. त्यामुळे तो अत्यत अप्रिय झाला होता.

## देशी राजवटीचा अंत

लिंग राजानंतर त्याचा मुलगा चिक्कराजवीरेंद्र हा १८२० साली कूर्गच्या

गादीवर बसला. तो अत्यंत सशयी व क्रूरकर्मा होता. आपले नातेवाईक आपल्याला गादीवरून काढून टाकतील या भीतीने त्याने अनेक नातेवाइकाना ठार मारले. दवम्माचा नवरा चेन्नबसप्पा यालाही त्याने कपटाने ठार मारण्याचा प्रयत्न केला. परंतु तो यशस्वी झाला नाही; आणि चेन्नबसप्पा इंग्रजाच्या आश्रयास गेला. इंग्रजांनी त्याला आपल्या स्वाधीन करावे अशी चिक्कवीर राजाने मागणी केली. ती इंग्रजानी फेटाळून लावल्यावर त्याने इंग्रजाविरुद्ध बड केले. इंग्रजानी ते बड मोडून काढले आणि चिक्कवीर राजाला पदच्युत करून कूर्ग खालसा केला. अशा प्रकारे २३० वर्षे कूर्गवर फडकणारा लिंगायत झेंडा जाऊन ६ एप्रिल १८३४ रोजी मरकाऱ्याच्या किल्ल्यावर युनियन जॅक फडकले.

चिक्कवीर राजाला निवृत्तिवेतन देऊन इंग्रजानी काशीला पाठविले. परतु तो आपल्यावरील अन्यायाविरुद्ध दाद मागण्यासाठी १८५२ साली आपली एकुलती एक मुलगी गौरम्मा हिला घेऊन इंग्लंडला गेला. आपले राज्य परत मिळविण्यात चिक्कवीर राजाला यश आले नाही. परतु व्हिक्टोरिया राणीने त्याना संरक्षण देऊन गौरम्माला ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली. गौरम्माचे लग्न एका ब्रिटिश इसमाशी झाले. तिला एक मुलगाही झाला होता. पण तो फार दिवस जगला नाही. तत्पूर्वीच चिक्कवीर राजा मरण पावला होता (१८५९); आणि त्यानतर काही दिवसांनी गौरम्माचेही निधन झाले. अशा प्रकारे कूर्गवरील लिंगायत राजाचा निर्वंश झाला.

या साऱ्या इतिहासात कोडवाना फारसे महत्वाचे स्थान नसल्याचे दिसून येते. आपल्या धन्याची इमानेइतबारे सेवा करणे एवढेच त्याना माहीत होते. ही त्यांची स्वामिनिष्ठा इंग्रजी अमदानीत त्याच्या उपयोगी पडली; आणि ते बघता-बघता पुढे आले.

### सत्तावनच्या बंडातील कामगिरी

१८५७ सालच्या बंडात इंग्रजाना मन पूर्वक साह्य केल्याबद्दल ब्रिटिशानी कोडवाना शस्त्रास्त्रांच्या कायद्यातून वगळून त्याच्या स्वामिनिष्ठेचे चीज केले. कूर्गचे कमिशनर सर मार्क कब्बन यांनी २६ फेब्रुवारी १८६१ रोजी एक फतवा काढून कोडवाना परवाना न काढता जवळ बदूक बाळगण्याची मुभा दिली. यानंतर कोडवाच्या वीरवृत्तीला चागलेच प्रोत्साहन मिळाले; आणि पजाबी, राजपूत,

गुरखा, मराठा वगैरे लढाऊ जमातींमध्ये कोडवाना मानाचे स्थान मिळाले. कोडवाना क्षत्रियत्वाचे बाळकडू पूर्वीपासूनच दिले जात होते. त्याच्या शौर्याला भारतीय सैन्यात भरपूर वाव मिळाला, आणि ते सरसेनापतीच्या हुद्द्यापर्यंत जाऊन पोचले

## इंग्रजांच्या संपर्काचा प्रभाव

इंग्रजाच्या आगमनापर्यंत आपल्या भौगोलिक परिस्थितीमुळे कोडव लोक एक प्रकारे भारतीय लोकजीवनाच्या मुख्य प्रवाहापासून जवळजवळ अलिप्तच राहिले. परतु इग्रजी राज्यामुळे ते त्या प्रवाहाशी एकरूप होऊ शकले. मात्र ही प्रक्रिया घडत असताना त्यांनी आपले व्यक्तित्व व अस्मिता कायम ठेवली. कूर्गच्या थंड हवेमुळे इंग्रजांनी तो प्रदेश शेजारच्या प्रातात विलीन न करता वेगळा ठेवला. त्याचाही परिणाम कोडवाच्या विकासास हातभार लावणारा ठरला. इंग्रजाच्या सपर्कामुळे कोडवामध्ये जवळजवळ शंभर टक्के साक्षरता आहे. इंग्रजी भाषेचाही प्रसार कोडवामध्ये खूप झाला. आजकाल बहुतेक सुशिक्षित कोडव इंग्रजी बोलू शकतात. इग्रजी व कोडगू याच्याबरोबरच शिक्षणाचे माध्यम असणारी कन्नड भाषा त्याना उत्तम येते. शेतात व कॉफीच्या मळ्यांत काम करणाऱ्या केरळीय मजुरांच्या संपर्कामुळे त्याच्यापैकी अनेकांना मल्याळम् भाषाही येते.

कोडव लोकांचे शौर्य, शिष्टाचार व देखणेपणा यामुळे इंग्रजांना ते विशेष प्रिय वाटले असल्यास आश्चर्य नाही. असे उमदे लोक आपल्या धर्मात यावेत म्हणून ख्रिस्ती धर्मप्रचारकांनी खूप धडपड केली. पण त्यात त्याना यश आले नाही. ज्या लोकानी ब्राह्मणी धर्मापुढे नमण्याचे नाकारले ते ख्रिस्ती बनतील, ही आशाच वेडेपणाची होती. परंतु इग्रजाचा पोषाख, शिष्टाचार, शिस्त वगैरे अनेक गुण मात्र कोडवांनी उचलले. याचा एक विपरीत परिणामही झाला. ते स्वत.ला इतर भारतीयांपेक्षा श्रेष्ठ समजू लागले. स्वातंत्र्योत्तर काळात कूर्गचे वेगळेपण कायम ठेवण्याचा त्यानी खूप प्रयत्न केला. परतु त्यात त्याना यश आले नाही. त्याना कर्नाटकात विलीन व्हावे लागले. याबद्दल जुनी मंडळी खेद व्यक्त करतात; परंतु नव्या पिढीला त्याचे काही वाटत नाही. ती कन्नड समाजात विलीन होण्यास मुळीच विरोध करीत नाहीत असे दिसते.

कूर्गला मॉंटेग्यू चेम्सफर्ड सुधारणानुसार १९२४ साली एक कायदे मंडळ

मिळाले होते. ते स्वातंत्र्यानंतरही सुमारे चार वर्षे टिकले. १९५१ साली कूर्गला 'क' वर्गीय राज्याचा दर्जा मिळाला; आणि १९५२ साली दोन सदस्यांचे मंत्रिमंडळ असलेली विधानसभा अस्तित्वात आली. पुढे १ नोव्हेंबर १९५६ रोजी कूर्ग मैसूर (कर्नाटक) राज्यात विलीन करण्यात आले. त्यानंतर कूर्ग हा कर्नाटकाचा एक जिल्हा बनला. परंतु कोडवांना या राजकीय स्थित्यंतराचे फारसे सोयर-सुतक वाटले नसावे. कारण त्यांना राजकारणात गोडी अशी कधी वाटलीच नाही. त्यांचा समाज सुधारलेला असल्याने समाज-सुधारणेचीही निकड त्यांना फारशी कधी जाणवली नाही. त्यामुळे कोडवांमधून राजकीय व सामाजिक नेते फारच थोडे निर्माण झाले. सैन्यात जावे, कॉफी-वेलदोड्याचे मळे लावावेत, हॉकीच्या खेळात प्रावीण्य मिळवावे, आणि मजेत आयुष्य घालवावे, हीच त्यांची जीवन पद्धती बनली.

जनरल कोडंदेर कार्यप्पा (जनरल करिअप्पा), त्यांचेच चुलत भाऊ जनरल कोडंदेर तिम्मय्या (थिमय्या), कु. चोनिर मुत्तम्मा (भारताच्या हंगेरीतील व आता घानातील परराष्ट्रीय वकील) गणेश, गोविंद (ऑलिंपिक हॉकीपटू), रामकृष्ण मिशनशी संबंध असलेले स्वामी शांभवानंद (तेलपंड चंगप्पा), माजी केंद्रीय मंत्री चेप्पुडीर पूणच्चा (सी. एम्. पुनाचा) वगैरे कोडवांची नावे आपल्याला माहीत आहेत. त्याखेरीज इतरही अनेक कोडव लोक जीवनाच्या विविध क्षेत्रात कर्तबगारी दाखवीत आहेत.

कोडवांच्या नावांत प्रथम त्यांच्या घराण्याचे नाव असते. परंतु ते नाव कशा-वरून पडले असावे हे मात्र फारच थोड्यांना सांगता येते. अनेक नावांना काही अर्थही नसतो. कोडंदेर, चोनिर, चेप्पुडीर, कीकणमाडा, पथंड, बाचमाडा ही आडनावे म्हणजे घराण्यांचीच नावे होत. या आडनावानंतर वडिलांचे किंवा पतीचे नाव येते व शेवटी त्या व्यक्तीचे नाव येते. ही पद्धत दाक्षिणात्यच होय. मात्र दाक्षिणात्य पद्धतीत गावाचे नाव हे सामान्यतः आडनाव असते. परंतु कोडवांच्या आडनावाचा त्यांच्या गावाशी काही संबंध नसतो.

कोडवांची भाषा कोडगू. तिच्यावर कन्नड, मल्याळम् व काही अंशी तमिळ या भाषांचा प्रभाव पडलेला स्पष्ट दिसतो. तिला स्वतःची लिपी नसून ती कन्नड लिपीत लिहिली जाते. या भाषेत थोडी बहुत साहित्यनिर्मिती अधून-मधून होत

असली तरी ती फारशी महत्त्वाची म्हणता येत नाही. कन्नड हीच कोडवाची साहित्यभाषा आहे मात्र दैनंदिन जीवनात ते कोडगूचाच वापर करून आपली अस्मिता टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करीत असतात.

अशा या लोकाचा सविस्तर परिचय मराठी वाचकाना निश्चितच उद्बोधक व मनोरंजक वाटेल

* * *

# २

# कोडव कोण आहेत ?

गोरा रंग, धिप्पाड शरीर, तरतरीत नाक, देखणा चेहरा, भेदक डोळे वगैरे शारीरिक वैशिष्ट्ये आणि वाटेल तेवढ्या मोठ्या समुदायात उठून दिसणारा पोषाख यामुळे कोडव लोक इतर भारतीयाहून वेगळे असल्याचे चटकन जाणवते. विशेषत: ज्या दक्षिण भारतात त्यांचे निवासस्थान आहे तेथील लोकाहून तर ते सर्वच बाबतींत वेगळे आहेत. असे हे लोक कोण आहेत ? ते कोठून आले ? कधी आले ? त्याचा इतिहास काय ? वगैरे अनेक प्रश्न आपल्यासमोर उभे राहातात. यांपैकी फारच थोड्या प्रश्नाची समाधानकारक उत्तरे आतापर्यंत मिळू शकली आहेत.

## कावेरी पुराणातील ' उग्र '

स्कंदपुराणातील एक भाग ' कावेरी माहात्म्य ' किंवा ' कावेरी पुराण ' या नावाने प्रसिद्ध आहे. कावेरीचा उगम कूर्गमध्ये झालेला असल्याने कूर्ग देश आणि कोडव लोक यांचा उल्लेख कावेरीपुराणात येणे क्रमप्राप्तच होते. त्यामध्ये कोडवाच्या उत्पत्तीची पुढील कथा देण्यात आली आहे :—

" मत्स्य देशाचा कदंब घराण्यातील राजा सिद्धार्थ याला चार मुलगे होते. त्यांतील सर्वांत धाकटा व हुशार मुलगा चंद्रवर्मा वयात आल्यावर तीर्थयात्रेसाठी दक्षिण भारतात गेला. तेथील ब्रह्मगिरी पर्वतावर त्याने पार्वतीची उपासना सुरू केली. पार्वतीने प्रसन्न होऊन वर मागण्यास सांगितले, तेव्हा तो म्हणाला, " मला एक राज्य मिळावे, क्षत्रिय पत्नीपासून मला मुले व्हावीत आणि शेवटी मला मोक्ष-

प्राप्ती व्हावी." यावर पार्वतीने सांगितले, "तुझ्या पूर्वजन्मातील पापामुळे तुला क्षत्रिय स्त्रीपासून सनती होणार नाही. शूद्र स्त्रीपासून होणाऱ्या मुलावरच तुला समाधान मानावे लागेल." एवढेच नव्हे तर तिने स्वत च एका शूद्र तरुणीशी त्याचा विवाह लावून दिला आणि सांगितले, "या पत्नीपासून तुला अकरा मुलगे होतील. त्याना उग्र या नावाने सबोधिले जाईल. ही मुले शूर, सदाचारी व ब्राह्मणाचा आदरसत्कार करणारी होतील. इतर सर्व बाबतींत त्याचे स्थान क्षत्रियाच्या बरोबरीचे राहील. मात्र त्याना वेदोक्त संस्काराचा अधिकार असणार नाही. तुझ्या वंशजाच्या सुखसमृद्धीसाठी मी कावेरी नदीच्या रूपाने या (कूर्ग) देशात अवतरीन. आता तू पुढे होऊन या देशातील म्लेंच्छाचे निर्दाळण कर." एवढे बोलून पार्वतीने चंद्रवर्म्याला एक विजयी तलवार, वायुवेगाने धावणारा एक शुभ्र घोडा आणि म्लेच्छाना कूर्गमधून पिटाळून लावण्यासाठी आवश्यक असणारे सैन्य दिले. देवीचा आदेश शिरसावंद्य मानून चद्रवर्म्याने कूर्ग देशातून म्लेच्छाची पूर्ण हकालपट्टी केली.

पुढे त्याने आपल्या क्षत्रिय जातीच्या एका तरुणीशी वैदिक पद्धतीने लग्न केले. ब्राह्मणानी त्याला राज्याभिषेक केला, तेव्हा त्याने त्याना जमिनी व घरे दान केली. आपला बाप ज्या देशावर राज्य करीत होता त्याचे स्मरण राहावे म्हणून त्याने कूर्गला मत्स्यदेश असे नाव दिले. देवीचा आदेश धुडकावून लावून त्याने शूद्र पत्नीपासून झालेल्या अकरा मुलावर नामकरण, चूडाकर्म, उपनयन वगैरे वेदोक्त संस्कार केले. अशा प्रकारे इतर द्विजाच्या पक्तीला त्याना नेऊन बसविण्यात आले.

ही मुले मोठी झाल्यावर त्यानी विदर्भ देशाच्या राजाच्या शंभर राजकन्याशी लग्ने केली. थोरला मुलगा देवकांत याने वीस मुलींशी लग्ने केली. दुसऱ्याने सोळा राजकन्याशी, तिसऱ्याने बारा राजकन्याशी, याप्रमाणे त्यानी विवाह केले. त्याच्यापैकी प्रत्येकाला शभराहून अधिक मुलगे झाले. ते सारेच अत्यत शूर व पराक्रमी निपजले. त्याच्या बोटाची नखे डुकराच्या नख्याहून अधिक मजबूत व धारदार होती. त्यांच्या साह्याने त्या मुलानी डोंगर खणून तेथे सपाट जमीन तयार केली, आणि जंगले तोडून नवीन जमीन लागवडीखाली आणली त्याचा हा पराक्रम वराह अवताराच्या पराक्रमासारखा असल्याने त्याच्या देशाला 'क्रोडदेश' असे नाव प्राप्त झाले; (क्रोड म्हणजेच वराह अथवा डुकर) व त्या देशात राहणाऱ्या लोकांना क्रोड लोक असे संबोधिण्यात येऊ लागले. कालातराने या क्रोड

शब्दाचेच रूपांतर कोडगू व कोडव असे झाले."

अर्थात ही सारीच कथा इतर पौराणिक भाकडकथांप्रमाणे हास्यास्पद व कपोलकल्पित (फँटॅस्टिक) असल्याचे उघडउघड दिसून येते. 'पट्टोले पळमे' (पट्ट म्हणजे वस्त्र. ओले म्हणजे ताडपत्र पळमे म्हणजे बोलणे, माहिती कापडासारख्या ताडपत्रावरील माहिती किंवा दंतकथा.) या पुस्तकाचे लेखक श्री एन्. चिन्नप्पा यांसारखे तुरळक कूर्गचे अभ्यासक या कथेवर विश्वास ठेवीत असले तरी बहुतेक कोडव तिच्यावर मुळीच विश्वास ठेवीत नाहीत. कोडवाचे आर्थिक सामर्थ्य व शस्त्रबल लक्षात घेऊन त्याना वैदिक धर्मात समाविष्ट करून घेण्यासाठी ब्राह्मणानी योजलेली ही एक क्लृप्ती असली पाहिजे हे सहज लक्षात येते. परंतु असे करताना कोडवाना सरळसरळ क्षत्रिय म्हणून मान्यता देण्यास त्यानी खळखळ केली असल्याचेही दिसून येते. इतर क्षत्रिय रानडुकराचे मास खात असले तरी गावठी डुकराचे मास त्यांना निषिद्ध असते. कोडवाना गोमासाखेरीज कसलेही मांस निषिद्ध नाही. त्याच्या या आहारविषयक अनिर्बंधपणामुळेच त्याना शुद्ध क्षत्रिय म्हणून मान्यता देण्यास ब्राह्मणानी हरकत घेतली असावी. काही कोडवांना आपण पाडवांचे वशज आहोत असे वाटते, आणि त्याला पुरावा म्हणून ते कोडवामध्ये प्रचलित असलेल्या काही प्रथाचा आधार घेतात. परंतु त्याला विद्वानाची मान्यता दिसत नाही.

## ब्राह्मणांबद्दल तिरस्कारबुद्धी

सर्वसामान्य शिक्षित कोडवाशी बोलताना त्यांच्या मनात ब्राह्मणाबद्दल एक प्रकारची अढी, तिरस्कार व तुच्छता असल्याचे मला आढळून आले आहे. ब्राह्मण ही आपल्यापेक्षा हलकी जात आहे, ब्राह्मणाशी शरीरसबध ठेवणे कमीपणाचे आहे, एवढेच नव्हे तर ब्राह्मण हा अशुभ आहे, अशीही भावना कोडवांमध्ये आढळते. याचे कारण बहुधा त्यांच्या उत्पत्तीसंबधी ब्राह्मणानी ही जी अपमानास्पद कथा रचली आहे तेच असावे. कावेरी महात्म्यातील ही कथा वाचताना आपल्याला राजर्षी शाहू छत्रपतींच्या वेदोक्त प्रकरणाचे स्मरण होणे स्वाभाविक आहे. ब्राह्मणाविषयीचा कोडवांचा हा तिरस्कार त्याच्यातील अम्मा कोडव या लहानशा जातीच्या संबधातही दिसून येतो. मात्र जी उत्पत्तिकथा त्यांना अपमानास्पद वाटते तशीच उत्पत्तिकथा अम्मा कोडवाविषयी खरी असल्याचे मानण्यात आपण काही

विसंगती करतो, याची कल्पना त्यांना असत नाही.

**अम्मा कोडव**

जातिव्यवस्था किंवा जातिभेद हे हिंदू धर्माचे एक व्यवच्छेदक लक्षण आहे. किंबहुना धर्माचे व्यापक स्वरूप लोकांच्या लक्षात येण्यापूर्वी जात ही धर्मवाचकच समजली जात होती; आणि आजही बहुतांश लोक जातीलाच धर्म समजतात. या जातिप्रथेचा पगडा भारतीय जनमानसावर इतका जबरदस्त आहे की धर्मांतरानंतरही अनेक खिस्ती लोक आपली जात सोडण्यास तयार नसतात. याचे नेहमीच्या व्यवहारातील उदाहरण म्हणजे ब्राह्मण किंवा सारस्वत खिश्चन लोक अब्राह्मण किंवा अस्पृश्य खिश्चनांशी बेटीव्यवहार करण्यास आजही तयार होत नाहीत. अशा स्थितीत कोडवांवर जातिप्रथेचा प्रभाव पडला नसता तरच आश्चर्य. वस्तुत कोडव ही एकसंध जमात आहे. तिच्यात जातिभेद किंवा अस्पृश्यता यांना स्थान नाही. परंतु तिच्यातही अम्मा, सन्न, मल्लु व जम्मा अशा चार जाती निर्माण झाल्या होत्या. कूर्गच्या लिंगायत राजांनी लष्करी सेवेसाठी अनेकांना इनाम जमिनी दिल्या होत्या. त्यांना जम्मा जमिनी असे म्हणतात. संस्कृत 'जन्म' शब्दापासून जम्मा हा शब्द बनला आहे, व त्याचा अर्थ 'वंशपरंपरागत' असा आहे. (कदाचित अरबीच्या 'जमअ' म्हणजे एकत्रित किंवा जमीन महसूल या शब्दापासूनही तो बनला असेल! जम्मा जमीन विकता येत नाही, तिचे विभाजन होऊ शकत नाही, तिचे हस्तांतरण करता येत नाही अथवा ती पोटभाड्याने देता येत नाही – तिच्यात वाटेकरी घेता येत नाही, यावरून अरबी 'जमअ'चा 'एकत्रित' हा अर्थ अधिक संयुक्तिक वाटतो.) ही जम्मा जमीन धारण करणाऱ्या काही कन्नड ओक्कलिग व तुळू गौडा लोकांनी कोडव जमातीत स्वतःचा शिरकाव करून घेतल्यानंतर त्यांना उद्देशून जम्मा कोडव हा शब्द वापरला गेला. सन्न म्हणजे लहान किंवा बारीक व मल्लु म्हणजे मोठा किंवा जाडाभरडा. सन्न तांदूळ उत्तम व मल्लु तांदूळ निकृष्ट समजला जातो त्यावरून सत्ता व संपत्ती असलेले कोडव स्वतःला सन्न व इतरांना मल्लु समजू लागले. परंतु कालांतराने या तिन्ही जाती मुख्य कोडवांमध्ये समाविष्ट झाल्या. फक्त अम्मा कोडव ही एकच वेगळी जात उरली आहे. १९४१ च्या जनगणनेप्रमाणे अम्मा कोडवांची संख्या केवळ ६६६ होती. त्यानंतर ती फारशी वाढली

नसल्याचीच शक्यता आहे. एकूण कोडवाशी तुलना करता ही फारच अल्प आहे. तरीपण तिच्या वैशिष्ट्यामुळे तिची माहिती करून घेणे उद्बोधक ठरेल.

## ब्राह्मण्याचा प्रभाव

अम्मा कोडव हे कोडवामधील ब्राह्मण आहेत असे म्हणण्यास हरकत नाही. ते पूर्ण शाकाहारी असून त्यांच्या धार्मिक संस्कारावरही ब्राह्मण्याचा पगडा स्पष्ट दिसून येतो. कोडवाच्या आहारात मद्य-मांसाला फार महत्त्वाचे स्थान आहे; तर अम्मा कोडवामध्ये मद्य-मांस पूर्णपणे निषिद्ध मानले जाते. ब्राह्मणाप्रमाणे ते जानवे घालतात आणि वार्षिक श्राद्ध वगैरे करतात. ते स्वतःला इतर कोडवांहून श्रेष्ठ समजतात; परंतु इतर कोडव त्यांना तुच्छ समजतात. बहुधा हिंदू धर्मातील ब्राह्मणांचे वर्णवर्चस्व पाहून काही कोडवांनी स्वतःला इतरांचे पुरोहित मानून ब्राह्मणी जीवनपद्धतीचा स्वीकार केला असावा; परंतु कूर्गमध्ये बाहेरून खरेखुरे ब्राह्मण आल्यावर या अम्मा कोडवांची भिक्षुकी गेली. त्यानंतर ते ब्राह्मणही राहिले नाहीत व क्षत्रियही राहिले नाहीत.

अम्मा कोडवाच्या उत्पत्तीसंबंधी पुढील दंतकथा प्रचलित आहे

केरळमधील वायनाड गावच्या ताइकाट तंब्रिन नावाच्या ब्राह्मणाला एक मुलगी होती. ती लग्नापूर्वीच रजस्वला झाल्यामुळे तंब्रिनने तिला घरातून हाकलून दिले तिने एका कोडवाशी लग्न केले. त्या उभयतांना जी मुले झाली त्यांना अम्मा कोडव असे नाव प्राप्त झाले. (अम्मा म्हणजे आई, ती मुले आईचे रीतिरिवाज पाळू लागल्यामुळे त्यांना हे नामाभिधान प्राप्त झाले.) दक्षिण भारतात 'अम्मा' हा शब्द सामान्यतः स्त्रियांच्या नावाबरोबर वापरला जातो. पण अम्मा कोडवामध्ये तो पुरुषांच्या नावाशी जोडला जातो. कोडगू भाषेत आईसाठी अव्वा हा शब्द वापरला जातो, आणि तो स्त्रियांच्या नावाबरोबर जोडला जातो. बापाला अप्पा म्हणतात, आणि तो शब्द पुरुषांच्या नावाशी जोडला जातो.

कूर्गचा शेवटचा (लिंगायत) राजा वीर राजा याच्या कारकीर्दीच्या अखेरीस अम्मा कोडव स्वतःला 'कावेरी ब्राह्मण' म्हणवून घेऊ लागले. कावेरी व तिचा नवरा अगस्ती यांच्या भांडणात अगस्त्याच्या ब्राह्मण शिष्यांनी कावेरीची बाजू घेतल्यामुळे क्रुद्ध होऊन अगस्त्याने "हे मत्स्यदेशातील ब्राह्मणांनो, तुमची आज्ञा कोणी मानणार नाही, आणि तुम्हाला पोटभर अन्न मिळणार नाही", असा शाप

दिला. तेव्हा ते कावेरीला शरण गेले. कावेरीने त्याना असे आश्वासन दिले की, "जोपर्यंत तुम्ही माझी भक्ती करीत राहाल तोपर्यंत तुमच्या पोटाला कमी पडणार नाही." त्या ब्राह्मणाचे आपण वंशज आहोत, असे अम्मा कोडव म्हणू लागले.

कोडवांना आपल्या क्षत्रियत्वाचा प्रखर अभिमान असल्यामुळे स्वाभाविकपणेच ते अम्मा कोडवांना आपल्यापेक्षा तुच्छ लेखू लागले. ब्राह्मणी संस्कृतीचा स्वीकार व ब्राह्मणी संस्काराचे पालन करून अनेक जमाती स्वत:ला श्रेष्ठ समजू लागल्याचे व इतर लोकही त्याना मान देऊ लागल्याचे अनेक दाखले आधुनिक इतिहासातही आढळतात. परंतु कोडवाच्या बाबतीत या प्रक्रियेचा उलटाच परिणाम झालेला दिसतो. कोडवांनी ब्राह्मणाचे श्रेष्ठत्व व वर्चस्व सतत नाकारल्याचेच आढळून येते. हिंदूधर्माच्या एकूण प्रभाव-परिघाच्या बाहेर राहण्याचा कोडवांचा हा प्रयत्न त्यांच्या अहिंदुत्वाच्या सिद्धांतालाच पुष्टी देतो.

## आर्यांच्या पूर्वी भारतात आलेली जमात

कोडवासंबंधी ज्या भारतीय व विदेशी लेखकांनी आजवर लिखाण केले आहे त्यांच्यामध्ये कोडवांच्या मूलस्रोतासंबंधी पुष्कळच मतभेद आढळतो. फादर हेन्री हेरास या ख्रिस्ती मिशनऱ्याच्या मते कोडव लोक आर्यांच्या आगमनापूर्वी मोहनजोदडो (मोहेंजोदारो) संस्कृतीच्या काळातच सिंधूच्या खोऱ्यात येऊन पोचले होते, कारण मोहनजोदडोतील एका अभिलेखात 'कुडुग' असा शब्द आलेला आहे. डॉ. जे. एच. हटन यांनी १९३१ च्या जनगणना-विवेचनात फादर हेन्री हेरासच्या या मताचे समर्थन केले आहे. सिंधूच्या खोऱ्यातून पश्चिम किनाऱ्याने दक्षिणेत उतरलेल्या लोकांपैकी 'कुडुग' लोकांची शाखा कूर्गमध्ये पोचली आणि तिच्यामुळे त्या प्रदेशाला 'कोडगू' हे नाव प्राप्त झाले असा निष्कर्ष या चर्चेवरून निघतो.

कूर्ग गॅझेटियर' तयार करणारे श्री. बी. एल. राइस यांच्या मते कोडव हे सीथो द्राविडियन असावेत. सम्राट सिकंदर (अलेक्झांडर) च्या सैन्यातील जे सिथियन लोक भारतात राहिले त्यांच्यापैकी काही दक्षिणेत येऊन कूर्गमध्ये स्थायी झाले. इतर लोक राजस्थान-काठेवाडात राहिले. त्यांचा अन्य हिंदूंशी घनिष्ठ संबंध आल्याने ते राजपूत-क्षत्रिय म्हणून हिंदुधर्मात विलीन झाले, परंतु कूर्गच्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे कोडवांचा इतर हिंदूंशी फारसा संबंध न आल्यामुळे

त्यांची मूळची संस्कृती टिकून राहिली. 'मंगराज निघंटु' या कन्नड भाषेतील जुन्या शब्दकोशात कोडवाना 'म्लेच्छ' या नावाने संबोधण्यात आले आहे. त्यावरून द्राविडाना ते परके वाटत असले पाहिजेत, असे दिसून येते.

बिळुगुंडाचे अब्दुल गफूर खान व बेंगळूरचे फजलुल हसन यांनी आपल्या पुस्तकात पोषाख व रीतिरिवाज याच्या बाबतीत कोडव व अरब याच्यात किती साम्य आहे हे दाखवून दिले आहे. विशेषत मूर्तिपूजेचा अभाव व स्त्रियाच्या पोषाखाची पद्धत या गोष्टी विचारात घेण्यासारख्या आहेत. अरब प्रदेशातील कुर्द लोकाच्या पोषाखाशी कूर्गच्या लोकांच्या पोषाखाचे विशेष साम्य आहे असे म्हणतात. इस्लामपूर्वकाळात जे अरब केरळच्या किनाऱ्यावर आले त्याच्यापैकी काही कूर्गमध्ये येऊन स्थायिक झाले असण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे त्याचे म्हणणे आहे.

कोडवामध्ये अश्वारोहणाची विशेष आवड आढळते. आणि हा भाग तर घोड्यासाठी प्रसिद्ध नाही. यावरून कोडवाचे उगमस्थान कोठेतरी घोड्याच्या प्रदेशात–मध्यपूर्वेत किंवा पश्चिम आशियात असले पाहिजे, असा युक्तिवाद करणारेही भेटतात. त्यांच्या या युक्तिवादाला पुरातत्त्वविद् (पुराणवस्तुसशोधक) डॉ. कौ. का. सुब्बय्या याच्या संशोधनाने चागलीच पुष्टी मिळते. कूर्ग जिल्ह्याच्या सोमवार पेट तालुक्यातील हेग्गडेहळ्ळी या गावाजवळ डॉ. सुब्बय्या यानी केलेल्या उत्खननात त्यांना ज्या महाप्रस्तर समाध्या (मेगॅलिथ्स) सापडल्या त्यातील हाडे, मातीची भाडी, वगैरे वस्तूंवरून कूर्गमधील मेगॅलिथ्सशी मध्य-पूर्वेतील मेगॅलिथ्सचे फारच साम्य व जवळचा संबंध असल्याचे त्यानी सप्रमाण सिद्ध केले आहे. याच संशोधनाबद्दल त्याना १९७२ साली पुणे विद्यापीठाकडून पीएच. डी. मिळाली आहे. आपल्या 'आर्कियॉलॉजी ऑफ कूर्ग विथ स्पेशल रेफरन्स टू मेगॅलिथ्स' या प्रबधात त्यानी या विषयाचे सविस्तर विवेचन केले आहे. कोडव लोक मध्यपूर्वेकडून आलेले आर्य असावेत असे अनुमान त्यानी व्यक्त केले आहे. परंतु कोडवांच्या ज्या एका स्वभाववैशिष्ट्याचा त्यानी आवर्जून उल्लेख केला आहे त्यावरून ते आर्यांच्या पूर्वी येथे बाहेरून आलेल्या एखाद्या जमातीतील असावेत, या अनुमानालाच अधिक पुष्टी मिळते. ज्या कूर्ग किंवा कोडव जमातीवरून या प्रदेशाला कूर्ग हे नाव मिळाले त्या जमातीने या प्रदेशावर कधीच राज्य केले नाही, कारण ते सदैव आपसात भाडत राहिले.

या बाबतीत डॉ. सुब्बय्या म्हणतात, " हे कोडव लोक नेहमीच आपसात झगडत राहिले प्रत्येकाला दुसऱ्याचे सामर्थ्य व प्रभाव याचा हेवा वाटत असे. त्यामुळे कूर्गच्या राजसिंहासनावर कोणाही कोडवाची स्थापना होण्यास त्यानी सतत विरोध केला." वस्तुत त्याना कूर्गवर कोडवाचे राज्य सहज स्थापन करता आले असते परतु आपसातील त्याच्या यादवीमुळे बाहेरून आलेल्या, दक्षिण भारतातील चोळ गग, होयसळ, विजयनगरचे सम्राट वगैरे बलाढ्य घराण्याचे सरदार असलेल्या, चेंगाळव आणि कोंगाळव या जैन घराण्यानी आणि नतर लिंगायत राजानीच कूर्गवर राज्य केले. ' सहवीर्यं करवावहै 'चे ध्येय समोर ठेवणाऱ्या आर्यांपेक्षा आपसात लढणारे हे लोक वेगळे असावेत, असेच अनुमान काढणे अधिक सयुक्तिक ठरते.

शिवाय आर्यांची जातिप्रथा, वर्णव्यवस्था व सस्कृतचा प्रभाव यापासून कटाक्षाने दूर राहाण्याचा कोडवाचा प्रयत्न लक्षात घेतल्यास आर्यांशी त्याचा संबंध नसावा, असेच अनुमान निघते. स्वत चा धर्मग्रथ नसलेली कोडव ही बहुधा एकच सुधारलेली भारतीय जमात असावी. जन्म, लग्न, मृत्यू यासारख्या महत्त्वाच्या संस्कारप्रसगी संस्कृत मंत्रांचा वापर न करणारेही बहुधा कोडव हेच एकमेव उच्चवर्णीय असावेत.

मुंबई विद्यापीठाचे डॉ. जी. एस. घुर्ये याच्या मते कोडव लोक इडोसिथियन वशाचे असावेत, तर ' मॅन्युअल ऑफ कूर्ग 'चे लेखक श्री. जी. रिश्टर कोडव लोक दक्षिण भारतातील द्राविड वशाशी संबंधित असावेत असे प्रतिपादितात. परंतु कोडवाचे रगरूप, नाक, डोक्याची मापे वगैरेवरून त्यांचा द्राविडाशी मुळीच संबंध नसल्याचे सिद्ध होते. सर एरस्किन पेरी, श्री एल. ए. कृष्णन ऐयर, लेफ्टनट पी. कॉन्नोर, श्री बी. डी. गणपती वगैरे लेखक कोडवांचा स्थानिक द्रविड जमातीशी कसलाही संबध नसल्याचे दाखवून देतात. " महाराष्ट्रातील चित्पावन ब्राह्मण अणि आम्ही एकाच जमातीचे लोक आहोत. त्यानी ब्राह्मण्य स्वीकारले, आणि आम्ही क्षत्रियत्व कायम ठेवले." असे सागणारे-ही अनेक लोक भेटतात, तर आपण शक-हूण वगैरे भटक्या टोळ्याशी सबधित असल्याचेही काही लोक सागतात

## इतिहासपूर्वकाळातील भटकी जमात

या सर्व मताचे परिशीलन केल्यानतर आणि कोडवाची शारीरिक-मानसिक

वाशिष्ट्य, विचारप्रणाली, सण-संस्कार वगैरेंचे सूक्ष्म निरीक्षण केल्यावर मी स्वत: अशा निष्कर्षाविर आलो आहे की आर्यांच्या आगमनापूर्वी, इतिहासपूर्वकाळात ज्या भटक्या जमाती भारतात येऊन स्थायिक झाल्या त्यापैकी कोडवाची जमात ही एक असावी. चोहोबाजूंनी प्रचंड डोंगर व घनदाट जगल यानी वेढलेल्या कूर्गसारख्या छोट्याशा प्रदेशात जाऊन तिने स्वत ला इतर जगापासून का तोडून टाकले असावे, याचा नीटसा उलगडा होत नाही. इसवी सनाच्या नवव्या शतकापर्यंत या जमातीचा काही मागमूस इतिहासात सापडत नाही. नतर सोळाव्या शतकापर्यंतही फारसे महत्त्वाचे उल्लेख आढळत नाहीत यावरून इतर समाजाशी मिसळण्याची अथवा त्याच्याशी एकरूप होण्याची ओढ या जमातीला नसली पाहिजे, आपले वेगळेपण टिकवून ठेवण्याचीच तिने सतत धडपड केली असली पाहिजे, हे उघड दिसते. इंग्रजाच्या आगमनानंतर या परिस्थितीत आमूलाग्र परिवर्तन घडून आले. कूर्गच्या नैसर्गिक सौंदर्याने व थड हवेने इंग्रजाना मोहिनी घातली, आणि त्यांनी तेथे आपले वास्तव्य करून शेवटपर्यंत हा प्रदेश वेगळा ठेवला. त्यामुळे भारतीय समाजाशी एकरूप होण्याची प्रक्रिया तेथे फारच मद व सौम्य स्वरूपात घडत राहिली. उलट इंग्रजी शिक्षणाने इंग्रजी भाषा व संस्कृती याचाच प्रभाव त्याच्यावर अधिक पडला; आणि ते मुख्य भारतीय समाजापासून काही प्रमाणात वेगळेच राहिले. तरीपण लष्करी पेशाची स्वाभाविक आवड असल्याने कोडवानी इंग्रजाच्या लष्करात मोठ्या प्रमाणावर प्रवेश केला; आणि तेथे मर्दुमकीबद्दल ख्याती मिळविली. इंग्रजाच्या या प्रभावाने भारतीय स्वातंत्र्यलढ्यापासून कोडवाना जवळ-जवळ अलिप्तच ठेवले. कै. पंधड बोळ्यप्प ( श्री पी. बेळियप्पा ) याच्यासारखा एखादा अपवाद वगळल्यास कूर्ग प्रदेश सामाजिक-राजकीय चळवळीपासून दूरच राहिला. स्त्रियांविषयी आदर हा कोडवाचा विशेष गुण समजला जातो. भारतातील इतर कोणत्याही समाजात स्त्रीविषयी इतका आदर आढळत नाही. बहुधा त्यामुळेच स्त्रियांच्या उन्नतीसाठी इतर समाजात ज्याप्रमाणे अनेक समाजसुधारकाना जन्म घ्यावा लागला त्याप्रमाणे कोडव समाजात घडले नाही.

अर्थात अशा प्रकारे आधुनिकीकरणाची किंवा पाश्चात्यीकरणाची प्रक्रिया चालू असताना कोडवांनी आपली अस्मिता व अनन्यता ( Identity ) टिकवून ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न केला असल्याचे दिसून येते. घराण्याची प्रतिष्ठा,

घराची ओढ, आपल्या जमातीचा अभिमान, यासारख्या गोष्टींतून जसा हा प्रयत्न दिसून येतो तसाच तो पारंपरिक श्रद्धावरील निष्ठा, भुताखेतांवरील विश्वास, लोकभ्रमाचा पगडा वगैरे गोष्टींतूनही दिसून येतो. आधुनिकीकरणाशी या परपरागत श्रद्धांचा मेळ कोडव लोक कसा घालतात ते पाहाणे मनोरंजक ठरते. आधुनिक विज्ञानाच्या वेगवेगळ्या शाखामध्ये प्राविण्य मिळविलेले तरुण कोडव स्त्री-पुरुष जुन्या लोकभ्रमावर मनापासून विश्वास ठेवतात, हे पाहिले की आपल्याला आश्चर्य वाटते. कोडवांच्या मनावरील लोकभ्रमाचा हा पगडा पाहिला की ही जमात आर्यांच्या आधी भारतात आली असली पाहिजे, निदान आर्यांशी तिचा काही सबध नसला पाहिजे, असे अनुमान काढता येते.

सस्कृतीकरण–संस्कृत भाषेचा प्रभाव किंवा Sankritization–आणि सस्कृत भाषेविषयीचे प्रेम हे आर्यांचे व हिंदू धर्माचे एक प्रमुख वैशिष्ट्य समजले जाते. त्यापासून अलिप्त राहाण्याचा कोडवानी निकराचा प्रयत्न केला असावा असे दिसते मुलामुलींची नावे ठेवताना सस्कृत शब्द टाळण्याकडेच त्याची प्रवृत्ती असल्याचे आढळून येते. मात्र अम्मा कोडवात संस्कृत विशेषनामे प्राचुर्याने आढळतात. हिंदू देव-देवतानी काही कोडव घरामध्ये प्रवेश केला असला तरी तो अजून ओसरीपर्यंतच मर्यादित आहे. देवघरामध्ये त्यांना प्रवेश मिळालेला नाही. याचाच एक परिणाम म्हणून कोडवामध्ये सस्कृत भाषेच्या अध्ययनाविषयी एक प्रकारची उदासीनता आढळते. अर्थात सर्वच अब्राह्मण जमातींविषयी हे विधान खरे आहे, परंतु कोडवाच्या बाबतीत त्याला एक वेगळी पार्श्वभूमी आहे. अन्य जमातींच्या बाबतीत संस्कृतवरील प्रभुत्व ही एक आकांक्षणीय गोष्ट समजली जात असे. डॉ. आबेडकर यांनाही संस्कृत शिकण्याची इच्छा होती व त्यानी सस्कृतवर प्राविण्य मिळविले होते. अशी भावना कोडवामध्ये मुळातच उद्भवली नसावी, असे दिसते. कारण त्यानी सस्कृत भाषा व ब्राह्मणी सस्कृती याचे श्रेष्ठत्व कधीच मान्य केले नव्हते.

या सर्व विवेचनाचा अर्थ कोडवाना हिंदू धर्माविषयी आपलेपणा नाही किंवा दुजाभाव वाटतो, असा मात्र मुळीच नाही. उलट ते स्वत:ला हिंदूच समजतात. किंबहुना इतर हिंदूपेक्षा ते काहीसे जास्त कट्टरच असल्याचे अनुभवास येते. कदाचित टिपू सुलतानाने त्याच्यावर केलेल्या अत्याचाराचीही ती प्रतिक्रिया असू शकेल. जनसंघाविषयी कोडवांना वाटणारी आत्मीयता त्याच्या या प्रतिक्रियेतूनच

निर्माण झाली असावी, असे मला वाटते. कदाचित परंपरागत संस्कार व संस्कृतीविषयी जनसंघाला वाटणाऱ्या आकर्षणामुळेही ते त्याच्याकडे ओढले गेले असावेत. ते काहीही असो. कोडवाची एकूण धर्मसंकल्पना हिंदू धर्माच्या सर्व-सामान्य संकल्पनेहून वेगळी असली तरी आज ते हिंदू धर्माच्या पोटातच समाविष्ट झाले आहेत. परतु त्याचा मूलस्रोत आर्यांहून वेगळा असावा, हा सिद्धात त्यामुळे खोटा ठरत नाही. कधीकाळी त्याच्या मूलस्रोतावर अधिक प्रकाश पडल्यास त्याच्या जीवनपद्धतीचा व समाजव्यवस्थेचा अधिक उलगडा होऊ शकेल.

* * *

# ३

# कोडवांचा धर्म

भारतीयाची व विशेषत हिंदूची धर्मविषयक संकल्पना तिपेडी किंवा त्रिस्तरीय असते. कुलदैवत व कुळाचार हा पहिला स्तर किंवा परीघ. हा त्या–त्या कुटुबापुरता किंवा घराण्यापुरता मर्यादित असतो. ग्रामदैवत व गावचे सामुदायिक सण-समारभ हा त्याहून मोठा असलेला परीघ; आणि सपूर्ण हिंदू समाजाला व्यापणारा किंवा स्पर्श करणारा धर्म हा सर्वांत मोठा व सर्वसमावेशक परीघ. अधिकांश जाती-जमातींमध्ये हे तीन्ही परीघ एकमेकात गुंतलेले असतात. त्यामुळे त्याच्यात द्वैत अथवा विरोध निर्माण होत नाही, किंवा परकेपणाची भावनाही उत्पन्न होत नाही. कारण कुलदैवत, ग्रामदैवत आणि सार्वभौम हिंदू दैवते ही एकाच परमेश्वराची विविध रूपे आहेत, हे सर्वांनी मनोमन जाणलेले असते. आदिवासींच्या बाबतीत थोडा वेगळा प्रकार घडलेला आहे. त्याच्या विशिष्ट दैवताचा सार्वभौम हिंदू दैवताशी साधा जुळलेला नसतो. तरीपण ज्या दगडा-धोंड्याच्या व झाडा-खोडाच्या रूपात त्याची दैवते विद्यमान असतात त्याच्याशी हिंदू दैवताचा संबध जोडणे अगदीच अशक्य नसते. शिवाय आदिवासी समाज अन्य नागर समाजाशी अद्यापि एकरूप झालेला नसल्याने त्याच्या देवदेवताची तशी कोणी फारशी चौकशी करीत नाही हिंदू समाजाचा विचार करताना बहुधा आपल्याला आदिवासींचा विसरच पडलेला असतो.

### कोडवांच्या धर्माचे वैशिष्ट्य

कोडव समाजही आदिवासींप्रमाणे मागसलेलाच राहिला असता, त्याचे आधुनिकीकरण व पाश्चात्यीकरण इतक्या झपाट्याने झाले नसते, आणि भारतीय

समाजात त्याला एवढे मानाचे व महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले नसते तर त्याच्या धार्मिक संकल्पनाकडे कोणी फारसे लक्षच दिले नसते. त्या समाजाने आपली अनन्यता ( identity ) हिंदू समाजाच्या सागरात विसर्जित करून टाकली असती, आपले वेगळेपण टिकवून ठेवले नसते, तरीदेखील त्याच्या धर्मविचाराची कोणी दखल घेतली नसती. परंतु या समाजाने आधुनिकीकरणाची आपली प्रक्रिया चालू ठेवण्याबरोबरच आपला परंपरागत वेगळा धर्म टिकवून ठेवल्यामुळे स्वाभाविकपणेच त्याच्या धर्मकल्पनाविषयी इतराच्या मनात सदैव कुतूहल राहात आले आहे.

कोडवानी व्यापक हिंदू धर्माचे सार्वभौमत्व मान्य केले आहे. खेड्यातील ग्रामदैवताचे आधिपत्यही नाकारलेले नाही. परंतु या दोन्ही धराशी मेळ न खाणारी आपली धर्मकल्पनाही सोडलेली नाही. मूर्तिपूजा, जातिभेदाधिष्ठित समाजव्यवस्था, वेद अथवा पुराणे याचे प्रामाण्य आणि धार्मिक संस्कारातील संस्कृत मंत्राची अनिवार्यता इत्यादी हिंदू धर्माच्या अपरिहार्य अगाचा मुळीच स्वीकार न करणारा कोडव समाज पारशी, बौद्ध, ख्रिस्ती अथवा मुसलमान लोकाप्रमाणे हिंदू धर्मापासून सहज अलिप्त राहू शकला असता; किंवा शीख व जैन याच्याप्रमाणे एकीकडे हिंदू धर्मापासून फटकून राहावयाचे व दुसरीकडे त्या धर्माची सर्वसमावेशकता, कुरकुरत का होईना, प्रत्यक्ष व्यवहारात मान्य करावयाची, अशा पद्धतीने आपली सामाजिकता वेगळी राखू शकला असता. परंतु या दोन्ही मार्गांचा अवलब न करता कोडव समाजाने स्वतःचा असा तिसराच मार्ग शोधून काढला. सार्वजनिक जीवनात हिंदू धर्माचे सार्वभौमत्व स्वीकारावयाचे, त्यातील काही सिद्धात मान्य करावयाचे, आणि त्याचबरोबर वैयक्तिक-कौटुबिक जीवनात आपले वेगळेपण कायम ठेवावयाचे. हा तो मार्ग आहे. हा मार्ग अवलंबिल्यामुळे कोडव समाज हिंदु समाजाचे अभिन्न अंग बनला आहे; परंतु त्याचबरोबर तो त्यात विलीनही झालेला नाही. कोडवाच्या धर्माचे हे एक आगळे वैशिष्ट्य म्हणता येईल.

### भूमी व वास्तू यांचे पावित्र्य

कोडव हा मूलतः भूमिपुत्र आहे. शेतीवाडी व वनसंपत्ती हाच त्याच्या जीवनाचा एकमेव आधार राहात आला आहे. आजकाल कूर्गमध्ये दिसणारे

कॉफीचे ( क्वचित चहाचे ) आणि वेलदोड्याचे मळे ही गेल्या शभर-सव्वाशे वर्षांतील घडामोड आहे. त्याआधी भातशेती व वनसंपत्ती यावरच तो सर्वस्वी अवलंबून होता. त्यामुळे भाताचे शेत व जंगल ही दोन्ही त्याच्या दृष्टीने पवित्र ठरली. ज्याप्रमाणे घराच्या पवित्र भागात पादत्राण घालून वावरणे तो निषिद्ध समजतो त्याचप्रमाणे भाताच्या खाचरातही पादत्राण घालून जाणे तो पाप समजतो; आणि आपल्या इस्टेटीतून फिरताना शीळ घालणे अथवा छत्री उघडून डोकीवर धरणे हेही त्या भूमीचा अवमान करण्यासारखेच आहे, असे तो मानतो. या इस्टेटीच्या आवारातच त्याचे देऊळ व स्मशान असते. त्यामुळे त्या संपूर्ण परिसराला एक प्रकारचे पावित्र्य प्राप्त झालेले असते.

वडिलार्जित घर ही त्याच्या दृष्टीने केवळ एक उपयुक्त वास्तू नसून ती देवालयासारखीच एक पवित्र व आदरणीय वस्तू असते. तिच्या पावित्र्याला, श्रेष्ठत्वाला धक्का पोचेल असे काहीही तो करणार नाही व इतराना करू देणार नाही. वास्तुदेव व भूमाता यांच्याविषयीचा एवढा कमालीचा पूज्यभाव अन्यत्र क्वचितच पाहावयास मिळतो.

## मूर्तिपूजेपासून पूर्णपणे अलिप्त

कोडव समाजाच्या धार्मिक संकल्पनेचे आगळेपण मूर्तिपूजेच्या अभावात आहे, असे म्हणता येईल. कोडवाच्या देवघरात कसलीही मूर्ती अथवा ( असमच्या लोकाप्रमाणे ) पोथी नसते. तेथे असते फक्त एक पणती-मातीची किंवा धातूची. हाच त्याचा देव. त्याला गंध, फूल, अक्षता, धूप-दीप वगैरे काही-लागत नाही. (फक्त काही विशिष्ट प्रसंगी त्यावर तांदूळ टाकतात, एवढेच. ) सकाळी संध्याकाळीं व ज्या दिवशी खास कारण असेल त्या दिवशी दुपारी नैवेद्य दाखविण्याच्या वेळी ही पणती पेटवावयाची, तिला नमस्कार करावयाचा आणि ती हाताच्या किंवा पदराच्या वाऱ्याने मालवावयाची दिव्याचे हे पावित्र्य एरव्हीही पाळले जाते. ‘ दिवा विझला ’ असे न म्हणता ‘ दिवा वाढला ’ ‘ दिव मोठा झाला ’ असे आपणही म्हणतो. त्याप्रमाणे कोडव लोक त्याच्या भाषेत ‘ बोळिच दुंबिपोचि ’ किंवा ‘ बोळिच दुबिचिड् ’ असे म्हणतात. त्याचाही अर्थ तोच आहे.

या पणतीप्रमाणेच स्वयंपाकघराच्या चुलीतील अग्नी हाही पवित्र व रक्षणकर्ता मानला जातो. तसा तो आपल्याकडेही मानला जातो. पण चितेला

द्यावयाचा अग्नी घरच्या चुलीतून नेण्याची प्रथा मात्र खास कोडवाचीच असावी. तिच्यातूनही घरच्या अग्नीचे विशेष पावित्र्यच सूचित होते. पारश्याची अग्निपूजा व अग्निहोत्री ब्राह्मणाची अग्निपूजा याहून कोडवाची दीपपूजा ही अगदी वेगळी आहे. त्यामुळे त्यांना अग्निपूजकांच्या सप्रदायात समाविष्ट करता येत नाही. कारण हिंदू व पारशी याच्या अग्निपूजेचे स्वरूप अगदी वेगळे आहे.

## धर्मग्रंथाचा अभाव

शीख व मुसलमान यासारख्या काही जमातींत मूर्तिपूजा नसली तरी पोथी पूजा आहे. ' कुराण ' व ' गुरु ग्रंथ साहेब ' याची स्थापना त्यानी मूर्तीच्या जागी केली आहे. तीही एक वेगळ्या प्रकारची मूर्तिपूजाच म्हटली पाहिजे. तशी पोथी-पूजा कोडवामध्ये नाही, कारण त्याना धर्मग्रथच नाही. धर्मग्रथ नसल्यामुळे साहजिकच अमुक एका भाषेला—धर्म ग्रथाच्या भाषेला—जे पावित्र्य इतर समाजात प्राप्त झालेले असते तसे ते कोडव समाजात झालेले नाही. त्याची प्रार्थना कोडगू भाषेत व गद्यातच असते. तिची कसलीही संहिता नसते. ज्याला जे हवे असेल त्याने ते आपल्या रोजच्या भाषेत, सहज संभाषणाप्रमाणेच मागावयाचे. जणू भक्त देवाशी समोरासमोर बोलत असतो. धर्मग्रथ व संस्कारमत्र यांचाच अभाव असल्याने त्या विषयात प्राविण्य सपादन करणाऱ्या मध्यस्थाची अथवा पुरोहित वर्गाची गरज कोडव समाजाला भासली नाही, आणि स्वाभाविक-पणेच तो जातिभेदरहित, एकसंध समाज म्हणून कायम राहिला.

## पितर-पूजेचे महत्त्व

पितर-पूजा किंवा पूर्वज-पूजा ही या—ना—त्या स्वरूपात सर्वच धर्मांमध्ये प्रचलित आहे, आणि ज्याच्यामुळे आपल्याला अस्तित्व प्राप्त झाले त्याच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा एक मार्ग या दृष्टीने ती स्वाभाविकही म्हटली पाहिजे. त्यामुळे कोणी पितराच्या नावाने ब्राह्मणाना जेऊ घालतात, श्राद्ध व पिंडदान करतात, कोणी कबरस्तानात जाऊन फातिहा पढतात, कोणी कबरीवर फुले वाहतात तर कोणी भिक्षूंना अन्नदान करतात, हे पाहून आपल्याला आश्चर्य वाटत नाही. पण तेथे पूर्वज हे मानवच राहातात. त्याना देवत्व प्राप्त होत नाही. कोडव समाजात मात्र मूळ पुरुष हा देवच असतो; आणि पणती हे त्याचे प्रतीक असते. मूळ पुरुषाची समाधी देवळाइतकीच पवित्र मानली

जाते. इस्टेटीच्या परिसरात त्या मूळ पुरुषाचीच अधिसत्ता असते आपल्या घराण्याचे सरक्षण करणे व सर्वांना सुख-समृद्धी मिळवून देणे याची जबाबदारी या मूळ पुरुषावरच असते. त्यामुळे तेथे इतर देवदेवताना काही स्थान नसते.

**भीतीच्या पोटी जन्मलेल्या श्रद्धा**

मृतात्मे, भुतेखेते, नाग–साप याचीही पूजा, भक्ती कोडव समाजात प्रचलित आहे. अर्थात ती भीतीतून निर्माण झालेली आहे, हे उघड आहे. या बाबतीत त्याचे आदिवासी जमातींशी पुष्कळच साम्य आहे. बिगर आदिवासी जमातींमध्येही अशा श्रद्धा आढळतात, पण त्या अज्ञानापोटी निर्माण झालेल्या असतात. योग्य शिक्षणानतर त्या हळूहळू नाहीशा होताल, कारण त्या त्याच्या धर्म-कल्पनाच्या आधारभूत श्रद्धा नसतात. आदिवासींमध्ये त्या त्यांच्या धर्म-कल्पनाच्या आधारभूत श्रद्धा असल्याने बाहेरून एखादा भाग चिकटावा व थोडा प्रयत्न केल्यावर तो निघून जावा, अशी स्थिती त्याच्या बाबतीत नसते. त्यामुळे शिक्षणाने त्या चटदिशी नाहीशा होत नाहीत. त्याची मुळे मानवी मनात खोलवर जाऊन पोचलेली असतात. अशीच काहीशी स्थिती कोडवांच्या बाबतीत असल्याचे दिसून येते. सुशिक्षित कोडवामध्ये ईश्वर ( शंकर ), भगवती ( पार्वती ), गणपती, वगैरे देवांविषयी जेवढा दरारा व दबदबा असतो त्यापेक्षा जास्त बीर ( मृत वीर पुरुषाचे आत्मे ), पूद ( भूत ), नाथ ( नाग ), गुळिक ( मृत्युदेव–मृत्यू जवळ आला असताना दिसणारा देव ) इत्यादी देवाविषयी असतो. हिंदू सस्कृती व संस्कृतीकरणाची प्रक्रिया याचा प्रभाव कोडवावर फार वरवरचा आहे. त्यानी त्यांच्या खोल अतर्यामी प्रवेश केलेला नाही, याचीच ती खूण आहे, असे मला वाटते. अर्थात इतर समाजाशी त्याचा जसजसा घनिष्ठ सबध येत आहे तसतसा हा प्रभाव अधिकाधिक सखोल बनत आहे हे मान्य केलेच पाहिजे.

**कावेरी मातेचे व गोमातेचे आकर्षण**

आदिवासी दैवताकडून वैदिक-पौराणिक ( म्हणजेच सस्कृतीकरण झालेल्या ) दैवताकडे कोडवांचा जो प्रवास चालू आहे त्यात कावेरी नदीचे आकर्षण आणि गोमातेविषयीचा पूज्यभाव हे दोन बळकट दुवे आहेत. कावेरी माहात्म्यातील कोडवाच्या उत्पत्तीविषयीच्या भाकडकथेवर विश्वास न ठेवणारे कोडवही कावेरीला पवित्र नदी मानतात, आणि कावेरीसंक्रमण हा त्याच्या विशिष्ट सणांतील अत्यत

महत्त्वाचा सण समजला जातो. भारतामध्ये सर्वच स्थानिक नद्या ह्या गंगा असतात. त्याप्रमाणे कूर्गमध्ये कावेरी ही दक्षिण गंगा आहे, आणि विवाहानंतर नववधूचा गृहप्रवेश गंगापूजनाशिवाय पूर्ण होत नाही. अर्थात या ठिकाणी गंगापूजन हे कावेरीशी प्रत्यक्षपणे संबंधित असते असे नाही. घराच्या परसातील विहीर किंवा जलाशय हीच गंगेचे प्रतिनिधित्व करतात. या कावेरी नदीच्या उगमाची व देवीच्या रूपाने रेखाटलेली चित्रे घराच्या ओसरीवर लावलेली आपल्याला पाहावयास मिळतात. मात्र या किंवा अन्य देव-देवतांच्या चित्रांना कोडवांनी आपल्या देवघरात प्रवेश करू दिलेला नाही, हे लक्षात ठेवण्या-सारखे आहे.

गाईच्या विषयीची कोडवांची पूज्यभावनाही त्यांना इतर आदिवासींपासून दूर व ब्राह्मणी हिंदुधर्माच्या जवळ नेते. गायीच्या बाबतीतील कोडवांच्या तीव्र भावनांचा आदर करण्यासाठी ब्रिटिशांनी १८३५ साली कूर्गमध्ये गोहत्येला कायद्याने बंदी घातली होती. गायींमध्ये अर्थातच बैलाचाही समावेश होता. गोमांस हे कोडवांना पूर्णपणे वर्ज्य आहे. मात्र या संदर्भात आणखी एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. कोडव लोक गायीपेक्षाही बैलाला अधिक पवित्र मानतात. सोमवारी बैलाकडून काम घेत नाहीत. त्या दिवशी शेतकाम वगैरे-साठी बैलाऐवजी ते रेड्याचा वापर करतात. यात कदाचित लिंगायत संप्रदायाचा प्रभाव कोणाला दिसेल. परंतु लिंगायतांशी संबंध येण्यापूर्वीही बैलाविषयी आणि त्यांना जन्म देणाऱ्या गायींविषयी कोडवांना पूज्यभाव वाटत असला पाहिजे. कोणत्याही कृषिसमाजात असे घडणे स्वाभाविकच आहे. शेतीतील व सर्वसामान्य जीवनातील पाण्याचे महत्त्व लक्षात घेता कावेरीविषयी पूज्यभाव वाटणे हेही तितकेच स्वाभाविक वाटते.

बहुतेक आदिवासी जमाती शेतीच्या बाबतीत उदासीन असतात. त्यामुळे शेतीशी संबंधित अशा देवदेवतांना त्यांच्या जीवनात फारसे स्थान नसते. या दृष्टीने पाहिल्यास कोडव समाज हा आदिवासी व वैदिक-पौराणिक हिंदू समाज यांना जोडणारा मधला दुवा आहे असे म्हणता येईल. त्याने आपली अग्नि-दीपपूजा व पितरपूजा या परंपरेचे रक्षण करण्याचे ठरविल्यामुळे तो मोठ्या हिंदू समाजात विलीन न होता यापुढेही असाच दुवा बनून राहील असे दिसते. अर्थात आदिवासींचेच संस्कृतीकरण व आधुनिकीकरण होऊन ते हिंदू किंवा

भारतीय समाजाच्या महाप्रवाहात विलीन होतील अशी लक्षणे दिसत आहेत. तसे जेव्हा घडेल तेव्हा कोडव समाजाची ही दुव्याची भूमिका नाहीशी होईल. कुणी सागावे, त्या काळापर्यंत कोडव समाजच आपली अनन्यता सोडून देऊन हिंदू समाजाच्या सागरात विलीन झालेला असेल. पण या फार दूरच्या गोष्टी आहेत. सध्यातरी तो समाज आपला वेगळेपणा टिकवून ठेवील, अशीच लक्षणे दिसतात.

## समावेशक समाज

अपवर्जकता ( exclusiveness ) ही हिंदू समाजाची व त्या समाजातील जातिप्रथेची व्यवच्छेदक खूण किंवा लक्षण समजली जाते हिंदू धर्मात किंवा हिंदू जातीत बाहेरून सहसा कोणाला प्रवेश करता येत नाही. ब्राह्मणाला अब्राह्मण किंवा स्पृश्याला अस्पृश्य बनण्याची इच्छा असूनही तसे घडू शकत नाही. मात्र हिंदू धर्मातून अथवा जातीतून कोणीही परधर्मात जाऊ शकतो कोडव समाजाची स्थिती या बाबतीत बौद्ध, इस्लाम व ख्रिस्ती धर्मासारखी समावेशक आहे. अर्थात कोडव जमातीत प्रविष्ट होणारे लोक उच्च वर्णीयच असतात. वायनाड ( केरळ )चे चेट्टी, कन्नडभाषक ओक्कलिग व तुळूभाषक गौडा, कर्नाटकातील लिंगायत अशा जातींनी ब्रिटिशाच्या आगमनापूर्वी व नतर कोडव समाजात प्रवेश केल्याचे इतिहासात नमूद आहे. कोडवामध्ये काळेसावळे व बुटके असे जे लोक आढळतात त्याचे कारण बहुधा हेच असावे असे दिसते. शुद्ध कोडवांचा शोध घेण्यासाठी भारतात आलेल्या एका पाश्चात्त्य सशोधिकेला नमुन्यासाठीही शुद्ध कोडव आढळले नाहीत, स्वत ला अत्यंत शुद्ध समजणारे कोडवही तसे नसल्याचेच तिला आढळून आले, असे श्री. बी. डी. गणपती या कोडगू लेखकानी मला सागितले. याचा अर्थ कोडवामध्ये भिन्न रक्ताचे मिश्रण मोठ्या प्रमाणावर झाले आहे या पार्श्वभूमीवरून पाहिल्यास टिपू सुलतानाने विश्वासघात करून बाटविलेल्या हजारो कोडव कुटुंबानी पुन आपल्या समाजात परत येण्याची इच्छा व्यक्त केली असताही त्याना समाजाने स्वीकारले नाही, ही घटना मोठी विचित्र वाटते. कदाचित मुसलमानाविषयी वाटणारा अविश्वास व तिरस्कार या घटनेच्या मुळाशी असण्याची शक्यता आहे. लिंगायताच्या सास्कृतिक प्रभावामुळे कोडवामध्ये भस्म ( विभूती ) लावण्याची प्रथा रूढ झाली; आणि

महादेव व नंदी यांचेही माहात्म्य कोडव समाजात वाढले. मरकाऱ्याचे ओंकारेश्वर मंदिर आणि भागमंडलचे भगंडेश्वर मंदिर यांचे वैभव पाहिल्यास कूर्गमध्ये शैव संप्रदायाने केवढी प्रतिष्ठा कमावली आहे ते लक्षात येते. मात्र कोडवांच्या कौटुंबिक धर्मावर त्यालाही फारसे आक्रमण करता आलेले नाही.

## तीव्र स्वधर्माभिमान

इतरत्र उल्लेख केल्याप्रमाणे ब्राह्मणांनी कोडवांना वैदिक-पौराणिक ब्राह्मणी धर्मात समाविष्ट करून घेण्याचा आटोकाट प्रयत्न केला, पण कोडवांनी त्यांना दाद दिली नाही. त्यांनी आपले वेगळेपण टिकवून धरले; एवढेच नव्हे तर आपण ब्राह्मणापेक्षाही उच्च आहोत, अशी भावना उराशी बाळगली. जैन व लिंगायत राजांच्या काळात त्यांनीही कोडवांना आपल्या पंखाखाली घेण्याचा स्वाभाविकपणेच प्रयत्न केला असला पाहिजे. पण त्यातही त्यांना यश आले नाही त्यानंतर इंग्रज आले. त्यांच्याबरोबर ख्रिस्ती धर्मप्रचारक आले. कोडवा-सारखे उमदे लोक आपल्या धर्मात येतील तर किती बरे, असे त्यांना वाटले. त्या दृष्टीने त्यांनी देशातल्या इतर भागाप्रमाणे नानाविध प्रलोभने वापरून पाहिली. परंतु त्यांनाही त्यात यश आले नाही. अनेक वर्षांच्या खटपटीनंतर जेमतेम ५-६ कोडव ख्रिस्ती बनले. ख्रिस्ती धर्माला एवढे प्रचंड अपयश जगाच्या पाठीवर बहुधा इतर कोठेच मिळाले नसेल. स्वधर्माविषयीचा कोडवाचा हा तेजस्वी अभिमान लक्षात घेण्यासारखा आहे. त्यांनी इंग्रजाची भाषा स्वीकारली, त्यांचे अनेक शिष्टाचार उचलले, बाह्यात ते खूपच ख्रिस्ताळले. पण त्यांनी आपला मूळ धर्म अजिबात सोडला नाही. एवढेच नव्हे तर आपले धार्मिक संस्कार व त्यावेळी वापरण्याचा विशिष्ट पोषाख यातही तिळमात्र बदल केला नाही. कोडव लग्नाला आपण हजर राहिलो असता एक अद्भुत दृश्य आपल्याला पाहावयास मिळते. एकजात सारे पुरुष लष्करी गणवेशासारखा पोषाख घालून आणि साऱ्या स्त्रिया परंपरागत साड्या नेसून व डोकीला विशिष्ट पद्धतीचा रुमाल बांधून तेथे उपस्थित असल्याचे आपल्याला दिसते. पोषाखाची एवढी शिस्तबद्ध समानता मला तरी अन्य कोणत्याही समाजात पाहावयास मिळालेली नाही.

## गाभा हिंदू धर्माचा

कोडवाचा धर्म सर्वसामान्य हिंदू धर्माहून कसा व किती वेगळा आहे हे सांगितल्यानंतर एक गोष्ट उरतेच. ती अशी की पापपुण्याच्या कल्पना, स्वर्ग व मोक्ष यांची इच्छा, नरकाची भीती, पुनर्जन्माची कल्पना, जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्त होण्याची आकांक्षा, आणि कर्मविपाकाच्या सिद्धांतावरील श्रद्धा वगैरे हिंदू धर्माचा गाभा समजल्या गेलेल्या गोष्टींचा कोडवांनी मनापासून स्वीकार केला आहे.

आधुनिक शिक्षणाचा प्रसार होण्यापूर्वीच रामायण व महाभारत या महाकाव्यांचा स्वीकार कोडवांनी केला होता, आणि त्यातील कथा कोडवाच्या घरोघरी जाऊन पोचल्या होत्या. श्रीराम आणि पांडव वनवासात व अज्ञातवासात असताना कूर्गमध्ये आले होते, अशी त्यांची भावना आहे. 'भीमकल्लू' या तलकावेरीच्या रस्त्यावरील शिळेची साक्ष पांडवांच्या अज्ञातवासातील त्यांच्या आगमनासाठी काढली जाते तर लक्ष्मणतीर्थ ही कूर्गमधील नदी रामलक्ष्मणाच्या आगमनाचा पुरावा म्हणून पुढे केली जाते. थोरल्या भावाच्या विधवा पत्नीशी धाकटा भाऊ लग्न करू शकतो, ही कोडवामधील प्रथा त्यांनी पांडवांकडून घेतली आहे, असेही काही लोक समजतात. पण या साऱ्या केवळ कपोलकल्पित गोष्टी असल्याचेही काही लोक मान्य करतात आपल्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट एवढीच की इतर हिंदूंप्रमाणे कोडवांनाही रामायण व महाभारत ही महाकाव्ये आपली आहेत असे वाटते.

आधुनिक शिक्षणाच्या प्रसारानंतर कोडवांमधील विचारवंत आणि बुद्धिवंत यांचे लक्ष हिंदूंच्या तत्त्वज्ञानाकडे वेधले गेले. भगवद्गीता आणि रामकृष्ण-विवेकानंद -अरविंद यांचे साहित्य निवडक कोडवांना आकर्षित करू लागले. कोडगू भाषेचे एक थोर सेवक श्री नडिकेरियंडा चिण्णप्पा यांनी कोडगू भाषेत केलेले गीतेचे समश्लोकी भाषांतर कोडगू भाषेच्या साहित्यिक सामर्थ्याचा मानदंड म्हणून प्रमाण मानले जाते. तसेच स्वामी देशिकानंद व स्वामी शांभवानंद या कोडव विद्वानांनी रामकृष्ण मिशनच्या कार्याला खूप मोठा हातभार लावला आहे.

या सर्वांवरून असा निष्कर्ष काढण्यास प्रत्यवाय नाही की हिंदू धर्म व संस्कृती यांचे हार्द समजून घेण्यास कोडव लोक उत्सुक आहेत; आणि त्यातील थोर तत्त्वाची माहिती करून घेऊन तिचा स्वतःचे जीवन उन्नत बनविण्यासाठी

उपयोग करून घ्यावा, अशी प्रेरणाही त्याना होत आहे. अर्थात सर्व प्रकारच्या भौतिक समृद्धीत लोळणाऱ्या पाश्चात्त्याना भारतीय तत्त्वज्ञानाचे आकर्षण वाटू लागल्याची चिन्हे स्पष्ट दिसत असता, कोडवाना तसे आकर्षण वाटले नसते तरच आश्चर्य. अर्थात् एकीकडे हे आकर्षण वाटत असता दुसरीकडे त्यानी आपला परंपरागत धर्म व संस्कृती टिकविण्याचीही धडपड चालविली असली तर त्याबद्दल आश्चर्यही वाटता कामा नये किंवा त्यातील बाह्य विसंगतीमुळे कोणी अस्वस्थही होण्याचे कारण नाही. एक जगाच्या दिशेने अखिल मानव जातीने चालविलेल्या वाटचालीच्या प्रक्रियेचाच तो एक भाग आहे, एवढे आपण ओळखले की पुरे !

* * *

# ४

# कोडव घरी

## पूर्व व सूर्य यांचे माहात्म्य

कोडवाच्या जीवनात पूर्व दिशेला फार महत्त्व आहे. पूर्व ही शुभ दिशा आणि दक्षिण ही अशुभ दिशा. कदाचित साऱ्या आशिया खंडातच ही भावना विद्यमान असावी. जपानमध्येही अशीच समजूत प्रचलित आहे या समजुतीने कोडवांच्य धर्मभावनाची हिंदूंच्या धर्मभावनाशी जवळीक निर्माण केली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. सकाळी उठल्यावर सूर्याला नमस्कार करणे आणि लग्न, शेतातील पेरणीचा प्रारंभ वगैरे सर्व मंगल प्रसंगी सूर्याचे स्मरण व पूजन करणे यातून सूर्याचे माहात्म्य प्रतीत होते. सूर्य पूर्वेला उगवतो, म्हणून पूर्वदिशा पवित्र व शुद्ध समजली जाते. दीप हे सूर्याचे प्रतीक. म्हणून दीपही पवित्र. ते अग्नीचे प्रतीक मानले तर इराणातील अग्निपूजकाशी कोडवाचा संबंध जोडता येईल.

## घराचे तोंड पूर्वेकडेच हवे

अशा स्थितीत आपल्या घराचे तोंड पूर्वेकडेच असले पाहिजे, असा आग्रह कोडव लोक बाळगीत असले तर ते या भावनेशी सुसंगतच आहे असे म्हटले पाहिजे. त्याचप्रमाणे मूळ पुरुषाची समाधी (कैमाडा किंवा कैमड), ज्या कोनाड्यात दिवा ठेवला जातो तो कोनाडा आणि दिव्यातील वात या सर्वांचे तोंड पूर्वेकडेच असते. लग्नाच्या वेळी वधू व वर याची तोंडेही पूर्वेकडेच असली पाहिजेत, असा नियम आहे. असे आहे पूर्वेचे माहात्म्य.

### ज्योतिष्याचे प्रस्थ

घर बांधण्यापूर्वी मान्त्रिकाचा (याला मंत्रवादी असे म्हणतात) सल्ला घेणे अपरिहार्य समजले जाते. हे मंत्रवादी सामान्यत. केरळचे सुतार असतात को गत्या जागी घर बांधले असता ते शुभदायक ठरेल ते शोधण्यासाठी मंत्रवादी सगळीकडे फिरतो, आणि विशिष्ट खाणाखुणा मिळाल्यावर घराची जागा निश्चित करतो. प्रत्येक घर उंच जागी असते. जेथे पूर्वेकडे घराचे तोंड ठेवणे शक्य नसेल तेथे ते उत्तरेकडे ठेवले जाते घरासमोर चांगला उतार असतो समोरच्या बाजूस घराण्याची भातशेती असते. घरातून शेतीवर सहज लक्ष ठेवता यावे, हाच यात प्रमुख हेतू असला पाहिजे, हे उघड आहे. गुराचा गोठा घरापासून बराच दूर असतो. त्यामुळे शेणा-मुताची दुर्गंध अथवा डास-माशाचा त्रास होत नाही. कॉफीचे व वेलदोड्याचे मळे घराच्या डाव्या-उजव्या बाजूंना असतात. संपूर्ण इस्टेटीभोवती एक लहानसा खंदक असतो. त्याला ‘ कडग ’ असे म्हणतात. आपल्या घराच्या व कुटुंबियाच्या संरक्षणासाठी मूळ पुरुषाचा आत्मा नागाच्या रूपाने सर्वत्र फिरत असतो. त्याचा मार्ग ठरलेला असतो. त्या मार्गात अडथळा निर्माण न होईल अशा बेताने घर बांधावे लागते. त्यामुळे घराची मोजमापेही मंत्रवादीच ठरवून देतो

### घर म्हणजे किल्लाच जणू

कोडव कुटुंबाचे वडिलार्जित घर हा जणू छोटेखानी किल्लाच असतो. त्याला ‘ ऐन मने ’ असे म्हणतात. यातील मने हा शब्द कन्नड असून त्याचा अर्थ घर असा आहे. ऐन या अरबी शब्दाचा अर्थ मुख्य, मूळचा असा आहे. या अर्थाने तो कन्नड व मराठी भाषेतही वापरला जातो. कोडगू भाषेतील अशा प्रकारच्या अरबी-फारसी शब्दांचे मूळ अरब व्यापारी व मुस्लिम शासक यांच्या संपर्कात सापडू शकेल; किंवा काही लोकांच्या मते कोडवाचा अरबांशी, विशेषत कुर्द, लोकांशी, जो वांशिक संबंध आहे त्यातही ते सापडू शकेल.

या घरापर्यंत पोचण्यासाठी छातीइतक्या उंच भिंती दोन्ही बाजूंना असलेल्या एका अरुंद वाटेने जावे लागते. घर उंचावर असल्याने ही वाट पायऱ्याची बनलेली असते. तिला ‘ ओणि ’ असे म्हणतात. ‘ ओणे ’ म्हणजे गल्ली अथवा बोळ या कन्नड शब्दापासून हा कोडगू शब्द बनला आहे. विहीर व स्नानगृह

याच्याकडे जाण्यासाठी या ओणीचाच वापर करावा लागतो. या ओणीच्या तोंडाशी पहारा ठेवल्यास घराचे रक्षण सहज करता येते. आपल्याकडील किल्ल्या-मध्येही अशा प्रकारची रचना अनेक ठिकाणी पाहावयास मिळते.

ओणीतून वर आल्यावर प्रशस्त, सारवलेले आगण लागते. ओणी आणि आगण याच्या भोवती केळी, नारळ, सुपारी, कॉफी किंवा संत्री याची झाडे असतात. या झाडामुळे सावली व गारवा तर राहातोच, परतु घराची शोभाही वाढते.

ही घरे बाधणारे गवंडी व सुतार प्रामुख्याने केरळचे असतात त्यामुळे केरळ-मधील खानदानी नायराचे वाडे आणि ऐन मने यामध्ये खूपच साम्य असते. आपल्याकडील चौसोपी जुने वाडे ज्यानी पाहिले असतील त्याना ऐन मनेची चटकन कल्पना येऊ शकेल. अलीकडील काळात वडिलार्जित घर व जमीन-जुमला याचा निरोप घेऊन अनेक कोडव नोकरीधंद्याच्या निमित्ताने कूर्गच्या बाहेर गेले आहेत. त्यामुळे ऐनमनेमध्ये संयुक्त कुटुबातील फार थोडी मंडळी राहात असलेली आढळतात. परतु ज्या काळी हे बहिर्गमन प्रचलित नव्हते तेव्हा एकेका घरात शंभर-दीडशेपर्यंत माणसे राहात होती. त्या सर्वांना व्यव-स्थितपणे राहाता येईल अशा पद्धतीची या घराची माडणी असते.

### घराचे आकर्षण

वडिलार्जित वास्तू व जमीनजुमला यांचे कोडव माणसाला वाटणारे आकर्षण मोठे जबरदस्त व अद्भुत असते. कोडव माणूस नोकरीधंद्याच्या निमित्ताने कोठेही राहात असला तरी लग्नकार्य, पुत्रीसारखे सण आणि मृत्यूसारखे दु खद प्रसंग यानिमित्ताने ऐन मनेला भेट देण्याची त्याला अनिवार उत्कठा असते. सारा जन्म कूर्गबाहेर काढावा लागला तरी निवृत्तीनतरचे आयुष्य आपल्या वडिलार्जित घरातच घालविण्याचा त्याने मनोमन निश्चय केलेला असतो. या घराचा मान राखणे आपले कर्तव्य आहे, असे तो समजतो. त्यामुळे घरात माणसाची गर्दी झाल्याने दुसरे घर बाधावे लागल्यास ते मूळ घरापेक्षा मोठे असणार नाही, नव्या घरामुळे जुने घर झाकले जाणार नाही किंवा नव्या घराच्या भपक्यामुळे जुने घर फिके वाटणार नाही, याची तो काळजी घेतो. बाहेरचा पाहुणा आल्यास त्याचे स्वागत प्रथम ऐन मनेमध्येच केले जाते. साराश, ऐन मनेची शान कोणत्याही

प्रकारे कमी झालेली त्याला खपत नाही. काही कारणाने भावाभावात मतभेद व भाडणे होऊन वेगळी बिऱ्हाडे केली जातात. पण त्या परिस्थितीतही थोरल्या घराची बेअदबी झालेली कोणी खपवून घेणार नाही. वडिलार्जित घरासबंधीची ही पूज्य भावना हे कोडवाचे वैशिष्ट्य होय.

**कन्निकंभाची प्रतिष्ठा**

घराच्या परसात बहुधा खळे असते. याला कोडगू भाषेत 'कळा' असे म्हणतात. कन्नडमध्ये त्याला कणज हा शब्द असताना मराठीतील खळ्याशी त्याचे इतके साम्य कसे निर्माण झाले असावे, याचे आपल्याला आश्चर्य वाटते. अगणाच्या एका बाजूला भात काढण्याची खोली असते. तिला आले कोट्टु असे म्हणतात. आले या कन्नड शब्दाचा अर्थ उसाचा रस काढण्याचा चरक असा असून कोट्टण याचा अर्थ भात कुटणे किंवा तादूळ सडणे असा आहे. हे भात काढण्याचे काम लाकडी काढणी (ढेंकी) ने केले जाते. ही कांडणी पायाने चालविली जाते. तिचे कोडगू नाव राटै असे असून त्याचे रहाटाशी बरेच साम्य दिसते.

अगणातून आपण घरात प्रवेश करण्यासाठी काही दगडी पायऱ्या चढून वर जातो आणि ओसरीवर प्रवेश करतो. या ओसरीला कय्यालि किंवा कैयालै असे म्हणतात. ओसरीचे किंवा घराचे छप्पर ज्या भरभक्कम खाबावर आधारलेले असते त्याना कन्निकभ असे म्हणतात. कन्नि म्हणजे नैर्ऋत्य (दक्षिण-पश्चिम दिशा) आणि कभ किंवा कंब म्हणजे खाब. या सर्व खाबाना जरी 'कन्निकंभ' अशी संज्ञा असली तरी त्यापैकी नैर्ऋत्य दिशेला असणारा खाब हाच खरा कन्निकभ होय कोडवाच्या जीवनात या स्तंभाला फार महत्त्व असते. नववधूने सासरच्या घरी प्रवेश केल्यानतर प्रथमत ज्या वस्तूना प्रणाम करावयाचा असतो त्यात हा कन्निकभ एक असतो. हा स्तभ घरच्या कर्त्या पुरुषाचे प्रतीक असतो व त्याच्या अनुपस्थितीत तो त्याचे प्रतिनिधित्व करतो. कर्ता पुरुष घरी नसताना एखादा महत्त्वाचा निर्णय घ्यावा लागला तर या कन्निकभाला साक्षी ठेवून त्याच्या पायाशी बसून परस्पर विचारविनिमयानतर तो निर्णय घेतला जातो; आणि तो सर्वांवर समानपणे बंधनकारक असतो. अखेर त्या घराचा शेवटचा निरोप घेताना, मृत व्यक्तीच्या मस्तकाचा स्पर्श कन्निकंभाला करविण्यात येतो.

ह्या खांबावर घराण्याच्या ऐपतीप्रमाणे कोरीव काम केले जाते. पक्षी, नाग, हत्ती, फुले वगैरेंचे कलापूर्ण खोदकाम त्यावर केलेले असते. जंगलाचे वैपुल्य असल्याने अत्यंत उत्कृष्ट प्रतीचे लाकूड तेथे सहज प्राप्त असते. इतके मोठे व ताशीव-कोरीव लाकडी खांब कूर्गच्या बाहेर क्वचितच पाहावयास मिळतात. अत्यधिक पावसाला दाद न देता वर्षानुवर्षे घराला आधार देणाऱ्या या खांबा-विषयी कोडवांच्या मनात कृतज्ञता भावना निर्माण झाली नसती तरच आश्चर्य !

## ऐमराचे महत्त्व

या खांबांना जोडणारी सुमारे दोन-अडीच फूट उंचीची व दीड फूट रुंदीची लहानशी भिंत असते. या भिंतीवर तेवढ्याच रुंदीची जाडजूड फळी अथवा आडवा खांबच बसविलेला असतो. त्यायोगे एक छानसा बाकच तयार होतो. त्याला ‘ ऐमर ’ म्हणतात. ( मात्र त्याचा उच्चार ‘ ऐमरा ’ असा करतात. ) ‘ मर ’ म्हणजे वृक्ष अथवा लाकूड या कन्नड शब्दापासून हा कोडगू शब्द बनला आहे. यापैकी एक ऐमर खास पूर्वजासाठी राखून ठेवलेला असतो. त्याला ‘ कारणवद् ऐमर ’ असे म्हणतात. या बाकावर कोणी झोपावयाचे नसते. कोणी झोपल्यास पूर्वजांचे आत्मे त्याला खाली फेकून देतात, अशी समजूत आहे.

हे सर्वच ऐमर पवित्र समजले जातात. ते कोणी ओलांडावयाचे नसतात स्त्रियांनी त्यावर बसावयाचे नाही. फक्त पुरुषच त्यावर बसू शकतात. मात्र खालच्या जातींतील पुरुषांना त्यावर बसता येत नाही. नववधू जेव्हा गृहप्रवेश करते तेव्हा ती क्षणभर ऐमरावर बसते. याचा अर्थ आता ती त्या घराण्याची घटक बनली असून तिचा हक्क सर्वांनी मान्य केला आहे असा होतो. अलीकडे घरातील कर्त्या स्त्रीला, सासूला, ऐमरावर बसण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. परंतु सुनांना मात्र अजून तो अधिकार प्राप्त झालेला नाही.

## देवळीतील पवित्र पणती

ओसरीवरून आपण घरात प्रवेश करतो. आपल्याकडे घराच्या प्रवेशद्वाराच्या चौकटीवर मध्यभागी वरच्या बाजूस बहुधा गणपती कोरलेला असतो. कोडव घराच्या चौकटीवर अर्धचंद्र व कमळपुष्प कोरलेले आढळते. मध्यपूर्वेत--विशेषत मुस्लिम देशात--अर्धचंद्राचे जे माहात्म्य आहे त्याच्याशी या प्रथेचा काही संबंध आहे किंवा कसे हे तपासून पाहण्यासारखे आहे. मात्र कमळ हे खास भारतीय

प्रतीक आहे. कोडवानी आपल्याबरोबर आणलेल्या अर्धचंद्राचे भारतीय कमळाशी मीलन घडवून संस्कृतिसंगम प्रत्यक्षात आणला असणे शक्य आहे.

दारातून आत जाताच समोरच्या भिंतीतील लहानशा कोनाड्यात — ज्याला कोडगूत ' कोडा ' असे म्हणतात— असलेल्या पणतीकडे आपले लक्ष चटकन वेधले जाते. ही पणती सामान्यत मातीचीच असते पण ती धातूचीही असू शकते. या दिव्याला ' नेल्लक्कि बोळुक ' असे म्हणतात. नेल्लक्कि म्हणजे तांदूळ किंवा अक्षता, आणि बोळुक म्हणजे दिवा. लग्नामध्ये वधुवरावर अक्षता टाकण्याचा समारंभ या पणतीसमोर होतो. त्यावरून तिला हे नाव पडले आहे. ही पणती कोडवाच्या घरातील अत्यंत पवित्र व आदरणीय वस्तू समजली जाते. ही पश्चिमेकडील भिंतीच्या कोनाड्यात असते. कोनाड्याचे व पणतीचे तोंड स्वाभाविकपणेच पूर्वेकडे असते. घरची गृहिणी रोज सकाळी व सांजवेळी पणती लावते व दिव्याला नमस्कार करते. घरातील इतर लोकही उठून हात-पाय व तोंड धुतात आणि दिव्याला नमस्कार करतात; तसेच संध्याकाळीही हातपाय धुऊन पणतीला नमस्कार करतात. हीच त्यांची देवपूजा. ही पणती फुंकर मारून विझवायची नसते. सर्वांनी नमस्कार केल्यावर हाताने वारा घालून ती मालवतात नववधू गृहप्रवेश केल्यानंतर या दिव्याला नमस्कार करते; तर नवरा मुलगा लग्नाचे संस्कार सुरू होण्यापूर्वी या दिव्याला प्रणाम करतो.

याखेरीज या दिव्याचे आणखी एक महत्त्व आहे. कुटुंबातील सर्व महत्त्वाच्या घटना या दिव्याच्या साक्षीने घडतात; आणि महत्त्वाचे निर्णय दिव्याला साक्ष ठेवून घेतले जातात. कर्जाची देवाण-घेवाण, करारमदार सारे काही या दिव्यासमोर केले जाते. मग कागदपत्र व लिखापढी करण्याची गरज उरत नाही. हा दिवा म्हणजे प्रत्यक्ष देवच असतो. त्याला साक्षी ठेवून केलेले सारे व्यवहार तोंडी असले तरी कोणीही त्याचे उल्लंघन करू शकत नाही. तसे करणे पाप समजले जाते. यावरून या दिव्याचे महत्त्व कळून यावे.

ज्या दिवाणखान्यात ही कोनाड्यातील पणती असते तेथेच आणखी एक पितळेचा टांगता दिवा असतो. त्याला ' तूग बोळुक ' म्हणजे लटकणारा दिवा असे म्हणतात. हा दिवाही पणतीसारखाच पवित्र समजला जातो, परंतु त्याच्यापेक्षा पणतीची प्रतिष्ठा अधिक मानली जाते. 'नेल्लक्कि बोळुक' ही 'तूग बोळुक'पेक्षा अधिक प्राचीन आहे, असे विद्वानांचे मत आहे.

## नेलकि नडुवाडे

उंबरठा ओलांडून आपण घरात प्रवेश करतो. हा प्रवेश आपल्याकडील माजघरासारख्या एका दिवाणखान्यात होतो. घरातील हा एक पवित्र भाग असतो. याला ' नेलकि नडुबाडे ' असे म्हणतात. सारे महत्त्वाचे संस्कार व कार्यक्रम या दिवाणखान्यातच साजरे केले जातात. याला नुसते ' नडुबाडे ' असेही म्हणतात. नडु म्हणजे मधला, मध्यवर्ती. वाडे म्हणजे दिवाणखाना. भोजनगृह म्हणूनही त्याचा वापर केला जातो. जमिनीवर बसून जेवणे व झोपणे हे फक्त सुतकातच केले जाते. यामुळे टेबलावर जेवणे व पलगावर झोपणे अपरिहार्य समजले जाते थंड हवेच्या दृष्टीनेही ते योग्यच होय. प्रत्येक कोडव कुटुंबाच्या भोजनगृहात टेबल व शयनगृहात पलग असतोच. कनिष्ठ समजल्या गेलेल्या जाती–जमातीच्या व्यक्तींना या नडुवाडेमध्ये प्रवेश करता येत नाही. बाळंतीण स्त्री बाराव्या दिवशी स्नान करून शुद्ध झाल्यावरच या माजघरात किंवा दिवाण-खान्यात जाऊ शकते. पूर्वी विटाळशी स्त्रियानाही या नडुबाडेत प्रवेश करण्यास बंदी असे. लग्नातील मुख्य विधीही याच दिवाणखान्यात साजरा केला जात असे. पण अलीकडे त्यासाठी मगल कार्यालयांचा मोठ्या प्रमाणावर वापर होऊ लागला आहे. शस्त्रपूजेचा कार्यक्रमही याच दिवाणखान्यात केला जातो.

## कन्निकोंबरे ऊर्फ देवघर

या दिवाणखान्याच्या दक्षिण पश्चिम ( नैर्ऋत्य ) कोपऱ्यात एक लहानशी खोली असते. तिला ' कन्निकोंबरे ' किंवा ' कन्निकोंबरे कोणे ' असे म्हणतात. ' कोंबरे ' म्हणजे खोली. ' कमरा ' या हिन्दी शब्दाशी त्याचे साम्य चटकन जाणवते. परंतु हा कमरा शब्दच मुळी ग्रीक ' कमरा ' व लॅटिन ' कॅमेरा ' या शब्दावरून आला असल्याने ' कोंबरे 'चा धागा पुन. पश्चिम आशिया व पूर्व युरोपपर्यंत नेऊन पोचविता येईल. कन्निकोंबरे म्हणजे शब्दश नैर्ऋत्येकडील खोली आणि कन्निकोंबरे कोणे म्हणजे नैर्ऋत्येच्या कोपऱ्यातील खोली. परंतु वस्तुत तेअसते देवघर.

येथे एक शका निर्माण होते. पूर्व व उत्तर या शुभ दिशा आणि दक्षिण व पश्चिम या अशुभ दिशा असे ज्या समाजात मानले जाते तेथे दक्षिण-पश्चिम ( नैर्ऋत्य ) दिशा कशी पवित्र व शुभ मानली जाते? कन्निकंभाच्या संदर्भातही

हाच प्रश्न उपस्थित होऊ शकतो. कोडवांविषयी लिहिणाऱ्या आतापर्यंतच्या विद्वानांना या शंकेने ग्रासलेले दिसत नाही. त्यामुळे त्यांनी या विषयाचे विवेचन केलेले नाही. दक्षिण दिशेचा स्वामी यमराज. त्याला शरण जाऊन त्याची अव-कृपा टाळण्याचा तर हेतू यात नसेल? पण मग सरळ दक्षिणेलाच मोठेपणा देण्यात काय बिघडले?

देवघर म्हटले की आपल्या डोळ्यांसमोर जे चित्र उभे राहते त्याच्याशी कन्निकोंबरेचे तिळमात्रही सादृश्य नसते. देव्हारा, त्यातील लहानमोठ्या मूर्ती, समया, पुजेचे साहित्य, फुले, धूप-दीप, पाट, पाण्याचा तांब्या, पळी-पंचपात्रे ताम्हन, देवादिकांच्या तसबिरी, फुलांच्या माळा, यापैकी तेथे काहीही नसते. आत प्रवेश करताच समोरच्या भिंतीत एक लहानसा कोनाडा दिसतो. त्या कोनाड्यात मातीची किंवा धातूची पणती असते. बस्स! संपूर्ण देवघरात फक्त एवढीच वस्तू असते. सकाळ संध्याकाळ ते झाडून स्वच्छ ठेवले जाते. बहुधा ते नेहमी बंदच असते. ज्या कोणाला निवातपणे प्रार्थना करावयाची असेल तो या देवघरात जाऊन बसतो. एऱ्हवी त्याचे अस्तित्व जाणवते ते मनोमनच. काही ठिकाणी कोनाड्यातील पणतीऐवजी पितळेचा टांगता दिवा असतो. काही घरात नेलक्कि बोळुक प्रमाणे सकाळ-संध्याकाळ नियमाने कन्निकोंबरेतील दिवा लाव-तात; तर काही घरामध्ये हा दिवा काही विशिष्ट समारंभाच्या निमित्तानेच लावतात. सणावारी या दिव्याला नैवेद्यही दाखविला जातो.

स्वाभाविकपणेच हे देवघर अत्यंत पवित्र समजले जाते. घरात वावरताना पायात सपाता असल्या तरी या देवघरात सपाता घालून जाता येत नाही. बाळं-तीण स्त्री बाराव्या दिवशीचे स्नान झाल्यावर मध्यवर्ती दिवाणखान्यात व स्वयंपाक घरात प्रवेश करू शकते, परंतु देवघरात मात्र जाऊ शकत नाही. साठ दिवस पूर्ण झाल्यावरच तिला देवघरात जाता येते. नववधू सासरी आल्यानंतर ती देवघरातील दिव्याला प्रणाम करते, नवधान्योत्सवाच्या दिवशी नवीन धान्याचा नैवेद्य देवघरातील दिव्याला प्रथम दाखविला जातो.

### नैवेद्याचे स्वरूप

या संदर्भात कोडव लोकांमध्ये प्रचलित असलेल्या नैवेद्याचे स्वरूप समजून घेणे उद्बोधक ठरावे. जसा भक्त तसा देव, असे म्हणतात. त्यामुळे भक्ताच्या

आवडीनिवडींचे प्रतिबिंब त्याच्या देवाच्या आवडी-नावडीतही स्वाभाविकपणेच दिसून येते. कोडवाच्या बाबतीत तर मूळ पुरुष अथवा एकूण पूर्वज हाच देव असतो. त्यामुळे त्याच्या आवडी-नावडी परंपरेने चालत आलेल्या व माहीत असलेल्या अशाच असणार, हे उघड आहे. कोडवाचे सर्वच मूळ पुरुष मद्य-प्राशन करीत होते, मांसाशन करीत होते, पान खात होते. म्हणून नैवेद्यामध्ये या सर्वांचा समावेश होणे अपरिहार्य आहे. त्याप्रमाणे शिजविलेले अन्न (भात) मध, मांस, मद्य व पानसुपारी यांचा नैवेद्य दाखविला जातो. या नैवेद्याला कोडगू भाषेत ' मिदि ' किंवा ' मीदि ' असे म्हणतात. कन्नड ' मिदि ' या क्रियापदाचा अर्थ ठार मारणे, कत्तल करणे असा आहे. संस्कृत ' मेध ' (आहुती, बळी, यज्ञ) शब्दापासून हे क्रियापद बनले आहे. त्याचा वापर कोडगूमध्ये नैवेद्य या अर्थी केला जातो, यावरूनच त्यातील मांसाचा समावेश स्पष्ट होतो. ब्राह्मणी संस्कृतीच्या प्रभावाखाली आलेल्या मांसाहारी किंवा मत्स्याहारी जमातींनी नैवेद्या-तून मत्स्य-मांसाचा समावेश वगळल्याचे आढळून येते. कोडव लोकांनी असा प्रकार केलेला दिसत नाही. (याला अम्मकोडव या शाकाहारी जमातीचा अप-वाद आहे.) यावरून ब्राह्मणी संस्कृतीच्या प्रभावापासून अलिप्त राहण्याचा त्यांचा प्रयत्न यशस्वी झालेला दिसतो.

**माडीवरील निरीक्षण झरोके**

एका टोकाला कन्निकोंबरे, दुसऱ्या टोकाला कोरवुकार म्हणजे कुटुंबप्रमुख याची खोली आणि दरम्यान घरच्या इतर लोकांच्या व पाहुण्यांच्या खोल्या, अशी व्यवस्था असते. उत्तरेस स्वयंपाकघर असते. त्याला ' उबळमने ' म्हणजे जेवण-घर म्हणतात. (वस्तुत. जेवणासाठी स्वयंपाकघराचा वापर न करिता मधल्या दिवाणखान्याचाच वापर करतात.) हे स्वयपाकघर देवघराइतकेच पवित्र समजले जाते.

कोडवाच्या काही घरामध्ये मधला चौक असतो. तेथे पूर्वेकडील बाजूस दिवाणखाना व पश्चिमेस देवघर वगैरे खोल्या असतात.

प्रत्येक घराला प्रशस्त माळा मात्र अवश्य असतो. त्याला ' अट्ट ' असे म्हणतात. या माळ्यावर धान्याचे तट्टये ठेवलेले असतात. त्यांना ' तुळिया ' म्हणतात. तसेच इतर मोठमोठी भांडी व अवजड सामान या माळ्यावरच असते.

या माळ्याला मुख्यत' पुढच्या बाजूने खिडकीवजा झरोके असतात. त्यातून दूरवर नजर ठेवता येते आणि शत्रूच्या हालचाली लक्षात येताच त्याला तोंड देण्याची तयारी करता येते. पूर्वीच्या काळी बाह्य शत्रूप्रमाणेच अंतर्गत शत्रूंचाही धोका असे. वेगवेगळ्या घराण्यामध्ये हाडवैर असे आणि ती एकमेकांचा नाश करण्यास टपून बसलेली असत. अशा वेळी प्रत्येक घराला संरक्षणाच्या तयारीत राहावे लागे. त्याच दृष्टीने घराची रचना व मांडणी करण्यात येई.

## पूर्वजपूजा व नागपूजा यांची स्थाने

कोडव लोक स्थानिक देवदेवताचे उपासक असल्याचे क्वचितच आढळून येते. त्यांची उपास्यदैवते मूलत पूर्वज, नाग व भूतप्रेत हीच असतात. त्यापैकी सर्वांत महत्त्वाचे स्थान अर्थातच पूर्वजाची किंवा अधिक निश्चितपणे सांगायचे म्हणजे मूळ पुरुषाची समाधी हे असते. प्रत्येक कोडव कुटुंबाच्या घराजवळच त्या कुटुंबाच्या मूळ पुरुषाची समाधी असते. बहुतेक कुटुबाचे संस्थापक किंवा मूळ पुरुष हे पुरुषच असतात. परंतु क्वचित प्रसंगी एखादी स्त्रीही कुटुंब-संस्थापक असते. असे एक उदाहरण डॉ. एम्. एन्. श्रीनिवास यानी आपल्या ' रिलीजन अँड सोसायटी अमग दि कूर्ग्स ऑफ साउथ इंडिया ' या ग्रंथात पृ. १६० वर दिले आहे. कूर्गच्या नाल्कनाड विभागातील एका ' ओक्का ' ( कुटुंब ) मधील सगळे पुरुष १६० वर्षांपूर्वीच्या एका लढाईत मारले गेले असता एका गरोदर कोडव स्त्रीने पळून जाऊन मलबार मधील पायूरप्पा मंदिरात आश्रय घेतला. तिला मुलगा झाला आणि ती परत कूर्गमध्ये आली. त्यानंतर जो वंश-विस्तार झाला त्यातील मंडळींनी तिलाच आपल्या घराण्याची संस्थापिका म्हणून मान्यता दिली. अर्थात अशी उदाहरणे अपवादादाखलच सापडतात. सामान्यत पुरुषच कुटुंबाचा संस्थापक असतो. त्याला ' कारणव ' ' कारोण ' ' मूळ पुरुष ', किंवा ' आदि कारणव ' या नावानी संबोधिले जाते. त्याची समाधी म्हणजे एक मोठा कोनाडा किंवा छोटेसे देऊळच असते. त्याला ' कैमठ ' किंवा ' कैमड ' असे म्हणतात. ' कैमठ ' याचा शब्दश. अर्थ कुटुंबा-तील मुलाना जेथे धुळाक्षरे शिकविली जातात अशी प्राथमिक शाळा हा आहे. परंतु तो अर्थ येथे फारसा लागू पडत नाही. ही समाधी फणस, वड वगैरे चीक ( दूध ) असणाऱ्या झाडाच्या मुळाशी चबुतरा बांधून त्यावर उभारली जाते.

समाधीच्या देवळीत एक पणती असते. पुत्री ( हुत्री ) वगैरे सणाच्या दिवशी ही पणती प्रज्वलित केली जाते, आणि समाधीला नैवेद्य दाखविला जातो. या समाधीचे तोंडही पूर्वेकडेच असते.

काही कुटुंबामध्ये मूळ पुरुषाची समाधी न बांधता चीक ( दूध ) असणाऱ्या झाडाभोवती पार बांधून त्यावर एक अनघड दगड रोवलेला असतो. तो दगडच सर्व पूर्वजांचे प्रतिनिधित्व करतो. मूळ पुरुषाखेरीज कुटुंबातील इतर पुरुषांच्याही समाध्या काही लोक हौसेने बांधतात, परंतु त्या केवळ शोभेसाठी असतात. त्यांना कैमडाचे महत्त्व अथवा पावित्र्य प्राप्त होत नाही.

नागपूजाही कोडवामध्ये पुष्कळच प्रचलित आहे. पण तिचे प्रस्थ मर्यादित आहे. नागाला ते ' नाथ ' म्हणतात. ( आपल्याकडील ' नागनाथ ' शब्दाचे या संदर्भात स्मरण होते. ) चीक ( दूध ) असणाऱ्या झाडाखाली मातीचा ओटा किंवा पार बांधून त्यावर नागाचे प्रतीक म्हणून अनघड दगड रोवतात, किंवा वारुळासारख्या मातीच्या उंचवट्यावरही नागाचे दगड ठेवलेले आढळतात. या नागस्थानाभोवती वाढणारे गवत अथवा झाडेझुडुपे यांना धक्का लावावयाचा नसतो. ती जागा पवित्र समजली जाते. विटाळशी स्त्रीने त्याच्या जवळ जावयाचे नसते. त्या स्थानाला तिचा स्पर्श झाल्यास नागदेव क्रुद्ध होतो आणि तो तिला किंवा तिच्या कुटुंबाला संकटात लोटतो, अशी समजूत आहे. म्हणून अशा प्रकारे चुकून विटाळ कालवला गेल्यास ब्राह्मणाकडून त्याचे प्रायश्चित व शुद्धी करविली जाते. दक्षिण भारतातील नागपूजेचे प्रस्थ लक्षात घेतल्यास या साऱ्या समजुती अथवा लोकभ्रम स्थानिक समाजांकडून उचलले असावेत हे उघड दिसते. कदाचित स्वाभाविक भीतीतूनही ते प्रचलित झाले असावेत.

नाग किंवा साप पूजनीय समजला गेल्यामुळे कोडव लोक सामान्यतः साप मारत नाहीत. विशेषत: नागस्थानाजवळील किंवा देवळातील साप कोणीच मारत नाहीत. साप मारल्यास श्वेतकुष्ठासारखे चर्मरोग होतात अशी कोडवामध्ये समजूत आहे. नागाला ठार मारल्यास त्या मारणाऱ्याचे नि:संतान होते अशीही एक समजूत प्रचलित आहे.

**कोडाविषयी भीती व तिटकारा**

या संदर्भात कोडवांना श्वेतकुष्ठ किंवा कोड या चर्मरोगाविषयी किती भीती

व तिटकारा वाटतो त्याचा उल्लेख करणे अप्रस्तुत होणार नाही. आधुनिक वैज्ञानिक संशोधनानुसार कोड हा खरोखरी चर्मरोग नसून काही विशिष्ट कारणामुळे कातडीचा रंग बदलणे, एवढेच त्याचे मर्यादित स्वरूप असते. तो एखादा सांसर्गिक रोगही नव्हे. तरीपण कोडामुळे शरीर विद्रूप दिसते. तेवढ्या-वरूनच त्याच्याविषयी लोकमानसात भीती व तिटकारा निर्माण झाला असला पाहिजे. कोड झालेली व्यक्ती अजूनही काही समाजात अपवित्र व पतित समजली जाते. कूर्गमध्ये कोड फारच क्वचित आढळतो बहुधा तो तेथील हवेचा परिणाम असावा. (गलितकुष्ठ किंवा महारोग तर कूर्गच्या लोकांना माहीतच नाही!) अशा स्थितीत कोड झालेल्या इसमाविषयी तेथे पराकाष्ठेचा गैरसमज रूढ असल्यास नवल नाही. अलीकडे कोडवामध्ये प्रेत-दहनाची प्रथा सुरू झाली असली तरी प्रेत पुरण्याची प्रथाच अजूनही सर्रास प्रचलित आहे. त्याला ते 'दपन' म्हणतात. ('दफ्न' किंवा 'दफन' या अरबी शब्दाचा तो अपभ्रंश आहे, हे उघड आहे. कोडवाचा अरब प्रदेशाशी संबंध जोडण्याला कदाचित या शब्दाचा उपयोग होईल!) कोड झालेल्या व्यक्तीस जमिनीत पुरल्यास त्यावर्षी पाऊस पडत नाही अशी समजुत असल्याने अशा व्यक्तीचे प्रेत दगड बांधून नदीत फेकून दिले जाई.

## शिस्तीचे नियम व बंधने

असे आहे कोडव घर व त्याचा परिसर. या घराला स्वतःचे असे एक व्यक्तिमत्त्व असते. कोडव कुटुंबातील व्यक्तींच्या परस्परसंबंधाचे नियम फार कडक असतात व त्याचे पालन अत्यंत काटेकोरपणे केले जाते. उदाहरणार्थ, ओसरीवर घरच्या स्त्रियांनी सहसा बसावयाचे नाही; एवढेच नव्हे तर वडील माणसे किंवा पाहुणे तेथे बसले असल्यास त्यांच्याहून लहान वयाच्या पुरुषांनीही तेथे न बसता, उभे राहावयाचे, असा नियम आहे. तो अजूनही पाळला जातो. कोडवामध्ये वयाला फार मान आहे. आपल्यापेक्षा वयाने अधिक असलेली व्यक्ती भेटली की तिच्या पायांना किंवा पिंड्यांना दोन्ही हातांनी स्पर्श करून तीनदा प्रणाम करण्याची प्रथा कोडवामध्ये कटाक्षाने पाळली जाते अशा वेळी वयाने लहान असणारी व्यक्ती समाजात कितीही मोठ्या पदावर आरूढ झालेली—मंत्री, सरसेनापती वगैरे असली, अथवा कितीही श्रीमंत असली आणि वयाने मोठी असणारी व्यक्ती

कितीही सामान्य अथवा गरीब असली तरी ते सारे भेदभाव विसरून प्रणामाची प्रथा पाळली जाते. लग्नसमारंभ किंवा सार्वजनिक सण यावेळी हे दृश्य हटकून पाहावयास मिळते. प्रतिष्ठेच्या नव्या कल्पनात वाढलेल्या आपल्यासारख्या त्रयस्थाना ते काहीसे चमत्कारिक वाटते. पण अशा प्रथामुळेच कोडव समाजात एक प्रकारची शिस्त, आत्मीयता व एकजूट टिकून राहिली आहे, हे विसरता येणार नाही. आपले घर, घराणे आणि समाज याविषयी कोडवाना जी आत्मीयता व अभिमान वाटतो त्याची बीजे अशा प्रकारच्या संस्कारातच आढळतात. कोडव माणूस कितीही मोठा बनला तरी त्याला आपल्या प्रदेशाची, समाजाची व घराची ओढ का वाटते, याचे कारण घराशी संबंधित असलेल्या या प्रथा व समजुती यामध्येच पाहावयास सापडते.

* * *

# ५

# कोडवांचे सण

भारतामध्ये हिंदूंचे बहुतेक सण प्रादेशिक असतात. उदाहरणार्थ उत्तर भारतात होळी व दिवाळी हे सर्वांत महत्त्वाचे सण समजले जातात तर दक्षिण भारतात दसरा, युगादि (किंवा उगादि = वर्षप्रतिपदा, गुढी पाडवा) ओणम् वगैरे सणांना विशेष महत्त्व दिले जाते. फार दूर कशाला, खुद्द आपल्या महाराष्ट्रातही देशावर दसरा-दिवाळी जेवढ्या उत्साहाने साजरी केली जाते तेवढा उत्साह कोकणात त्या सणाच्या बाबतीत आढळत नाही. तेथे गौरी-गणपतीचे प्रस्थ सर्वांत अधिक असते. याखेरीज वेगवेगळ्या जातीजमातींचेही वेगवेगळे सण असतात. हीच गोष्ट कोडवांच्या बाबतीतही दिसून येते. मैसूर व केरळमध्ये विशेष प्रचलित असलेले युगादी, शिवरात्र, सुब्रह्मण्य षष्ठी आणि स्थानिक देवदेवतांचे सण-उत्सव कमी-जास्त प्रमाणात कोडव लोकही साजरे करतात, त्यात सहभागी होतात. पण त्यांचे स्वत:चे असेही काही सण आहेत. त्यांची माहिती मनोरंजक वाटेल.

**शौर्याचा सण : कैल पोल्दु ऊर्फ शस्त्रपूजन**

कोडव पुरुष जन्मजात शिकारी व लढवैया असतो नेमबाजीत प्राविण्य न मिळविणारा कोडव क्वचितच आढळेल. पुरुषांप्रमाणेच कोडव स्त्रियाही बंदूक चालवू शकतात. अशा स्थितीत शस्त्रांनी त्यांच्या जीवनात महत्त्वाचे स्थान मिळविले असल्यास नवल नाही. ब्रिटिशांनीही कोडवांना इंडियन आर्म्स ॲक्ट (भारतीय शस्त्रास्त्र कायदा) लागू न करता परवान्याशिवाय बंदुका व तलवारी बाळगण्याची मोकळीक दिली होती. या शस्त्रांचे पूजन हा कोडवांचा महत्त्वाचा सण ठरणे स्वाभाविकच होते. आपल्याकडेही खंडे नवमीला शस्त्रांची व अवजारांची पूजा

केली जाते. तिचे स्वरूप काहीसे प्रतीकात्मक असते. कोडवाचे शस्त्रपूजन ऊर्फ कैल पोळ्दु हा एक जिवंत सण असतो; कारण शस्त्रपूजनानंतर लगेच त्या शस्त्राचा वापरही ते करतात— अर्थात शिकारीसाठी।

पावसाळा सुरू झाला की कोडवाची शस्त्रे म्यानात जातात. त्याची रवानगी देवघरात केली जाते. सारे लक्ष भातशेतीवर केंद्रित केले जाते. जूनपासून सप्टेंबरच्या प्रारंभापर्यंत तीन महिने शस्त्राना विश्रांती द्यावयाची, शिकार करावयाची नाही, हा नियम अगदी कटाक्षाने व कडकपणे पाळला जातो, त्याला पोळ्दु केट्टु असे म्हणतात.

भातशेतीतील कामे पूर्ण झाली, पावसाचा जोर ओसरला की कोडवाना थोडा विसावा मिळतो. पिकाच्या कापणीपर्यंत ते निश्चित असतात. अशा वेळी त्याचा अत्यंत आवडता शोक उफाळून वर येतो. तो म्हणजे शिकारीचा. तो कार्यक्रम सुरू करण्यापूर्वी ज्याच्या साह्याने तो पार पाडावयाचा त्या शस्त्राची पूजा करणे हे कृतज्ञता-ज्ञापनाचे व पर्यायाने सुसंस्कृतपणाचेच कार्य म्हटले पाहिजे.

शस्त्रपूजनाचा मुहूर्त काढून देण्याचे काम मलबारमधून येऊन कूर्गमध्ये स्थायिक झालेले कणिय नावाचे तान्त्रिक ब्राह्मण ज्योतिषी ( ज्याना कुडबुडे ज्योतिषी म्हणता येईल असे ) करतात. हा दिवस सामान्यत सप्टेंबरच्या सुरुवातीस येतो.

## गंध-फुलांनी पूजा

कोडवाच्या नेहमीच्या पूजेत गध-फुलाना स्थान नसते. परंतु या आयुधपूजेचे स्वरूप मात्र सर्वसामान्य मूर्तिपूजेसारखेच असते. तो बहुधा ब्राह्मणी धर्माचा प्रभाव असावा. पावसाळ्याच्या सुरुवातीस देवघरात ठेवलेल्या बंदुका व तलवारी बाहेर काढतात व घासूनपुसून स्वच्छ करतात. त्यानतर त्या रांगेने देवघरातील किंवा माजघरातील ( नेल्लक्कि नडुबाडेमधील ) पणतीसमोर मांडून ठेवतात. शस्त्राना गंध लावून ‘ तोक्रू ’ नावाची विशिष्ट फुले वाहातात या ‘ तोक्रू ’ फुलाचा आकार बंदुकीसारखा असल्याने ती या प्रसगी मुद्दाम वापरली जातात. काही कोडव पूजा करण्यापूर्वी स्वत ही ब्राह्मणाप्रमाणे गंध लावतात. तांदळाच्या पिठाचे उकडलेले उंडे, डुकराचे मांस आणि दारू केळीच्या पानावर वाढून त्याचा नैवेद्य या शस्त्राना दाखविला जातो.

## शस्त्रग्रहणाचा समारंभ

पक्वान्नाचे जेवण झाल्यानतर घरातील सर्व पुरुषमंडळी आपला खास पोषाख चढवून देवघरात किंवा माजघरात जमतात त्यावेळी शस्त्रपूजा करणारा कुटुंब-प्रमुख प्रत्येकाला त्याची त्याची बंदूक देतो. सर्वांत वडील पुरुषला प्रथम बंदूक दिली जाते. बदूक ग्रहण करणारा प्रत्येकजण कुटुंबप्रमुखाला प्रणाम करतो. शिकार करण्याचे वय झालेल्या मुलाला या प्रसंगी त्याची नवी बदूक दिली जाते. बंदूक देताना कुटुंब प्रमुख कोडगू भाषेत म्हणतो, " नरिनो पदिनो बट्टे बुट्ट पणंग, शत्तुर्न एणगते शत्तुरुन एणगुवेंगि बट्टे केट्टि पणग् मित्तुरक् तोणे यायित् निल्ल राजंग् मिनियते, देवळ मरेयते."

( वाघ आणि रानडुक्कर याच्या उडीच्या किंवा मुसडीच्या टप्प्यात उभे न राहाता बाजूला उभे राहून त्याच्यावर हल्ला करा. आपल्या शत्रूला विनाकारण डिवचू नका. त्याचे सामर्थ्य कमी लेखू नका. समोरासमोर झुज करण्याचा प्रसग उद्‌भवल्यास त्याचा रस्ता रोखून त्याला तोंड द्या. मित्राच्या मदतीला नेहमी धावून जा. राजाशी एकनिष्ठ राहा आणि देवाचा विसर पडू देऊ नका. )

यानतर कुटुबप्रमुख घरच्या कुत्र्याना उडे किंवा इडली खाऊ घालतो; आणि सर्व लोक ग्रामदेवतेच्या देवळात ( ऊर अवलमध्ये ) एकत्र जमण्यासाठी घराबाहेर पडण्यापूर्वी तो म्हणतो, " मला मोठा काळवीट आणि सुळे असलेला रानडुक्कर मला आडवा जावो. " आणि असे म्हणून तो जंगलाच्या दिशेने बंदुकीचा एक बार काढतो.

## मैदानी खेळांचा कार्यक्रम

ग्रामदेवतेच्या देवळात गावातील सर्व कोडव जमल्यावर गावचा पुजारी देवाची पूजा करतो आणि देवाचे आशीर्वाद घेतो. त्यानतर सर्वजण मिरवणुकीने इतर देवाच्या व पवित्र स्थानाच्या दर्शनाला जातात. यावेळी ते बदुकीचे बार काढतात व आनदाने जयघोष करतात सरतेशेवटी ते चावडीसमोरच्या पटागणात जमतात. तेथे निशाणबाजीच्या स्पर्धा होतात, धावणे, उच्च व लाब उडी, वजन उचलणे यासारख्या मैदानी खेळाच्या शर्यती होतात. केळीचे तीन जाडजूड खुट एकमेका-जवळ पुरून ते तलवारीच्या एका घावात कापून दाखविण्याची स्पर्धा हा कोडवाचा खास कार्यक्रम तेथे होतो.

## सामुदायिक शिकार

वस्तुत. शस्त्रपूजेच्या दिवशीच शिकारीचा सामुदायिक कार्यक्रम व्हावयाचा. पण तो दिवस पूजा, जेवण व खेळ यातच संपून जातो म्हणून गावच्या सामुदायिक शिकारीसाठी एक स्वतंत्र दिवस मुक्रर केला जातो या शिकारीला 'ऊर बोटे' ( ऊर = गाव: बोटे = शिकार ) असे म्हणतात. ठरलेल्या दिवशी सर्वजण आपापल्या बंदुका व शिकारी कुत्रे घेऊन ग्रामदेवतेच्या देवळात गोळा होतात. नतर ते पद्धतशीरपणे गावाजवळच्या जगलाला वेढा घालतात. कुत्रेवाली मंडळी जगलात शिरतात आणि बंदुकधारी शिकारी मोक्याच्या जागी दबा धरून बसतात. शिकार ही एक खास कला असून कोडव लोक त्या कलेत फार प्रवीण आहेत. भित्रेपणा व गचाळ नेमबाजी या अपराधाना कडक शासन दिले जाते. शिकारीच्या प्रसगी घाबरून जाणाऱ्या किंवा गाफीलपणा करणाऱ्या इसमाला काटेरी झाडावर चढण्याची किंवा काटेरी कुपणावरून उडी मारण्याची शिक्षा सुनावली जाते. जो कोणी शिकार मारील त्याला त्या प्राण्याचे मुंडके व पाय मिळतात. जो कोणी गोळी लागून पडलेल्या मरणोन्मुख श्वापदाच्या शेपटीला प्रथम स्पर्श करतो त्याला त्या श्वापदाच्या मासात खास वाटा मिळतो. शिकारीत सहभागी होणारी माणसे व कुत्रे याना सारखा वाटा दिला जातो.

## शिकारीचा देव अय्यप्पा

मोहिनीच्या रूपातील विष्णू आणि शकर याना झालेला मुलगा अय्यप्पा हा शिकारीचा देव समजला जातो. त्याला शास्ता, हरिहरपुत्र किंवा सातवि असेही म्हणतात. त्याची देवळे जगलात व गावातही असतात. रात्रीच्या वेळी तो आपल्या शिकारी कुत्र्याना शीळ घालीत जगलात फिरत असता अशी समजूत आहे. हा अय्यप्पा बुधवारी व शनिवारी शिकार करतो, म्हणून ते दोन दिवस कोडवानी शिकारीच्या बाबतीत वर्ज्य ठरविले आहेत. काही ठिकाणी अय्यप्पासाठी खास अरण्ये राखून ठेवलेली आहेत. तेथे कोणीही शिकार करीत नाही, अथवा तेथील झाडेही तोडत नाही. शिकार यशस्वी व्हावी यासाठी अय्यप्पाची प्रार्थना करून लोक त्याला नवस बोलतात, आणि त्याला दारूचा व मासाचा—विशेषत: कोंबड्याचा—नैवेद्य दाखवितात. काही अय्यप्पाना मद्य—मास चालत नाही ते शाकाहारी आहेत. अशा अय्यप्पाचे पुजारी बहुधा ब्राह्मण असतात. अय्यप्पाला

प्रसन्न करून घेण्यासाठी त्याला मातीचे कुत्रे, घोडे, धनुष्य-बाण वाहतात.

**नरिमंगल**

एखादा पुरुष सतत शौर्य गाजवीत राहिला की 'त्याचे तलवारीशी लग्न लागले आहे,' असे आपण वाच्यार्थाने म्हणतो. परतु वाघाची शिकार करणाऱ्या कोडवाचे त्या मृत वाघाशी खरोखरीच साग्रसंगीत लग्न लावले जाते, ही गोष्ट बाहेरच्या लोकाना निश्चितच गमतीची वाटेल. या लग्नाला नरिमगल ( नरि = वाघ, मगल = लग्न ) असे म्हणतात.

एखाद्या पुरुषाने अथवा स्त्रीने वाघाची शिकार केली की त्याला अथवा तिला नरिमगल करवून घेण्याचा अधिकार प्राप्त होतो. वाघाची शिकार करणारा 'हीरो' मानला जातो. समाजात त्याला खास प्रतिष्ठा प्राप्त होते. सार्वजनिक समारभात त्याला मानाचे स्थान दिले जाते. तसेच, वाघाची शिकार करणाऱ्याला कल्ले ( गहुमीसे = गलमिशा ) ठेवण्याची परवानगी मिळते. असे कल्ले असणाऱ्याला समाजात मोठा मान मिळतो.

मारण्यात आलेले श्वापद बिबळ्या वाघ ( पँथर ) असल्यास नरिमगलाचा कार्यक्रम गावच्या पटागणात साजरा केला जातो. पण तो ढाण्या किंवा पटाईत वाघ ( टायगर ) असल्यास हा कार्यक्रम तालुक्याच्या पटागणात ( नाड मंदूमध्ये ) थाटाने साजरा केला जातो.

नारिमंगलाचा सगळा विधी खरोखरीच्या लग्नासारखाच असतो. वाघाची शिकार करणारी व्यक्ती ( स्त्री अथवा पुरुष ) अभ्यंगस्नान करून लग्नाच्या वेळचा खास परंपरागत पोषाख परिधान करते. नतर ती वाजत-गाजत मिरवणुकीने गावच्या किंवा तालुक्याच्या पटागणात जाऊन पोचते.

मिरवणुकीने जात असताना, ती व्यक्ती पुरुष असेल, व त्याने ढाण्या वाघाची शिकार केली असेल तर तो आपली बंदूक उलटी धरतो. म्हणजे त्याच्या बदुकीचा दस्ता मागे व नळी पुढे असते. बदुकीची नळी लाल फडक्याने झाकलेली असते. त्या फडक्याला 'ओज' असे म्हणतात. त्याने बदुकीखेरीज इतर साधनानी वाघ मारला असल्यास तो ते लाल फडके आपल्या डोक्यावर ठेवतो. शिकार करणारी व्यक्ती स्त्री असेल आणि तिने बदुकीच्या साह्याने वाघ मारला असेल तर ती आपल्या केसाच्या अंबाड्यावर ते फडके गुंडाळते.

क्र. 23989 मू-प्रवाह

पटागणात शिकार केलेला वाघ किंवा त्याचे कातडे अथवा मुंडके टांगून ठेवलेले असते. त्याच्या जवळच शिकार करणारी व्यक्ती पूर्वेकडे तोंड करून एका तिपाईवर बसते; आणि मग तिच्यावर अक्षता टाकणे, तिला अहेर (भेटी) देणे वगैरे सर्व विधी खरोखरीच्या लग्नासारखेच केले जातात. हा समारंभ चालू असतांना वाघाची शिकार कशी केली, याचे बहादर वर्णन असलेले गाणे गायिले जाते. हा विधी पूर्ण झाल्यावर सर्व इष्टमित्र त्या व्यक्तीच्या घरी जातात. त्याना लग्नाची चमचमीत मेजवानी देऊन निरोप दिला जातो.

## शौर्याचे प्रतीक

वस्तुत नरिमंगल हा काही धार्मिक विधी नव्हे किंवा धर्माशी त्याचा काही संबधही नाही. स्त्री पुरुषाच्या शौर्याला प्रोत्साहन व मान्यता देण्याचा तो एक सार्वजनिक कार्यक्रम असतो. त्यायोगे समाजात आपोआपच शौर्याची व निर्भयतेची जोपासना होते. आपल्या आयुष्यात ज्यानी पन्नास-साठ वाघ मारले आहेत असे पट्टीचे शिकारी कूर्गमध्ये भेटतात. त्याच्या शौर्याची माहिती इतराना होण्याच्या दृष्टीने नरिमंगलाचा उपयोग होतो मात्र यामध्ये पोरकटपणा असत नाही. लग्नाइतकाच गभीरपणे हा समारभ साजरा केला जातो. यामुळे तो धार्मिक नसतानाही त्यावर धार्मिकतेची छाप असते. शूराची पूजा किंवा प्रतिष्ठा म्हणजेच शौर्याची पूजा वा प्रतिष्ठा असते कोडव स्त्रीपुरुषामध्ये पराक्रमाची परंपरा कायम राहाण्यास नरिमंगलासारख्या विधींचा जुन्याकाळी नक्कीच उपयोग होत असला पाहिजे. अलीकडे आर्थिक परिस्थितीमुळे असे कार्यक्रम क्वचितच पाहावयास मिळतात.

## नवधान्याचा सण : हुत्री किंवा पुत्री

कन्नड भाषेतील 'ह' अक्षर शब्दाच्या प्रारभी आल्यास कोडगू भाषेत त्याचे 'प' मध्ये रूपांतर होते. त्यामुळे अनेक शब्द 'ह' व 'प' अक्षराचा वापर करून एकच अर्थ देतात. उदाहरणार्थ कोडवाचा सर्वात मोठा सण सुगीचा. त्याला हुत्री व पुत्री या दोन्ही नावानी संबोधतात. (त्यामुळे डॉ श्रीनिवास यानी 'पुत्री' शब्द वापरला आहे, तर श्री गणपती यानी 'हुत्री' शब्दाचा वापर केला आहे.) हुत्री किंवा पुत्री म्हणजे भाताचे नवीन पीक. भाताच्या पिकाची कापणी या समारंभाने केली जाते. कन्नडमध्ये हुत्त म्हणजे मुंग्याचे

सहकार्य घेतले जाते. कुभार नवे गाडगे आणून देतो, चटई विणणारा नवी चटई देतो, सुतार लाकडाची किंवा बाबूची मोठ्या मापट्याच्या आकाराची कुंडी ( हिला कुत्ति म्हणतात ) आणि लोहार नवा विळा आणून देतो. या सर्वांचा या सणात उपयोग केला जातो.

गावातील सारी देवळे सारवून-लिंपून त्याना रंग दिला जातो. देवळाभोवतालचा भाग, पटांगण व तेथपर्यंत जाण्याचा रस्ता यावरील झाडे-झुडपे काढून टाकून ते सारे स्वच्छ केले जातात. सगळी घरेही सारवून-लिंपून आणि रगरगोटी करून चकचकीत केली जातात. सणाला आवश्यक असणारे उत्साहाचे व प्रसन्नतेचे वातावरण अशा प्रकारे निर्माण केले जाते. या कामी गावातील कारूनारूचे चागले साह्य होते.

## ब्राह्मणी धर्माचा प्रभाव

या सणावर ब्राह्मणी धर्माचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. अर्थात हा प्रभाव प्रत्यक्ष नसून अप्रत्यक्ष आलेला आहे हे केरळच्या लोकजीवनाची माहिती असलेल्या व्यक्तीच्या सहज लक्षात येते. केरळमध्ये 'ओणम्' किंवा 'तिरुओणम्' हा नवधान्योत्सव असाच दहा दिवस साजरा केला जातो तेथेही मेजवान्या, नृत्य-गायन आणि नौकाच्या शर्यती याना प्राधान्य दिले जाते. कूर्गमध्ये समुद्र किंवा खाड्या नसल्याने तेथे नौकाच्या शर्यतीऐवजी मैदानी व फरीदग्यासारखे मर्दानी खेळ आणि शिकार याना प्राधान्य मिळाले आहे. केरळप्रमाणेच कूर्गमध्येही धार्मिक बाबींचा विचार करताना राशींवर आधारलेले महिनेच प्रमाण मानले जातात. वृश्चिक ( कार्तिक ) महिन्याच्या पौर्णिमेस हुत्रीचा सण साजरा केला जातो. त्यावेळी कृत्तिका अथवा रोहिणी हे नक्षत्र असणे आवश्यक समजले जाते. प्रत्यक्ष मुहूर्त शोधून काढण्याचे काम ज्योतिषी करतो. तसेच कुटुंबातील कोणा पुरुषाच्या हातून कापणीचा शुभारभ केल्यास भरपूर धान्य मिळेल हे सागण्याची जबाबदारीही ज्योतिष्यावरच असते. गावचा भटजी घरोघर जाऊन लोकाना तीर्थ देतो. मुख्य सणादिवशी भल्या पहाटे उठून घरची गृहिणी घर आणि आगण स्वच्छ झाडते व गाईच्या शेणाचा सडा घालते. दारे व खिडक्या फुले व आब्याच्या व पिंपळाच्या डहाळ्या याच्या तोरणानी सजविल्या जातात. उबरठ्यावर व खिडक्या-वर पावित्र्यदर्शक चिन्हे रेखाटली जातात. घरापासून शेतापर्यंतचा मार्ग तोरणांनी

किंवा सापाचे वारूळ असा एक शब्द आहे. त्यावरून हुत्तरी → हुत्री असा शब्द बनला असण्याचीही शक्यता आहे. परंतु 'पुदियारी' (नवे भात) या मल्याळम् शब्दापासून पुद्री → पुत्री हा शब्द बनला असल्याचे मत अधिक ग्राह्य वाटते.

**नृत्यगायनाला प्राधान्य**

पुत्तरी किंवा पुत्रीच्या सणात नृत्य व गायन यांना विशेष प्राधान्य दिले जाते. प्रत्यक्ष भातकापणीच्या कार्यक्रमापूर्वी सात दिवस सर्व लोक आनंदाने नाचतात व गातात. कोडवाचा पुत्रीचा नाच विशेष प्रख्यात व लोकप्रिय आहे. या सामुदायिक नृत्यात प्रत्येक कुटुंबातील किमान एका तरी पुरुषाने सामील झालेच पाहिजे, अशी प्रथा आहे. सण सुरू होण्यापूर्वी आठ दिवस सारे लोक रात्रीच्या वेळी एकत्र जमून नृत्यकाराच्या मार्गदर्शनाखाली नृत्याचा सराव करतात. गावच्या पटांगणात केल्या जाणाऱ्या या सरावाला 'ईडु' असे म्हणतात.

त्यानंतर प्रत्यक्ष सणाला सुरुवात केली जाते. पहिले सात दिवस सामुदायिक नृत्य, गाणे व खेळ यांच्या कार्यक्रमांनी गजबजलेले असतात. आठव्या दिवशी प्रत्यक्ष कापणीचा समारंभ होतो नवव्या दिवशी प्रत्येक घरात पक्वान्नाची मेजवानी होते आणि गावातील लोकांचे खेळ व नाचगाणी होतात. दहाव्या दिवशी गावच्या किंवा तालुक्याच्या (नाडाच्या – 'नाड' म्हणजे काही गावांचा समूह हा तालुक्यापेक्षा खूपच लहान असतो. पण मराठी वाचकांकरिता 'नाड' या शब्दासाठी 'तालुका' हा शब्द वापरला आहे) लोकांचा सामुदायिक शिकार, खेळ व जेवणावळ असा कार्यक्रम होऊन सणाची समाप्ती होते.

तसे पाहिल्यास सर्वच शेती-प्रधान समाजात व जमातींत पिकाच्या कापणीला महत्त्व असते. शुभमुहूर्तावर कापणी केली जाते. भाताच्या लोंब्या देवाला वाहिल्या जातात, किंवा घराच्या चौकटीवर त्यांची माळ करून बांधली जाते. परंतु कोडवांच्या पुत्री सणामध्ये नृत्यगायनाला जे प्राधान्य दिले गेले आहे ते त्याचेच वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

**बारा बलुत्यांचे सहकार्य**

पुत्रीच्या सणात गावातील बहुतेक सर्व व्यावसायिकांचे किंवा बारा बलुत्यांचे

सहकार्य घेतले जाते. कुंभार नवे गाडगे आणून देतो, चटई विणणारा नवी चटई देतो, सुतार लाकडाची किंवा बांबूची मोठ्या मापट्याच्या आकाराची कुडी (हिला कुत्ति म्हणतात) आणि लोहार नवा विळा आणून देतो. या सर्वांचा या सणात उपयोग केला जातो.

गावातील सारी देवळे सारवून-लिंपून त्याना रंग दिला जातो. देवळाभोवतालचा भाग, पटांगण व तेथपर्यंत जाण्याचा रस्ता यावरील झाडे-झुडपे काढून टाकून ते सारे स्वच्छ केले जातात. सगळी घरेही सारवून-लिंपून आणि रंगरंगोटी करून चकचकीत केली जातात. सणाला आवश्यक असणारे उत्साहाचे व प्रसन्नतेचे वातावरण अशा प्रकारे निर्माण केले जाते. या कामी गावातील कारूनारूंचे चांगले साह्य होते.

## ब्राह्मणी धर्माचा प्रभाव

या सणावर ब्राह्मणी धर्माचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. अर्थात हा प्रभाव प्रत्यक्ष नसून अप्रत्यक्ष आलेला आहे हे केरळच्या लोकजीवनाची माहिती असलेल्या व्यक्तीच्या सहज लक्षात येते. केरळमध्ये 'ओणम्' किंवा 'तिरुओणम्' हा नवधान्योत्सव असाच दहा दिवस साजरा केला जातो. तेथेही मेजवान्या, नृत्य-गायन आणि नौकांच्या शर्यती यांना प्राधान्य दिले जाते. कूर्गमध्ये समुद्र किंवा खाड्या नसल्याने तेथे नौकाच्या शर्यतीऐवजी मैदानी व फरीदग्यासारखे मर्दानी खेळ आणि शिकार यांना प्राधान्य मिळाले आहे. केरळप्रमाणेच कूर्गमध्येही धार्मिक बाबींचा विचार करताना राशींवर आधारलेले महिनेच प्रमाण मानले जातात. वृश्चिक (कार्तिक) महिन्याच्या पौर्णिमेस हुत्रीचा सण साजरा केला जातो. त्यावेळी कृत्तिका अथवा रोहिणी हे नक्षत्र असणे आवश्यक समजले जाते. प्रत्यक्ष मुहूर्त शोधून काढण्याचे काम ज्योतिषी करतो. तसेच कुटुंबातील कोणा पुरुषाच्या हातून कापणीचा शुभारंभ केल्यास भरपूर धान्य मिळेल हे सांगण्याची जबाबदारीही ज्योतिष्यावरच असते. गावचा भटजी घरोघर जाऊन लोकांना तीर्थ देतो. मुख्य सणादिवशी भल्या पहाटे उठून घरची गृहिणी घर आणि अंगण स्वच्छ झाडते व गाईच्या शेणाचा सडा घालते. दारे व खिडक्या फुले व आंब्याच्या व पिंपळाच्या डहाळ्या यांच्या तोरणांनी सजविल्या जातात. उंबरठ्यावर व खिडक्या-वर पावित्र्यदर्शक चिन्हे रेखाटली जातात. घरापासून शेतापर्यंतचा मार्ग तोरणांनी

किंवा सापाचे वारूळ असा एक शब्द आहे. त्यावरून हुत्तरी → हुत्री असा शब्द बनला असण्याचीही शक्यता आहे. परंतु 'पुदियारी' (नवे भात) या मल्याळम् शब्दापासून पुद्री → पुत्री हा शब्द बनला असल्याचे मत अधिक ग्राह्य वाटते.

**नृत्यगायनाला प्राधान्य**

पुत्तरी किंवा पुत्रीच्या सणात नृत्य व गायन याना विशेष प्राधान्य दिले जाते. प्रत्यक्ष भातकापणीच्या कार्यक्रमापूर्वी सात दिवस सर्व लोक आनंदाने नाचतात व गातात. कोडवाचा पुत्रीचा नाच विशेष प्रख्यात व लोकप्रिय आहे. या सामुदायिक नृत्यात प्रत्येक कुटुंबातील किमान एका तरी पुरुषाने सामील झालेच पाहिजे, अशी प्रथा आहे. सण सुरू होण्यापूर्वी आठ दिवस सारे लोक रात्रीच्या वेळी एकत्र जमून नृत्यकाराच्या मार्गदर्शनाखाली नृत्याचा सराव करतात. गावच्या पटांगणात केल्या जाणाऱ्या या सरावाला 'ईडु' असे म्हणतात.

त्यानंतर प्रत्यक्ष सणाला सुरुवात केली जाते. पहिले सात दिवस सामुदायिक नृत्य, गाणे व खेळ याच्या कार्यक्रमानी गजबजलेले असतात. आठव्या दिवशी प्रत्यक्ष कापणीचा समारंभ होतो. नवव्या दिवशी प्रत्येक घरात पक्वान्नाची मेजवानी होते आणि गावातील लोकाचे खेळ व नाचगाणी होतात. दहाव्या दिवशी गावच्या किंवा तालुक्याच्या (नाडाच्या — 'नाड' म्हणजे काही गावाचा समूह हा तालुक्यापेक्षा खूपच लहान असतो. पण मराठी वाचकाकरिता 'नाड' या शब्दासाठी 'तालुका' हा शब्द वापरला आहे) लोकाचा सामुदायिक शिकार, खेळ व जेवणावळ असा कार्यक्रम होऊन सणाची समाप्ती होते.

तसे पाहिल्यास सर्वच शेती-प्रधान समाजात व जमातींत पिकाच्या कापणीला महत्त्व असते. शुभमुहूर्तावर कापणी केली जाते. भाताच्या लोंब्या देवाला वाहिल्या जातात, किंवा घराच्या चौकटीवर त्याची माळ करून बांधली जाते. परंतु कोडवाच्या पुत्री सणामध्ये नृत्यगायनाला जे प्राधान्य दिले गेले आहे ते त्याचेच वैशिष्ट्य म्हणावे लागेल

**बारा बलुत्याचे सहकार्य**

पुत्रीच्या सणात गावातील बहुतेक सर्व व्यावसायिकाचे किंवा बारा बलुत्याचे

सहकार्य घेतले जाते. कुभार नवे गाडगे आणून देतो, चटई विणणारा नवी चटई देतो, सुतार लाकडाची किंवा बाबूची मोठ्या मापट्याच्या आकाराची कुंडी (हिला कुत्ति म्हणतात) आणि लोहार नवा विळा आणून देतो. या सर्वांचा या सणात उपयोग केला जातो.

गावातील सारी देवळे सारवून-लिंपून त्याना रंग दिला जातो. देवळाभोवतालचा भाग, पटागण व तेथपर्यंत जाण्याचा रस्ता यावरील झाडे-झुडपे काढून टाकून ते सारे स्वच्छ केले जातात. सगळी घरेही सारवून-लिंपून आणि रगरंगोटी करून चकचकीत केली जातात. सणाला आवश्यक असणारे उत्साहाचे व प्रसन्नतेचे वातावरण अशा प्रकारे निर्माण केले जाते. या कामी गावातील कारूनारूचे चागले साह्य होते

## ब्राह्मणी धर्माचा प्रभाव

या सणावर ब्राह्मणी धर्माचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. अर्थात हा प्रभाव प्रत्यक्ष नसून अप्रत्यक्ष आलेला आहे हे केरळच्या लोकजीवनाची माहिती असलेल्या व्यक्तीच्या सहज लक्षात येते. केरळमध्ये 'ओणम्' किंवा 'तिरुओणम्' हा नवधान्योत्सव असाच दहा दिवस साजरा केला जातो तेथेही मेजवान्या, नृत्य-गायन आणि नौकांच्या शर्यती यांना प्राधान्य दिले जाते. कूर्गमध्ये समुद्र किंवा खाड्या नसल्याने तेथे नौकाच्या शर्यतीऐवजी मैदानी व फरीदग्यासारखे मर्दानी खेळ आणि शिकार याना प्राधान्य मिळाले आहे. केरळप्रमाणेच कूर्गमध्येही धार्मिक बाबींचा विचार करताना राशींवर आधारलेले महिनेच प्रमाण मानले जातात. वृश्चिक (कार्तिक) महिन्याच्या पौर्णिमेस हुत्रीचा सण साजरा केला जातो. त्यावेळी कृत्तिका अथवा रोहिणी हे नक्षत्र असणे आवश्यक समजले जाते. प्रत्यक्ष मुहूर्त शोधून काढण्याचे काम ज्योतिषी करतो. तसेच कुटुंबातील कोणा पुरुषाच्या हातून कापणीचा शुभारभ केल्यास भरपूर धान्य मिळेल हे सागण्याची जबाबदारीही ज्योतिष्यावरच असते. गावचा भटजी घरोघर जाऊन लोकाना तीर्थ देतो. मुख्य सणादिवशी भल्या पहाटे उठून घरची गृहिणी घर आणि आगण स्वच्छ झाडते व गाईच्या शेणाचा सडा घालते. दारे व खिडक्या फुले व आंब्याच्या व पिंपळाच्या डहाळ्या यांच्या तोरणानी सजविल्या जातात. उंबरठ्यावर व खिडक्या-वर पावित्र्यदर्शक चिन्हे रेखाटली जातात. घरापासून शेतापर्यंतचा मार्ग तोरणानी

सजविला जातो. नेल्लकि नडुबाडे ( माजघर ) मधील दिवा लावला जातो. त्या दिव्याखाली भिंतीला चिकटून नवी चटई अंथरली जाते. तिच्यावर नवी टोपली ठेवून आंबा, पिंपळ व कडू भोपळा याची पाने तिच्यात ठेवली जातात. त्यावर काही वेलींचे तुकडे ठेवतात. दुसऱ्या एका टोपलीत घरातील जुने भात भरून त्यावर शेरभर भात व अर्धाशेर तांदूळ मापात भरून ती एकमेकावर ठेवतात त्यावर तांदळाचे पीठ भरलेले एक एक भांडे ठेवतात नव्या धान्याचे स्वागत करण्यासाठी घरात गतवर्षीचे धान्य भरपूर शिल्लक आहे, हे दर्शविणारे ते प्रतीक आहे.

नव्या मडक्यामध्ये भाजलेल्या तांदळाचे पीठ भरून ठेवतात. त्याला तंबिट्टू असे म्हणतात. त्याच्या शेजारी इतर लहान-लहान भांड्यामध्ये दूध, तूप, मध, तीळ, खोबऱ्याचे तुकडे ठेवले जातात. धान्याच्या बुट्टीशेजारी कुडीच्या आकाराची लाकडी किंवा बांबूची कुत्ती ठेवतात. तिच्यात थोडेसे दूध, मध, तूप, खोबऱ्याचे तुकडे, आले, ओला बोरू आणि तीळ टाकतात. जवळच सकाळी लोहाराने आणून दिलेला नवा विळा ठेवतात. त्याच्या शेजारी एक छोटीशी तिवई ठेवून तिच्यावर आरतीचे ताम्हण ठेवतात. त्या ताम्हनात अक्षता, विड्याची पाने व सुपाऱ्या ठेवलेल्या असतात. या तिवईला ‘ मुक्कलि ’ म्हणतात.

हे सर्व चालू असताना वाजत्री वाजत असतात. प्रत्येक कुटुंबाचे स्वतंत्र वाजत्री असतात. शुभाशुभ प्रसंगी वाद्ये वाजविणे एवढेच काम करणाऱ्या अस्पृश्य जमाती कूर्गमध्ये असून त्यांची घराणी एकेका कोडव कुटुंबाशी बांधलेली असतात.

या सणाच्या सुमारास पिकून तयार होणारा हुत्री गेणसू नावाचा रताळ्यासारखा एक कंद असतो. तो उकडून त्यात मध व तूप घालून सर्वांना तो फराळ म्हणून दिला जातो.

## मूळ पुरुषाचे स्मरण

यानंतर कुटुंबातील सर्व मंडळी माजघरातील दिव्यासमोर गोळा होतात. यावेळी कर्ता पुरुष परमेश्वराचे व आपल्या मूळपुरुषाचे स्मरण करून त्याचे आशीर्वाद मागतो. यावेळी ज्या परमेश्वराचे स्मरण केले जाते त्याचे नाव इग्गुतप्पा ’ असे आहे. मूळ पुरुषाला ‘ कारण ’ म्हणतात.

कुत्ती घेऊन शेतात कोणी जावयाचे आणि भाताच्या पहिल्या ओंब्या कुणी

कापावयाच्या ते ज्योतिषी महाराज प्रत्येकाची कुंडली पाहून निश्चित करतात. शुभ मुहूर्त जवळ येताच ( हा बहुधा गोरज मुहूर्त असतो ) कुटुंब प्रमुख ज्योतिष्याने निवडलेल्या पुरुषाकडे कुत्ती व विळा देतो. हा भाग्यवान् पुरुषाने यावेळी पांढरा कुप्या घातलेला असतो. बंद गळ्याचा, लांब बाह्याचा, पिंढऱ्यापर्यंत पोचणारा झग्यासारखा अंगरखा म्हणजे कुप्या होय.

यावेळी सर्वजण आपल्यापेक्षा वडील मंडळींना वाकून नमस्कार करतात, आणि त्यांचे आशीर्वाद घेतात. मात्र ज्याच्याकडे कुत्ती आलेली असते तो त्या क्षणी सर्वश्रेष्ठ पुरुष असल्यामुळे तो कोणाला नमस्कार करीत नाही. एक कुमारिका हातात आरती घेऊन पुढे होते. तिच्यापुढे वाजंत्री मंगल वाद्ये वाजवीत चालू लागतात. तिच्या मागून कुत्ती घेतलेला पुरुष आणि घरचे आबालवृद्ध, स्त्री-पुरुष, नोकर-चाकर हे सारे मिरवणुकीने शेताकडे जाऊ लागतात.

## देव पोळ्दु व ओक्का पोळ्दु

कौटुंबिक धान्य कापणीचा हा कार्यक्रम सुरू करण्यापूर्वी गावच्या सामुदायिक कापणीचा एक कार्यक्रम व्हावयाचा असतो त्यासाठी सगळी गावकरी मंडळी ग्रामदेवतेच्या देवळात जमा होतात. तेथे देवाचा ब्राह्मण पुजारी देवाची पूजा करून देवस्थानाच्या शेताकडे जातो. त्याच्या मागोमाग इतर गावकरी जातात. तेथील एका विशिष्ट जागेची पूजा भटजी करतो, आणि भाताच्या रोपाच्या एका झुबक्याच्या मुळाशी दूध व मध ओततो. कोडवाच्या धार्मिक विधीत आणि दैनंदिन आहारात मधाला जेवढे प्राधान्य दिले गेले आहे तेवढे अन्य कोणत्याही जमातीत असेल असे वाटत नाही. यातूनच कूर्गमध्ये मधाच्या उत्पादनाचा विकास घडून आला असला पाहिजे, हे उघड आहे. पण या मधमाहात्म्याचा कोडवाच्या मूलस्रोताशी काही संबंध असेल काय ? विचार करण्यासारखी ही गोष्ट अवश्य आहे. ही पूजा झाल्यानंतर बंदुकीचा एक बार काढला जातो. यानंतर भटजी दोन-तीन मुठी भाताच्या लोंब्या कापतो आणि आपला विळा ( अरुवल ) देवळाच्या प्रमुखाकडे देतो. मंदिर-प्रमुख सर्वांना मूठमूठभर मिळतील एवढ्या लोंब्या कापतो. सर्वजण 'पोलि पोलि महादेवा !' ( महादेवा भरपूर पीक दे. ) असा घोष करीत देवळाकडे गात नाचत जातात. तेथे देवाला त्या लोंब्या अर्पण करून सर्वजण आपापल्या घरी

जातात. या कार्यक्रमाला देव पोळ्दु असे म्हणतात. घरच्या कापणीच्या समारंभाला ओक्का पोव्दु ( कौटुंबिक पूजा ) असे म्हणतात.

### पूर्व दिशेला नमस्कार

प्रत्येक घरापासून भाताचे शेत अगदी जवळ, नजरेच्या टप्प्यात असते. मिरवणुकीने तेथे पोचल्यावर कापणी करणारा इसम पवित्र पूर्व दिशेला व शेताला नमस्कार करतो. घरातील टोपलीत ठेवलेल्या पानाची व वेलींची सुरळी करून त्याने बरोबर आणलेली असते. ती सुरळी तो एका भातरोपाच्या मुळाशी बांधतो आणि कुत्तीमधील दूध, मध वगैरे पदार्थ त्या सुरळीवर ओततो. यावेळी सर्वजण ‘ पोलि पोलि महादेवा ’ असा जयघोष करतात. बंदुकीतून एक बार काढला जातो. त्यानंतर कापणी करणारा लोंब्या कापतो. दर खेपेस तीन, पाच, सात, नऊ अशा विषम संख्येने लोंब्या कापण्याची तो खबरदारी घेतो. या लोंब्या तो कुत्तीत ठेवतो आणि ती कुत्ती डोकीवर किंवा खांद्यावर घेतो. इतर लोकही मूठमूठभर लोंब्या घेतात आणि सर्वजण वाजत-गाजत, फटाके उडवीत, भुईनळे लावीत घरी परत येतात. यावेळी ‘ पोलि देवा ’ चा गजर सतत चालू असतो. घरात प्रवेश करण्यापूर्वी सर्वजण मूळ पुरुषाच्या समाधीकडे ( कैमडाकडे ) किंवा कट्टयाकडे ( कारणव तरेकडे ) जातात व तेथे काही लोंब्या वाहतात तेथून घराजवळच्या खळ्यात जाऊन ते घरी येतात. दारातच एक सौभाग्यवती कुत्ती घेऊन आलेल्या पुरुषाच्या पायावर पाणी घालते आणि त्याला दूध पिण्यास देते. नंतर तो घरात प्रवेश करून हातातील कुत्ती माजघरातील दिव्याखाली अंथरलेल्या चटईवर ठेवतो. काही ठिकाणी ही कुत्ती स्वयंपाकघरात ठेवली जाते. यानंतर भाताच्या लोंब्याच्या माळा तयार करून त्या दारावर व खिडक्यावर बांधतात. धान्याच्या कणगी, कपडे व पैसे ठेवावयाच्या पेट्या, गाद्या, पलंग, चूल, वगैरे सर्व महत्त्वाच्या ठिकाणी या लोंब्या ठेवल्या जातात.

### येळकिक पुट्टूचा प्रसाद

कुत्ती ठेवल्यानंतर ती आणणारा इसम घरातील वडीलधाऱ्यांना प्रणाम करून त्यांचे आशीर्वाद घेतो; आणि मग भाजलेल्या तांदळाचे पीठ, केळी, दूध, मध आणि नव्या भाताचे सात दाणे, सात नाणी, सात खडे, सात तीळ, सात खोबऱ्याचे तुकडे, वगैरे सात सात गोष्टी मिसळून त्यांचे उंडे किंवा गोळे बन-

वितो. हे गोळे तो पिंपळाच्या पानावर ठेवतो आणि प्रत्येक पूर्वजाचे नाव घेऊन ते घराच्या छतावर मारतो. जो गोळा छताला चिकटेल तो त्या पूर्वजाने स्वीकारला आणि तो संतुष्ट आहे असे समजले जाते. हे गोळे देवघरातील दिव्याला व मूळ पुरुषाच्या समाधीला वाहून उरलेल्या गोळ्यातील थोडा-थोडा भाग सर्वजण प्रसाद म्हणून ग्रहण करतात. ज्या कोणाला या प्रसादातील खडे किंवा नाणी मिळतील ते दीर्घायुषी किंवा श्रीमंत होतील, असे समजले जाते. या प्रसादात सात तादूळ असल्यामुळे त्याला सात तादळाची पोळी-येळक्किपुट्ट किंवा येळक्किपुट्टू असे म्हणतात.

या सणासाठी तादळाची खीर बनविली जाते. तिच्यात नव्या भाताचे सात दाणे सोडून टाकले जातात. यानतर केळीच्या पानावर जेवणाचे सारे पदार्थ वाढून तो नैवेद्य देवघरातील व समाधीवरील पणतीपुढे ठेवला जातो मग इष्टमित्रासह सर्वजण भोजन करतात.

असा हा आनदाचा सण ! काही ठिकाणी गावच्या सामुदायिक भोजनाने या सणाचे समापन होते. भातावर ज्याचे जीवन सर्वस्वी अवलंबून आहे त्याना हा सण सर्वात महत्त्वाचा वाटल्यास काय नवल ?

**कावेरी संक्रमण : ब्राह्मणी धर्माची गडद छाया**

कैल पोळ्दु ( शस्त्रपूजन ) किंवा पुत्री ( नवधान्य स्वागत ) हे कोडवाचे खास असे सण म्हणता येतात. त्यात त्याच्या विशिष्ट सस्कृतीचे प्रतिबिंब पाहायास मिळते. कावेरी सक्रमण हा कोडवाचा अत्यंत महत्त्वाचा व पवित्र सण असला तरी त्यात त्याचे वेगळेपण मुळीच दिसत नाही. उलट ब्राह्मणी धर्माची गडद छाया त्यावर पसरलेली दिसते. किंबहुना कोडवाना हिंदू धर्माशी जोडणारा तो एक अत्यत मजबूत दुवा आहे, असेही म्हणता येईल. कोडवाच्या सस्कृतीकरणाचा ( Sanskritization चा ) जो प्रयत्न ब्राह्मणानी केला त्याचेच हे फळ म्हणता येईल. परतु तो प्रयत्न या सणापर्यंत येऊनच थाबला. त्यांच्या इतर जीवनाचे किंवा भावजीवनाचे संस्कृतीकरण होऊ शकले नाही. तरीपण या एका सणाच्या वेळी कोडव स्त्रीपुरुष इतर कावेरी भक्ताच्या मेळाव्यात सामील होऊन कावेरीच्या उगमस्थानी असलेल्या कुडात भक्तिभावाने स्नान करतात, आणि आपण काशीहून गगा आणतो त्याप्रमाणे कोडव लोक तलकावेरीतील पाणी

गंगाजल म्हणून घरी आणतात. सूर्य तुला ( तूळ ) राशीत प्रवेश करतो तेव्हा हा सण किंवा पर्व सुरू होते आणि तो वृश्चिक राशीत प्रवेश करीपर्यंत, म्हणजे महिनाभर ते चालू राहते. या काळात कावेरीच्या उगमापाशी असलेल्या कुंडात हजारो-लाखो भाविक मंडळी स्नान करतात. त्यात कोडवाची संख्या खूपच मोठी असते. तलकावेरीचे सविस्तर वर्णन ‘ जय कावेरी ’ या लेखात आले असल्याने त्याची येथे पुनरावृत्ती केलेली नाही.

**खास कोडव स्पर्श**

हा झाला या सणाचा ब्राह्मणी किंवा वैदिक-पौराणिक भाग. त्याची दुसरी एक अवैदिक किंवा प्राकृत बाजूही आहे, आणि कोडवाच्या सणाचा विचार करताना ही बाजूच उल्लेखनीय ठरते. कारण तिला कोडवाच्या विशिष्ट जीवन पद्धतीचा स्पर्श झालेला आहे.

तीर्थोद्भवाच्या रूपाने तुला संक्रमणाच्या वेळी कावेरी दरसाल आपल्या भक्तासाठी प्रकट होते. त्यावेळी ती प्रत्येक कोडवाच्या घराला व शेताला भेट देऊन त्याने आपले घर लखलख ठेवले आहे की नाही आणि आपल्या शेताचा इंच-इंच भाग लागवडीखाली आणला आहे किंवा नाही याची पाहाणी करते, अशी श्रद्धा असल्यामुळे सर्व कोडव लोक आपापली घरे झाडून, सारवून स्वच्छ ठेवतात; आणि आपल्या सर्व जमिनीकडे आपले लक्ष आहे, हे सिद्ध करण्यासाठी शेतात झाडाच्या फांद्या अथवा मधोमध चिंबविलेल्या बांबूचे दोन तुकडे कैचीप्रमाणे पुरतात व विशिष्ट जंगली वेलींच्या माळांनी ते सुशोभित करतात. याला बोत्तू किंवा बोत्त म्हणजे निशाण असे म्हणतात. हे बोत्तू शेताप्रमाणेच इतर स्थावर संपत्तीमध्येही पुरले जातात. ही स्थावर संपत्ती कावेरी-भक्ताच्या मालकीची आहे, असे सिद्ध करण्यासाठी ते केले जाते. दोन दिवसाच्या या सणातील पहिल्या दिवशी बोत्तस्थापनेचा हा कार्यक्रम घरातील पुरुष मंडळी नोकराच्या साह्याने पार पाडतात. दुसऱ्या दिवशीच्या पूजेसाठी फुले गोळा करण्याचा कार्यक्रमही या दिवशी संध्याकाळी पार पाडला जातो.

**कणिपूजा**

दुसऱ्या दिवशी सकाळी सूर्योदयापूर्वी उठून घरची गृहिणी सारे घर स्वच्छ झाडून काढते. गायींच्या शेणाने ते सारवते, आणि सगळीकडे तीर्थ शिंपडते.

घरातील सौभाग्यवती स्त्री स्नान करून नवे किंवा धुतलेले कपडे घालते आणि माजघरातील दिवा लावते. नतर काकडी, भोपळा, कोहळा यासारखी एखादी फळभाजी घेऊन तिच्यावर बारीक काड्या खोचून ती कावेरी मातेची मूर्ती तयार करते. त्या मूर्तीला ती फुले व दागदागिने घालून सजविते. या मूर्तीजवळ एका थाळीत आरतीचा दिवा, तादूळ, विड्याची पाने व सुपाऱ्या ठेवल्या जातात.

यानंतर घरातील सर्व मडळी स्नान करून, नवे कपडे घालून त्या मूर्तीसमोर उभी राहातात. प्रथम सर्वांत वडील व्यक्ती थाळीतील तादूळ पारंपरिक पद्धतीने तीन वेळा मूर्तीवर टाकते, आणि तिला नमस्कार करते. तिच्या पाठोपाठ इतर मडळी तिचे अनुकरण करतात आणि लहान मडळी वडिलाच्या पायाना हात लावून प्रणाम करतात व आशीर्वाद घेतात. आपल्या शेजाऱ्याच्या घरी जाऊन वडिलाना नमस्कार करण्याची प्रथा या सणात आहे. लग्न झालेल्या मुली यावेळी आपल्या माहेरी जातात. आपल्याकडील गौरीपूजेसारखीच ही कावेरी पूजा दिसते.

या पूजेला कणिपूजा म्हणतात. 'कणि' म्हणजे प्रतिमा. 'कण्ण' म्हणजे डोळा या कन्नड शब्दावरून किंवा मल्याळम् मधील 'कणि' म्हणजे दर्शन या शब्दापासून हा शब्द बनला असावा; किंवा 'कणि' हा शब्द जसाच्या तसाच घेतला असावा.

**गगापूजा**

कणिपूजेनतर घरातील सौभाग्यवती स्त्री घरच्या विहिरीवर जाते आणि तेथे गंगापूजा करते. तेथील चोत्तूवर ती तीन दोशे (आंबोळ्या) ठेवते. जणू तो रानातील देवाला नैवेद्यच असतो. मग ती विहिरीचे पाणी काढून घरी आणते आणि त्या पाण्याने घरच्या लोकासाठी स्वयपाक तयार करते.

कावेरी मातेची ही कणि ऊर्फ प्रतिमा तीन दिवस घरात ठेवतात. या अवधीत जे कोणी घरी येतात ते तिच्यावर तांदूळ टाकून व नमस्कार करून तिच्याविषयी आपला भक्तिभाव व्यक्त करतात. चौथ्या दिवशी ही प्रतिमा जवळच्या नदीत विसर्जित करतात. जवळपास नदी नसल्यास तिचे विसर्जन दूध (चीक) असणाऱ्या झाडाखाली करतात.

## बोड्डु नम्मे

आपल्याकडील शिमग्यातील सोंगाप्रमाणे कूर्गमध्येही सोंगे काढण्याचा एक सण आहे. त्याला बोड्डु नम्मे असे म्हणतात. नम्मे म्हणजे सण. ' बोड्डु ' म्हणजे शिंग नसलेला, टक्कल पडलेला. त्यावरून बहुरूप्याचा सण असा अर्थ त्याला प्राप्त झाला आहे. हा सण सर्व गावात एका ठराविक दिवशी साजरा केला जात नाही. कारण त्याचा धर्माशी काही संबंध नाही. प्रत्येक गाव आपल्या सोयी-प्रमाणे त्याचा दिवस निश्चित करतो. मात्र पावसाळा सुरू होण्यापूर्वी हा सण साजरा केला जातो. रात्रीच्या वेळी वेगवेगळी सोंगे घेऊन गावातील पुरुष मुले व तरुण घरोघरी जातात. मापिळ्ळा ( मोपला ), ओड्डर ( वड्ड ), सन्याशी, जोगी ( भटके गायक ), कलावंतिणी वगैरेंची सोंगे ती घेतात. प्रत्येक घरी त्यांना चहा-कॉफी, फराळाचे पदार्थ, नारळ, केळी वगैरे दिली जातात. गावा-तील इतर जातीजमातींची मुलेही त्यात सहभागी होतात

दुसऱ्या दिवशी सकाळी गावच्या मैदानात सगळे बहुरूपी एकत्र येतात. त्यांना पाहायला सारा गाव लोटतो. तेथे कुणाच्या तरी अंगात देव येतो. नंतर घोड्याची शर्यत होते. मात्र हे घोडे खरोखरीचे नसून पाय नसलेले घोड्यांचे सांगाडे असतात. ते उचलून घेऊन घोडेस्वार बनल्याचा आभास निर्माण केला जातो. असे घोडेस्वार धावतात त्यात विजयी होणाऱ्याला इनाम दिले जाते. असेच इतरही गमतीचे खेळ होतात आणि या सणाची समाप्ती होते. ग्रामीण जीवनातील हास्यविनोदाच्या अभिव्यक्तीला या सणामुळे चांगला वाव मिळतो.

## शेती आणि शौर्य

सारांश, कोडवांचे सण हे मुख्यत शेती आणि शौर्य या गोष्टींवर आधारलेले आहेत. कॉफी, वेलदोडे, मिरी, संत्री वगैरे बागायती शेती ही अगदी अलीकडील घटना आहे. तत्पूर्वी शतकानुशतके भातशेती हाच कोडवांच्या जीवनाचा आधार होता. त्यामुळे त्यांच्या सणात तांदुळालाच सर्वांत अधिक प्राधान्य मिळालेले दिसते. याचा पुरावा त्यांच्यातील अनेक प्रथा व समजुती यामध्ये आढळतो. उदाहरणार्थ, नववर्ष दिनी नांगरलेल्या शेतातील एक मातीचे ढेकूळ घरी आणून ते धान्याच्या कणगीत किंवा कोठारात ठेवले जाते. पुढे जेव्हा भाताच्या लोंबीत तांदूळ भरल्याचे पहिल्या प्रथम एखादाला दिसते तेव्हा तो घरी येऊन भाताच्या

कणगीसमोर उभा राहतो आणि म्हणतो, "भाताच्या लोंबीत मला तांदूळ दिसला. चांगला टचटचीत भरलेला. अगदी खरं ! तू मुळीच आश्चर्यचकित होऊ नकोस." आता भरपूर पीक येणार असून धान्याचे कोठार भरून ओसंडणार असल्याची ग्वाही तो कोठाराला देतो. कावेरी संक्रमणाच्या वेळी तलकावेरीला जाणारे यात्रेकरू भागमंडलच्या भगंडेश्वर मंदिरातील अक्षय पात्रातून मूठभर तांदूळ आणतात आणि ते घरच्या कणगीत किंवा कोठारात टाकतात. त्यायोगे भरपूर पीक येते अशी समजूत आहे

कुटुंबप्रमुखाच्या सर्वांत थोरल्या मुलाची नाळ कुटुंबाच्या भाताच्या शेतात पुरली जाते, कारण तोच त्या शेताचा मालक होणार असतो; आणि त्याची काळजी घेणार असतो. याचा अर्थ भातशेतीशी कोडवाचा अतूट संबंध जडलेला असतो. बण्ण जातीच्या देवऋषीच्या अंगात जेव्हा एखाद्या कुटुंबाचा मूळ पुरुष संचारतो तेव्हा तो आपले भातशेत पाहण्यास धावतो आणि शेताची निगा नीट राखली जाते की नाही, याची पाहणी करतो. या सर्वांवरून भाताच्या शेताचे कोडवाच्या जीवनातील महत्त्व सहज लक्षात यावे.

* * *

# ६

# कोडवांचे संस्कार

जन्म, लग्न, आणि मृत्यू या प्रत्येक मानवाच्या जीवनातील तीन महत्त्वाच्या घटना समजल्या जातात. यामुळे या तीन घटनाशी सबंधित संस्कार प्रत्येक जाती-जमातीत महत्त्वाचे समजले जातात. प्रत्येक समाजातील या संस्कारामध्ये काहीतरी वैशिष्ट्य, वेगळेपण अवश्य सापडते. कोडवाच्या या सस्कारामध्येही त्याच्या समाजाचे वैशिष्ट्य दिसून येते.

**जन्म  बदुकीच्या बाराने स्वागत**

सर्वच समाजात मुलाचा जन्म ही अत्यत आनददायक घटना समजली जाते, आणि सर्वांनाच मुलीपेक्षा मुलगा होणे अधिक प्रिय असते. कोडव लोक याला अपवाद नाहीत. आपल्याकडे अष्टपुत्रा सौभाग्यवती ही भाग्यवती समजली जाई. कोडवानी त्याच्याही पुढे आघाडी मारली होती. ज्या स्त्रीला दहा मुले झाली असतील आणि ती सर्व मुले हयात असतील अशा स्त्रीचा खास गौरव केला जाई. या गौरव समारभाला 'पैटाडेक अळप' असे नाव आहे. कोडवामध्ये स्त्रीला सन्मानाने वागविले जाते. कोणत्याही स्त्रीचा अपमान अथवा अवमान कोणताही कोडव पुरुष कधीही सहन करणार नाही. तरीपण त्या समाजातही पितृसत्ताक पद्धती प्रचलित असल्याने मुलीपेक्षा मुलाचा जन्म अधिक मौल्यवान समजला जातो मुलगा जन्माला येताच बदुकीचा एक बार काढून त्याचे स्वागत केले जाते, आणि ते शुभवर्तमान साऱ्या गावाला कळविले जाते. मुलगी झाल्यास घटी वाजवितात किंवा पितळेची थाळी वाजवून तिचे आगमन सूचित करतात.

मुलाची नाळ किंवा वार (गर्भवेष्टण) चीक (दूध) देणाऱ्या झाडाच्या

मुलाशी पुरली जाते. मात्र कालांतराने कुटुंबप्रमुख होणाऱ्या थोरल्या मुलग्याची नाळ कुटुंबाच्या भाताच्या शेतात प्रमुख जागी पुरली जाते.

नवजात बालकाला कोमट पाण्याने आघोळ घालून गूळ, तूप, व मिरी याचे मिश्रण चाटवितात. हे चाटण देताना " बेल्ल अलिवनेके अलि नै उरुवनेके उर, मळुननेके कठिणआयितिर् " म्हणजे भावी जीवनात तुझे आचरण गुळासारखे गोड बनो, हृदय तुपाप्रमाणे इतरासाठी वितळो आणि सदाचार पालनाच्या बाबतीत ते तिखट व कडक राहो, असा उपदेश त्याला केला जातो.

### एरंडेलाचा दिवा

बाळतिणीची खोली स्वच्छ व प्रकाशमान असावी, पण तेथे झगझगीत उजेडही नसावा, अशी खबरदारी घेतली जाते. मुलाच्या डोळ्याना प्रकाशाचा त्रास होऊ नये यासाठी या खोलीत रॉकेलचा दिवा न लावता एरंडेलाचा सौम्य प्रकाश देणारा दिवा लावला जातो. नवजात अर्भकाला हाताचा स्पर्श होणार नाही व खडबडीत बाजले आणि खरखरीत कपडे त्याच्या शरीराला लागणार नाहीत अशी काळजी घेतली जाते. त्यासाठी त्याला केळीच्या मऊ पानावर झोपविले जाते.

बाळंतपणाचा सोयर ( जननाशौच ) बारा दिवस पाळला जातो. या मुदतीत घरचे लोक देवपूजा, गावचे उत्सव वगैरेमध्ये भाग घेऊ शकत नाहीत. मात्र घरी लग्नासारखे आनदोत्सव साजरे करू शकतात बाराव्या दिवशी सर्व घर सारवून स्वच्छ करतात आणि घरभर तीर्थ शिंपडतात. खुद्द बाळतीण साठ दिवस सोयर पाळते. या मुदतीत ती घरात वावरू शकते. पण धार्मिक कृत्यात भाग घेऊ शकत नाही.

### नामकरण संस्कार

सामान्यत: बाराव्या दिवशी मुलाचे बारसे करतात. परतु अलीकडे साठ दिवस पूर्ण झाल्यावर बारसे करण्याची प्रथा रूढ झाली आहे. बारसे झाल्यावर मुलाला पाळण्यात घालतात. तोपर्यंत त्याला एखाद्या टोपलीत किंवा परातीसारख्या मोठ्या लाकडी भाड्यात झोपवितात. ज्या सुरीने मुलाची नाळ कापली जाते ती सुरी मुलाच्या अथरुणाखाली ठेवण्याची प्रथा आहे.

बाराव्या दिवशी मुलाच्या हातात एरंडाच्या फांद्यापासून तयार केलेले धनुष्य-बाण देतात. अशा प्रकारे त्याला क्षत्रियत्वाची दीक्षा दिली जाते.

बाळ-बाळंतिणीला अभ्यंगस्नान घालून नवीन कपडे घातले जातात. मुलगा असल्यास कमरेला, मनगटावर व घोट्यावर काळा दोरा बांधतात. मुलगी असल्यास फक्त मनगटावर व घोट्यावरच काळा दोरा बांधतात.

मुलाला पाळण्यात घालण्यापूर्वी एक सौभाग्यवती स्त्री वरवंट्यासारखा लांबट आकाराचा एक दगड पाळण्यात ठेवते आणि म्हणते, " दगडासारखा घट्टमुट्ट हो आणि शतायुषी हो. " मुलाची आजी किंवा इतर कोणी वडीलधारी स्त्री मुलाला पाळण्यात घालून त्याचे नाव ठेवते. मग ती स्त्री किंवा मुलाची आई त्याचे नाव घेऊन म्हणते, " चेंगण्णा, ऊठ आणि दूधभात खा. " यानंतर एका सोन्याच्या नाण्यावर थोडीशी साय ठेवून ती मुलाच्या जिभेवर घासते. सोन्याच्या चमच्यातून दूध पाजण्याच्या क्रियेचे ते प्रतीक समजता येईल.

साठ दिवसाच्या या काळात बाळंतीण अंगावरील दागिने काढून ठेवते. दररोज मोलकरणी तिला भरपूर तेल चोळून आंघोळ घालतात. तिला खास पौष्टिक आहार व संपूर्ण विश्रांती दिली जाते.

**गंगापूजा**

साठाव्या दिवशी बाळंतीण अभ्यंगस्नान करून नव्या नवरीप्रमाणे सजते. साठ दिवस ज्या तांब्याच्या हंड्यात स्नानासाठी पाणी तापविलेले असते तो बाहेर काढून त्यात गार पाणी भरले जाते. त्यावेळी " कडायतर अडि तपाननेके नीडं केल तपाड् " म्हणजे गार पाण्याने भरलेल्या हंड्याप्रमाणे तुझे पोट थंड राहो, असे म्हटले जाते.

यानंतर ती दोन कुमारिका किंवा सौभाग्यवती स्त्रियांसह घरच्या विहिरीवर जाते. यावेळी कुटुंबाचे इष्टमित्र व गावचे लोकही तिच्याबरोबर असतात. प्रथम ती सूर्याला नमस्कार करून त्याच्या दिशेने तांदूळ ( अक्षता ) टाकते. मग ती विहिरीची प्रार्थना करून विहिरीत तीनदा अक्षता टाकते; नारळ फोडून त्याचे पाणी विहिरीत सोडते, आणि तीन सुपाऱ्या व तीन विड्याची पाने विहिरीत टाकते. विहिरीचे पाणी काढून ती पाण्याचे तीन घोट घेते; आणि दोन लहान कळशांमध्ये पाणी भरून घेते. तिच्यानंतर तिच्याबरोबर आलेल्या स्त्रियाही विहिरीचे

पाणी काढतात. ती त्या कळशा एकावर एक अशा डोकीवर ठेवून घराकडे येते. तिच्या सख्याही पाणी घेऊन तिच्याबरोबर येतात. ती पाण्याची भांडी त्या स्वयपाकघरात नेऊन ठेवतात. यावेळी माजघरातील पणती लावली जाते. ती त्या पणतीवर अक्षता टाकून नमस्कार करून वडील मंडळींना प्रणाम करते. त्यानतर सर्वांना मिष्टान्न भोजन दिले जाते.

गंगापूजेनतर बाळ-बाळंतीण ग्रामदेवतेच्या दर्शनाला जातात; आणि त्या समारंभासाठी जमलेली मंडळी भेटीदाखल मुलीला पैसे व आशीर्वाद देऊन निरोप घेतात. आपल्याकडे अंगाई गीताचा प्रारंभ ' बाळा जो जो रे ' या शब्दानी होतो. कोडवाच्या अंगाई गीताचा पहिला चरण ' जूव जूव कुणियो ' असा असतो ' जूव ' म्हणजे झोप. मराठी ' जो ' हा कोडगू ' जव 'चा अपभ्रंश असेल काय ?

## आता तू वीर पुरुष झालास

मूल सहा महिन्याचे झाल्यावर त्याला दूधभात व साखर मिसळून खाऊ घालतात. दूधभात हे समृद्ध जीवनाचे प्रतीक असल्याने कोडवाच्या सर्व शुभ संस्कारात व सणात त्याचा वापर केला जातो.

मुलगा सोळा वर्षांचा झाल्यावर त्याला कोडवांचा राष्ट्रीय पोषाख चढविला जातो; आणि त्याच्या कमरेला बाधलेल्या शेल्यात विशिष्ट आकाराचा जंबिया अडकवून घरचा कर्तापुरुष त्याला सागतो, “ आता तू वीर पुरुष झालास.” या जंबियाला ' पीचेकत्ती ' असे म्हणतात

## केम्मि कुत्ति मगल

परंतु एवढ्याशा संस्काराने कोणत्याही मुलाला प्रौढत्व प्राप्त होत नाही. त्यासाठी त्याला कान टोचून घेण्याचा समारभ करून घ्यावा लागतो. आपल्याकडे सामान्यत बारशाच्या दिवशीच मुलाचे कान टोचण्याची प्रथा आहे. परतु कोडवांमध्ये तो लग्नासारखा एक थाटाचा कार्यक्रम असतो म्हणून लग्नासाठी प्रामुख्याने वापरला जाणारा ' मंगल ' हा शब्द या सस्कारासाठी वापरला जातो. केमि किंवा केम्मि म्हणजे कान आणि कुत्ति म्हणजे टोचणे किंवा छेद करणे. त्यावरून या संस्काराला केम्मिकुत्ति मंगल असे म्हणतात. दक्षिण भारतातील इतर भाषांप्रमाणे कोडगूमध्येही लग्न या अर्थाने मगल हा शब्द वापरला

बारशाच्या दिवशी मुलाच्या हातात एरंडाच्या फांद्यापासून तयार केलेले धनुष्य-बाण देतात. अशा प्रकारे त्याला क्षत्रियत्वाची दीक्षा दिली जाते.

बाळ-बाळंतिणीला अभ्यंगस्नान घालून नवीन कपडे घातले जातात. मुलगा असल्यास कमरेला, मनगटावर व घोट्यावर काळा दोरा बांधतात. मुलगी असल्यास फक्त मनगटावर व घोट्यावरच काळा दोरा बांधता.

मुलाला पाळण्यात घालण्यापूर्वी एक सौभाग्यवती स्त्री वरवंट्यासारखा लांबट आकाराचा एक दगड पाळण्यात ठेवते आणि म्हणते, "दगडासारखा धट्टमुट्ट हो आणि शतायुषी हो" मुलाची आजी किंवा इतर कोणी वडीलधारी स्त्री मुलाला पाळण्यात घालून त्याचे नाव ठेवते. मग ती स्त्री किंवा मुलाची आई त्याचे नाव घेऊन म्हणते, "चेंगप्पा, ऊठ आणि दूधभात खा." यानंतर एका सोन्याच्या नाण्यावर थोडीशी साय ठेवून ती मुलाच्या जिभेवर घासते. सोन्याच्या चमच्यातून दूध पाजण्याच्या क्रियेचे ते प्रतीक समजता येईल.

साठ दिवसाच्या या काळात बाळतीण अंगावरील दागिने काढून ठेवते. दर-रोज मोलकरणी तिला भरपूर तेल चोळून आघोळ घालतात. तिला खास पौष्टिक आहार व संपूर्ण विश्रांती दिली जाते.

### गंगापूजा

साठाव्या दिवशी बाळतीण अभ्यंगस्नान करून नव्या नवरीप्रमाणे सजते. साठ दिवस ज्या तांब्याच्या हंड्यात स्नानासाठी पाणी तापविलेले असते तो बाहेर काढून त्यात गार पाणी भरले जाते. त्यावेळी "कडायतर अडि तपाननेके नीड केल तपाड्" म्हणजे गार पाण्याने भरलेल्या हंड्याप्रमाणे तुझे पोट थंड राहो, असे म्हटले जाते

यानंतर ती दोन कुमारिका किंवा सौभाग्यवती स्त्रियांसह घरच्या विहिरीवर जाते. यावेळी कुटुंबाचे इष्टमित्र व गावचे लोकही तिच्याबरोबर असतात. प्रथम ती सूर्याला नमस्कार करून त्याच्या दिशेने तांदूळ ( अक्षता ) टाकते. मग ती विहिरीची प्रार्थना करून विहिरीत तीनदा अक्षता टाकते; नारळ फोडून त्याचे पाणी विहिरीत सोडते; आणि तीन सुपाऱ्या व तीन विड्याची पाने विहिरीत टाकते. विहिरीचे पाणी काढून ती पाण्याचे तीन घोट घेते; आणि दोन लहान कळशामध्ये पाणी भरून घेते. तिच्यानंतर तिच्याबरोबर आलेल्या स्त्रियाही विहिरीचे

पाणी काढतात. ती त्या कळशा एकावर एक अशा डोकीवर ठेवून घराकडे येते. तिच्या सख्याही पाणी घेऊन तिच्याबरोबर येतात. ती पाण्याची भांडी त्या स्वयपाकघरात नेऊन ठेवतात. यावेळी माजघरातील पणती लावली जाते. ती त्या पणतीवर अक्षता टाकून नमस्कार करून वडील मडळींना प्रणाम करते. त्यानतर सर्वांना मिष्टान्न भोजन दिले जाते.

गंगापूजेनंतर बाळ-बाळंतीण ग्रामदेवतेच्या दर्शनाला जातात; आणि त्या समारंभासाठी जमलेली मडळी भेटीदाखल मुलीला पैसे व आशीर्वाद देऊन निरोप घेतात. आपल्याकडे अगाई गीताचा प्रारभ ' बाळा जो जो रे ' या शब्दानी होतो कोडवांच्या अगाई गीताचा पहिला चरण ' जूव जूव कुणियो ' असा असतो ' जूव ' म्हणजे झोप. मराठी ' जो ' हा कोडगू ' जव 'चा अपभ्रंश असेल काय ?

## आता तू वीर पुरुष झालास

मूल सहा महिन्याचे झाल्यावर त्याला दूधभात व साखर मिमळून खाऊ घालतात. दूधभात हे समृद्ध जीवनाचे प्रतीक असल्याने कोडवांच्या सर्व शुभ संस्कारात व सणात त्याचा वापर केला जातो

मुलगा सोळा वर्षांचा झाल्यावर त्याला कोडवाचा राष्ट्रीय पोषाख चढविला जातो; आणि त्याच्या कमरेला बाधलेल्या शेल्यात विशिष्ट आकाराचा जबिया अडकवून घरचा कर्तापुरुष त्याला सागतो, " आता तू वीर पुरुष झालास." या जंबियाला ' पीचेकत्ती ' असे म्हणतात

## केम्मि कुत्ति मगल

परंतु एवढ्याशा संस्काराने कोणत्याही मुलाला प्रौढत्व प्राप्त होत नाही. त्यासाठी त्याला कान टोचून घेण्याचा समारभ करून घ्यावा लागतो. आपल्याकडे सामान्यत' बारशाच्या दिवशीच मुलाचे कान टोचण्याची प्रथा आहे. परतु कोडवामध्ये तो लग्नासारखा एक थाटाचा कार्यक्रम असतो म्हणून लग्नासाठी प्रामुख्याने वापरला जाणारा ' मंगल ' हा शब्द या सस्कारासाठी वापरला जातो. केमि किंवा केम्मि म्हणजे कान आणि कुत्ति म्हणजे टोचणे किंवा छेद करणे. त्यावरून या सस्काराला केम्मिकुत्ति मंगल असे म्हणतात. दक्षिण भारतातील इतर भाषाप्रमाणे कोडगूमध्येही लग्न या अर्थाने मगल हा शब्द वापरला

जात असला तरी अत्यंत महत्त्वाच्या व शुभ अशा संस्कारासाठीही कोडगूमध्ये मंगल हा शब्द वापरला जातो.

कानात भीकबाळी असणे हे एकेकाळी आपल्याकडे प्रतिष्ठितपणाचे व श्रीमंतीचे लक्षण समजले जात असे. तीच स्थिती कोडवाचीही होती. या भीकबाळीला 'पत्तोटि कडुक' असे म्हणत. आजकाल ही भीकबाळी प्रचारातून पूर्णपणे गेली आहे एवढेच नव्हे तर कान टोचण्याची प्रथाही लुप्त होत चालली आहे. तरी पण या कर्णवेध संस्काराची माहिती मनोरंजक ठरेल.

या संस्काराचा समारंभ जवळजवळ लग्नाच्या समारंभासारखाच साजरा केला जातो. फरक एवढाच की त्यात नवरी नसते. त्यावेळी गायिले जाणारे गाणेही लग्नातलेच गाणे असते. मात्र त्यातील नवरीसंबंधीचा उल्लेख वगळण्यात येतो.

मुलाला तिवईवर बसवून त्याच्या दोन्ही खांद्यावर एकेक लाल फडके टाकण्यात येते. नंतर सोनार त्याचे कान टोचून त्यात भिकबाळी अडकवितो. सोनाराला ते दोन्ही तांबडे रुमाल देऊन टाकतात. त्याखेरीज तांदूळ, पैसे नारळ वकेळी ही त्याला देतात. एकेकाळी कान न टोचलेल्या पुरुषाला नालकाडच्या इग्गुतप्पाच्या देवळात प्रवेश करता येत नसे. तसेच कान न टोचता निधन पावलेल्या पुरुषाचे कान अंत्यसंस्कार करण्यापूर्वी टोचण्याचीही प्रथा प्रचलित होती.

पुरुषाच्या बाबतीत या केम्मिकुत्ति मंगलाचे जे महत्त्व होते तेच स्त्रियांच्या बाबतीत 'पोले कंडा मंगल' म्हणजे ऋतुदर्शन समारंभाच्या संस्काराचे होते. मुलगी ऋतुमती झाली की हा समारंभ केला जाई. आपल्याकडे न्हाण आलेल्या स्त्रीला मखरात बसवून जसा समारंभ केला जाई तशाच प्रकारचा हा समारंभ असे. परंतु अलीकडे हा संस्कारही लुप्त झाला आहे. पूर्वी ऋतुमती स्त्रीचा विटाळ पूर्णपणे निषिद्ध मानला जाई; त्याकाळी ती तीन दिवस दूर बसत असे. इतकेच काय पण तिने मुख्य घरात न राहता 'आले पोरे' नावाच्या खोपटातच तीन दिवस राहिले पाहिजे, असे तिच्यावर बंधन असे. आजकाल ही सारी बंधने नाहीशी झाली आहेत; आणि विटाळशीपणाची शिवाशीवही उरलेली नाही मात्र घरातील व घराभोवतालच्या पवित्र ठिकाणी आणि देवळामध्ये जाण्याचे ऋतुमती स्त्रिया आजही सामान्यत टाळतात. बेनगूर गावात केत्रप्पाच्या उत्सवाच्या वेळी कोणाही ऋतुमती स्त्रीने हजर राहता कामा नये, असा नियम

आहे. तोही बहुधा अद्यापि पाळला जात असावा.

**विवाह : जगावेगळी प्रथा**

कोडव लोकाच्या जीवनातील सर्वांत आगळी व काहीशी चमत्कारिक वाटणारी गोष्ट म्हणजे त्याची विवाह-पद्धती होय. विवाह हे दोन जीवाचे मीलन असते म्हणून तर त्याला लग्न असे म्हणतात. जगातील बहुतेक सर्व समाजात स्त्री व पुरुष एकत्र आल्यावर त्याचे लग्न होते. लग्नासाठी वधू व वर एके ठिकाणी असणे हे सर्वच विवाहात अनिवार्य समजले जाते. परतु कोडवाच्या विवाहात मात्र नवरा व नवरी याचे स्वतंत्रपणे त्याच्या त्याच्या घरी किंवा गावी विवाह होतात; आणि नतर त्याचे मीलन होते. ज्योतिष्याने काढून दिलेल्या शुभ मुहूर्तावर हे लग्न होते. यामुळे या मुहूर्ताला कोडव लग्नात फार महत्त्व असते. त्याला ते 'मूर्त' असे म्हणतात. नवरा व नवरी याची लग्ने एकाच मुहूर्तावर होतात. फरक एवढाच की त्यावेळी ती आपापल्या गावी व आपापल्या घरी असतात. त्याची ही गावे एकमेकापासून अनेकदा खूपच दूर असतात. अलीकडे आधुनिक पद्धतीच्या मंगल कार्यालयात लग्ने होऊ लागली आहेत. तेथेही नवरा व नवरी याची लग्ने वेगवेगळ्या दालनात होतात

**लग्नाला बाजाराचे स्वरूप नाही**

आजकाल आपल्याकडे लग्नाला जणू बाजाराचे रूप प्राप्त झाले आहे. हुंडा, मानपान, देणी-घेणी वगैरे गोष्टी चक्क सौदेबाजीसारख्या असतात; तर वधू-परीक्षा म्हणजे गुरांच्या बाजारातील गुराच्या तपासणीसारखीच एक कवाईत असते लग्न करू इच्छिणाऱ्या तरुणाने किती मुली पाहाव्यात व नाकाराव्यात याला तर काही धरबंधच उरलेला नाही. दोनशे मुली पाहून त्याना नकार दिल्याची उदाहरणेही काही कमी नाहीत. असे करण्यात आपण स्त्री जातीचा केवढा अपमान करतो याची कल्पनाच तरुणाना नसते. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे या कामी त्याची आई, बहीण, मावशी, आत्या वगैरे स्त्रियाही सहभागी होतात. याबाबतीत कोडवाचे उदाहरण आदर्श म्हणून सर्वांनी घेण्यासारखे आहे. कोडव तरुण सामान्यत: एकच मुलगी पाहातो; आणि ते पाहणेही केवळ प्रतीकात्मक असते. मुलगी नाकारणे हा त्या जमातीत भयकर अपमान समजला जातो. ज्या मुलीला मागणी घालावयाची तिचे कुल-शील, रूप-सौंदर्य, आर्थिक

परिस्थिती वगैरे गोष्टींची सपूर्ण माहिती आधी मिळविली जाते. तिच्या घरच्या लोकाची काही हरकत असणार नाही याची खात्री करून घेतली जाते आणि मगच मागणी घातली जाते; किंवा मुलगी पाहाण्याचा कार्यक्रम केला जातो. अलीकडे प्रेमविवाह होऊ लागले असले तरी अजूनही घरची वडीलधारी मडळीच लग्न ठरविण्यात पुढाकार घेतात आणि तरुण लोक त्याचा निर्णय मान्य करतात

हुडा किंवा मानपान हा प्रकारच कोडवाना माहीत नाही. मुलीला तिच्या माहेराकडून भाडीकुंडी, कपडालत्ता व दागदागिने दिले जातात. परतु त्यासबधी काही अटी नमतात. ज्याची जशी ऐपत असेल त्याप्रमाणे ते वस्तू देतात. लग्नाला येणारे नातेवाईक व इष्टमित्रही भेटी आणतात. परतु तो सारा खुषीचा मामला असतो. त्यात कसलीही जबरदस्ती नसते.

### कन्निमगल

कोडवामध्ये विधवा-विवाह पूर्वीपासून प्रचलित आहे. घटस्फोटालाही समाज-मान्यता आहे. परतु घटस्फोट क्वचितच घेतला जातो. गेल्या पन्नास-साठ वर्षांत दहा-बाराही घटस्फोट झालेले नाहीत, असे म्हणतात. विधवा स्त्री अशुभ समजली जाते. यामुळे तिच्या लग्नाला फारसे महत्त्व दिले जात नाही. ते अगदी साधे-पणाने साजरे केले जाते या लग्नाला ‘ कूडावळि मगल ’ असे म्हणतात. जेव्हा एखादी विधवा स्त्री विधुर पुरुषाशी लग्न करते तेव्हा तर ते अगदीच औपचारिक असते. अशा लग्नाला ‘ मंगल ’ म्हणणे अनेक कोडवाना मान्य नाही

कुमार आणि कुमारी याचे लग्न हे खरे लग्न. ते अत्यंत थाटामाटाने साजरे केले जाते. त्याला ‘ कन्निमगल ’ असे म्हणतात. कोडवामध्ये मुलाची जन्म-कुंडली बनविण्याची प्रथा आहे केरळचे ( मलबारचे ) कणिय जातीचे ज्योतिषी ही कुडली किंवा पत्रिका तयार करतात. हे कणिय लोक आता कूर्गमध्ये स्थायिक झाले आहेत. मुहूर्त काढून देण्याचे कामही तेच करतात. ज्योतिषी मलबारी असल्याने जन्मकुंडल्या मल्याळम् भाषेत लिहिलेल्या किंवा ताडपत्रावर कोरलेल्या असतात. मात्र कोडवामध्ये वधुपक्षालाच वरपक्षाकडे कुडली अथवा पत्रिका मागण्याचा हक्क असतो. अलीकडे जन्मकुडलीचा रिवाज पुष्कळच कमी झाला आहे. जन्मपत्रिका नसल्यास उभय पक्षांचे लोक देवळात जातात आणि देवाला

कौल लावतात. त्याला ‘ पूइडुपो ’ ( फूल घेणे ) असे म्हणतात. देवाला वाहिलेल्या फुलांपैकी उजव्या बाजूचे व पांढरे फूल खाली पडल्यास तो शुभ शकुन व शुभाशीर्वाद समजला जातो. तांबडे व डाव्या बाजूचे फूल अशुभ समजले जाते.

मामाच्या मुलीशी लग्न करण्याची प्रथा दक्षिण भारतात खूप मोठ्या प्रमाणावर प्रचलित आहे. किंबहुना मामाच्या मुलीवर तिच्या आतेभावाचा हक्कच असतो, असे समजले जाते. कोडवामध्येही ही प्रथा रूढ आहे. परंतु त्याच्यात आणखी एक प्रथा आहे, व ती अधिक रूढ आहे. ती म्हणजे आत्याच्या मुलीशी लग्न करण्याची. आपल्याकडे आते बहिणीशी लग्न निषिद्ध समजले जात नसले तरी स्वागतार्ह समजले जात नाही. सगोत्र म्हणजे एका घराण्यातील व्यक्तींचा विवाह कोडवांमध्येही अत्यंत निषिद्ध व वर्ज्य समजला जातो. केवळ मामाच्याच मुलीशी लग्न करण्याच्या प्रथेमुळे एकेरी वाहतूक चालत राहाते. आत्याच्या मुलीशी लग्न करण्याच्या प्रथेमुळे दुहेरी वाहतूक चालून दोन्ही घराण्यांतील परस्पर संबंध अधिक दृढ होतात. असे मानले जाते.

### मंगल कुरिप

लग्नाची प्राथमिक बोलणी झाली, लग्न ठरले की वाङ्निश्चय किंवा साखरपुडा केला जातो. याला कोडगू भाषेत ‘ मंगल कुरिप ’ ( कुरिप म्हणजे निश्चय ) असे म्हणतात. आपल्याकडे वरपिता व वधूपिता यांच्या भूमिका लग्नात महत्त्वाच्या असतात. पण कोडवामध्ये त्या दोघानाही काहीच महत्त्व नसते. उलट त्यांनी लग्न होऊन जाईपर्यंत एकमेकाना भेटावयाचेही नसते. लग्नानंतरच्या वर्षात वरपित्याला वधूच्या कुटुंबाकडून मेजवानीचे निमंत्रण मिळते, आणि वधूपित्यालाही तसेच आमंत्रण वरपित्याकडून दिले जाते. या प्रसंगी ते एकमेकाना भेटतात. या कार्यक्रमाला ‘ बेंदु अखि ’ म्हणजे नातेवाइकाची ओळख असे म्हणतात. या प्रथेमुळे वाङ्निश्चयाच्या प्रसंगी वधुवराचे पिते हजर नसतात. त्याचे प्रतिनिधित्व त्याचे कुटुंबमित्र करतात. या कुटुंबमित्राला ‘ अरुव ’ असे म्हणतात.

### अरुवाचे महत्त्व

कोडव समाजात ‘ अरुव ’ ( जाणकार, ज्ञाता ) ही एक वैशिष्ट्यपूर्ण व्यक्ती

किंवा संस्था असते. शेजारच्या कुटुंबाचा प्रमुख पुरुष हा अरुव असतो. त्यामुळे क्ष व ज्ञ ही दोन कुटुंबे शेजारी शेजारी राहात असल्यास क्ष कुटुंब-प्रमुख व ज्ञ कुटुंब-प्रमुख हे एकमेकांचे अरुव बनतात. कूर्गमधील खेड्यातील घरे एकमेकांपासून इतकी दूर असतात की अशा कुटुंबमित्राचे अस्तित्व अपरिहार्यच ठरते. लग्न व मृत्यू या दोन्ही महत्त्वाच्या प्रसंगी अरुवच पुढाकार घेऊन सारी कामे करतो. लग्नामध्ये काही भाडगतंत्र उद्भवणार नाही आणि नंतरच्या विवाह-जीवनातही काही अडथळा निर्माण होणार नाही हे पाहाण्याची जबाबदारी अरुवावर असते. या कामी अरुवाची पत्नी व मुले यांचेही सहकार्य त्याला मिळत असते. अडीअडचणीच्या प्रसंगी अरुवाने धावून आले पाहिजे, अशी अपेक्षा असते; आणि आनंदाच्या प्रसंगी त्याने सहभागी झाले पाहिजे, हीही अपेक्षा असते. दोन कुटुंबाचे आपसातील संबंध सोहार्दपूर्ण ठेवण्याचीच नव्हे तर त्यांचे इतराशी होणारे व्यवहारही सुरळीत पार पाडण्याची जबाबदारी अरुवावर असते. इतर समाजांतही असे कुटुंबमित्र असतात. परंतु कोडव समाजातील अरुव ही एक प्रकारची वंशपरंपरागत चालणारी व धार्मिक-सामाजिक कर्तव्याच्या भावनेने परिपूर्ण असलेली संस्था आहे.

### वाङ्निश्चय व तिथिनिश्चय

वाङ्निश्चयाचा हा कार्यक्रम वधूच्या घरी होतो. या कार्यक्रमाला नियोजित वधूवर उपस्थित नसतात हे त्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणता येईल. वराकडून त्याच्या कुटुंबाचा अरुव. कुटुंबातील एक पुरुष आणि कुटुंबाचे इतर एक-दोन मित्र असे मुलीच्या घरी जातात. तेथे वधूच्या कुटुंबाचा प्रमुख आपल्या अरुवाला व इतर काही मित्रांना बोलावून घेतो. त्या कुटुंबाचा ज्योतिषीही त्या प्रसंगी हजर राहातो. सर्वांचा फराळ झाल्यानंतर ज्योतिषी लग्नाच्या मुहूर्ताचा दिवस व वेळ निश्चित करतो; आणि त्याप्रमाणे तो लग्नपत्रिका लिहून तिच्यावर दोन्ही पक्षाच्या सह्या घेतो. एवढे झाल्यावर उभय पक्ष माजघरातील (नेल्लक्कि नडुबाडे) भिंतीतील पणतीसमोर दोन रांगा करून परस्परासमोर उभे राहातात. यावेळी पणती लावलेली असते. दोन्ही पक्षामध्ये सवाल-जबाब होतात. बोलण्याचे काम अर्थातच दोन्ही बाजूंचे अरुव करतात. लग्न होईपर्यंत मुलगी सुरक्षित राहील हे पाहाण्याची जबाबदारी वधूकुटुंबाच्या अरुवावर असते. त्या प्रसंगाचा तो साक्षी-

दार असतो. त्याबद्दल त्याला एक पणाचे नाणे दिले जाते. ( पण हे नाणे दोन आणे आठ पैचे असे. सहा पणाचा एक रुपया होई. ) असेच एक नाणे मुलाच्या अरुवालाही वधूपक्षाकडून दिले जाते आजकाल पणाऐवजी रुपया वापरला जातो.

यानतर वरपक्षाचा अरुव किंवा वराच्या कुटुंबातील कोणीतरी दिव्यावर अक्षता टाकून परंपरागत पद्धतीने प्रणाम करतो आणि जडावाचा एखादा दागिना वधूपक्षाच्या अरुवाला देतो. त्यानतर जेवण करून वरपक्षाची मडळी परततात. वाङ्निश्चयानतर वरपक्षाच्या मडळींनी वधूच्या घरी किंवा जवळपासच्या घरात रात्री राहाता कामा नये असा नियम आहे.

वाङ्निश्चयानतर नियोजित वधूवरानी कोणतीही नदी ओलाडता कामा नये अथवा पारपरिक पोषाख घालता कामा नये. त्याच्यापैकी कोणीही आकर्षक कपडे घालावयाचे नाहीत अथवा सार्वजनिक समारभात सामील व्हावयाचे नाही, असाही निर्बंध आहे. त्याच्याबद्दल इतराना आकर्षण वाटून लग्न मोडू नये, ही कल्पना या प्रथेच्या मुळाशी असली पाहिजे. दोन्ही कुटुंबाना कसलीही अशुभ वार्ता कळणार नाही अशी खबरदारी घेतली जाते. एखादा जवळचा नातेवाईक निधन पावला तरी या दोन कुटुबानी त्याबाबतीतील आपली पारपरिक कर्तव्ये पार पाडावयाची नसतात

## लग्नाची तयारी

लग्नाचे निमंत्रण देण्याचे काम स्वत. नवरा मुलगा किंवा त्याचा भाऊ आणि त्याची वहीण यानी करावयाचे असते. लग्नाच्या आधल्या दिवशी लग्नाची तयारी केली जाते त्याला करिकमुरिपाचा किंवा चप्परचा दिवस म्हणतात. या दिवसाच्या कार्यक्रमाला प्रत्येक कुटुबातील सर्वांनी हजर राहावे असे निमंत्रकानी आवर्जून सागावयाचे असते. या निमंत्रणाला मान देऊन गावच्या लोकानी लग्नाला हजर राहाणे हे त्याचे कर्तव्य समजले जाते. एखाद्या कुटुबातील लोक लग्नाला आले नाहीत तर त्याची त्या लग्नाला मान्यता नाही, असा त्याचा अर्थ होतो. लग्नाचे निमत्रण गडीमाणसाकडून धाडणे हा अपमान समजला जातो

करिकमुरिपाच्या दिवशी गावातील प्रत्येक कुटुंबातील एक पुरुष व एक स्त्री लग्नघरी येतात; आणि लग्नमंडपापासून स्वयपाकापर्यंत सर्व कामात मदत करतात.

अर्थात मुख्य जबाबदारी अरुवाची म्हणजे कुटुंबमित्राची असते. तो जातीने सर्व गोष्टींत लक्ष घालून सारी कामे व्यवस्थित पार पडत आहेत की नाही ते पाहातो. वस्तुत: लग्नाचा मुख्य समारंभ पूर्वी माजघरातच साजरा केला जात असे. पण अलीकडे घरालगतच्या 'कल्याण-मंटपा'मध्ये (लग्नमंडपात) साजरा केला जातो. कल्याण-मंडप लहानसरच असतो. पण त्याला जोडून भला मोठा मांडवही घातला जातो. कल्याण-मंडप पाच खांबाचा असतो. त्यापैकी एक खांब दूध (चीक) देणाऱ्या झाडाचा असतो. त्याच्या प्रवेशद्वारात केळीचे खुंट उभारले जातात. मंडपाचा चांदवा किंवा छत पांढऱ्याच कापडाचे असले पाहिजे असा नियम आहे. हे चांदवे माजघरापर्यंत नेलेले असते; आणि तसेच ते मांडवातही आणलेले असते.

## तेरण मंगल

एवढी तयारी झाल्यावर अरुव, नातेवाईक व गावकरी मंडळी 'तेरण मंगल' म्हणजे मेंदी लावण्याच्या कार्यक्रमासाठी माजघरात जमतात. नवरा मुलगा (किंवा नवरी) स्नान करून पारंपरिक पोषाख परिधान करतो; आणि दिव्याला व वडिल-धाऱ्यांना प्रणाम करून, दिव्याखाली अंथरलेल्या चटईवर बसतो. त्यानंतर तीन सुवासिनी त्याच्या हातांना व पायांना मेंदी लावतात. आपल्याकडे हळदी लावण्याची जी पद्धत काही जातींत आढळते तिच्याशी या प्रथेचे साम्य आहे. हा कार्यक्रम चालू असता चार व्यक्ती 'मंगल पाट' नावाचे गीत गातात. वधु-संशोधनाची मोठी मनोरंजक कथा या गीतात गुंफलेली असते.

मेंदी लावण्याचा कार्यक्रम संपल्यावर जमलेल्या सर्व लोकांना चमचमीत मेजवानी दिली जाते. जेवणानंतर पुरुषांच्या सामुदायिक नृत्याचा कार्यक्रम होतो. कोडवांच्या सर्वच समारंभांत पुरुषांच्या सामुदायिक नृत्याला विशेष प्राधान्य दिलेले आढळते. स्त्रियांचीही सामुदायिक नृत्ये होतात. परंतु पुरुषांची नृत्ये हे कोडवांचे वैशिष्ट्य म्हणता येईल. या नृत्यांचे विषय व प्रकार प्रसंगानुसार वेग-वेगळे असतात. कोडव पुरुषांमधील नृत्याची आवड व प्रथा हा त्यांच्या आदिवासी जीवनाचा अवशेष असण्याची शक्यता आहे. आदीवासींप्रमाणे कोडवांमध्ये स्त्री-पुरुषांचा संयुक्त नाच होत नाही. स्त्रिया व पुरुष यांचे नाच वेगवेगळे असतात.

शेवटी जमलेल्या सर्व लोकांना पानसुपारी देऊन निरोप देण्यात येतो. यावेळी गावच्या प्रत्येक कुटुंबाला किमान पाच विड्याची पाने, सहा सुपारीची

खाडे, खोबऱ्याचे तुकडे, केळी, साळीच्या लाह्या, वगैरे वस्तू दिल्या जातात. लग्नात सहभागी होण्यासाठी दिलेले ते आमंत्रण असते.

वधूच्या घरी असाच कार्यक्रम होतो. मात्र गावकरी मंडळी निघून गेल्यावर नातेवाईक व घरची मगळी माजघरात जमतात; आणि 'पोट्टिदुंबिचिडुवो' नावाचा कार्यक्रम साजरा केला जातो. यावेळी वधूला द्यावयाचे कपडेलत्ते, दागदागिने, भांडीकुंडी वगैरे उपस्थितांना दाखवून ती पेट्यात भरली जातात.

## मुहूर्ताचा कार्यक्रम

प्रत्यक्ष लग्नाचा म्हणजे मुहूर्ताचा दिवस कार्यक्रमांनी गच्च भरलेला असतो. सकाळी धोबी येऊन माजघराच्या छताला पांढरे कापड लावतो व ते तसेच कल्याणमंडपापर्यंत नेतो. त्या ठिकाणी त्या पांढऱ्या कापडाला तो लाल कापडाचे अस्तर लावतो. या लाल चादऱ्याच्या चारी टोकांना केळी, नारळ, काकडी व सुपारी यांचे घोस टांगले जातात.

नवरा मुलगा बाह्याचा पांढरा डगला व लाल पागोटे परिधान करतो. सकाळची न्याहारी झाल्यावर नवऱ्या मुलाचा मेहुणा — बहिणीचा नवरा अथवा अरुवाच्या कुटुंबातील कोणीतरी अथवा त्याचा एखादा मित्र आणि नवरीची वहिनी अथवा एखादी विवाहित मैत्रीण यांनी सतत त्याच्याबरोबर राहावयाचे असते. आपण त्यांना करवला-करवली म्हणू शकतो

ठरलेल्या वेळी बोजकार ऊर्फ करवला नवऱ्या मुलाला देवघरात घेऊन जातो. तेथे नवरा मुलगा भिंतीतील दिव्याला त्रिवार प्रणाम करून माजघरात येतो. तेथील दिव्याला व वडील माणसांना नमस्कार करून तो त्यांचे आशीर्वाद घेतो.

## कौंबन् जवर

लग्नाच्या आधीचा श्मश्रूचा (हजामतीचा) कार्यक्रम वैशिष्ट्यपूर्ण असतो. जुन्या काळी लग्नानंतर पुरुषाला नियमितपणे हजामत करवून घेण्याचा अधिकार प्राप्त होत असे. पूर्वीच्या काळी कोडव पुरुष शेंडी ठेवून हजामत करवून घेत. आता बहुतेक पुरुष आधुनिक पद्धतीचे केस वाढवितात. आईवडील हयात असेपर्यंत मिशा न काढण्याचा नियमही कोडव पुरुष पूर्वी कटाक्षाने पाळीत असत.

लग्नाच्या आधी नवरा मुलगा हजामत करवून घेतो. मात्र यावेळी पाण्याऐवजी दुधाचा वापर केला जातो. या हजामतीसाठी खास व्यवस्था असते. हजामतीच्या ठिकाणी एक सतरंजी अथरून तिच्यावर एक तिपाई ( मुक्कलि ) ठेवली जाते. त्या तिपाईवर नवरा मुलगा बसतो. जवळच एका पितळेच्या भाड्यात दूध ठेवलेले असते; आणि एका नव्या दुरडीत शेरभर तादूळ, एक नारळ, काही केळी व पाने आणि सुपाऱ्या ठेवलेल्या असतात. हजामत करताना केस जमिनीवर पडणार नाहीत याची न्हावी काळजी घेतो. तो ते एका थाळीत टाकतो. यावेळी डोकीवरील पुढचे कानशीलावरील केस अशा पद्धतीने कापले जातात की त्यातून दोन ऐटदार शिंगाचा भास व्हावा. ( आपल्याकडे पूर्वी लहान मुलाची झुलुपे राखीत असत त्याच्याशी याचे साम्य दिसते. अजूनही काही खेडवळ व आदिवासी लोकात अशी झुलुपे राखली जातात. दक्षिणेतील गोपुरावरही अशी दोन शिंगे पाहावयास मिळतात. ) शिंगे उगवणे हे तारुण्यात पदार्पण केल्याचे लक्षण समजले जाते. तेव्हा केसाची अशी शिंगे कोरून नवरा मुलगा वयात आला असल्याचे जाहीर केले जात असावे. या विशिष्ट प्रकारच्या केशरचनेला ‘ कोंब चवर ’ किंवा ‘ कोंबन जवर ’ असे म्हणतात. ( कोंबु म्हणजे शिंग आणि चवर म्हणजे चवरी ). हा कार्यक्रम चालू असता वाजंत्री वाजत असतात. नवऱ्यामुलाबरोबर आणखी दोघा-चौघानी हजामत करवून घ्यावयाची असते.

हजामत आटोपल्यावर न्हावी कापलेले केस व उरलेले दूध चीक ( दूध ) असणाऱ्या झाडाच्या मुळाशी नेऊन टाकतो. यावेळी त्या न्हाव्याला तादूळ, नारळ वगैरे असलेली दुरडी, ज्या काशाच्या थाळीत केस टाकलेले असतात ती थाळी, किंवा तिच्या ऐवजी पाच पण ( सुमारे तेरा आणे ), ती चटई, नवऱ्यामुलाने कमरेला बाधलेला लाल सुती रुमाल आणि पाच पण किंवा त्याहून अधिक रक्कम बक्षीस म्हणून दिली जाते.

### बांगड्या भरण्याचा समारंभ

नवऱ्या मुलाच्या घरी हा श्मश्रूचा समारंभ चालू असतो त्यावेळी नवऱ्यामुलीच्या घरी बागड्या भरण्याचा कार्यक्रम चालू असतो. तेथेही चटई, दुरडी, तादूळ, नारळ वगैरे त्याच वस्तू असतात. नवरीने निदान दोन-दोन तरी बागड्या भरल्या पाहिजेत असा नियम आहे. तिच्याबरोबर दोन किंवा अधिक

बायकाही बांगड्या भरून घेतात. बांगड्या भरणाऱ्याला ती चटई व दुरडी देऊन शिवाय पाच पण दिले जातात. हा सारा कार्यक्रम चालू असता नवरी-बरोबर करवली असते. तिला बोजकार्ति असे म्हणतात. आपल्याकडे या बांगड्यांना चुडा म्हणतात. कोडगूतही त्याच्या करिता ' मुत्तैदे ' हा खास शब्द आहे.

कूर्गच्या दक्षिण-पश्चिम भागात नवरीची वहिनी नवरीच्या केसाच्या काही बटा कापते व तिची नखे काढते. याला ' कूरंगोडी मुरिप ' असे म्हणतात. हे केस व नखे दुधाने भरलेल्या थाळीत ठेवून ती थाळी चीक असणाऱ्या झाडाच्या मुळाशी रिकामी केली जाते.

## सुवासिनींच्या हस्ते सचैल स्नान

श्मश्रूचा व बांगड्या भरण्याचा कार्यक्रम झाल्यावर स्नानाचा कार्यक्रम पार पाडला जातो. घरापासून स्नानगृहापर्यंत जाताना वाजत्री वाजवतात. या स्नान-गृहाला ' गुड्डा ' म्हणतात. यावेळी चार कुर्गी पुरुष ' दुडी ' नावाचे डमरू सारखे कोडवांचे खास वाद्य वाजवून ' वट्टे पाट ' ( मार्ग गीत ) नावाचे गाणे गातात. या स्नानाच्या वेळी वराबरोबर दोन पुरुष आणि वधूबरोबर दोन मुली यानाही आंघोळ घालतात. वधूच्या अंगावर तर यावेळी कपडे असतातच, पण वराच्या अंगावरही कपडे असतात तीन सुवासिनी आंघोळ घालण्याचे काम करतात. त्यात वधू-वराची आईही असते आणि त्यांचे वडीलही स्नान घालण्यात भाग घेतात.

## समारंभाचा खास पोषाख

स्नानानंतर वधूवरांना खास लग्नाचा पोषाख चढविण्याचा कार्यक्रम होतो. यावेळी कोडव स्त्री पुरुषाचा राष्ट्रीय पोषाखच थोड्या फार फरकाने परिधान केला जातो. नवरामुलगा लांब बाह्यांचा पांढरा कुप्या ( डगला किंवा लांब कोट ) घालतो. तो बंद गळ्याचा असतो. इतर वेळी कोडव पुरुषाचा कुप्या काळा, अर्ध्या बाह्यांचा व त्रिकोणी ( V आकाराचा ) उघड्या गळ्याचा असतो. त्यामुळे आतील पांढरा सदरा व टायही दिसू शकतो. हा कुप्या गुडघ्याच्या खाली थोडासा येतो. पांढरा कुप्या सुती कापडाचा असतो तर काळा कुप्या लोकरीचा व भारी किमतीचा असतो. जपानी किमोनो किंवा मुस्लिम यासारखा कुप्या दिसतो; आणि त्यालाही गुंड्या नसतात. त्याऐवजी कमरेला भरतकाम

केलेला जरीकाठी तांबडा रेशमी शेला (कमरबस्ता) घडी करून बांधतात. त्याने कुप्या नीट जागच्या जागी राहातो. या शेल्याची दोन्ही टोके समोरच्या बाजूस मोकळी सोडलेली असतात. किमोनोला किंवा युकाताला कमरेभोवती साधी कापडी पट्टी असते. कुप्याच्या कमरबस्त्याला 'चेले' असे म्हणतात. हा 'चेले' भला मोठा लांबलचक असतो. त्यामुळे तो चांगला चोपून-चापून बांधता येतो. या कमरपट्ट्यात 'पीचेकत्ती' नावाची खास म्यानातील कुर्गी सुरी खोवलेली असते. तिला सुरा किंवा खंजीरही म्हणता येईल. ही पीचेकत्ती मोठी डौलदार असते तिचे म्यान हस्तिदंती व मूठ सोन्या-चांदीची असते. बारीक धागऱ्याची एक चांदीची साखळी व एक गोंडा त्याला लावलेला असतो. एका दृष्टीने ही पीचेकत्ती शोभेचीच वस्तू असते. या पीचे-कत्तीच्या म्यानावर कोठे-कोठे अर्धचंद्र कोरलेला किंवा जडविलेला असतो. इतरही नाना प्रकारची कलाकुसर व जडावाचे काम तिच्या म्यानावर किंवा मुठीवर केलेले असते. या पीचेकत्ती सारखेच आणखी एक शस्त्र कमरेभोवती गुंडाळलेल्या जाडजूड साखळीच्या मागल्या बाजूला कडीत किंवा हुकात अडक-विलेले असते. तिला 'ओडिकत्ती' म्हणजे तलवार म्हणतात पण तिचा आकार मात्र कोयत्यासारखा किंवा गुरख्याच्या कुकरी सारखा असतो. ही ओडिकत्ती फक्त वराच्या पोषाखातच असते. ज्या साखळीत ही ओडिकत्ती अडकविलेली असते तिला 'नोडगु' असे म्हणतात. खाली पांढरी सुरवार अथवा पँट असते. डोकीला पागोटे असते. त्याला 'पानिमडेतुणि' असे म्हणतात. वस्तुत. हा जरीकाठी रुमालच असतो. परंतु पागोट्याप्रमाणे पक्का बांधलेला असतो. वराच्या प्रत्येक मनगटात सोन्याचे एकेक भरीव कडे घातलेले असते. त्याला 'कट्टिबळे' असे म्हणतात. हातात अंगठ्या असतात. गळ्यात सोन्याचे मणी व पोवळी एकत्र गुंफलेली माळ किंवा हार असतो. त्याला 'पोम्माले' म्हणतात. या हाराच्या मधोमध मोत्याची झालर असलेले एक चंद्राकार पदक असते शिवाय फुलांचा मोठा हारही त्याच्या गळ्यात घालतात. लाल रंगाचे एक झिरझिरीत रेशमी वस्त्र त्याने पदराप्रमाणे डोकीवरून घेतलेले असते. त्याला 'मुसुकु' असे म्हणतात. मुसुकु घेण्याची ही प्रथा सार्वत्रिक नसून काही भागातच प्रचलित आहे. काही भागात फक्त वधूच मुसुकु घेते. मुसुकु हा प्राचीनकाळी प्रचलित असलेल्या बुरख्याचा अवशेष असावा.

या सर्वांत महत्त्वाचे आभूषण किंवा वस्तू म्हणजे वराच्या हातातील विशिष्ट प्रकारचा दंड किंवा सोटा होय. त्याला ' गेज्जे तंड ' असे म्हणतात. गेज्जे म्हणजे घुंगुर आणि तंड म्हणजे दंड. उत्कृष्ट प्रतीच्या शिसवी लाकडाची ही काठी असते. तिच्यावर सुंदर कोरीव काम केलेले असून तिला सोन्या-चांदीच्या पत्र्याची मूठ व सोन्या-चांदीचेच घुंगरू लावलेले असतात. हा दंड हातात घेतल्याशिवाय नवरा मुलगा वधूला आणण्यासाठी तिच्या घरी जाऊ शकत नाही. वस्तुत: हा दंड वराचा प्रतिनिधीच असतो. पूर्वीच्या काळी नवरा मुलगा आजारीपणामुळे वधूला आणण्यासाठी मिरवणुकीने तिच्या घरी जाऊ शकला नाही तर त्याच्याऐवजी हा दंड तेथे मिरवत नेला जाई, आणि वराने करावयाचे सारे कार्यक्रम त्याच्या साक्षीने उरकून नववधूला सासरी आणले जाई.

### वधूचा पोषाख

कोडव पुरुषाचा पोषाख जेवढा सर्वस्वी वेगळा व वैशिष्ट्यपूर्ण असतो तेवढा कोडव स्त्रियांचा नसतो. त्यामुळे कोडव वधूच्या पोषाखात फार वेगळेपण आढळत नाही. मात्र कोडव पुरुषांनी आपला परंपरागत पोषाख खास समारंभापुरताच मर्यादित ठेवलेला असून दैनंदिन जीवनात त्यांच्या पोषाखाचे संपूर्ण पाश्चात्यीकरण झालेले आहे; तर कोडव स्त्रियांनी आपला पोषाख बहुतांशी जशाचा तसा टिकवून ठेवला आहे.

कोडव स्त्रिया ५ किंवा ६ वारी साडीच नेसतात. मात्र साडीच्या निऱ्या पुढच्या बाजूला न सोडता त्या मागच्या बाजूला सोडलेल्या असतात. यासंबंधी कावेरी पुराणात आलेली एक आख्यायिका सांगितली जाते. देवकांत राजा कूर्गवर राज्य करीत असता कावेरी माता नदीच्या रूपाने प्रकट होणार असल्याचे स्वप्न त्याला पडले. त्याप्रमाणे तो वालामुरी या ठिकाणी कावेरीच्या दर्शनासाठी आपल्या प्रजाजनांसह हजर राहिला. त्यावेळी सर्वांनी नदीत उतरून स्नान केले. नदीच्या प्रवाहाला एवढा प्रचंड जोर होता की स्त्रियांच्या लुगड्याच्या पुढील बाजूस असणाऱ्या निऱ्या गर्रकन फिरून मागील बाजूस गेल्या. तेव्हापासून तो कावेरी मातेचा आदेश किंवा प्रसाद समजून कोडव स्त्रिया मागील बाजूस निऱ्या खोवू लागल्या. अशा निऱ्या खोवण्याची पद्धत भारतात बहुधा इतरत्र नसावी.

पदराच्या बाबतीतही थोडा फरक आहे. सामान्यत पदर डाव्या किंवा उजव्या खांद्यावरून घेण्याची पद्धत आहे. परंतु कोडव स्त्रिया आपला पदर डाव्या बाजूच्या काखेतून पाठीवर व तेथून उजव्या खांद्यावर घेतात. हा पदर पुढील बाजूस उजवीकडे छातीवर गाठ मारून घट्ट बसविला जातो. या पद्धतीने छाती आपोआप झाकली जाते.

कोडव स्त्रिया लांब बाह्याचा व बंद गळ्याचा ब्लाउझ किंवा पोलके घालतात. त्याला ' कळकुप्या ' असे म्हणतात. त्या डोकीला एक मोठे फडके किंवा रुमाल विशिष्ट पद्धतीने बांधतात. या रुमालाचे पखे दोन्ही खांद्यावर सोडलेले असतात. साडीचे नेसण व डोकीचा रुमाल यांचे अरब देशातील विशेषतः कुर्द जमातीतील स्त्रियांच्या पोषाखाशी खूपच साम्य आहे असे म्हणतात व त्यावरून कोडवांचा कुर्दांशी संबंध लावला जातो.

वधूच्या पोषाखातील जरतारी साडी, पोलके व रुमाल ही सारी लाल रेशमी कापडाची असतात. तिच्या अंगावरील दागिने विविध प्रकारचे असतात. वराच्या गळ्यात जसा ' पोम्माले ' असतो तसा वधूच्या गळ्यात ' जोमाले ' नावाचा हार असतो. तो सोन्याचे मणी काळ्या रेशमी किंवा सुती दोऱ्यात गुंफून तयार केलेला असतो. आपण त्याला एकदाणी म्हणू शकतो. त्याशिवाय ' कोक्के ' हा एक खास दागिना असतो. तीही सोन्याच्या मण्यांची माळच असते. मात्र तिच्या मधोमध हिरेजडित, चंद्राकार पदक असते. त्याच्या किनारीला मोती लावलेले असतात. आपल्याकडील मंगळसूत्राप्रमाणे पताक नावाचा एका सौभाग्यदर्शक दागिना असतो. वधूच्या माहेरचे लोक हे पताक तयार करतात व वधूची आई ते तिच्या गळ्यात बांधते. हे पताक सोन्याचे असते. त्याच्या मध्यभागी पक्ष्याच्या डोक्याच्या आकाराचे पदक असते. हे पदक माणकांनी जडविलेले असते. या पताकात सोन्याचे टपोरे मणी, पोवळी व काळे मणी ( करिमणी ) असतात. काळे मणी बहुधा दृष्ट लागू नये म्हणून सर्वच जमातींत वापरले जातात असे दिसते. वधूच्या हातात प्रत्येकी एकेक किंवा दोन-दोन सोन्याच्या अथवा चांदीच्या बांगड्या ( गोट किंवा बिलवर ) असतात. त्यांना ओंटु किंवा जोडु कडग असे म्हणतात. लग्नाची अंगठी वधूच्या डाव्या हाताच्या चौथ्या बोटात असते. प्रत्येक बोटात एकेक अंगठी घालून ती चांदीच्या बारीक साखळीने हातातील बांगड्यांना जोडलेली असते. या दागिन्याला ' कैसर '

म्हणतात. अशाच प्रकारच्या पायातील दागिन्याला ' कासर ' म्हणतात. कैसर व कासर हे दागिने सामान्यत चांदीचे असतात.

सौभाग्यालंकार या दृष्टीने महत्त्वाचा पायातील अलंकार म्हणजे ' कामोदिरा ' ( पायातील मुद्रिका ) हा होय. आपल्याकडे विवाहित स्त्रिया पायाच्या अंगठ्या-जवळच्या बोटात चांदीची वेढणी किंवा वळी घालतात. तशीच ही कामोदिरा असते. तीही चांदीचीच असून सौभाग्यसूचक समजली जाते. नाकातील चमकीही सौभाग्य-सूचक असते. कानातही कर्णफुलासारखे अलंकार असतात.

**कल्याण मंडपात प्रवेश**

सारा पोशाख व्यवस्थितपणे चढविल्यावर वधू आणि वर आपापल्या घरी देवाची प्रार्थना करून कपाळाला भस्माचा ( विभूतीचा ) टिळा लावतात किंवा आडवा तीन बोटांचा पट्टा ओढतात यावेळी वधूला आयुष्यात प्रथमच पान खाण्याची मुभा प्राप्त होते. स्नानगृहापासून लग्नमंडपापर्यंत वधू-वर अनवाणी पावलांनी, मिरवणुकीने चालत जातात. यावेळी वाजत्री वाजत असतात व ' बट्टेपाट् ' नावाचे मार्गगीत गायिले जात असते. दोन कुमारिका हातात आरत्या घेऊन पुढे चालत असतात लग्नमंडपापर्यंतच्या रस्त्यावर पांढऱ्या कापडाच्या पायघड्या घातलेल्या असतात. करवला व करवली वर व वधू यांच्या शिरावर छत्री धरतात. ही छत्री पांढऱ्या कापडाची असते. ही मिरवणूक सुरू होण्यापूर्वी लग्नाला आलेले वराचे दूरचे व जवळचे नातेवाईक एका चटईवर बसून नारळ फोडून त्याचे खोबरे व साळीच्या लाह्या खातात व पाणी पितात. त्यानंतर त्यांच्यापैकी एकजण शेजारी पुरलेल्या केळीच्या नऊ खुटांपैकी तीन खुट ओडिकत्ती ( कोयत्या ) ने कापतो. याला बाळे ' बिरुदु ' असे म्हणतात. बाळेबिरुदूचा हा कार्यक्रम पाहुण्याचा सन्मान करण्याचा एक प्रकार आहे. या खुटांवर फुले खोवलेली असतात. एका घावात एक खुट कापावयाचा असतो बाळे बिरुदूचा हा कार्यक्रम इतर प्रसंगीही केला जातो. पूर्वीच्या काळी लग्नाला येणारे नातेवाईक स्वत बरोबर तांदूळ, मांस, केळी वगैरे सामान घेऊन येत. याला ' केटामे ' असे म्हणतात. त्यांच्याबरोबर त्यांचे वाजत्रीही असत. अशा नातेवाइकांच्या स्वागतासाठी बाळेबिरुदूचा कार्यक्रमकेला जात असे. या पाहुण्यांनी ग्रामदेवतेसाठी काही रक्कम देण्याची प्रथा होती.

**कल्याण मंटपातील मांडणी**

मोठ्या लग्नमंडपाच्या पूर्वेकडील कोपऱ्यात उभारलेल्या छोट्या कल्याण मटपातील माडणी वैशिष्ट्यपूर्ण असते वराचे आगमन होण्यापूर्वी कुटुंबमित्राच्या परिवारातील एखादी सौभाग्यवती स्त्री तेथील जागा स्वच्छ झाडून काढते; आणि तेथे एक चटई किंवा गालिचा अथरते. मध्यभागी एक तिपाई किंवा लाकडी मोळ्यासारखी बैठक ठेवून तिच्यावर लाल रगाचे कापड घालते. या तिपाईच्य डाव्या बाजूस दुसरी एक तिपाई असते. तिच्यावर एका थाळीत तादूळ व दूधा भरलेली चादीची एक झारी किंवा बुदली असने. समोर दोन्ही बाजूना एकेक तिपाई ठेवून तिच्यावरील थाळीत तादूळ, विडा, ( पानसुपारी ) व पितळी किंवा मातीची पणती पेटवून ठेवलेली असने. या आरतीला 'तळियक्कि बोळुक' असे म्हणतात. त्याच्याही पुढे दोन्ही बाजूंना कमरेइतक्या उचीच्या दोन पितळी समयात वाती तेवत असतात. त्याना 'कुत्तुम् बोळिच' किंवा 'कुत्तविळकु' असे म्हणतात वराच्या बैठकीच्या उजव्या बाजूस एक मोठी परात ठेवलेली असते व तिच्या जवळच करवल्याला बसण्यासाठी एक लहान स्टूल असते.

**विवाह-विधी**

नवरा मुलगा करवल्यासह कल्याणमटपात प्रवेश करून तिपाया व समया याना तीन प्रदक्षिणा घालतो. यावेळीही पायघड्या घातलेल्या असनात. दिव्याना व तिपाईला नमस्कार करून तीन वेळा उजवे पाऊल पुढे टाकून व मागे घेऊन तो तिपावर बसतो.

यानंतर प्रत्यक्ष विवाहविधी सुरू होतो. कोडवाच्या विवाहात भटजी, मंत्र, अतर्पाट, मगलाष्टके, सप्तपदी, वगैरे काहीही नसते. यावेळी वधूही वराजवळ नसते.

वराने यावेळी आपल्या गुडघ्यावर तांबडा, टॉवेलच्या आकाराचा रुमाल पसरलेला असनो. प्रथम सात सौभाग्यवती व पुत्रवती स्त्रिया आपल्याकडील औक्षणासारखा कार्यक्रम करतात शेजारच्या थाळीतील मूठभर तांदूळ घेऊन ते दोन्ही हातानी वराचे दोन्ही गुडघे हाताचे कोपरे, खांदे व डोके यावर टाकतात; आणि त्याला पैशाची भेट देतात. सर्वांत प्रथम वराची आई समयांच्या दिव्यावर अक्षता टाकून त्याना नमस्कार करते. नंतर आपल्या खांद्यावरून मागच्या बाजूस

अक्षता टाकून सूर्यदेवतेला प्रणाम करते, आणि मग वरील पद्धतीने अक्षता टाकून दुधाची झारी वराच्या तोंडाला लावते. त्यातील थोडेसे दूध वर पितो. नतर ती त्याला पोंब्रण म्हणजे सोन्याचे नाणे (सामान्यत गिनी किंवा सॉव्हरिन) भेट म्हणून देते. इतर सहा स्त्रियाही असेच करतात. त्या रुपये, दागिने वगैरेच्या भेटी देतात. त्यानतर ओळीने सर्व स्त्रिया व त्याच्या नंतर पुरुष अक्षता टाकून भेटी देतात. सात स्त्रिया व वडीलधारी मडळी गुडघे, खांदे व डोके यावर अक्षता टाकतात व दूधाची झारी वराच्या तोंडाला लावतात. यावेळी वर त्याच्या पायाना दोन्ही हात लावून तीन वेळा प्रणाम करतो आणि वडील मंडळी त्याला आशीर्वाद देतात. इतर स्त्री-पुरुष व बरोबरीची किंवा लहान मंडळी फक्त डोकीवर अक्षता टाकतात. प्रत्येकाने किमान एक पण ( १९ नवे पैसे ) भेट द्यावयाचा असतो. इतर भेटी देणाऱ्यांनाही त्याच्यासोबत एक पण दिला पाहिजे अशी प्रथा आहे मात्र आजकाल सामान्यत. दोन रुपयाहून अधिक रक्कम भेट म्हणून दिली जाते. नवरा मुलगा इतराशी हस्तादोलन करतो किंवा नुसते हात जोडून नमस्कार करतो. मिळालेल्या भेटी तो जवळच्या परातीत टाकतो. तेथे बसलेला करवला ( हा बहुधा वराचा मेहुणा असतो. ) त्या वस्तूंची नोंद करून त्या एका बॅगेत भरतो आईने दिलेले पोंब्रण ( सोन्याचे नाणे ) वेगळे ठेवले जाते. त्याला ' चीले पण ' असे म्हणतात. ते फार मौल्यवान समजले जाते. ( चीले किंवा चील म्हणजे पिशवी ).

हजर असलेल्या प्रत्येक व्यक्तीने वरावर अक्षता टाकून त्याला भेट दिलीच पाहिजे, असा नियम असल्यामुळे हा कार्यक्रम उपस्थिताच्या संख्येनुसार लांबतो. सामान्यतः तास-दीड तासात हा कार्यक्रम संपतो. यावेळी अक्षता टाकणारे स्त्रीपुरुष पादत्राणे काढून ठेवतात. चमड्याला अपवित्र मानण्याची ही ब्राह्मणी चाल कोडवाच्या एकूण जीवनप्रणालीशी थोडीशी विसंगतच वाटते. हा सारा विधी चालू असता वाद्यवादन व गीत–गायन चालू असले पाहिजे, असा नियम आहे.

**पांढऱ्या अक्षता**

या साऱ्या कार्यक्रमात पांढरे तांदूळच अक्षता म्हणून वापरले जातात. आपल्याकडे हळद-कुंकू लावून अक्षता तांबड्या बनविणे शुभ समजले जाते.

याच्या उलट कोडव समाजात हळद लावून पिवळ्या केलेल्या अक्षता अत्यंत अशुभ समजल्या जातात. त्या केवळ अंत्यसंस्कारात वापरल्या जातात.

### वधूच्या घरीही असाच कार्यक्रम

वराच्या घरी कसा विवाहविधी साजरा केला जातो, ते आपण वर पाहिले. अगदी असाच विधी त्याच मुहूर्तावर वधूच्या घरीही साजरा होतो. याला 'मूर्त' किंवा मुहूर्त असे म्हणतात. हा मुहूर्त नेहमीच सकाळी बारा वाजण्यापूर्वी असतो. विवाह विधीतील हाच कार्यक्रम सर्वांत अधिक महत्त्वाचा समजला जातो. वराने वधूच्या घरी जाऊन तिचे पाणिग्रहण करण्याचा जो विधी नंतर होतो त्याला 'दंपतिमुहूर्त' असे म्हणतात. परंतु त्यासाठी मुहूर्त पाहात नाहीत. उभय पक्षाच्या सोयीने तो केव्हाही उरकून घेतला जातो.

### भोजन व नृत्य

लग्नानंतर वराचा किंवा वधूचा उजवा हात धरून करवला किंवा करवली जवळच्या खोलीत घेऊन जातात. उशीरा येणारे लोक त्या खोलीत जाऊन वधुवराना आशीर्वाद व भेटी देतात.

कोडवांच्या लग्नातील भोजनसमारंभ ही अत्यंत खर्चाची बाब असते. सगळे नातेवाईक व गावकरी जेवणात सहभागी होतात. मुख्य जेवण मांसाहारी असते. (आधल्या रात्रीच्या जेवणापूर्वी मद्यपान होते. तसे या जेवणात नसते.) पुलाव, मटण व खीर (पायसम्), हे मुख्य पदार्थ असतात. अम्म कोडव जातीचे लोक शाकाहारी असतात, त्याच्यासाठी भात, आमटी, उसळ, लोणचे, पापड, ताक व खीर असा बेत असतो गव्हाच्या खिरीत मुगाची डाळ, वेलदोडे, काजू वगैरे घालून हे पायसम तयार केलेले असते. त्यात साजूक तूप घातल्यावर ते खूपच चवदार लागते. पाण्याऐवजी कॉफी किंवा सरबत पिण्यास देण्याचीही प्रथा अनेक ठिकाणी आहे.

जेवणाऱ्यांची संख्या फार मोठी असल्यास आधी बायकांच्या पंगती उठतात. पाहुणे व नातेवाईक यांच्याबरोबर घरच्या कर्त्या पुरुषाने जेवायला बसावयाचे असते. घरची मंडळी व गावकरी नंतर जेवतात. त्यांनी जेवताना डोकीचे पागोटे व कमरेचा खंजीर काढून ठेवावयाचा असतो. पारंपरिक पोषाख घातलेली मंडळी एका रांगेत मेजावर बसतात. लहान मुले व इतर पोषाख घातलेले लोक दुसऱ्या

रांगेत बसतात. कोडव लोकात जमिनीवर बसून जेवण्याची प्रथा नाही. घरीही टेबलावर किंवा टेबलाच्या आकाराच्या बाकावर बसूनच जेवतात.

खुद्द नवरा-नवरी मात्र आपापल्या खोलीतच जेवण घेतात. करवला-करवली आणि दोन जवळचे मित्र-मैत्रिणी त्याच्या पक्तीला जेवतात.

जेवायला सुरुवात करण्यापूर्वी कोणीतरी 'उगना ?' (सुरुवात करायची ?) असे विचारतो आणि होकार मिळाल्यावर जेवायला सुरुवात होते. भोजन आटोपल्या-वर कोणीतरी विचारतो, "के बायि ओत्तता ?" (पोटभर जेवलात ? आता उठायचं ?) आणि होकार मिळाल्यावरच सर्वजण हात धुण्यासाठी उठतात

भोजनोत्तर विड्याची पाने, चुना व मसाला सुपारी घेऊन प्रत्येकजण आपा-पला विडा तयार करतो.

यावेळी पुरुषाचे सामुदायिक नृत्यही होते.

## दंपती-मुहूर्त

जेवणे झाल्यावर बहुतेक निमंत्रित मंडळी घरोघर निघून जातात. मात्र वरा-बरोबर वधूच्या घरी किंवा गावी जाणारी मंडळी तेथेच थांबतात. वरातीची तयारी सुरू होते. कुटुबमित्राच्या परिवारातील एक सवाष्ण स्त्री 'पोळिय' भरते. 'पोळिय' ही एक झाकण असलेली वेताची विणलेली टोपली किंवा पेटी असते. तिच्यात ३, ५, ७ अशा विषम संख्येतील वस्तू भरतात. ३ शेर उत्कृष्ट तादूळ, ३ नारळ, ३ शेर गूळ, ३ केळी, सुमारे २५ विड्याची पाने व अर्धा शेर सुपारी. त्याशिवाय त्यात एक लहान भांडे दूध भरून ठेवलेल असते. हे दूध वधूला दपती मुहूर्ताच्या वेळी द्यावयाचे असते. जी सौभाग्यवती ही पेटी भरते तिने वरातीबरोबर वधूच्या घरी जावयाचे असते.

दंपती मुहूर्तासाठी सामान्यत त्याच दिवशी वरातीने जातात. काही ठिकाणी हा कार्यक्रम दुसऱ्या दिवशी केला जातो. वरातीत नातेवाईक व इष्टमित्र यांच्या व्यतिरिक्त गावातील प्रत्येक कुटुंबातील एक स्त्री व एक पुरुष यानी सामील झाले पाहिजे, असा दडक आहे. वरात सुरू होण्यापूर्वी करवला नवऱ्या मुलाला माजघरात घेऊन जातो. तेथे नवरा मुलगा देवळीतील पणतीला नमस्कार करतो; आणि सर्व वडील मंडळींना नमस्कार करून त्याचे आशीर्वाद घेतो. नतर तो

मूळ पुरुषाच्या समाधी ( कैमडा ) कडे जाऊन पूर्वजांचे आशीर्वाद घेतो नंतर वाजत गाजत वरात सुरू होते.

ही वरात ज्या ज्या खेड्यातून जाते तेथील गांवकरी व नातेवाईक केळीचे खुंट रोवून ( बाळेबिरुदु करून ) वराचे स्वागत करतात. त्याला दूध देतात. ते दूध पिऊन त्या भाड्यात एक ' पण ' टाकून ते परत देतो. कॉफी किंवा इतर पेय दिल्यास ' पण ' द्यावे लागत नाही.

ही वरात जात असताना समोरून दुसरी वरात आल्यास ते अशुभ समजले जाते.

वधूच्या गावी पोचल्यावर तेथे बाळेबिरुदूच्या जागी वरात थांबते. वर पक्षाचा एक प्रतिनिधी आणि इतर दोघेजण वधूच्या घरी जाऊन वराच्या आगमनाची सूचना देतात. तेथे त्यांचे स्वागत करून वधू पक्षाकडील लोक बाळेबिरुदूच्या जागी जातात. तेथे उभय पक्ष एकमेकाचे क्षेमकुशल विचारतात. या ठिकाणी केळीचे सहा खुंट रोवलेले असतात. वर पक्षाचा काणीतरी ते खुंट सपासप कापतो वधूच्या गावी किंवा दारासमोर होणाऱ्या या बाळेबिरुदूला एक विशिष्ट अर्थ आहे. वराच्या मार्गात वधू पक्षाचे लोक अडचण निर्माण करतात. ती दूर करून त्याने वधूचे हरण करावयाचे असते. केळीचे खांब हे त्या विरोधाचे प्रतीक होत. ते कापून वर आपले शरीर सामर्थ्य सिद्ध करतो. तेथून सर्वजण वधूच्या घरी जातात. तेथे वराला पायघड्या घालतात या पायघड्याना ' माडे ' असे म्हणतात. वधूपक्षाकडील कुमारिका वराच्या पायावर पाणी घालून त्याचे स्वागत करतात.

घराच्या पायऱ्या चढून नवरा मुलगा वर गेला की दोन कुमारिका आरत्यांनी त्याचे स्वागत करतात, आणि इतर मंडळी त्याच्यावर अक्षता टाकतात. आसरीवरील ' ऐमरा ' ( पवित्र बाका ) वर किंवा माजघरातील खुर्चीवर तो बसतो. वर पक्षाने आणलेली पोळेय वधू-पक्षाकडील एक सौभाग्यवती बाळेबिरुदूच्या जागीच आपल्याकडे घेते. पुन. एकदा वधुपक्षाकडील एक कुमारिका वराचे व वधूपक्षाकडील कुटुंब-प्रमुखाचे पाय धुवून त्याना विभूती ( भस्म ) देते ते दोघे प्रार्थना करून ती विभूती त्या मुलीला परत देतात, आणि त्याबरोबर तिला एक ' पण ' देतात.

यानंतर फराळ, चहापाणी व नतर जेवण होते. नवरा मुलगा, करवला व

त्याचा एक मित्र घरात बसून जेवतात. इतर पाहुणे मंडळी बाहेरच्या माडवात जेवतात. वधूपक्षाचा कुटुंबप्रमुख पाहुणे मंडळींच्या पंक्तीला जेवतो.

हा सारा कार्यक्रम चालू असतात वाद्यवादन चालूच असते.

## दंपती-मुहूर्तांची नवी व जुनी पद्धती

सुमारे चाळीस वर्षांपूर्वी दंपती मुहूर्तेही पहिल्या मुहूर्ताप्रमाणे वेगवेगळा साजरा केला जाई. त्यावेळी वरपक्षाकडील नातेवाईक मंडळी वधूवर अक्षता टाकून मुहूर्त करीत; वधूचे नातेवाईक वराकडे वरावर अक्षता टाकून दुसरीकडे त्याचा मुहूर्त साजरा करीत! आणि मग वर वधूवर अक्षता टाकून तिचे पाणि-ग्रहण करी.

परंतु अलीकडे त्यात ब्राह्मणी धर्मानुसार बदल घडवून आणण्यात आला आहे. आता वधूवराना दोन तिपायावर शेजारी बसवून त्यांच्यावर अक्षता टाक-तात व त्याना भेटी देतात. हा दंपती मुहूर्ताचा कार्यक्रम सामान्यत. वधूच्या माजघरात होतो. पण ते लहान असल्यास तो इतरत्रही होऊ शकतो. कोडव लोक याला ' डबलमूर्त ' असे म्हणतात. यावेळची माडणी पहिल्या मुहूर्तासारखी असते व इतर विधीही तसेच होतात. फरक एवढाच की यावेळी वधूची आई प्रथम वराला मुहूर्त करते व नंतर वधूला. सर्वांत शेवटी वरपक्षाचा प्रमुख पुरुष अक्षता टाकून भेट देतो. तो थोड्या अक्षता व पाच ' पण ' शेजारच्या आरतीत टाकून त्याचा स्वीकार करण्याची वधूपक्षाच्या प्रमुखाला विनंती करतो. वधूपक्षाने केलेली व्यवस्था व सोयी यांच्याबद्दल उतराई होण्याचे प्रतीक म्हणून ही रक्कम असते.

यानंतर करवला वराचा हात धरून त्याला वधूसमोर नेतो. तेव्हा वर वधूवर अक्षता टाकून तिला पैशाची लहानशी थली ( चीलें पण ) देतो. वधू दोन्ही हातानी त्या थैलीचा स्वीकार करते, आणि ती डाव्या हातात ठेवून वराने पुढे केलेला उजवा हात आपल्या उजव्या हातात धरून उठून उभी राहते. (म्हणजे येथे वधूच वराचे पाणिग्रहण करते!) जवळच असलेली करवली वधूच्या साडीच्या पदराला ( म्हणजे छातीवर उजव्या बाजूस जेथे पदराची गाठ साडीला बांधलेली असते तेथे – मोलेकेट्टूला) वधूच्या आईने दिलेली थैली बांधलेली असते ती सोडून तिच्या जागी वराने दिलेली थैली बांधते. याचा अर्थ वधूचा माहेरशी

असलेला आर्थिक सबध संपून सासरचा संबंध सुरू होतो.

काही ठिकाणी हा थैली बाधण्याचा कार्यक्रम स्वत वरच करतो. वधू आपल्या घराच्या स्वयंपाकघरात एकटीच बसलेली असते. तेथे जाऊन वर तिच्यावर अक्षता टाकतो व तिच्या पदराला बाधलेली तिच्या आईने दिलेली थैली ( पर्स ) सोडून त्या जागी आपली थैली बाधतो नंतर तिला हात देऊन उठवितो आणि तिच्यासह स्वयंपाकघराच्या दारापर्यंत जातो तो प्रथम त्या दारातून बाहेर पडतो आणि उंबऱ्याच्या आत असलेल्या वधूकडे आपला उजवा हात पुढे करतो. वधू त्याचा हात धरून स्वयंपाकघरातून बाहेर येते. याचा अर्थ वधूचा माहेरशी असलेला संबध संपतो.

धार्मिक दृष्टया लग्नाचा महत्त्वाचा विधी येथे संपतो. काही सामाजिक विधी अजूनही व्हावयाचे शिल्लक असतात.

## संबंद कोडुपो

यापैकी महत्त्वाचा विधी म्हणजे ‘ सबद कोडुपो ’ किंवा ‘ समद ’ ( संबंध दान ) हा होय. या विधीअन्वये वधूला वराच्या एकत्र कुटुंबात हक्काचे स्थान दिले जाते. एका अर्थाने हा विवाहविधीतील कायद्याचा भाग असतो. हा संबध जोडताही येतो आणि विशिष्ट कारणानी तोडताही येतो. हा हक्क देताही येतो आणि काढून घेताही येतो

हा सबंद कोडुपोचा कार्यक्रम वधूच्या घरी होतो. यावेळी स्वयंपाकघराच्या उबरठ्याच्या आत वधू उभी असते आणि वर बाहेर असतो. वराच्या एका बाजूला त्याचा कुटुबमित्र व त्याचे दोन नातेवाईक उभे असतात; तर दुसऱ्या बाजूला वधूचा कुटुंबमित्र व तिचे दोन नातेवाईक उभे असतात. इतर नातेवाईक व मित्रमडळी दुर उभी राहून तो कार्यक्रम पाहतात. यामध्ये मुख्यत सवाल-जबाब होतात. ते कोडगू भाषेत असतात.

प्रथम वधूचा कुटुबमित्र वराच्या कौटुंबिक स्थावरजगम मालमत्तेचे तपशील-वार वर्णन करून या सर्वांमध्ये वधूला सपूर्ण हक्क दिले जातील काय असे विचारतो. त्यावर तिला तिचे सर्व हक्क ( सम्मद ) दिले जातील असे वराचा कुटुबमित्र आश्वासन देतो. मग वधूचा कुटुबमित्र वराच्या कुटुबमित्राला विचारतो, “ तू ‘ मन्न अरुव ’ म्हणजे भूमीशी संबद्ध परंपरागत कुटुंबमित्र

आहेस की 'पण्ण अरुव' म्हणजे या समारंभासाठी सोने देऊन भाड्याने आणलेला कुटुंबमित्र आहेस?" यावर वराचा कुटुंबमित्र सांगतो, "मी दोन्ही प्रकारचा कुटुंबमित्र आहे." तेव्हा वधूचा कुटुंबमित्र त्याला अकरा बारीक दगड (खडे) देतो. आणि म्हणतो, "ह्या घे तुला बारा सोन्याच्या लगडी" (एक दगड वधूच्या कुटुंबमित्राने स्वत जवळ ठेवून घेतलेला असतो. याचा अर्थ वधूचा आपल्या माहेरावर थोडाबहुत हक्क कायम राहतो.)

ते अकरा खडे स्वीकारून वराचा कुटुंबमित्र विचारतो, "वधूने सासरच्या लोकांविरुद्ध कागाळ्या केल्या, ती माहेरी पळून आली, तर तिला समजावून परत सासरी पाठविण्याची जबाबदारी कुणावर आहे?" वधूचा कुटुंबमित्र म्हणतो, "माझ्यावर आहे" तेव्हा वराचा कुटुंबमित्र त्याला साक्षद्रव्य म्हणून एक पण देतो. तो पण घेऊन वधूचा कुटुंबमित्र विचारतो, "आमच्या मुलीवर (पतिनिधनासारखी) एखादी दैवी आपत्ती कोसळली तर तिला सुरक्षितपणे माहेरी परत, पाठविण्याची जबाबदारी कोणावर आहे?" वराचा कुटुंबमित्र म्हणतो, "माझ्यावर आहे." तेव्हा वधूचा कुटुंबमित्र त्याला साक्षद्रव्य म्हणून एक पण देतो. वराचा कुटुंबमित्र तो पण स्वीकारतो; आणि संबद्ध कोडुपोचा कार्यक्रम संपतो.

वधूच्या पदराला बांधलेली पैशाची थैली काढून तिच्या जागी हे अकरा खडे बांधले जातात; आणि वराची मंडळी वधुवरांना घेऊन परत यायला निघतात.

## माणसाचे वजन बारा सोन्याच्या लगडी

कोडगू भाषेत एक म्हण आहे : 'पोन्नु तूक मनुष्य पन्नरंडच्चि' म्हणजे माणसाचे वजन सोन्यामध्ये बारा लगडी असते. या बारा लगडींचे प्रतीक म्हणून बारा खडे असतात. ते वधूच्या माहेरावरील हक्काचे प्रतिनिधित्व करतात. त्यापैकी अकरा खडे सासरच्या लोकांना देऊन तिचे माहेरावरील बहुतेक हक्क समाप्त झाल्याचे सूचित केले जाते. घटस्फोट, वैधव्य यासारख्या कारणांनी तिला माहेरी परत जावे लागले तर उरलेला एक खडा तिच्यासाठी माहेरचा दरवाजा उघडा असल्याचे सूचित करतो. पूर्वीच्या काळी हे खडे पवित्र समजून जपून ठेवले जात. हल्ली त्यांना कोणी फारसे महत्त्व देत नाही.

## मेहुणीवर हक्क कोणाचा ?

वधूची आई वराच्या डोकीवरील झिरझिरीत बुरखा काढून तो त्याच्या खाद्यावर ठेवते; आणि मग वरात परतते. यावेळी एक गमतीचा विधी होतो. जेव्हा वर वधूचा हात धरून तिच्या घरून बाहेर पडू लागतो तेव्हा वधूच्या वहिणीचा नवरा त्याला अडवितो आणि वधूवर आपला हक्क असल्याचे सांगतो. यावेळी वर त्याला एक सोन्याचे नाणे देऊन त्याची समजूत काढतो. मग वधूचा मेहुणा आपल्या जवळचे आणखी एक सोन्याचे नाणे त्यात घालून ती दोन्ही नाणी वधूच्या पदराला बांधतो व त्याना जाऊ देतो. घरातून बाहेर पडल्यावर घरचा जुना गडी त्याना अडवितो त्यालाही वर बक्षिसी देऊन खूप करतो.

यानतर वधूवर कैमडाकडे जाऊन पूर्वजाचे आशीर्वाद घेतात, आणि वरात वराच्या घरी-गावी परतते. पूर्वीप्रमाणेच वधूच्या व वराच्या घराजवळ त्याना बाळेबिरुदूचा सन्मान दिला जातो.

## वधूचा गृहप्रवेश

वधूवर घरात प्रवेश करतात तेव्हा त्याना ओवाळून त्याच्यावर अक्षता टाकतात. प्रथम नवरा मुलगा माजघरातील दिव्याला व घरच्या वडीलधाऱ्याना प्रणाम करतो. त्याच्या मागोमाग वधूही तसेच करते आणि 'ऐमरा' वर बसते ओसरीवरील त्या विशिष्ट बाकावर तिने बसणे म्हणजे त्या घराचे सदस्यत्व मिळविणे होय. वराकडील मडळी यावेळी तिला भेटी देतात. मग नववधूची सासू तिला तिच्या खोलीत नेऊन दूधभात (पकुळ) खाऊ घालते. चहा-पाण्याचा कार्यक्रम झाल्यावर वधूची वेणीफणी करून तिला नवे कपडे नेसविले जातात. ती मग माजघरात जाऊन भिंतीतील दिव्याला व वडीलधाऱ्याना प्रणाम करते नतर ती नातेवाईक व मैत्रिणी याच्यासह घरच्या विहिरीवर जाते. तेथे गगापूजनाचा कार्यक्रम होतो. विहिरीचे पाणी घेऊन ती वाजत गाजत घरी येते व स्वयंपाकघरात पाणी ठेवते.

गगापूजेच्या आधी नववधूने घरच्या गोठ्यात जाऊन तेथील बुट्टीभर शेण घरच्या शेतात नेऊन टाकावयाचे असते. परंतु अलीकडे ही प्रथा मोडत चालली आहे.

गंगापूजेनंतर नववधूने बरोबर आणलेले कपडेलत्ते, दागदागिने माजघरात ठेवून सर्वांना दाखविले जातात. तिच्या पेट्या उघडणाऱ्या स्त्रीला वधुपक्षाचे लोक साक्षद्रव्य म्हणून पाच ' पण ' देतात. ( पुढे मागे या संबंधी काही वाद उपस्थित झाल्यास या स्त्रीला साक्षीसाठी बोलावतात. )

यानंतर गाव जेवण होते. यावेळी नवरा मुलगा सर्वांबरोबर जेवायला बसतो. जेवणानंतर वधूचे नवीन नाव ठेवले जाते. मात्र तत्पूर्वी वधूपक्षाच्या मंडळींना निरोप देण्याचा औपचारिक कार्यक्रम होतो. ही मंडळी त्याच वेळी परत न जाता दुसऱ्या दिवशी जातात काही ठिकाणी वधूचे नामकरण जेवणाच्या आधी केले जाते.

त्याच रात्री नवदापत्याचे मधुमीलन होते. त्यावेळी पत्नी पतीला चरणस्पर्श करून प्रणाम करते आणि त्याला विडा करून देते दुसऱ्या दिवशी सकाळी नववधू कुटुंबातील सर्व लहान मुलांना पैशाच्या भेटी देते.

पतीपत्नींचा समागम होऊन विवाहाची परिपूर्ती ( Consummation ) होण्यापूर्वी पतीचे निधन झाल्यास पत्नीला वैधव्य प्राप्त होते; आणि तिला पतीच्या कुटुंबात वारसा हक्क प्राप्त होतो.

पहिल्या गरोदरपणात पत्नीला भेटी म्हणून खाण्याचे पदार्थ परिचितांकडून आणले जातात. त्यावेळी त्या पदार्थांत एक पीचेकत्ती ( कट्यार ) आणि एक चमचा खुपसतात व एखाद्या लहान मुलाला त्यापैकी एक वस्तू उचलण्यास सांगतात. मुलाने पीचेकत्ती उचलल्यास भावी मातेला मुलगा होणार आणि चमचा उचलल्यास मुलगी होणार असे समजले जाते.

पहिले बाळंतपण माहेरी केले जाते. त्याचा सारा खर्च माहेरचे लोक करतात. त्यानंतर माहेरी बाळंतपण झाल्यास त्याचा खर्च सासरच्या लोकांनी द्यावयाचा असतो. त्याला ' ईतुकर्च ' असे म्हणतात. पत्नीच्या गरोदरपणी पुरुषाने केस व दाढी वाढवून स्वतःला विद्रूप ठेवण्याची प्रथा पूर्वी होती. पत्नीशी एकनिष्ठा व्यक्त करण्याचा तो प्रकार समजला जाई.

## विवाहाचे इतर प्रकार

येथवर वर्णन केलेले कन्निमंगल हे प्रमुख प्रकारचे लग्न होय. याखेरीज कोदिमंगल ' ( बालविवाह ) ' कूडावळी मंगल ' ( विधवेशी किंवा घटस्फोटित

स्त्रीशी होणारे लग्न अथवा पुनर्विवाह ) ' ओक्क परिजे ' ' मक्क परिजे ' असे आणखीही प्रकार आहेत यापैकी बालविवाह आता क्वचितच घडून येतो. विधवेला आपल्या दिराशी लग्न करता येते. तसे तिने केल्यास तिचा सासरच्या कुटुंबावरील अधिकार अबाधित राहातो. त्यामुळे या लग्नात ' संबंद कोडुपो'चा विधी होत नाही. स्त्रीला एकदाच धार्मिक लग्न करता येत असल्यामुळे मुहूर्त, गंगापूजा वगैरे विधी या लग्नात नसतात. पुरुषाला अनेक लग्ने करता येत असल्याने त्याच्या बाबतीत मात्र ' मुहूर्त ' विधी केला जातो. विधवा स्त्री आपला शुभ्र पोषाख उतरून नववधूचा पोषाख चढविते आणि बांगड्या घालते. सामान्यत' अशा प्रकारच्या लग्नात कसलाच थाटमाट नसतो.

विधवेने दुसऱ्या घराण्यातील पुरुषाशी लग्न करावयाचे ठरविल्यास ती आपल्या सासरचा सबंध तोडते. यावेळी तिच्या लग्नात तिच्या माहेरच्या कुटुंब-मित्राकडून सासरच्या कुटुंब-मित्राने स्वीकारलेले अकरा खडे परत केले जातात. तिने माहेरून आणलेले कपडेलत्ते वगैरे तिला परत दिले जातात. विधवेची मुले तिच्या सासरीच राहाणार असतील तर ती आपल्या स्त्रीधनापैकी नाममात्र घेऊन इतर सर्व तेथेच ठेवते, एरव्ही त्या घरात राहिल्याबद्दल थोडेसे सामान तेथे ठेवून ती इतर सव आपल्याबरोबर घेऊन जाते.

या लग्नात ' सबंद कोडुपो 'चा विधी आवश्यक असतो. मुहूर्त, गंगापूजा वगैरे विधी होत नाहीत.

पहिल्या पतीच्या निधनाला एक वर्ष पूर्ण झाल्यावरच पुनर्विवाह करता येतो.

घटस्फोटित स्त्रीच्या विवाहाचे स्वरूप असेच असते. मात्र तिला घटस्फोटा-नतर सहा महिन्यानी लग्न करता येते.

### घरजावई

ज्या कुटुंबात मुलगा नसेल व एकच मुलगी अथवा विधवा सून असेल त्याचे नाव पुढे चालविण्यासाठी जे लग्न केले जाते त्याला ' ओक्क परिजे ' ( परिवार-प्रजा ) असे म्हणतात. या लग्नात वराला आपले घराणे सोडून वधूच्या घराण्यात प्रवेश करावा लागतो. त्यासाठी अकरा खड्याचा विधी केला जातो. ' ओक्क परिजे ' म्हणजे घरजावई बनविण्यासाठी केलेले लग्न असे म्हणण्यास हरकत नाही.

ज्यावेळी वर आपल्या कुटुंबाचा त्याग न करिता केवळ वधूच्या कुटुंबाला वारस मिळवून देण्यासाठी तिच्याशी लग्न करतो तेव्हा त्या लग्नाला ' मक्क परिजे ' म्हणजे मुलासाठी केलेले लग्न असे म्हणतात. मात्र त्याच वेळी तो आपल्या स्वत.च्या घराण्यासाठी वारस निर्माण करण्याकरिता वेगळे लग्न करू शकतो. त्याला ' मक्क परिजे ' लग्नाच्या बायकोच्या मालमत्तेत कसलाही अधिकार मिळत नाही. तो आपल्या घरीच राहातो. फक्त अधूनमधुन त्या पत्नीकडे जात राहतो. तिच्या चरितार्थाची जबाबदारी त्याच्यावर नसते. मात्र तो तिच्या घरी राहील तेव्हा त्याच्या चरितार्थाची जबाबदारी ती उचलते. याला ओब्बगाल असे म्हणतात.

या खेरीज ' कुट्ट परिजे ' या नावाचा आणखी एक प्रकार आहे. कुमारी मातेच्या संततीला घराणे मिळवून देण्याचा हा मार्ग आहे ज्या पुरुषापासून ती स्त्री गरोदर राहिली असेल त्याने तिच्याशी लग्न करण्याचे नाकारल्यास त्याच्या कुटुंबावर तिला व तिच्या मुलाला स्वीकारण्यासाठी इतराकडून दडपण आणले जाते. काही वेळा कुटुंब-प्रमुख स्वत च समजूतदारपणा दाखवून त्याना आपल्या कुटुंबात सामील करून घेतो. त्यासाठी फक्त ' सबंद कोडुप ' विधी केला जातो. या लग्नाला ' बेंडु परिजे ' म्हणजे नातेसंबध जोडणारे लग्न असे म्हणतात. परंतु हा विधी होण्यापूर्वी तो पुरुष मरण पावल्यास त्याचे दहन किंवा दफन होण्यापूर्वी त्या स्त्रीला व तिच्या मुलाना कुटुंबात सामील करून घेतले जाते. याला ' कुट्ट ( चिता ) परिजे ' असे म्हणतात. हा विधी झाल्यानतर ती विधवा स्त्री त्या पुरुषाच्या उत्तरक्रियेत भाग घेऊ शकते.

**बाळे मगल**

आपल्याकडे एखाद्या पुरुषाच्या दोन बायका निधन पावल्यावर त्याचे तिसरे लग्न रुईच्या झाडाशी लावले जाते; आणि मग तो खरे लग्न करतो. त्यामुळे ते त्याचे चौथे लग्न होते. कोडवामध्ये पुरुषाचे तिसरे लग्न केळीच्या खांबाशी लावण्याची प्रथा प्रचलित होती. याचा अर्थ ब्राह्मणी धर्मातील हा लोकभ्रम त्यानीही मान्य केला होता. हल्ली मात्र अशी लग्ने क्वचितच होतात.

**पैतांडे कळेप**

पारशी लोकांप्रमाणेच कोडवामध्येही जननप्रमाण फार कमी आहे. बहुधा तो

सुखवस्तूपणाचा परिणाम असावा. अलीकडे आधुनिक विचार-पद्धतीचा प्रसार झाल्याने कुटुंबनियोजनाची अमलबजावणी कोडवामध्ये खूप कसोशीने केली जाते. त्यामुळे त्याची संख्या नेहमीच फार मर्यादित राहिली आहे. जुन्या काळी शेतीला मनुष्यबळाची गरज होती. त्यामुळे जास्तीत जास्त मुले होणे हे भाग्याचे लक्षण समजले जाई. त्याचा अवशेष म्हणजे ' पैताडेकळेप ' होय. एखाद्या स्त्रीला दहा मुले झाली आणि ती सर्व हयात असली तर तिचा खास गौरव करण्यात येतो. तिला दहावे मूल झाल्यानंतर दोन महिन्याच्या आत खऱ्याखुऱ्या कन्निमगलासारखी तयारी केली जाते. तिला नववधूचा पोषाख चढवून सजविण्यात येते. आणि ' मुहूर्ता 'चा विधी केला जातो. या लग्नाला ' पैताडेक अळेप ' असे म्हणतात.

याच्या उलट एखादी स्त्री मूलबाळ न होता मरण पावली तर तिच्या लग्नात दिलेले कपडेलत्ते व दागदागिने तिच्या सासरच्या लोकांकडून परत मागण्याचा तिच्या माहेरच्या लोकाना अधिकार असतो.

साराश, कोडवाच्या विवाहविधीत धार्मिकतेपेक्षा सामाजिकतेला अधिक महत्त्व असल्याचे दिसून येते. स्त्रीला भरपूर संरक्षण असल्याचेही दिसते. अर्थात कोडवामध्ये स्त्रीदाक्षिण्य इतराहून खूपच अधिक असल्यामुळे तिला आपोआपच सन्मान व संरक्षण ही मिळतात. अनेक विधींवर ब्राह्मणी धर्माची छाप पडलेली स्पष्ट दिसते. ती इतर जातींच्या सपर्कामुळे आलेली असणार हे उघड आहे. तरीपण कोडवाच्या विवाहविधीचे वेगळेपण ठळकपणे उठून दिसते.

## मृत्यू आणि अंत्येष्टी

जन्म आणि विवाह याच्याप्रमाणेच कोडवाचे मृत्युविषयक सस्कार, विधी व लोकभ्रमही मोठे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. काही विधी हिंदूच्या इतर जाती-जमातींच्या विधींहून सर्वस्वी भिन्न आहेत तर काहींवर ब्राह्मणी सस्काराची छाप स्पष्ट दिसून येते. लोकभ्रमामध्येही काही इतर जमातीसारखेच असल्याचे आढळते.

उदाहरणार्थ, इतर काही जमातींप्रमाणे कोडवामध्येही अथरुणावर अथवा बंद खोलीत मरण येणे वाईट समजतात. म्हणून एखाद्या व्यक्तीचा अतकाल जवळ आला की घरातील माजघर-स्वच्छ झाडून तेथे एक चटई अथरतात, आणि त्या चटईवर त्या व्यक्तीला निजवितात. ( आपल्याकडे घोंगडी अथरून तिच्यावर

मरणोन्मुख किंवा मृत व्यक्तीला झोपवितात. मात्र आपल्याकडे मृत व्यक्तीचे पाय दक्षिणेकडे करण्याची पद्धत आहे; तर कोडवामध्ये तिचे डोके दक्षिकडे ठेवतात. एक नारळ, थोडी तुळशीची पाने, दर्भ व सोन्याची काही नाणी जवळ आणून ठेवतात. शेवटच्या क्षणाला नारळ फोडून त्याचे पाणी एका थाळीत साठवतात. हे पाणी, तुळशीची पाने व दर्भाचे तुकडे मरणोन्मुख व्यक्तीच्या तोंडात घाल-तात. काही ठिकाणी तिच्या तोंडात सोन्याची नाणीही घालतात. शेवटी गंगोदक घालतात. मृत व्यक्ती विवाहित व वयस्क असल्यास तिच्या मृत्यूची सूचना इतरांना देण्यासाठी बंदुकीचे दोन बार काढतात; आणि थोड्या थोड्या अंतराने हे दोन बार काढत राहतात. मृत व्यक्ती अविवाहित असल्यास फक्त एकच बार अधूनमधून काढतात.

### अविवाहितांचा असन्मान

ब्रह्मचर्याला कोडवसमाजात मुळीच स्थान नाही. ( इस्लामलाही ब्रह्मचर्य मान्य नाही, हे या संदर्भात लक्षात ठेवण्यासारखे आहे. ) अविवाहित स्त्रीपुरुषां-कडे समाज तुच्छतेने पाहातो. एवढेच नव्हे तर मृत्यूनंतरही अशा व्यक्तींचा अपमान केला जातो. उदाहरणार्थ विवाहित व्यक्तीच्या शवाच्या तोंडात सोन्याचे ( किंवा चांदीचे ) नाणे ठेवले जाते. त्याला 'बट्टे पण' ( वाटखर्च ) असे म्हणतात. परंतु मृत व्यक्ती अविवाहित असल्यास तिच्या तोंडात 'कान्यटकायि' नावाचे एक अत्यंत कडू फळ घालतात. जन्मभर दुष्टपणाने वागून बदनाम झालेल्या माणसाच्या तोंडातही हे फळ घालतात. अविवाहित व दुष्ट व्यक्तींचे आत्मे असंतुष्ट असतात व ते इतरांना त्रास देतात अशी समजूत आहे त्यामुळे त्यांना मृत्यूनंतरही सन्मान दिला जात नाही. त्यांच्याविषयी नातेवाइकांच्या भावना काय असतात ते त्या कडू फळाच्या द्वारे व्यक्त होते. आपल्याकडेही मुंजाचे भूत तापदायक समजले जातेच.

### जातीय ऐक्याचे दर्शन

शोकसूचक बंदुकीचे बार कानी पडताच प्रत्येक कोडवाने हातातील काम ताबडतोब जिथल्या तिथे थांबवून मयताच्या घरी धावून जाण्याची प्रथा आहे. मृत्यूची बातमी सर्व गावाला देण्याची जबाबदारी मृत व्यक्तीच्या कुटुंबियावर नसून ती सर्वांवरच असते. ज्याला बंदुकीचे बार ऐकू आले असतील अथवा ती

बातमी समजली असेल त्याने ती इतराना कळवायची असते. त्यासाठी कोणीही कोणाच्याही नोकराचा वापर करण्याची मुभा असते. सारे गाव एक कुटुंब असल्याची भावना या प्रसंगाने दृढ होते. जातीय ऐक्याचे दर्शनच यावेळी घडत असते.

लग्नाप्रमाणेच मृत्यूच्या प्रसगीही कोडवाना वाजंत्री लागतात. बंदुकीचे बार किंवा मृत्यूची बातमी कानावर पडताच त्या कुटुंबाचे वाजंत्री मृतव्यक्तीच्या घरासमोर येऊन आपली वाद्ये वाजवू लागतात. यावेळी जे विशिष्ट सूर काढतात व ठेका वाजवितात त्याला ' चावु परे ' ( मृत्युसंगीत ) असे म्हणतात. दहन किंवा दफन पूर्ण होईपर्यंत हे वाद्यवादन चालू असते.

मयतीसाठी येणाऱ्या लोकांनी विशिष्ट प्रकारचा पोषाख घातला पाहिजे असा नियम आहे. पुरुषानी पांढरे धोतर ( लुगी ऊर्फ मुंडु ) आणि पांढरे उपरणे ( तुंडू ) असा पोषाख करावयाचा व स्त्रियानी पांढरे पातळ नेसून खांद्यावरून पांढरे कापड घ्यावयाचे. पूर्वीच्या काळी पुरुष पांढरा कुप्या ( झगा ) घालून त्याचा उजवा हातोपा रिकामा ठेवीत ( म्हणजे उजव्या बाहीत हात न घालता तो बाहेर ठेवीत. ) तसेच कुप्याच्या कमरेला लाल दुशाल्याऐवजी काळा दुशाला बांधीत.

कुटुंबातील जी मंडळी मृत व्यक्तीपेक्षा वयाने वडील असतील त्यानी अंत्य-संस्कारात कसलाही भाग घ्यावयाचा नसतो. इतरानी स्नान करून शोकसूचक पांढरे कपडे परिधान करावयाचे आणि शवाजवळ जमावयाचे. स्त्रियानी केस मोकळे सोडावयाचे आणि अंगावरील सौभाग्यसूचक अलंकार वगळून इतर दागिने काढून ठेवावयाचे अशी प्रथा आहे.

समाचारासाठी येणारी मंडळी व नातेवाईक आपल्याबरोबर स्वतःचे वाजंत्री व इतर आवश्यक वस्तू घेऊन येतात. घराकडे जाणाऱ्या बोळाच्या ( ओणीच्या ) तोंडाशी येताच तेथे एका केळीच्या पानावर भात, खोबऱ्याचे तुकडे व खोबऱ्याच्या तुकड्यावर पेटलेली कापसाची वात ( तिरि ) ठेवून ' केट्टिरो अज्जय ' ( आजोबा आम्हाला सोडून गेलात ना ! ) असे तीन वेळा शोकस्वरात म्हणावयाचे. मृतव्यक्ती आजा नसल्यास जी कोणी असेल तिचा उल्लेख करावयाचा. त्यानी बरोबर आणलेल्या बंदुकीतून दोन बार काढून घराकडे जावयाचे असते. या साऱ्या विधीला ' कूळु बेप्पो ' ( मृतात्म्याला अन्नदान ) असे म्हणतात. स्मशान

यात्रेसाठी येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने शवाच्या छातीला हाताच्या तळव्याच्या उलट बाजूने स्पर्श करून तो तळहात स्वत:च्या छातीला लावावयाचा आणि मृत-व्यक्तीच्या नात्याचा उल्लेख करून आपला शोक व्यक्त करावयाचा अशी प्रथा आहे. याला 'चावुक कै कोडप' असे म्हणतात.

विशेष जवळचे नातेवाईक दुरून यावयाचे असल्यास त्याच दिवशी अंत्य-संस्कार करता येत नाही. अशा वेळी लहान मुले वगळून सर्वांनी रात्रभर शवाजवळ जागत बसावयाचे असते. यावेळी घरची मंडळी, कुटुंबमित्र, शेजारी-पाजारी या सर्वांनी हजर राहावयाचे असते. अशा परिस्थितीत एक चटई उलटी अंथरून तिच्यावर शव ठेवतात. चेहरा पितळेच्या थाळीने झाकतात. साऱ्या शरीरावर पांढरे कापड घालतात; आणि एक पणती तेथे जळत ठेवतात. या जागरणाला 'चवु ओळियुव' म्हणतात. चार पुरुष व चार स्त्रिया प्रेताजवळ बसून त्याचे गुणवर्णन करणारे 'चवु पाट' नावाचे शोकगीत गातात. अलीकडे हे गायन फक्त पुरुषच करतात.

**शवाचे स्नान व पोशाख** .

इतर जातींप्रमाणे कोडवामध्येही शवाला स्नान घालण्याची पद्धत आहे. मात्र हा स्नान-विधी ज्या काटेकोरपणे व तपशीलवारपणे पार पाडला जातो त्याचे इस्लामी शवस्नानाशी विशेष साम्य दिसून येते. घराबाहेर डाव्या बाजूच्या अंगणात तात्पुरता आडोसा तयार करून तेथे हा विधी केला जातो. मृतव्यक्ती पुरुष असल्यास त्याची हजामत केली जाते. हे काम मित्र किंवा नातेवाईक करतात. तेलात हळद मिसळून ते शवाच्या सर्वांगाला चोळले जाते व नतर स्नान घातले जाते. मृत पुरुषाची पत्नी शवावर पाण्याचा पहिला तांब्या ओतते. शवस्नानानतर पाण्याची भांडी पालथी घालून ठेवतात.

स्नानानंतर शवाला कुप्या, पगडी, लाल कमरपट्टा वगैरे परंपरागत पोशाख चढवितात. यावेळी त्याला पांढरा कुप्या (झगा) घालतात. प्रेताचे दहन करावयाचे असल्यास हा कुप्या उलटा (आतली बाजू बाहेर काढून) घालतात. त्याचे दफन होणार असल्यास त्याची डावी बाजू उजव्या बाजूवर ठेवतात. शवाच्या कपाळाला विभूती (भस्म) लावतात आणि त्यावर एक सोन्याचे नाणे चिकटवितात. त्याच्या जोडलेल्या हातात एक आरसा ठेवतात तोंडावर लाल कापडाची पट्टी बांधतात.

मृत व्यक्ती सौभाग्यवती असल्यास तिला सौभाग्यवस्त्रे व अलंकार यानी सजवितात.

**शवयात्रा**

शवाला सजविल्यानतर ओसरीवरील बाकावर ( ऐमरावर ) किंवा माजघरात बसवितात. खाली एक चटई उलटी अथरून त्यावर बाजले अथवा बाक ठेवून त्यावर शवाला बसविण्याची किंवा झोपविण्याची पद्धत आहे. शवयात्रेच्या वेळीही शवाला खुर्चीवर बसवून नेतात. मात्र त्यावेळी त्याच्यावर पांढऱ्या कापडाचा चादवा तयार करतात. प्रेत घरात असेपर्यंत त्याच्याजवळ उदबत्ती, कापूर वगैरे जाळतात आणि एक आरती पेटवून ठेवतात. त्याच्या जवळ बसून काही स्त्रिया ताडाच्या पानाच्या पंख्याने त्याला वारा घालतात. ताडाचे पान अशुभ समजले जाते व त्याचा उपयोग अशा वेळीच केला जातो.

प्रेताचे दहन करावयाचे असल्यास झाडाची वाळलेली लाकडे तोडण्याचे काम करावे लागते त्याची जबाबदारी कुटुंबमित्राकडे असते. यावेळी तोडलेली सारी लाकडे वापरलीच पाहिजेत असा नियम आहे. दहनासाठी कुटुंबाच्या घरच्या चुलीतील अग्नी नेला जातो.

दफन करावयाचे असल्यास आधी जाऊन खड्डा खणावा लागतो. एखादया ठिकाणी खड्डा खणण्यास सुरुवात केल्यावर खाली खडक किंवा पाणी लागल्यामुळे ती जागा बदलावी लागल्यास ते अत्यंत अशुभ समजले जाते. अशा वेळी पहिल्या खड्डयात एखादा कोंबडा कापून पुरतात. ( कारण असा खड्डा रिकामा ठेवल्यास लौकरच त्या कुटुंबातील आणखी कोणाचा तरी मृत्यू होतो, अशी समजूत आहे. )

शवयात्रा सुरू होण्यापूर्वी जमलेले सर्व लोक शवाच्या तोंडात पानाच्या टोकाने पाणी घालतात, आणि जवळच्या थाळीत आपापल्या ऐपतीप्रमाणे पैसे टाकतात. अत्येष्टीच्या खर्चाला हातभार लावण्याची ही एक पद्धत समजता येईल.

तिरडी किंवा खुर्ची उचलून तिच्यासह नाचत उलट्या दिशेने ( डावीकडून ) घरासमोरच्या अंगणाला तीन फेऱ्या घालतात. यावेळी चिल्लर नाणी व हळद लावलेले तांदूळ आकाशात फेकतात हळद लावलेल्या तांदळाना मंजलक्कि' असे म्हणतात. स्मशानापर्यंतच्या रस्त्यावरही हे तांदूळ व नाणी फेकत जातात. शवयात्रेच्या पुढे दोन माणसे एका टोकाला चिंबविलेला एक बांबू ( तेंगेतिरि )

घेऊन चालत असतात. त्या बाबूत एक करवंटी बसवून तिच्यात तेल घालून वात पेटविलेली असते.

मृत व्यक्ती पुरुष असल्यास त्याच्या आजोळचे लोक आणि स्त्री असल्यास तिच्या माहेरचे लोक एक नारळ, खोबरेल, साळीच्या लाह्या, पोहे, शिजविलेल्या मासाचा किंवा अंड्याचा रस्सा, हळद लावलेला भात आणि एरंडेलात तळलेल्या तीन 'कज्जाया' (गोड पुऱ्या) एवढे सामान घेऊन येतात. याला 'समेय' असे म्हणतात. कुटुंबमित्राच्या घरातील एखादी स्त्री हे समेय घेऊन स्मशानात जाते. घरापासून स्मशानापर्यंतच्या रस्त्यावर या समेयातील वस्तू फेकत जातात. स्मशानयात्रेतही शोकगीत (चावुपाट) गातात.

## घटस्फोटाचे महत्त्व

स्मशानात पोचल्यावर तिरडीसह सरणाला किंवा खड्डयाला तीन प्रदक्षिणा घालतात; आणि प्रेताचे तोंड किंवा डोके दक्षिणेकडे राहील अशा बेताने तिरडी खाली ठेवतात. मृताची पत्नी किंवा पती आणि जवळचे नातेवाईक स्नान करतात. याला नीरक्कळिव किंवा नीरकिलिवो असे म्हणतात. मग पती किंवा पत्नी मातीचा पाण्याने भरलेला घडा डोकीवर घेतात. त्या घड्याला एक बारीक भोक पाडलेले असते. त्यातून थोडे थोडे पाणी खाली पडत असते. जलाशया-पासून दहन-दफन स्थानापर्यंत ही पाण्याची धार पडत असते. पतीच्या किंवा पत्नीच्या मागे त्याची मुले डोकीवर असोला नारळ घेऊन आणि त्याचा जावई पाण्याने भरलेली एक झारी घेऊन चालतात. त्या सर्वांनी यावेळी डाव्या हाताच्या बोटात दर्भाची अंगठी (पवित्र) घातलेली असते. (काही ठिकाणी सर्व मुले न येता फक्त थोरला मुलगाच येतो; आणि जावयाऐवजी पुरुषाच्या बहिणीचा मुलगा व स्त्रीच्या भावाचा मुलगा असतो.) मातीच्या घागरीत व धातूच्या झारीत आंब्याचे एकेक पान घातलेले असते, व एक पान मुलाच्या हातात असते. नारळाला (शाहळ्याला) ही एक भोक पाडलेले असते. त्यातून व झारीतून पाणी गळत असते. पती किंवा पत्नी, मुलगा व जावई या अवस्थेत शवाला तीन उलट्या प्रदक्षिणा (डावीकडून) घालतात. यावेळी त्या तिघावर पांढरे कापड छताप्रमाणे ताणून धरलेले असते. प्रदक्षिणा पूर्ण झाल्यावर पती किंवा पत्नी शवाच्या डोक्याशी, मुलगा पायाशी व जावई बाजूला असे उभे

राहातात. शव बसविलेले असल्यास पती किंवा पत्नी त्याच्या डाव्या खांद्याजवळ मुलगा उजव्या खांद्याजवळ आणि जावई पायाजवळ असे उभे राहातात. ते तिघेही शवाला नमस्कार करून पुन: तीन उलट्या प्रदक्षिणा घालतात आणि यावेळी हळद मिसळलेला भात शिंपडत जातात. तीन फेऱ्या पूर्ण झाल्यावर पती किंवा पत्नी डोकीवरील घडा तिरडीच्या काठीवर ( किंवा खुर्चीच्या हातावर ) आपटल्याचा दोनदा आविर्भाव करून किंवा त्याला प्रत्यक्ष घड्याचा स्पर्श करून तिसऱ्यादा खरोखरीच तो आपटून फोडतो आणि त्याचे तुकडे तिरडीच्या किंवा खुर्चीच्या खाली टाकतो. या घटस्फोटाला 'कोड कुक्कुव' असे म्हणतात. मुलगाही असेच शहाळे फोडून त्याचे तुकडे तिरडीखाली टाकतो, आणि जावई झारीतील पाणी ओतून तीही तिरडीखाली टाकतो; मग तिघेही 'केट्टिरो अज्जय्य किंवा अप्पय्य' ( आम्हाला सोडून गेलात ना ! ) असे तीनदा म्हणून टाहो फोडतात.

मृत व्यक्ती पत्नी असल्यास तिचा नवरा एका लहान पिशवीत एक नाणे घालून ती तिच्या साडीच्या पदराला बांधतो. मृत व्यक्ती पती असल्यास ती आपल्या हातातील सर्व बांगड्या फोडून टाकते, गळ्यातील मंगळसूत्र तोडते आणि अंगावरील इतर दागिने काढून ते शवाच्या हातात ठेवते. शेवटी शवाच्या हातातील व अंगावरील सारे दागिने काढून घेतात. मग जमलेले सर्वजण शेवटचा नमस्कार करतात. तिरडी भोवती तीन प्रदक्षिणा घालतात, त्यावेळी पिवळा भात शिंपडतात आणि 'आम्हाला सोडून गेला ना !' म्हणून विलाप करतात.

घटस्फोट म्हणजे मृतात्म्याशी असलेल्या संबंधाचे विच्छेदन. ही कल्पना इतर जमातींतही आहे. मात्र इतरत्र विधवा स्त्री स्मशानात जात नाही अथवा घट-स्फोटही करीत नाही. याबाबतीत कोडवांनी एक पाऊल पुढे टाकून स्त्रीलाही पुरुषाप्रमाणेच अधिकार दिले आहेत असे दिसते. अन्त्यक्रियेमध्ये इतर जमातींत फक्त पुरुषानाच प्राधान्य दिले गेले आहे. कोडवामध्ये मात्र पती व पत्नी या दोघावर सारखीच जबाबदारी टाकण्यात आली आहे. त्यामुळे मोठा मुलगा असला तरी अंत्यक्रियेत स्त्रीचीच प्रमुख भूमिका असते.

वंशसातत्याचे प्रतीक असलेला नारळ मुलाकडे असतो. हेही एक वेगळेपण म्हणता येईल. जावई किंवा भाचा याना उत्तर क्रियेत प्राधान्य देऊन दुसऱ्या

घराण्याशी असलेले संबंध दृढतर करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

मृताची पत्नी गरोदर किंवा आजारी असल्यास ती स्मशानात जात नाही. मात्र ती आपल्या अंगावरील सौभाग्यालंकार उतरविते आणि पतीला शेवटचे पाणी देण्याचा विधी घरीच करते.

अग्निसंस्काराच्या बाबतीत कोडवाचे एक वेगळेपण असे की प्रेताला सरणावर बसवूनच अग्नी दिला जातो. हा अग्नी मुलगा देतो. दहन करावयाचे असल्यास मृत पुरुषाच्या अंगावरील पोषाख काढून घेऊन फक्त एक पांढरे कापड त्याच्या शरीराभोवती गुंडाळतात. प्रेत पुरावयाचे असल्यास त्याच्या अंगावरील पोषाख तसाच ठेवून त्याला आडवे, दक्षिणेकडे डोके करून, झोपवितात. त्याच्या वर, खाली, आजूबाजूला मीठ टाकतात; व विभूती शिंपडतात. पहिली तीन ढेकळे पत्नी किंवा मुलगा टाकतो.

दहन संस्काराच्या वेळी संपूर्ण शरीर जळून भस्म होईपर्यंत गावातील प्रत्येक कुटुंबाच्या एका तरी प्रतिनिधीने हजर राहावे, अशी अपेक्षा असते. बरोबर आणलेले सभेय ( अन्न ) कबरीतील प्रेताच्या उशाकडे ठेवतात. अखेर बंदुकीचे दोन बार काढतात; आणि स्मशानातील त्या दिवसाचा विधी समाप्त होतो.

स्मशानातून परत फिरण्यापूर्वी भिकाऱ्याना व कुटुंबातील नोकराना वस्त्रदान करण्याचा एक कार्यक्रम होतो. मात्र ते कापड बाजारातून शोकमग्न कुटुंबाला विकत आणावे लागत नाही, हे उल्लेखनीय आहे. जवळचे नातेवाईक अंत्यदर्शनासाठी येताना पांढरे कापड घेऊन येतात. हे कापड स्त्रियानी आपल्या डोकीवर घेऊन यावयाचे असते. घराच्या आवारात प्रवेश करताना डोकीवर कापड घेऊन त्या छाती व डोके पिटतात. या कापडाला ' मुरी ' असे म्हणतात. नातेवाइकानी बरोबर आणलेले वाजत्री, बंदुका व हे कापड या सर्वांना मिळून ' केल्टी ' असे म्हणतात. लग्नात जे नातेवाईक ' केटामे ' म्हणजे अहेर आणतात त्यानी ' केल्टी ' आणावयाची असते. शवाजवळ बसलेली स्त्री हे कापड घेऊन शवाच्या उशाखाली ठेवते. शवाच्या नातेवाइकाना नेसण्यापांघरण्यासाठी, शवाला गुंडाळण्यासाठी आणि भिकाऱ्याना व नोकराना देण्यासाठी या कापडाचा उपयोग केला जातो.

### उत्तर क्रियेतील साम्य

स्मशानातून परतताना शेवटच्या इसमाने रस्त्यावर काटे पसरून ठेवावयाचे

असतात. मृतात्म्याने घराकडे परत येऊन घरच्या लोकांना त्रास देऊ नये यासाठी ही खबरदारी घेतली जात असावी, हे उघड आहे.

स्मशानयात्रेला गेलेल्या व्यक्तींनी स्नान करून व कपडे बदलूनच आपापल्या घरात प्रवेश करावयाचा, त्यांनी इतराना स्पर्श करावयाचा नाही, वगैरे गोष्टी इतर जमातींतल्या प्रमाणेच कोडवामध्ये प्रचलित आहेत. प्रेताचा अंत्यसंस्कार होईपर्यंत त्या घरात स्वयंपाक करावयाचा नसतो. अशावेळी कुटुंबप्रमुखाच्या व शेजाऱ्याच्या घरून मृत व्यक्तीच्या घरातील लोकासाठी जेवण पाठविले जाते. स्मशानातून परतल्यावर कुटुंबमित्र कच्च्या केळयाचा घड कापून त्यातील काही केळी घरच्या स्त्रियाकडे देतो. त्या ती केळी भाजून मृत व्यक्तीच्या पतीला किंवा पत्नीला खावयास देतात. या विधीला 'चात पुक्कुव' असे म्हणतात.

दहनक्रिया झाली असल्यास दुसऱ्या दिवशी रक्षा गोळा करतात व ती जवळच्या नदीत किंवा भागमंडलच्या कावेरीसंगमात नेऊन टाकतात. ज्याना ते शक्य नसते ते ती राख फणस, वड यांसारख्या चीक (दूध) देणाऱ्या झाडाखाली पुरतात. दहनाच्या जागेवर पाणी शिंपून तेथे भात व इतर धान्ये पेरतात. ती तरारून उगवली तर मृतात्म्याला शांती लाभली आहे, असे समजतात.

मृताशौच किंवा सुतक आपल्या प्रमाणेच बारा दिवसाचे असते. या काळात कोणत्याही धार्मिक किंवा आनंदाच्या समारंभात भाग घ्यावयाचा नसतो. मृत व्यक्तीहून वयाने लहान असलेल्या नातेवाइकानाच सुतक लागते. अंत्यक्रियेच्या दुसऱ्या दिवशी सर्व पुरुषमंडळी हजामत करवून घेतात. त्यानंतर बारा दिवस पूर्ण होईपर्यंत त्यानी दाढी किंवा हजामत करवून घ्यावयाची नसते. स्त्रियांनीही चांदीच्या व काचेच्या बांगड्या, नाकातील चमकी व काळ्या मण्याचे मंगळसूत्र याखेरीज इतर सारे अलंकार अकरा दिवस घालावयाचे नसतात. सुतकातील लोकानी दूध, मध, मांसे अंडी किंवा अळंबे (मश्रूम) खावयाचे नसते. त्यानी पानसुपारीही खावयाची नसते. सुतकाच्या घरात भाकरी (अर्थात तांदळाची) अथवा इतर पक्वान्ने केली जात नाहीत.

मृत व्यक्तीची पत्नी अथवा पती आणि एक-दोन अगदी जवळचे नातेवाईक यांचे सुतक विशेष कडक असते. या लोकाना 'कुळिक निप्पो' म्हणतात. इतराना 'मॅंगते निप्पो' म्हणतात. कुळिक निप्पो मंडळींना एखाद्या तीर्थस्थानी

जाऊन पिंडदान करीपर्यंत सुतक पाळावे लागते. त्यानी रोज स्नान करून आपला स्वयंपाक वेगळा करावयाचा, दिवसातून फक्त एकदाच जेवावयाचे, एका हाताच्या मनगटात चांदीची साखळी घालावयाची. एक सुरी सतत जवळ बाळगावयाची, घरातून बाहेर पडावयाचे नाही, नदी ओलांडावयाची नाही, खुर्चीवर किंवा स्टुलावर-बाकावर बसावयाचे नाही, जमिनीवर चटई अंथरून तिच्यावरच झोपावयाचे वगैरे बंधने पाळावयाची असतात.

कोडव लोक इतर वेळी जमिनीवर का बसत नाहीत, याचा उलगडा यावरून होतो. घरी बाकावर किंवा खुर्चीवर आणि लग्न प्रसंगी तिपाईवर बसण्याचे औचित्य यावरून लक्षात येते.

बाराव्या दिवशी जवळचे नातेवाईक एका टोपलीतून तांदूळ, पिकलेली केळी, पाच नारळ, गूळ वगैरे वस्तू घेऊन येतात. याला 'पोडिबाळे' म्हणतात. ही टोपली परत करताना तिच्यात थोडे मांस व पानसुपारी घालून ती द्यावयाची असते.

या दिवशी कुटुंबमित्र घरच्या एक-दोन मंडळींसह स्मशानात जातो व वाटेत जेथे-जेथे प्रेत ठेवलेले असते त्या जागी तीर्थोदक शिंपडून लहान पानावर अन्न ठेवतो याला 'एडे' म्हणतात. प्रत्यक्ष दहनाच्या किंवा दफनाच्या जागेवर तीर्थोदक शिंपडून तीन केळींची पाने व तीन द्रोण ठेवतात पानावर अन्न वाढतात, आणि द्रोणात सुपारीचे तुकडे, दुसऱ्यात पाणी व तिसऱ्यात दारू घालतात. एवढे करून ते परत येतात. बाराव्याच्या या विधीला 'माद' असे म्हणतात.

ही मंडळी घरी आल्यावर त्याच्यावर तीर्थोदक शिंपडून त्याना पान खावयास देतात. हे पान चघळून तो चोथा त्यानी घराच्या छपरावर टाकावयाचा असतो. प्रमुख सुतकवाल्याच्या हातातील चांदीची साखळी काढून ती आरतीच्या थाळीत टाकली जाते. त्यानतर गावभोजन होते.

सुतकामध्ये पिंडदान करून ते कावळ्याकडून शिवविण्याची प्रथाही कोडवामध्ये आहे. मात्र हे पिंडदान 'दीक्षे उत्तुव' पेक्षा वेगळे व सामान्य असते. त्यासाठी ब्राह्मणांची जरूर नसते.

गावभोजनानंतर चार पुरुष व चार स्त्रिया शोकगीत (चावुपाट) गातात, त्यानतर 'पोलिचि पाडुव' नावाचे गाणे गातात. त्यात मृत व्यक्तीचे गुणगान

असते. यानंतर अंत्यक्रिया समाप्त होते. यातील अनेक विधींचे इतर जमातींच्या अंत्य-विधींशी साम्य आढळते. तो नंतरच्या प्रभावाचा परिणाम असावा. मात्र अंत्यविधीं-मध्ये ब्राम्हणांना फारसे स्थान नसते. फक्त अंत्येष्टीच्या दुसऱ्या दिवशी कुटुंबप्रमुख ब्राह्मणाला किंवा ज्योतिष्याला आणून त्याच्या सूचनेप्रमाणे पूजा अथवा इतर विधी करतो. ब्राह्मणाकडून तीर्थोदक घेऊन घरात व इतरत्र शिंपडण्याचाही विधी केला जातो. परंतु एकूण विचार करता कोडवांच्या इतर संस्काराप्रमाणे मृत्युविषयक संस्कारातही ब्राह्मण किंवा वैदिक मंत्र यांना मुळीच स्थान नसल्याचे दिसते. मात्र भागमंडलासारख्या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी जे पिंडदान सामान्यत अंत्यविधीनंतर सहा महिन्यांच्या अवधीत केले जाते त्यासाठी ब्राह्मणाची जरूर असते. या विधीला 'दीक्षे उत्तुव' म्हणतात.

## लहान मुलांचा अंत्यविधी

लहान मुलांच्या अंत्यविधीचा प्रकार सामान्यत. इतरत्र प्रचलित असलेल्या विधीसारखाच असतो. दात येण्यापूर्वी निधन पावलेल्या मुलाला कसलाही विधी न करता पुरून टाकतात. त्याला पुरलेल्या जागेवर प्रेताच्या डोक्याच्या बाजूस एका करवंटीत त्याच्या आईचे दूध ठेवतात. मूल दोन महिन्यांहून अधिक वयाचे असल्यास त्याला आंघोळ घालून व कपाळाला विभूती लावून त्याला पुरतात, आणि त्याच्या कबरीवर दूधभात कालवून ठेवतात. मुलाचे शव स्मशानात नेल्यावर फक्त त्याच्या आईने आंघोळ करून कपडे बदलावयाचे असतात.

## इतरत्र झालेले मृत्यू ·

एखाद्या व्यक्तीचा मृत्यू गावापासून दूरच्या ठिकाणी झाला असल्यास तेथे साध्या पद्धतीने तिचा अंत्यविधी साजरा करतात, आणि तिला पुरले असल्यास तिचे थोडेसे केस, कापलेली नखे व तिच्या कबरीवरील थोडीशी माती, आणि दहन केले असल्यास तिची थोडीशी रक्षा घरी आणतात. याला 'चावु पोले' म्हणतात. हे अवशेष घराबाहेरच ठेवून परंपरागत पद्धतीने त्याची अंत्येष्टी केली जाते. अशी व्यक्ती सांसर्गिक रोगाने मेली असल्यास तिचे अवशेष न आणता तिचा गवताचा पुतळा तयार करून नेहमीप्रमाणे अंत्यक्रिया करतात. सांसर्गिक रोगाने मरण पावणाऱ्या व्यक्तीला नेहमीपेक्षा वेगळ्या ठिकाणी दहन किंवा दफन करतात. तिचे अंत्यसंस्कार लहान मुलाच्या अंत्यसंस्काराप्रमाणे विशेष गाजावाजा

न करता उरकले जातात.

असे आहेत कोडवांचे संस्कार! त्याच्यावर ब्राह्मणी धर्माचा पगडा स्पष्ट दिसतो, आणि तो हळूहळू वाढतही आहे. परंतु तरीही कोडवांनी आपली अशी काही खास वैशिष्ट्ये आपल्या संस्कारात टिकवून ठेवली आहेत, आणि त्यातून त्यांचे वेगळेपण उठून दिसते हेही नाकारता येणार नाही.

* * *

# ७

# काही श्रद्धा व समजुती

इंग्रजांचे सान्निध्य व इंग्रजी शिक्षणाचे संस्कार यामुळे कोडव समाजाचे आधुनिकीकरण व काही अंशी पाश्चात्यीकरण झाले असल्याचे दिसते. परंतु अधिक जवळ गेल्यावर तो केवळ बाह्य देखावा असल्याचे आढळून येते. कोडव माणूस मनाने अत्यंत श्रद्धाळू, धर्मभोळा व काही अंशी लोकभ्रमाच्या आहारी गेलेला आहे. हा एक प्रकारचा विरोधाभासच म्हणता येईल. परंतु तो तसा आहे खरा. तसे पाहिल्यास काही श्रद्धा व समजुती सुधारलेल्या पाश्चात्य समाजातही विद्यमान असल्याचे दिसून येते. पण कोडवाच्या श्रद्धा व समजुती या धर्मभोळेपणात मोडणाऱ्या आहेत. त्यांच्यात रूढ असलेल्या काही श्रद्धांचा व समजुतींचा इतर गोष्टींच्या विवेचनाच्या ओघात उल्लेख आलाच आहे. त्यावरून त्यांची मनोभूमिका अजूनही काही अंशी आदिवासी व भटक्या जमाती यांच्या मनोभूमिकेशी अधिक मिळती जुळती आहे, असे दिसून येते. कोडवामध्ये रूढ असलेल्या श्रद्धा, समजुती व लोकभ्रम काही प्रमाणात इतर भारतीय समाजातही रूढ असल्याचे आढळते. यावरून इतर भारतीय समाजाचे लोकजीवन व चिंतन-प्रणाली यांचा कोडवावर खूपच प्रभाव पडलेला आहे, असे म्हणता येते. एका दृष्टीने ते स्वाभाविकही आहे. आता आपण कोडवामध्ये रूढ असलेल्या आणखी काही श्रद्धा, समजुती व लोकभ्रम यांची थोडक्यात माहिती करून घेऊ.

**अतिथिदेवो भव**

कोडव लोक त्यांच्या आतिथ्यशीलतेबद्दल विशेष प्रख्यात आहेत. जणू 'अतिथिदेवो भव' हे त्यांचे ब्रीदवाक्य आहे. तुम्ही कोणाही कोडवाच्या घरी

गेलात तर घरची स्त्री एक पाण्याचा तांब्या आणून तुम्हांला देईल. त्या पाण्याने तुम्ही हातपाय धुवायचे आणि ओसरीवर बसायचे. ( घरात प्रवेश करण्यापूर्वी प्रत्येकाने हातपाय धुतलेच पाहिजेत, अशी प्रथा अजूनही कूर्गमध्ये पाहावयास मिळते ) त्यानतर त्याला चहा. कॉफी व फराळाचे देण्यात येते; आणि त्यानंतर पानाचा विडा दिला जातो. दक्षिण भारतातील इतर प्रदेशाप्रमाणे कूर्गमध्येही पान, चुना व सुपारी या तीन गोष्टीच विड्यासाठी पुरेशा समजल्या जातात. तेथे कातशिवाय विडा रंगतो.

नवीन माणसाशी ओळख करून घेण्यास कोडव सदैव उत्सुक असतात. "तुम्हाला आमचा कूर्ग कसा काय वाटला?" हा त्याचा परस्थाना हटकून विचारला जाणारा एक प्रश्न होय. आपल्या घरी येण्याचे निमंत्रण इतरांना देण्यात कोडव लोक अत्यत उदार असतात. त्यामुळे परक्याना त्याच्या सान्निध्यात परकेपणा वाटत नाही. सर्वांशी मिळून-मिसळून वागण्याची कोडवांची ही वृत्ती विशेष उल्लेखनीय म्हटली पाहिजे.

## कोडवांचे स्त्रीदाक्षिण्य

स्त्रीदाक्षिण्याची आधुनिक कल्पना आपण पाश्चात्यांकडून घेतलेली आहे. परंतु कोडवामधील स्त्रीदाक्षिण्य त्यांच्या परंपरेतच विद्यमान असावे असे त्यांच्यातील रूढी व त्याचे शिष्टाचार यावरून दिसते. कोडव स्त्रीला 'कोडवती' असे म्हणतात. कोडवती ही कुटुबाचा नैतिक आधारस्तंभ समजली जाते. तिचा कोणीही अपमान करीत नाही. तिला पुरुषाच्या बरोबरीने, समानतेने वागविले जाते. हुड्याची प्रथा कोडवामध्ये नाही; आणि भाराभर मुली पाहाण्याची पद्धत त्याच्यामध्ये नसल्याने 'वधूपरीक्षे'चा तमाशा तेथे होत नाही. स्त्री–शिक्षणाचा प्रसार फार पूर्वीपासून असल्याने कुमारी मुत्तम्मा याच्यासारखी एकमेव भारतीय परराष्ट्रीय वकील कोडवामधून निर्माण होऊ शकली. सौभाग्यवतीपेक्षा विधवा व घटस्फोटित स्त्रीला कमी लेखण्याची जी परंपरा कोडवामध्ये आहे तो वैदिक हिंदू धर्माचा परिणाम असण्याची शक्यता आहे तरी पण विधवा स्त्रियाच्या कर्तबगारीला कोडवामध्ये भरपूर वाव दिला जातो. कोडवती या सन्मानाला पूर्णपणे पात्र असल्याचे तिने दाखवून दिले आहे. भयाण जंगलात असणाऱ्या आपल्या एकाकी घरात श्रीमती कीकणमाडा पूवव्वा यानी आपल्या लहान

कच्च्याबच्च्यासह अनेक वर्षे धैर्याने कशी काढली असतील याची जेव्हा मी कल्पना करतो तेव्हा त्याची निर्भयता, चिकाटी, परिश्रम व धीरोदात्तता याच्यापुढे मी नतमस्तक होतो. कोडवती ही खऱ्या अर्थाने वीरमाता व वीरपत्नी असते. अशा स्त्रीविषयी कोडवाच्या मनात आदरभावना नसती तरच आश्चर्य. कोडव स्त्री कधीही वेश्या-व्यवसाय करणार नाही. हेही तिच्यासबंधी कोडवाना वाटणाऱ्या आदराचेच प्रतीक म्हणता येईल. भिकारी कोडवती आपल्याला पाहावयास मिळत नाही. (वस्तुत: कोडव माणूस कधीच भीक मागणार नाही. याबाबतीत त्याचे पंजाबी माणसाशी खूपच साम्य आहे. शिवाय एक आर्थिक कारणही आहे. प्रत्येक कोडवाच्या मालकीची थोडी फार जमीन कूर्गमध्ये असतेच. वडिलार्जित जमीन विभागता येत नसल्याने आपोआप जमीन टिकून राहाते. शिवाय हक्काचे घर असतेच. स्त्रीला सासरी किंवा माहेरी स्थान [illegible]

कतव्य वाटत. यामुळ वश्या व भिकारी याना कोडवामध्ये स्थान नाही.) स्त्री-शिक्षण, विधवाविवाह, वगैरे ज्या गोष्टींसाठी इतर समाजाना चळवळी कराव्या लागल्या त्या गोष्टी कोडव समाजात पूर्वीपासूनच प्रचलित असल्याने कोडवाना समाज-सुधारणेसाठी वेगळी चळवळ करावी लागली नाही. त्याच्यांत जातिभेद नाही; आणि अस्पृश्यताही विशेष तीव्र नाही. या सर्व कारणांमुळे कोडवामध्ये सामाजिक सुधारणेची स्वतंत्र अशी परंपरा निर्माण झाली नाही. कदाचित स्त्री-दाक्षिण्याची पूर्वपरंपरा गाठीशी असल्याने इंग्रजाकडून तो गुण अधिक उत्तम प्रकारे स्वीकारण्यात त्याना अडचण वाटली नसावी; आणि इंग्रजांनाही इतर भारतीय जाती-जमातींपेक्षा कोडव जास्त जवळचे वाटले असण्याचीही शक्यता आहे.

## कोडी कित्तुवुदु

व्यभिचार, जारकर्म यासारख्या अपराधाबद्दल गुन्हेगार व्यक्तीला समाजातून बहिष्कृत करण्याची प्रथा कोडवामध्ये होती. अशी व्यक्ती मेली आहे असे समजून एक विधी केला जाई त्याला 'कोडी कित्तुवुदु' असे म्हणत. त्याचा अर्थ 'कापड फाडणे' असा होतो. गुन्हेगार व त्याचे नातेवाईक काठाला टीप घातलेले एक कापड ताणून धरीत आणि ते मधोमध फाडून टाकीत. याचा अर्थ त्या गुन्हेगार व्यक्तीचा तिच्या कुटुंबाशी सबध तुटला असा होई. अशा

व्यक्तीच्या मुलावर तिच्या जिवतपणी तिला पोसण्याची आणि तिच्या मृत्यूनंतर तिची अंत्यक्रिया करण्याची जबाबदारी उरत नसे. मुख्यत खालच्या समजल्या गेलेल्या जातींशी अनैतिक संबंध ठेवणाऱ्या व्यक्तीलाच ही शिक्षा दिली जाई.

### दिवसातील शुभाशुभ वेळा

प्रत्येक दिवसामध्ये काही क्षण शुभ व काही अशुभ असतात ही कल्पना दक्षिण भारतात सर्वत्र प्रचलित असल्याचे आढळून येते तमिळनाडूत तिचे प्राबल्य विशेष आहे. बहुधा तिचाच प्रभाव कोडवावरही पडलेला असावा. संबंध आठवड्यात रोज कोणत्या वेळा अशुभ आहेत हे सांगणारा तक्ता अनेक कोडवाच्या घरी टांगलेला दिसून येतो. कोणतेही काम करताना ही अशुभ वेळ टाळली जाते. अलीकडे पंचांगाचा वापरही मोठ्या प्रमाणात केला जाऊ लागला आहे. त्यात रोजच्या शुभाशुभ वेळा दिलेल्या असतात. दाढी कधी करावयाची, अमुक एका दिशेला प्रवास करावयाचा असल्यास तो कधी करावा, वगैरे गोष्टी या पंचांगातून त्यांना समजतात. अर्थात आपल्याकडेही काही लोक पंचांगाचा वापर या कामांसाठी करतातच.

### धोब्याचा उपयोग शुद्धीकरणासाठी

धोबी हा लोकांचे कपडे धुऊन स्वच्छ करतो, त्याप्रमाणे घराची शुद्धी करण्याचे कामही त्याला करावे लागते. मुलाच्या जन्मानंतर सातव्या किंवा बाराव्या दिवशी एका भांड्यात सज्जीखार ( कौद्ध = कपडे धुण्याची खारी माती ) विरघळलेले पाणी घेऊन तो येतो आणि आंब्याच्या पानांनी ते घरभर शिंपडतो. या विधीने घर शुद्ध होते, अशी कोडवाची श्रद्धा आहे. मात्र अलीकडे धोब्या-ऐवजी ब्राह्मणालाच बोलावून त्याच्याकडून तीर्थोदक शिंपडून घेण्याची प्रथा अधिक लोकप्रिय होत असल्याचे दिसते. ब्राह्मणी किंवा वैदिक धर्माविषयी त्यांना वाटू लागलेल्या आदराचे ते प्रतीक समजता येईल.

### राक्षसवेळेची धास्ती

सूर्यास्तापासून रात्रीपर्यंतचा काळ हा आपल्याकडेही 'राक्षसवेळ' समजून अशुभ मानला जातो तसाच तो कोडवामध्येही समजला जातो. यावेळी मुलांना जेवायला वाढत नाहीत किंवा त्यांना झोपू देत नाहीत. यावेळी जेवणे अथवा झोपणे अशुभ समजले जाते.

असाच एक आपल्याकडे प्रचलित असलेला लोकभ्रम कोडवामध्येही आढळतो. जेवण चालू असता दिवा अचानक विझला तर ती गोष्ट अरिष्टसूचक समजली जाते. आपल्याकडे विजेचे दिवे आल्यावर वीज वाटेल तेव्हा बंद पडू लागली; आणि निदान शहरातून तरी हा लोकभ्रम जवळजवळ नाहीसा झाला. परंतु कूर्गमध्ये अजून त्याचे पुष्कळच प्राबल्य आहे. जेवताना अकस्मात दिवा गेल्यास जेवणारा पानावरून उठतो. हात व ताट धुऊन टाकतो; आणि थोड्या वेळानंतर पुन जेवायला बसतो.

आपल्याकडे प्रचलित असलेला आणखी एक भ्रम कोडवामध्ये प्रचलित आहे. तो असा की नखाचे किंवा केसाचे तुकडे हे अपवित्र असतात. ते घरात पडल्यास त्या घराला दारिद्र्य येते. म्हणून ते घरापासून दूर नेऊन टाकण्याची प्रथा कोडवामध्ये आहे. बहुधा आरोग्याच्या कल्पनेतून हा भ्रम रूढ झाला असावा.

**कावळ्याचे अशुभत्व**

आपल्याप्रमाणेच कोडवामध्येही कावळा हा पक्षी अशुभ समजला जातो व त्याचा संबंध पिंडदानाशी असतो. त्याखेरीज इतरही काही लोकभ्रम कावळ्याशी संबंधित आहेत. एखाद्या घरावर बसून कावळा ओरडला तर त्या घरातील कोणाचा तरी मृत्यू घडणार असे समजले जाते. ( आपल्याकडे हाच लोकभ्रम टिटवीच्या बाबतीत प्रचलित आहे. ) जो कोणी कावळा–कावळीचे जुगणे पाहील तो लौकरच मरण पावणार, असे समजले जाते. मात्र त्याच्या मृत्यूची खोटी बातमी ( सागावा ) त्याच्या नातेवाईकांना ताबडतोब कळविल्यास त्या मृत्यूतून त्याची सुटका होते, अशा समजुतीने पूर्वी असा सागावा धाडला जाई. आजकाल त्या-ऐवजी तार केली जाते.

ज्याच्या अंगावर कावळ्याची विष्ठा पडेल त्याने तळ्यात किंवा नदीत एक हजार वेळा बुड्या माराव्यात, असे विधान आहे अर्थात हा उपाय कटकटीचा असल्यामुळे त्यातून सुटण्याचा एक उपाय शोधण्यात आला आहे. त्या माणसाच्या डोक्यावर एक चाळण धरली जाते आणि त्या चाळणीत ताब्याने पाणी ओतले जाते. चाळणीला जितकी घरे असतील तितक्यांदा स्नान केल्याचे श्रेय त्या माणसाला मिळते; व अशा प्रकारे हजार वेळा बुड्या मारण्याच्या कटकटीपासून तो वाचतो.

## उपवासाला धिरडे

कोडवामध्ये उपवासाचे प्रस्थ जवळजवळ नाहीच. तरीपण ग्रामदेवतेच्या उत्सवाच्या आधल्या दिवशी ( किंबहुना उत्सवातील शेवटच्या दिवसाच्या आधल्या दिवशी ) गावच्या इतर लोकांबरोबर कोडव स्त्री-पुरुषही उपास करतात. त्याला ‘ पटणी ’ असे म्हणतात. सामान्यतः माणसे रोज जो आहार घेतात त्यापेक्षा वेगळा आहार घेतला की उपास होतो. गोव्यातील उपासाला मुगाच्या डाळीची खीर व गव्हाच्या रव्याचा शिरा चालतो, तो असलाच प्रकार म्हणता येईल. आमटी भात हा कोडवाचा रोजचा आहार. तोच फक्त उपवासाच्या दिवशी निषिद्ध समजला जातो. मात्र तांदळाच्या पिठाचे पदार्थ उपासाला चालतात. म्हणून उपासाच्या दिवशी तांदळाच्या पिठाचे धिरडे व मुगाच्या डाळीचे पायस ( खीर ) हे तामिळनाडूतील उपवासाचे पदार्थ कोडवामध्येही प्रचलित आहेत. हे पदार्थ लग्नसमारंभात व सोयर-सुतकात निषिद्ध समजले गेले आहेत, हे एक वैशिष्ट्य म्हणता येईल.

## दूध व पानाचा विडा

एखाद्या नातेवाइकाच्या मृत्यूनंतर सुतकाच्या काळात दूध पिणे अथवा विडा खाणे म्हणजे त्याच्या मृत्यूविषयी आपल्याला मुळीच दुःख झालेले नाही, उलट आनंदच झाला आहे, असे सूचित करणे होय, असे मानले जाते. कन्नड भाषेत तर ‘ तू मेलास की मी दूध पिईन ’ ही अत्यंत कठोर शिवी समजली जाते. दूध न पिणे व पान न खाणे ही गोष्ट मृताविषयी आदर सूचित करते. विडा ही कोडवाची अत्यंत प्रिय वस्तू आहे. विडा कुटून तो अंत्यसंस्कारापूर्वी प्रेताच्या तोंडात घातला जातो; आणि श्राद्धाच्या वेळी मृतात्म्याला पान व सुपारी अर्पण केली जाते. एवढी प्रिय वस्तू सोडणे म्हणजे मृताविषयी आदर दर्शविणे समजले जात असल्यास नवल नाही.

## भूतयोनीतील अवतार

पुण्यकर्म करणारा स्वर्गाला जातो आणि पापकर्म करणारा नरकाला जातो, तसेच माणसाला त्याच्या भल्याबुऱ्या कर्मांचे भलेबुरे फळ मिळते, वगैरे समजुती कोडवामध्येही रूढ आहेत. परंतु मरणोत्तर जीवनाविषयी त्यांच्या काही वेगळ्या कल्पनाही आहेत. उदाहरणार्थ, जे लोक रणांगणावर लढताना मृत्युमुखी पडतात

ते ' बीर ' ( वीर ) बनतात; आणि ते इतर पूर्वजापेक्षा श्रेष्ठ समजले जातात. अशा वीरासाठी स्वतंत्र ' बीर कोटे ' नावाची स्मारके बांधतात. कर्नाटकात वीरगती प्राप्त करणाऱ्या सैनिकाच्या स्मृतीसाठी शिळा उभारण्याची प्रथा पूर्वी होती. या शिळांना ' इरगल्लु ' असे म्हणतात त्यावरूनच कोडवांना ' बीर-कोटे 'ची कल्पना सुचली असावी.

यापेक्षा वेगळी व विचित्र कल्पना म्हणजे जी व्यक्ती वाघाकडून मारली जाते ती वाघाच्या जन्माला जाते; किंवा तिचा आत्मा व्याघ्रयोनीत प्रवेश करतो. तिला ' नरीपूद ' म्हणजे वाघभूत असे म्हणतात. तिच्या श्राद्धाच्या वेळी बण्ण जातीचा भगत आपल्या तोंडाला पिवडी फासून त्यावर काळे पट्टे किंवा ठिपके काढतो. मग त्याच्या अंगात त्या व्यक्तीचे भूत संचारते व स्वतःला जे हवे असेल ते ती मागते व भविष्य वर्तविते.

## तांदीचे अशुभ झाड

कोडव लोक दुधाला अमृत समजतात, आणि ज्या झाडातून दूध ( चीक ) निघते ती झाडे पवित्र मानली जातात. त्यांचे सारे देव या झाडाखाली असतात; आणि सर्व पवित्र संस्कार या झाडाखाली केले जातात. सर्वांत अधिक पवित्र वृक्ष पिंपळाचा समजला जातो. पिंपळ हा शंकराचा प्रतीक समजला जातो. तर आवळा हा पार्वतीचा प्रतीक मानला जातो. पिंपळ व आवळा एकत्र लावून त्याभोवती पार बांधतात व त्यांचे लग्नही लावतात व त्यासाठी खूप खर्च करतात. आपल्याकडे तुळशीचे लग्न लावतात तशीच ही प्रथा म्हणता येईल.

चंदन, आंबा व फणस ही झाडेही अशीच पवित्र मानली जातात. केळीचे झाड तर कोडवांच्या सर्व शुभाशुभ संस्कारामध्ये अनिवार्य समजले जाते. तुळशीचे झाडही पवित्र समजले जाते. वृक्षारोपणाचे महत्त्व कोडवांना फार पूर्वीच समजले होते. दोन झाडे लावल्यावरच एक झाड तोडावयास परवानगी असे.

याच संदर्भात एका अशुभ झाडाचाही उल्लेख केला पाहिजे. त्याचे नाव ' तांदी ' हे एक जंगली झाड असून त्याच्या कोणत्याच भागाचा उपयोग कोडव लोक करीत नाहीत. इमारतीसाठीच नव्हे तर जळणासाठीही त्याच्या लाकडाचा वापर केला जात नाही. नळराजावर या झाडाखाली बसल्यामुळेच दुर्दैव ओढवले

अशी कोडवाची समजूत आहे. या झाडाखालून जाताना कोडव लोक नळराजाचे नामस्मरण करतात.

## सूर्य-चंद्र-ग्रहणाविषयी कोडवांची कल्पना

राहू नावाचा दैत्य सूर्य-चंद्राला गिळण्याचा प्रयत्न करतो तेव्हा ग्रहण लागते अशी आपल्याकडे समजूत आहे. त्याबाबतीतील कोडवामध्ये रूढ असलेली दंतकथा मात्र थोडी वेगळी आहे. ती अशी

एका झाडाखाली एक वारुळ होते. त्या वारुळात एक नाग राहात होता. तो एकाक्ष होता. त्या झाडावर भोपळ्याचा वेल चढलेला होता. त्या वेलाला एक भोपळा लागला होता. त्या भोपळ्यात एक ससा राहात होता. एकदा खूप जोराचा वारा सुटला आणि तो भोपळा वारुळावर पडून फुटला. त्यातला ससा बाहेर पडला व पळू लागला. नागाला त्याचा राग आला आणि तो सशाला पकडण्यासाठी त्याच्या मागे धावू लागला. अंतराळातून चंद्राने ती शर्यत पाहिली आणि सशाची कीव येऊन त्याने त्याच्या मदतीसाठी वरून एक दोर सोडला. त्या दोराला धरून ससा वर गेला आणि चंद्राच्या मांडीवर बसला. आता तो नाग अधूनमधून सशाला पकडण्याचा प्रयत्न करतो. त्यावेळी चंद्राला ग्रहण लागते. असे ग्रहण सुरू झाले की कोडव लोक आकाशाकडे पाहून ओरडतात, "अरे एकाक्ष सिद्दप्पा, सोड, सोड त्याला."

## मलबारविषयी विचित्र कल्पना

वस्तुत. केरळचा मलबार भाग हा कूर्गला अगदी लागून आहे. या दोन प्रदेशाचा व्यापारिक संबंध फार जुना आहे. या दोन राज्यांच्या सरहद्दीवरील गावाचा परस्पराशी चांगला परिचय आहे. मलबारमधील मोपला (मापिळ्ळा) व इतर मजूर कूर्गमध्ये खूप मोठ्या संख्येने प्राचीन काळापासून येत राहिले आहेत. इतके असूनही त्या प्रदेशाविषयी कोडवाच्या कल्पना मोठ्या विचित्र राहिल्या आहेत. कोडव लोकसाहित्यात मलबारचा उल्लेख 'अज्ञान भूमी' असा येतो. केरळमधील नायरामध्ये एकेकाळी प्रचलित असलेल्या मातृसत्ताक समाजव्यवस्थेमुळेच बहुधा ही कल्पना कोडवामध्ये रूढ झाली असावी. कर्नाटक व तमिळनाडू येथील लोक पूर्वी मलबारचा उल्लेख 'स्त्री मलयाळ' किंवा 'स्त्रीराज्य' असा करीत असत. त्याचेही कारण हेच असावे.

रामलक्ष्मणाच्या कोडगू कथेत मलबारसबधीचा कोडवांचा गैरसमज प्रकर्षाने दिसून येतो. त्या कथेप्रमाणे रामलक्ष्मणानी मलबारमध्ये प्रवेश करताच लक्ष्मणातील आज्ञाधारकपणा एकदम लुप्त झाला आणि तो रामाशी उद्धटपणे वागू लागला. पुढे ते जेव्हा कूर्गमध्ये प्रविष्ट झाले तेव्हा लक्ष्मण पूर्ववत आज्ञाधारक बनला, आणि आपल्याकडून झालेल्या उद्धटपणाचा त्याला इतका पश्चात्ताप झाला की त्याने अग्निप्रवेश करण्याचा निश्चय केला. तेव्हा रामाने एक नदी निर्माण करून ती चिता विझवून टाकली. या नदीचे नाव आहे लक्ष्मणतीर्थ. ही लक्ष्मणतीर्थ नदी कूर्गमध्ये उगम पावून कर्नाटकातच कावेरीला मिळते. लक्ष्मणाने ज्या ठिकाणी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता त्या ठिकाणी रामाने एका शिवलिंगाची स्थापना केली. त्याला रामेश्वर असे नाव प्राप्त झाले इरपू या गावी असलेल्या या रामेश्वराची शिवरात्रीला खूप मोठी जत्रा भरते

### नोकराला एरंडेल

कूर्गमध्ये प्राचीन काळापासून एक प्रकारची दास-प्रथा चालत आली होती. मुख्यत पोलेय नामक दलित जातीची कुटुबे प्रत्येक कोडव जमीनदाराकडे पिढ्यानुपिढ्या राबत होती. पुढे एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास कॉफीची लागवड मोठ्या प्रमाणावर कूर्गमध्ये सुरू झाली. युरोपियन मळेवाले त्या व्यवसायात उतरले. मजुराना मागणी वाढली. कोडवाकडील गुलाम मजूर गोऱ्या मळेवाल्याकडे पळून जाऊ लागले. अशा वेळी ब्रिटिशानी गुलामीची प्रथा कायद्याने बंद करून या गुलामाना मुक्त केले. परंतु आपल्या मजुराशी कोडवाची वागणूक अत्यत सहानुभूतीची व प्रेमळपणाची असावी असे दिसते. कारण आपल्या मालकाच्या घरी कोणी मयत झाल्यास हे मजूरही सुतक पाळत असत. आपल्या मजुराची कोडव लोक किती काळजी घेत असत याची काहीशी कल्पना आजही त्याच्यात रूढ असलेल्या काही गोष्टींवरून येते. उदाहरणार्थ, आजही एखाद्या पोलेय मजुराकडून काम करून घेतल्यावर त्याची मालकीण त्याला धान्याच्या रूपाने द्यावयाच्या मजुरीबरोबर (कोच्चीबरोबर) थोडेसे एरंडेलही देते. उन्हात काम केल्याने मजुराचे डोके तापते. ते थड व्हावे, म्हणून हे तेल दिले जाते. ते दिल्याने मजूर थंडपणे काम करतो अशी समजूत आहे. काही ठिकाणी तर सणासुदीला घरची मालकीण स्वतः घरगड्याच्या डोकीला तेल

लावते. काही घराण्यानी आपल्या मजुराना आपल्या भातशेतीतील काही भाग कायमचा दिला असल्याचीही उदाहरणे आहेत.

अशा प्रकारे कोडवामध्येही अनेक श्रद्धा, समजुती लोकभ्रम प्रचलित आहेत. त्यातील अनेक इतर हिंदू जाती-जमातींत प्रचलित असलेले आहेत. अनेक शतकांच्या संपर्कामुळे असे घडून येणे स्वाभाविकच होते. तरीपण कोडवांच्या अशा काही खास श्रद्धा, समजुती व लोकभ्रम आहेत. त्याचे ओझरते दर्शन घडविणे एवढाच या विवेचनाचा हेतू होता.

* * *

## ८

# कोडगूचे साहित्यसेवक

## श्री बी डी गणपती

कूर्गमध्ये हिंडताना राहून राहून मला एक गोष्ट सारखी खटकत होती. या एवढ्या उमद्या, हुशार समाजात आपल्याला एकही समानधर्मा का भेटू नये हे मला समजत नव्हते. त्याची कारणेही मी माझ्या परीने शोधण्याचा प्रयत्न करीत होतो. एका बाजूने अत्यंत धर्मभोळा व परंपरानिष्ठ असलेला हा समाज दुसऱ्या बाजूने पूर्णपणे भौतिकतावादी, व्यवहारवादी व इहवादी असल्याने साहित्य, संगीत, कला, समाजसेवा, देशसेवा या विषयात रस असणारी माणसे मला भेटली नव्हती कॉफी–वेलदोड्याचे मळे, संत्र्याच्या बागा, लष्करी जीवन, सरकारी व कारखान्यातील नोकऱ्या, याविषयी प्रामुख्याने बोलणारी माणसे भेटत. त्यामुळे साहित्यसेवेला जीवन वाहिलेल्या, राष्ट्रीय चळवळीत भाग घेतलेल्या, गांधीजींच्या सर्वोदयवादी विचारप्रणालीप्रमाणे साधे जीवन जगणाऱ्या, खादी वापरणाऱ्या, मद्यालाच नव्हे तर चहालाही स्पर्श न करणाऱ्या अशा एका कुटुंबाशी ओळख झाली तेव्हा मला आनंद व आश्चर्य यांचा धक्काच बसला. हे कुटुंब होते श्री बी. डी. गणपती यांचे.

### खरा साहित्यसेवक

श्री बाचामाडा देवैया गणपती हे कूर्गमधील प्रथम क्रमांकाचे लोकप्रिय कोडव लेखक आहेत. कन्नड, इंग्रजी व कोडगू या तीन भाषात ते साहित्यनिर्मिती करतात. त्याचा जन्म मरकाऱ्याहून सुमारे ३० मैलावर असलेल्या बेसागूर या खेड्यात १६ जून १९२० रोजी झाला. पोन्नमपेट व विराजपेट या शहरात

त्यांचे शालेय शिक्षण झाले. कॉलेजात काही दिवस काढून त्यांनी देशसेवेसाठी शिक्षणाला रामराम ठोकला, आणि अगदी अल्पवयात म्हणजे १९३७ साली 'कोडगू' (कूर्ग) या कन्नड साप्ताहिकात उपसंपादक म्हणून काम करण्यास सुरुवात केली. प्रामुख्याने कोडव समाजाच्या उन्नतीस वाहिलेले हे साप्ताहिक असून आजही जगभर पसरलेल्या कोडव लोकांपर्यंत ते जाऊन पोचते.

श्री गणपती यांनी तरुणपणी कूर्गमध्ये विद्यार्थी कॉंग्रेसची संघटना केली; कूर्ग जिल्हा कॉंग्रेस कमेटीचे ते काही काळ चिटणीसही होते; आणि १९४२ च्या भारत छोडो चळवळीत भाग घेतल्याबद्दल त्यांनी तुरुंगवासही भोगला. परंतु त्यांचा खरा पिंड साहित्यिकाचा व विधायक कार्यकर्त्याचा असल्याने देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर त्यांनी पक्षीय राजकारणातून निवृत्त होऊन सर्वोदय कार्यास वाहून घेतले. या काळात त्यांचे साहित्यलेखन चालूच होते. पुढे ते 'कोडगू' या साप्ताहिकाचे मुख्य संपादक झाले; त्या जागेवर सुमारे १५ वर्षे राहून ते १९७२ साली निवृत्त झाले. आता ते आपला सारा वेळ साहित्यनिर्मितीतच घालवितात.

### साहित्यातील वैविध्य

कथा, कादंबरी, नाटक, कविता या ललित साहित्यप्रकारांमध्येच नव्हे तर तत्त्वज्ञानात्मक गंभीर लिखाणातही श्री गणपती यांना रस असून अशा विविध साहित्यशाखांमध्ये त्यांनी सुमारे पंचवीस पुस्तके लिहिली आहेत. 'कन्निकावेरी', 'प्रेमद दारियल्ली' (प्रेमपथावर) यासारख्या कादंबऱ्या, 'प्रतिध्वनी', आणि 'ओंकार' हे काव्यसंग्रह, 'कुसुमचय', 'तुतुरु' व 'अंत किरण' हे कथासंग्रह, 'पत्रावळि', पंचामृत' हे पत्रसंग्रह, 'जीवनदर्शन', 'मानव', 'अमृत', 'सत्यशोधने' यासारखे चिंतनात्मक ग्रंथ, यावरून त्यांच्या ग्रंथ-संपत्तीची कल्पना यावी. परंतु यापेक्षाही त्यांचे एक वेगळेपण आहे. कोडव समाजाचा अभ्यास करून त्यांच्या संस्कृतीची व जीवनपद्धतीची खुद्द कोडवांना व इतरांना ओळख करून देण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले आहे. 'कोडगु मत्तु कोडवरू', 'कोडवरु अवर संस्कृति, संप्रदाय', 'कोडगिन स्वातंत्र्य-चळवळ' हे कन्नड ग्रंथ, आणि 'कोडवाज (कूर्ग्ज), देअर कस्टम्स अँड कल्चर', आणि 'साइड-लाइट्स ऑन कोडव कल्चर' हे इंग्रजी ग्रंथ या दृष्टीने

अत्यंत उल्लेखनीय व लोकप्रिय आहेत. तत्त्वज्ञान हा श्री गणपतींचा विशेष आवडीचा विषय आहे. मानवजीवनासंबंधी त्यानी सखोल विचार केला आहे. ' दि इटर्नल क्वेस्ट ' या त्यांच्या तत्त्वज्ञानात्मक ग्रंथाची विद्वानानी खूप प्रशंसा केली आहे. तत्त्वज्ञानाचा विचार नाटकाच्या माध्यमातून मांडण्याचा श्री गणपती यानी केलेला प्रयत्न या संदर्भात उल्लेखनीय आहे. त्यानी ' कावेरी ' या नावाचे एक नाटक अलीकडेच लिहिले असून त्यातील गूढगुंजनाने अनेकांना मंत्रमुग्ध केले आहे.

या सर्व पुस्तकाचे प्रकाशक श्री. गणपती हे स्वत:च आहेत. त्यामुळे प्रकाशकाकडून होणाऱ्या शोषणाचा त्रास त्यांना भोगावा लागत नाही. वाचकाच्या अभिरुचीचाही त्यामुळे त्याना नीट अंदाज लागतो. आपल्या पुस्तकासंबंधी बोलताना ते म्हणाले, " माझ्या कन्नड पुस्तकाना राज्य सरकारची पारितोषिकं मिळाली आहेत. इतरही काही बक्षिस त्याना मिळाली आहेत. पण त्याच्यापेक्षाही जास्त खप होतो इंग्रजी पुस्तकाचा. कोडवाच्या संस्कृतीसंबंधीचं माझं पुस्तक इंग्रजीत व कानडीत एकाच वेळी प्रसिद्ध झालं. त्यापैकी इंग्रजी आवृत्ती कधीच संपली, पण कन्नड आवृत्ती मात्र अजून अर्धीही संपली नाही. "

" मातृभाषेविषयीचं आमचं प्रेम किती बेगडी आहे हेच यावरून सिद्ध होत नाही काय ? " मी विचारले.

श्री गणपती नुसते सौम्यपणे हसले.

## मातृभाषेची सेवा

कन्नड ही कोडवाची व्यवहारभाषा असली तरी मातृभाषा कोडगूची सर तिला कशी येणार ? तिच्याविषयी श्री गणपती याना विशेष आस्था वाटणे स्वाभाविकच आहे. कन्नड व कोडगू यांचे संबंध काहीसे मराठी व कोंकणी यासारखे आहेत कोकणीप्रमाणेच कोडगूतही थोडीफार साहित्य-निर्मिती झालेली आहे. कोकणीने जशी मराठीची बाळबोध लिपी ( प्रामुख्याने ) स्वीकारली आहे तशीच कोडगूने कन्नड लिपी स्वीकारली आहे. कै. हरदास अप्पाचा कवी याची पौराणिक नाटके आणि त्यांचेच समकालीन कै. नडिकेरियंडा चिन्नप्पा याचे ' पट्टोले पळमे ' हे कोडवाच्या जीवन पद्धतीची माहिती देणारे पुस्तक हे कोडगू साहित्य महत्त्वाचे समजले जाते. त्यापेक्षाही अधिक महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे कै. चिन्नप्पा यानी कोडगू भाषेत केलेला भगवद्गीतेचा सरस

अनुवाद हे होय. त्यावरून कोडगूच्या साहित्यिक सामर्थ्याची निश्चित प्रचीती येते. कोडगू सेवकाच्या या परपरेत श्री गणपती यानीही मानाचे स्थान पटकावले आहे. 'कुत्तुबोळिच' ( समई ) आणि 'नग कोडव' ( आम्ही कोडव ) ही कोडव जीवनाशी सबधित दोन पुस्तके कोडगू भाषेत लिहून कोडगूच्या साहित्य-सपदेत त्यानी भर घातली आहे. 'नग कोडव' या अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या पुस्तकात कोडव जमातीतील प्रसिद्ध व कर्तबगार लोकाचा व संस्थाचा सचित्र परिचय देण्यात आला आहे.

**समंजस भूमिका**

कोडगू ही नुसती बोली नसून ती एक स्वतत्र भाषा आहे, इतर द्राविडी भाषाहून वेगळी अशी तिची काही वैशिष्टये आहेत, मल्याळम् व कन्नड या भाषाचा अत्यधिक प्रभाव पडलेला असूनही तिने आपले वेगळेपण टिकवून ठेवले आहे, आणि पाऊण लाख कर्तबगार लोकाची ती भाषा आहे, असे प्रतिपादन करणारे श्री गणपती याना मी विचारले होते की, "कोडगू एवढी शक्तिशाली भाषा असेल तर कोकणीप्रमाणे तिला साहित्य अकादमीकडून मान्यता मिळविण्याचा प्रयत्न तुम्ही मडळी का करीत नाही ?" माझ्या या प्रश्नाला उत्तर म्हणून त्यानी आपल्या ता. ९ जून १९७५ च्या पत्रात तीनच मोजकी व मार्मिक वाक्ये लिहिली आहेत. ते म्हणतात, "We don't want to develop 'Kodagu' as a language to be recognized by the Academy We want its development to preserve our culture and customs It should have its place in the family as well as in society" ( साहित्य अकादमीची मान्यता मिळविण्यासाठी आम्हाला कोडगूचा विकास करावयाचा नाही. आमची संस्कृती व संस्कार याचे रक्षण करण्यासाठी आम्हाला कोडगूचा विकास घडवून आणावयाचा आहे. कोडव कुटुबात आणि समाजात तिला तिचे मानाचे स्थान मिळावे एवढीच आमची इच्छा आहे. )

कोडव लोकाचे सरकार-दरबारी असलेले वजन लक्षात घेता त्यानाही कोकणीप्रमाणे कोडगूला साहित्य अकादमीची व सरकारची मान्यता मिळविता येईल हे उघड आहे. परतु कोडवाची भूमिका खूपच व्यावहारिक व समजूतदारपणाची आहे असे दिसते. कोडवावर इंग्रजीचा अवास्तव प्रभाव आहे. श्री गणपतींच्या राष्ट्रीय मनाला ते खटकते. त्या प्रभावातून कोडवानी आपली सुटका

करून घ्यावी असे ते सांगत असतात. तेवढ्या मर्यादित स्वरूपातच त्यांचा कोडगूचा पुरस्कार व्यक्त होतो.

**निःस्पृह साधे जीवन**

श्री गणपती यांच्या टुमदार घरात प्रवेश केल्यानंतर तेथील निर्मळपणा व टापटीप याबरोबर तेथे राहाणाऱ्यांच्या निःस्पृह व साध्या जीवनाचीही छाप आपल्या मनावर पडते. वस्तुतः कोडवामधील श्रेष्ठ लेखक या नात्याने श्री गणपतींविषयी सर्वांच्या मनात आपलेपणा व आदर आहे. जनरल कार्यप्पा ( करियप्पा ) आणि इतर मोठमोठे अधिकारी यांच्याशी त्यांचा घनिष्ठ स्नेह आहे. या स्नेहातून त्यांना भरपूर संपत्ती गोळा करता आली असती. पण तसला विचारही त्यांच्या मनात आला नाही. उलट सत्ताधारी पक्ष व सरकार यांचे कठोर टीकाकार म्हणूनच ते कूर्गमध्ये प्रसिद्ध आहेत. या त्यांच्या भूमिकेमुळे त्यांना कधीच श्रीमंत होता आले नाही. त्यांच्या या भूमिकेला त्यांच्या सौभाग्यवतीनेही मनःपूर्वक साथ दिली. त्याचेही एक कारण आहे. कूर्गचे सर्वांत प्रमुख राष्ट्रीय पुढारी व स्वातंत्र्य-सेनानी कै. बेळियप्पा ( पंदड बोळयप्प ) यांच्या कन्या या श्री गणपतींच्या धर्म-पत्नी आहेत. हे जेव्हा मला समजले तेव्हा त्यांच्या पत्नीच्या अंगावरील खादीच्या साडीचे मला आश्चर्य वाटले नाही; आणि त्या घरातील साधेपणाचेही नवल वाटले नाही. कोडवासारख्या रंगेल व रंगेल समाजाच्या मरकाऱ्यासारख्या भपकेबाज राजधानीत राहात असूनही श्री गणपती यांचे जीवन शांतपणे, आपल्याच तंद्रीत तेवत राहाणाऱ्या पणतीसारखे सौम्य, स्निग्ध वाटते. त्यांच्या साहित्यातून त्यांची विद्वत्ता व रसिकता शब्दाशब्दातून व्यक्त होते. सभ्य व्यक्तीच्या डोळ्यांना व मनाला खुपेल, खटकेल असे काहीही त्यात नसते. जसे साहित्य तसेच जीवन. कोडव समाजाला ज्यांच्याविषयी अभिमान वाटावा अशा व्यक्तींमध्ये श्री बी डी. गणपती यांची गणना नक्कीच होते. परंतु साहित्यिक, विचारवंत व देशभक्त या नात्याने श्री गणपती हे फक्त कूर्गचे नाहीत. कर्नाटकाचा त्यांच्यावर पहिला हक्क आहे हे खरे; पण त्यांच्यातील जागरूक भारतीय आत्मा पाहिल्यास ते साऱ्या भारताचेच आहेत, असे म्हणता येते. त्यांच्यातील या भारतीयतेमुळेच ते मला विशेष आकर्षक व श्रेष्ठ वाटले. कोडव समाज व कोडगू भाषा यांची अशीच सेवा त्यांच्या हातून निरंतर होत राहो !

* * *

# १

## बिरुनाणीतील चार दिवस

सामान्यत' ज्या घराण्यात अथवा घरात आपली मुलगी जाणार असते ते घर लग्नाआधी प्रत्यक्ष पाहून मुलीच्या भावी सुखाबद्दल खात्री करून घेणे हे प्रत्येक वधूपित्याचे कर्तव्य समजले जाते. त्याप्रमाणे वस्तुत' माझ्या मुलीच्या लग्नापूर्वी मी तिच्या सासरला जाऊन व्याही मंडळींना भेटून यावयास हवे होते परंतु या लग्नाला माझ्या जावयाच्या - डॉ. कीकणमाडा कार्यप्पा सुब्बय्या याच्या – घरच्या लोकाचा सक्त विरोध होता. मी त्याच्या गावी गेलो तर ते माझा अपमान करतील अशी डॉ. सुब्बय्याना भीती वाटत होती. म्हणून त्याच्या विनतीवरून लग्नाआधी घर-घराणे पाहाण्याचा कार्यक्रम मला रहित करावा लागला होता नाहीतर माझी कूर्गची सफर तीन-चार वर्षांपूर्वीच घडून आली असती. खरे म्हणजे, मैसूरच्या बाजूला मी यापूर्वी दोनतीनदा गेलो होतो त्यावेळीच मी कूर्गला जाऊन यावयास हवे होते. पण तेथे कोणी ओळखीचे नसल्याने तो कार्यक्रम तसाच राहून गेला होता.

लग्नालाच विरोध असल्यामुळे डॉ. सुब्बय्यांचे नातेवाईक स्वाभाविकपणेच लग्नाला आले नव्हते. एकदा लग्न होऊन गेल्यानतर त्याचा विरोध व राग थोडा-बहुत कमी झाला असेल, याविषयी माझ्या स्वत च्या लग्नाच्या अनुभवावरून माझी खात्री होती. म्हणून १९७२ च्या डिसेंबरात मुलीला भेटण्यासाठी आम्ही पतिपत्नी मैसूरला गेलो असता उभ्या-उभ्या मुलीच्या सासरी — कूर्गमधील बिरुनाणी या गावी जाऊन आलो होतो. आमच्या व्याह्यानी आमच्या अपेक्षेपेक्षाही अधिक प्रेमाने व आपलेपणाने आमचे स्वागत केलेले पाहून आम्ही भारावून गेलो होतो. पण त्याच्या स्वागतापेक्षाही बिरुनाणीच्या सृष्टिसौंदर्याने मी जास्त भारावून गेलो

होतो; आणि पुन. केव्हातरी लौकरच सवड काढून बिरुनाणीला दोन-तीन दिवस निवातपणी राहाण्यासाठी जावयाचे असा मी मनाशी सकल्प केला होता. सुमारे सव्वा वर्षांनतर माझा हा संकल्प पूर्ण झाला. माझ्या डोळ्याचे पारणे फिटले. एका अद्‌भुत स्वप्नभूमीत वावरल्याचा आनद मला लाभला.

## तापदायक प्रवास

मैसूरहून बिरुनाणीला जावयाचे म्हणजे मरकारा अथवा विराजपेटला जाणाऱ्या बसने ५५ मैल दूर असणाऱ्या गोणीकोप्पल या बाजारपेठेच्या गावी जावयाचे आणि तेथून बिरुनाणीला जाणारी बस पकडावयाची. हे ५५ मैलाचे अतर कापायला सामान्यत: ३ तास लागतात. पण गोणीकोप्पलहून बिरुनाणी फक्त वीस मैल दूर असली तरी तेवढ्या अतरालाही किमान तीन तास लागतात. कारण वाटेत लागणारे प्रत्येक घर हे जणू एक गावच असते. त्यामुळे या वीस मैलाच्या अतरात पन्नास-साठ ठिकाणी तरी बस थाबतेच. शिवाय बस मिळविण्यासाठी जो वेळ घालवावा लागतो तो हिशेबात घेतल्यास ७५ मैलाच्या या प्रवासाला सुमारे बारा तास लागतात. यावरून कूर्गमधील वाहतूक व्यवस्थेची (म्हणजेच अव्यवस्थेची) कल्पना यावी. अशा वेळी आगगाडीचा अभाव विशेषत्वाने जाणवतो. ज्या गोऱ्या साहेबाने समुद्रसपाटीपासून ७२२८ फूट उंचीवर असलेल्या ऊटकमंडपर्यंत आगगाडी नेली, त्याने त्याच्या निम्म्या उंचीवर असलेल्या मरकाऱ्यापर्यंत आगगाडी नेण्याचा प्रयत्न का केला नसावा कळत नाही.

बरे, सरकारने बसव्यवस्था तरी नीट ठेवावी! तीही नाही. कर्नाटक सरकारच्या परिवहन मडळाचे अस्तित्वही कूर्गमध्ये जाणवत नाही. खाजगी बसकपन्याचाच सुळसुळाट. त्याच्यावर ना कोणाचे नियंत्रण ना कोणी जबाबदार. जुन्या काळची मोगलाईच जणू. त्यामुळे कूर्गमधील बसप्रवास म्हणजे एक वैतागच ठरतो.

त्यात पुन: गोणीकोप्पलपासून श्रीमंगलपर्यंत १२ मैल डाबरी रस्ता आहे. नंतर नुसतीच धूळ आणि धुरळा. बसचा अवतारही त्या एकूण वातावरणाला साजेसाच लाकडी बाकडी जेमतेम बसविलेली. गाडीने उसळी घेतली की टपाला डोके थडकेल अशी धास्ती. गाडीत किती 'शिटा' घ्यावयाच्या याला

कर्नाटकात कोठेच धरबंद नाही. तो कूर्गमध्ये कसा असणार?

परंतु एवढ्या साऱ्या दिव्यातून सहीसलामत पार पडून आपण बिरुनाणीला पोचलो आणि शरीरावरील व कपड्यावरील धूळ झटकून सभोवताली पाहू लागलो की क्षणार्धात सारा शीण, सारा थकवा नाहीसा होतो आणि आपण वाऱ्याच्या झुळुकीसरशी ताजेतवाने होतो.

## हिरवागार उन्हाळा

कूर्गचा दक्षिण भाग आधीच पावसाबद्दल प्रसिद्ध. त्यात पुन बिरुनाणी हे केरळच्या सरहद्दीला लागून असलेले गाव. त्यामुळे तेथे पावसाचा नेहमीच विशेष जोर असतो. १९७४ साली तर तेथे पर्जन्यराजाने अगदी कहर केला होता. ५०० इंचापर्यंत पाऊस पडला होता. (एरव्ही २५०—३०० इंच पाऊस तेथे पडतच असतो!) पावसाच्या या आधिक्यामुळे या भागात घनदाट जंगले तयार झाली आहेत. गावाच्या हद्दीत प्रवेश करण्याआधीपासूनच हिरवीगार वनराजी आपले स्वागत करते. पहिल्या खेपेला कॉफीचे मळे आणि सभोवारची झाडी याच्या जोडीला लोंब्यावर आलेली भाताची शेते दृष्टिसुखात भर घालीत होती. पण त्यावेळी थंडीचा कडाका विशेष जाणवला होता. घरातील जमीनही इतकी गार लागत होती की अनवाणी पावलांनी घरात चालणे जिवावर येत होते. कूर्गचे लोक घरातही पादत्राणे का वापरतात याचे कारण त्यावेळी कळले होते.

या खेपेला मी ऐन उन्हाळ्यात गेलो होतो. तरीपण सभोवतालच्या झाडीमुळे उकाडा फारच सौम्य वाटत होता. मातीच्या भिंती असलेले घर चांगले थंडगार भासत होते; आणि जमिनीचा गारवाही फारसा कमी झालेला नव्हता.

## तीन चार चौरस मैलांचे गाव

बसस्टँडवरून आम्ही पायवाटेने निघालो; कारण गाडीरस्ता तेथेच संपला होता. ही पायवाट शेताच्या बांधावरून जात होती. सगळीकडे शांत, नीरव वातावरण पसरलेले होते. येणारे-जाणारे माणूस क्वचितच भेटत होते. मी डॉ. सुब्बय्याना विचारले, "तुमचं गाव बरंच दूर दिसतय. किती लांब आहे इथून?" यावर ते हसून म्हणाले, "आपण गावातूनच चाललोय." मला वाटले ते गंमत करताहेत. मी म्हणालो, "गावातून चाललोय, मग घर कुठं

आहेत ?" "ती काय ती झाडीत लपली आहेत! त्या तिकड एक घर आहे. या बाजूला एक आहे. त्या टेकडीच्या पलीकडे काही आहेत." मी सभोवती न्याहाळून पाहिले. दृष्टीच्या टप्प्यात दोन-तीन घरेच दिसत होती. कोकणातल्या वाड्या मी पाहिल्या होत्या. रस्त्याच्या कडेला एकमेकांपासून दूर-दूर असणारी केरळमधील घरेही पाहिली होती. पण कूर्गच्या खेड्यातील घराची ही रचना मला त्यापेक्षाही थोडी वेगळीच वाटली. डोंगराळ प्रदेश आणि अधूनमधून असणारी जंगले यामुळे हा वेगळेपणा निर्माण झाला असावा. कदाचित केरळच्या अंतर्भागात अशी खेडी अस्तित्वात असतीलही. पण मला त्याचा अनुभव नव्हता.

## रात्रीची भयाण शांतता

या प्रकारच्या घराच्या भयाणतेची खरी कल्पना मला रात्री आली. पहिल्या खेपेला आम्ही दिवसाउजेडीच येऊन परत गेलो होतो त्यामुळे रात्रीच्या भयाण नीरवतेची कल्पना आम्हाला आली नव्हती. सारे कसे नुसते मनोहर, सुंदर वाटले होते. आता त्या सृष्टिसौंदर्यामागे दडलेल्या, घाबरवून सोडणाऱ्या शांततेचा अनुभव आला. जसजसा अंधार वाढू लागला तसतशी एकाकीपणाची जाणीव तीव्रतेने होऊ लागली. विद्युत्-प्रकाशाची सवय असलेल्या डोळ्यांना विजेचे दिवे नसलेली रात्र तशी नेहमीच भिवविते. कारण आपल्या व इतरांच्या घरातील विद्युद्दीपामुळे एक प्रकारची सोबत होत असल्याचा आभास मिळतो. येथील घरे एकमेकांपासून इतकी दूर आणि झाडीत लपलेली आहेत की दुसऱ्या घराचे अस्तित्वही जाणवत नाही. आवाज तर सोडाच, पण प्रकाशही दिसत नाही. अशा घरांना वीज पुरविणे आज तर अशक्यच आहे; पण नजिकच्या भविष्य-काळातही ते शक्य होईल असे वाटत नाही.

रात्र जसजशी वाढू लागली तसतसा काळोखाचा दरारा वाढत चालला. काळोखाच्या सागरातील एक एकाकी बेट असे स्वरूप घराला प्राप्त झाले. रातकिड्यांचा कर्णकटू आवाज नीरवतेचा भंग करीत होता पण त्याने जिवाला आधार वाटण्याऐवजी उलट त्याचा थरकापच होत होता. आकाशाला भिडू पाहाणाऱ्या वृक्षांच्या फांद्यावर व शेंड्यावर काजवे चमकू लागले; आणि त्या चांदण्याच असल्याचा भास होऊ लागला. असा भास यापूर्वी कधी झाला

नव्हता. डॉ. सुब्बय्यानी आपल्या स्वतंत्र खोलीत माझ्या झोपण्याची सोय केली होती. अलीकडेच, म्हणजे दहा-पंधरा वर्षांपूर्वी बाधण्यात आलेली ही खोली तशी प्रशस्त होती. पण घराभोवती सापाकिरडाचा संचार कसा अव्याहत चालू असतो हे सागताना डॉ. सुब्बय्यानी जेव्हा असे सागितले की, "या खोलीत मी किमान शभर तरी साप मारले असतील", तेव्हा क्षणभर मला असा भास झाला की त्या खोलीत खरोखरीच शेकडो साप सरपटत आहेत; आणि माझ्या अगावर भीतीने काटा उभा राहिला. कूर्गच्या लोकाचा – सुशिक्षिताचाही – भुताखेतावर फार विश्वास. घराचे रक्षण करणारे पूर्वजाचे आत्मे रात्री घराभोवती फिरत असतात, त्याचा भ्रमणमार्ग ठरलेला असतो. त्या मार्गात येणारा कसलाही अडथळा त्याना सहन होत नाही, तसा अडथळा निर्माण केला गेल्यास ते तो नष्ट करून टाकतात, म्हणून घराची वाढ करताना प्रेतात्म्यांच्या मार्गाचा विचार करावा लागतो, हा मार्ग या नव्या खोलीजवळूनच जातो, यामुळे ती अशी लहान ठेवावी लागली, आणि आणखी एक खोली बाधण्याची जरूर असतानाही ती बाधता आली नाही, वगैरे गोष्टी त्यानी सागितल्यामुळे त्या खोलीभोवती अज्ञात आत्मे फिरत असल्याचा भास मला होऊ लागला. मनात एकदा विचार आला, जावयाला म्हणावे, "बाबारे, या खोलीत मला एकट्याला भीतीमुळे झोप यायची नाही. तूही तुझी खाट इथच का घालत नाहीस?" पण सकोचामुळे आणि आपल्या भित्रेपणाचे प्रदर्शन होऊ नये म्हणून मी तसे काही बोललो नाही.

## निर्भय स्त्रिया

असल्या घरांत बायका कशा राहात असतील? मी डॉ. सुब्बय्याना विचारले, "अस एकाकी राहाताना तुमच्या बायकामुलांना भीती वाटत नाही?" यावर ते हसून म्हणाले, "आम्हाला या एकाकीपणाचं बाळकडूच मिळालेलं असतं. ते आमच्या अगवळणी पडलय. त्यामुळ घरचा कर्ता पुरुष एखाद्या दिवशी परगावी गेला आणि रात्री परत आला नाही तरी एकटी बाई लहान मुलाना घेऊन निर्धास्तपणानं राहाते. माझे वडील वारले तेव्हा आम्ही चारी भावंडं अगदी लहान होतो. मी तर दोन वर्षांचाच होतो. पण आमच्या आईनं मुळीच न डगमगता आमचा सांभाळ केला. तिन त्या रात्री कशा काढल्या असतील याची

तुम्ही कल्पनाही करू शकणार नाही. पण आम्हाला एक मोठा आधार असतो. तो म्हणजे आमच्या श्रद्धेचा. आमचा कुलपुरुष आमचं सतत संरक्षण करीत असल्याची दृढ श्रद्धा आमच्यात असते. त्यामुळ आमच्या मनाला भीतीचा स्पर्श होत नाही. दुसरा आधार आमच्या बदुकीचा. प्रत्येक कोडवाच्या (कूर्ग माणसाच्या) घरी बदूक असलीच पाहिजे. शिखाना जशी कृपाण ठेवायला कायद्यानं परवानगी आहे तशी प्रत्येक कोडवाला परवाना काढल्याशिवाय बदूक बाळगता येते. (आता अलीकडे परवाना काढावा लागतो, असं म्हणतात!) शिकार आणि संरक्षण या दोन्हीसाठी ती या प्रदेशात एक अत्यावश्यक वस्तू आहे. आमच्या घरी बदूक असते हे सगळ्याना माहीत असल्यामुळ आमच्या वाटेला सहसा कुणी जात नाही. शिवाय चोर-दरोडेखोर यायचे ते केरळच्या बाजून, पश्चिमेकडून. तर पूर्वेला आमचाच प्रदेश आहे. पश्चिमेकडून यायच म्हणजे भयाण जगल पार कराव लागत किर्र काळोखात एवढा धोका पत्करून यायच आणि त्या मानानं मिळणार काय? आमच्या घरात सोनं-नाणं, पैसा-अडका क्वचितच असतो. जे काही मिळेल ते पुन: शेतीत घालायच, उरेल ते चैनीत उडवून टाकायच, ही आमची वृत्ती. त्यामुळ चोऱ्या-दरवड्याचे प्रकार इथं फारच क्वचित घडतात. शिवाय सवयीन हे वातावरण अगवळणी पडून जात. रोजचीच गोष्ट झाल्यावर भीती अशी उरतच नाही पुण्यामुंबईच्या लोकाना रस्त्यावरून भरधाव पळणाऱ्या वाहनाची भीती कधी वाटते काय? तसच हे. उग्र निसर्ग आणि हिंस्र पशू याच्या सान्निध्यात राहावं लागल्यानं आमच्या बायकाही धीट, शूर बनल्या आहेत."

अर्थात हे सारे विवेचन ऐकल्याने माझी भीती मुळीच कमी झाली नाही. शौचकूप ही संस्थाच येथे नाही. त्यामुळे रात्री जरूर भासल्यास आपले कसे होईल, याचीच चिंता मला सतावीत होती. लघुशंकेसाठी एकदा घराच्या अगणाजवळच जाऊन यावे लागले, तर विजेरीच्या झोतात सारा भाग तपासून मगच बसण्याची हिंमत झाली. अधारात मला जिकडे-तिकडे साप-विंचू व जळवाच फिरत असल्याचा भास होत होता. वस्तुत उन्हाळ्यात जळवा नसतात. पण जूनपासून डिसेंबरपर्यंत येथे जळवाचा एवढा सुळसुळाट असतो की त्या कल्पनेनेच अंगावर शहारे येतात; आणि कूर्गमध्ये गेल्यावर त्यांची आठवण विसरता विसरली जात नाही.

## गावठी टॉर्च आणि इतर गोष्टी

डॉ. सुब्बय्या गावी गेले की त्यांना भेटायला येणाऱ्याची रीघ लागते. त्याप्रमाणे एक मित्र आले होते. त्याच्या गप्पा सरता सरेनात. अंधार वाढू लागला तशी मलाच काळजी वाटू लागली की हा गृहस्थ काळोखातून घरी कसा जाणार ? अखेर तो जायला निघाला तेव्हा डॉ. सुब्बय्याच्या वहिनीने घरातून वाळलेल्या वांबूच्या चार जाडजूड जळत्या कामट्या अंगणात आणून टाकल्या. प्रथम मला त्याचा अर्थ समजला नाही. पण त्याने त्या उचलल्या आणि जरा हलवल्या. त्याबरोबर फक्कन जाळ झाला आणि त्या जाळाच्या उजेडात तो चालू लागला. असला गावठी टॉर्च बहुधा कोकणातही प्रचलित असावा. अलीकडे मात्र कोकणात कंदील जास्त आढळतात.

सकाळी प्रातर्विधीसाठी नदीकाठी गेलो. नदीचे नाव कुटियाल. डिसेंबरात ती ओढ्यासारखी झुळझुळ वाहात होती. आता ती तुंबलेल्या गटारासारखी दिसत होती. खाली काळाभोर खडक. पण काठावरील झाडाचा विशेषत मेसकाठ्याचा पालापाचोळा पडून पाणी कुजल्यासारखे वाटत होते. उडी मारून पलीकडे जाता येईल एवढीच रुंदी. बहुधा जवळच्याच डोंगरात तिचा उगम असावा. मेस-काठ्याच्या दाट बनामुळे भरपूर आडोसा होता. पण सापा-किरडाची व जळवाची भीतीही खूप वाटली. डॉ. सुब्बय्या याच्या कीकणमाडा घराण्याची जी शंभर एकर जमीन आहे तिच्यातूनच ती वाहते. परत येताना त्यांनी आपल्या घराण्याची स्मशानभूमी दाखविली. घरापासून इतक्या जवळ स्मशानभूमी पाहून आश्चर्य वाटले. आपापल्या घराण्यातील मृत व्यक्तींना आपल्या जमिनीतच पुरावयाची प्रथा असल्याने प्रत्येक कुटुंबाचे स्वतंत्र स्मशान असते.

त्याच्या घराण्याचे मूळ पुरुष कीकणमाडा मंदण्णा याची समाधी पाहिली. तिला कैमडा म्हणतात. समाधीवर एक मोठासा कोनाडा असतो. तिच्यात एक पणती असते. पुत्री ( हुत्री ) वगैरे सणाच्या दिवशी ती पणती पेटवितात; आणि तेथे नैवेद्य नेऊन ठेवतात. सध्या त्याचा कैमडा ज्या शेतात आहे ते दुसऱ्याच्या ताब्यात आहे. ते शेत घेतल्यापासून त्या इसमाला वाईट दिवस आले; म्हणून कीकणमाडा मंडळींनी ते परत विकत घ्यावे, असे त्याचे म्हणणे आहे.

स्नानगृह घरापासून थोड्या अंतरावर विहिरीच्या काठी आहे. तीन भिंती व वरती छप्पर. दार वगैरे नाही. स्नानगृहात पूर्वी एक मोठा हंडा कायमचा ठेवलेला

असे. काही दिवसापूर्वी तो चोरीला गेल्याने आता सर्वांची स्नाने झाल्यावर हंडा घरात नेऊन ठेवतात.

## शाकाहारी भगवती आणि मांसाहारी चामुंडी

स्नान करून ग्रामदेवतेच्या दर्शनाला गेलो. सुमारे एक मैल दूर अंतरावर ते देऊळ आहे देवीचे नाव भगवती. देऊळ तसे अलीकडीलच असावे—सुमारे दीडशे वर्षांपूर्वीचे दारातील सिंहाचे कोरीव काम सोडले तर देवळात कला-दृष्ट्या पाहण्यासारखे काही नाही. आवारात सुमारे पुरुषभर उंचीचा एक खडक आहे. त्याच्यासंबंधी एक दंतकथा आहे. तो खडक काढून टाकून अंगण सपाट करावे असे वाटल्यावरून पाथरवटाला आणण्यात आले. त्याने छिन्नीने एक ढलपा काढताच त्या खडकातून भळभळा रक्त वाहू लागले म्हणून मग तो तसाच राहू दिला गेला.

भगवती ही पूर्ण शाकाहारी देवी असून तिच्या मूर्ती पितळेच्या आहेत. कोडग्याचे ते दैवत असू शकत नाही. पण ग्रामदेवता या नात्याने ते तिची भक्ती करतात. दरवर्षी या देवीचा तीन दिवसाचा उत्सव असतो. त्या वेळी घरोघरी जाऊन नाचण्याचा कार्यक्रम होतो. गतवर्षी या उत्सवात खाजगी अदावतीवरून दोन खून झाले होते. म्हणून यंदा एक दिवसातच तो कार्यक्रम आटोपता घेतला. त्यामुळे देवी नाराज झाली आणि तिने ( म्हणजे भटजीने ) नाचण्याचे नाकारले. अखेर पुन पूर्वीप्रमाणे तीन दिवसांचा कार्यक्रम करण्यास कबुली द्यावी लागली. कार्यक्रम संक्षिप्त झाला तर भटजीची प्राप्ती कमी होते, हे त्यातील रहस्य. पण सामान्य जनतेच्या इच्छेपुढे मान वाकवावीच लागते. इथला भटजी मंगळूरकडला उडुपी जातीचा असतो. जितके दिवस गावकरी मंडळींशी त्याचे पटते तितके दिवस तो राहतो. नंतर त्याला हाकलून त्याच्या जागी दुसरा आणला जातो त्याच्या-साठी देवळाजवळ गावकऱ्यांनी बांधून दिलेले घर छान आहे. घराभोवतालच्या बागेत त्याने मधमाशांच्या पेट्याही ठेवल्या आहेत. गोव्यातील भटाच्या घराची आठवण ते घर व तेथील वातावरण पाहून मला झाली. आपण भिक्षुकीच्या धंद्यातच राहिलो असतो तर अशा निसर्गरम्य ठिकाणी भटजी म्हणून राहण्यात निश्चितच आनंद झाला असता, असा विचार माझ्या मनात येऊन गेला.

मंदिराच्या बाहेर एका बाजूला काही खोबणी किंवा खड्डे असलेली एक फरशी

आहे. ती चामुंडी देवी. ती फरशी पाहून मला आमच्या गावच्या (मूरगूडच्या) अंबाबाईच्या देवळासमोर असलेली तसलीच फरशी आठवली. तिच्यावर सहा-सहा खड्डे असलेल्या दोन ओळी आहेत. गुराखी मुले-मुली आणि शाळकरी पोरे खड्यांच्या साह्याने तेथे खेळत असत. ती फरशीही अशीच एखादी आदिवासी देवता असेल काय ?

या फरशीवर उत्सवामध्ये शेकडो कोंबड्या कापल्या जातात. कोंबडीचे रक्त हाच तिचा नैवेद्य.

शाकाहारी व मांसाहारी देवताचे हे सहअस्तित्व मला मोठे सूचक वाटले. कूर्गमध्ये शाकाहारी समाज अगदी अल्पसंख्य आहेत. त्याना अभय देण्यासाठीच ही युक्ती भटजींनी शोधून काढली असेल काय ?

दोन दिवस असे मजेत गेले. नतर मात्र कंटाळा येऊ लागला. डॉ. सुब्बय्याना शिकारीची भारी हौस ते मला शिकारीला न्यायला तयार होते पण जंगलातील पायपीट झेपणार नाही, म्हणून मीच ते टाळले. त्या लोकाना दहा-वीस मैलाचा फेरफटका करणे म्हणजे काहीच वाटत नाही. पण माझी चालण्याची शक्ती मर्यादित होती. त्यामुळे गावातल्याच काही मित्राकडे व नातेवाइकाकडे मला नेण्याची इच्छा असूनही ते नेऊ शकले नाहीत. शिवाय भाषेची अडचण. मला कोडगू किंवा कन्नड यापैकी कोणतीच भाषा येत नसल्यामुळे दरवेळेला सुब्बय्याची मदत घ्यावी लागे आपल्याच देशात आपण कसे परके बनतो, याचा हा अनुभव खरोखरीच क्लेशदायक होता.

* * *

# १०

# मरकारा

कूर्गबाहेरच्या लोकांच्या दृष्टीने मरकारा म्हणजेच कूर्ग असते. मरकाऱ्याला जाऊन येणारा आपण कूर्ग पाहून आलो असे समजतो. मरकारा ही पूर्वीच्या केंद्रशासित कूर्ग प्रदेशाची व नंतर छोट्या कूर्ग राज्याची राजधानी असल्याने कूर्गबाहेरील लोकांना फक्त त्याचीच माहिती असे. आता कूर्ग हा कर्नाटक राज्याचा एक लहानसा जिल्हा बनल्यानंतर त्याचे महत्त्व स्वाभाविकपणेच कमी झाले आहे. पण थंड हवेचे ठिकाण म्हणून मरकाऱ्याचे महत्त्व कायमच राहिले आहे.

**मडिकेरी = मरकारा**

मरकारा हे ब्रिटिशांनी आपल्या सोयीसाठी बनविलेले रूप आहे. या शहराचे मूळचे व स्थानिक लोकांच्या वापरात अजूनही असलेले नाव ‘ मडिकेरी ’ हे आहे. कन्नड ( व कोडगू ) लिपीत आजही ‘ मडिकेरि ’ असेच लिहिले-छापले जाते. हा शब्द कन्नड भाषेतील नसून कोडगू ( कूर्ग ) भाषेचा आहे. मडि म्हणजे पवित्र, शुद्ध, स्वच्छ. केरि म्हणजे शहर ( कन्नडमध्ये केरि या क्रियापदाचा अर्थ पुसून टाकणे, खरवडणे असा असून केरे याचा अर्थ तलाव असा आहे. पण त्यातील ‘ के ’ ऱ्हस्व आहे. मडिकेरीतील ‘ के ’ दीर्घ आहे. मडि या कन्नड शब्दाचे घडी, निरी, बागेतील वाफा, माडी, धूतवस्त्र वगैरे अनेक अर्थ आहेत. परंतु त्यांचा या संदर्भात काही उपयोग होत नाही. ) सारांश मडिकेरी या शब्दाचा अर्थ स्वच्छ शहर असा होतो. मरकारा शहर पाहिल्यानंतर हा अर्थ योग्य आहे असेच वाटते. अनेक टेकड्यांच्या उतरणीवर ते वसलेले असल्याने

आणि पाऊसही भरपूर असल्याने निसर्गनेच त्याच्या स्वच्छतेची व्यवस्था केली असावी असे वाटते. या शब्दाची आणखी एक व्युत्पत्ती सांगितली जाते. मूळ शब्द मधुकेरी म्हणजे मधाची दरी हा होता. त्यावरून मडिकेरी हा शब्द बनला, असे काही लोक समजतात. या भागातील मधाचे वैपुल्य लक्षात घेता ही व्युत्पत्ती बरोबर असावी असा भास होतो पण ती नुसतीच रोमँटिक असली पाहिजे, हे लक्षात येण्यास फारसा वेळ लागत नाही. किंबहुना इ. स. १६८१ साली मरकाऱ्याहून पाच-सहा मैलावर असलेली हालेरी ही आपली राजधानी बदलून मरकाऱ्याला स्थलांतर करणाऱ्या मुद्दू राजा या लिंगायत शासकाच्या नावाचा मडिकेरीशी संबंध जोडणे ( मुद्दू केरी → मडिकेरी ) अधिक सयुक्तिक म्हणता येईल. कूर्ग जिल्ह्याच्या गॅझेटियरने ही व्युत्पत्ती स्वीकारली आहे. मुद्दू राजा हालेरीजवळच्या जंगलात शिकारीला गेला असता त्याला एके ठिकाणी एक ससा कुत्र्याचा पाठलाग करीत असल्याचे अद्भुत दृश्य दिसले. तेव्हा त्या स्थानाचे माहात्म्य ओळखून त्याने त्या ठिकाणी आपला किल्ला बांधला आणि त्याच्या सभोवती नवीच राजधानी निर्माण केली. त्या नव्याने उभारण्यात आलेल्या शहराला मुद्दूराजाकेरी असे नामाभिधान प्राप्त झाले. पुढे त्यातील ' राजा ' लुप्त होऊन ' मुद्दूकेरी ' शब्द रूढ झाला व लोकांनी त्याचे ' मडिकेरी 'मध्ये रूपांतर केले, असे गॅझेटियरचे म्हणणे आहे ( पृ. ५०८ ). तरीपण मरकारा शहरातील स्वच्छता पाहून ' स्वच्छ शहर ' हा अर्थही सयुक्तिकच वाटतो.

### सिनेमावाल्यांची गर्दी

बिरुनाणी या आमच्या जावईबापूंच्या गावाहून दुपारी १२ ला निघालो आणि गोणिकोप्पल, विराजपेट या मार्गे सायंकाळी चार वाजता आम्ही दोघे मरकाऱ्याला पोचलो. कूर्गमधील वाहतूक व्यवस्था फार अव्यवस्थित व तापदायक आहे. तरीपण आमची गाडी जगदीश सर्व्हिसची एक्सप्रेस असल्याने सुमारे साठ मैलांचे अंतर आम्ही चार तासांत तोडले.

मरकारा हे शहर समुद्रसपाटीपासून ३९०० फूट उंच असून त्याची लोकसंख्या १९३०० असल्याची माहिती शहराच्या प्रवेशद्वाराशीच प्रवाशांच्या सोयीसाठी लिहून ठेवण्यात आली होती. अनेक लहानमोठ्या शहरांच्या वेशीवर अशी माहिती इंग्रजीत लिहून ठेवलेली आढळते. ही प्रथा मला उपयुक्त व

अनुकरणीय वाटली. या शहराचे तापमान ५५ ते ९० डिग्री फॅ. च्या दरम्यान असते. आणि वार्षिक पर्जन्यमान सरासरीने १०७ इंच असते. यावरून या शहराच्या हवामानाची कल्पना येते आणि ब्रिटिशानी आपल्या मातृभूमीशी ( वेल्सशी ) हवामानाच्या बाबतीत या प्रदेशाचे अद्भुत साम्य ओळखून अगदी सुरुवातीपासून येथे आपला तळ का ठोकला असावा याचे उत्तर मिळते ब्रिटिश गेल्यानतर आता धनिक-वणिकानी आणि स्वातंत्र्योत्तर काळातील समृद्धीचे लोणी मटकावणाऱ्या सिनेमावाल्यानी येथे गर्दी केली असल्यास आश्चर्य नाही. वस्तुत: डॉ. सुब्बय्या याचे एक जवळचे नातेवाईक श्री भीमय्या याचे मरकाऱ्यास स्वत चे घर आहे. त्याच्या घरीच उतरण्याची माझी इच्छा होती. कारण तसे केल्यास कूर्ग लोकांच्या वेगवेगळ्या थरातील कुटुबाचा जवळून परिचय करून घेण्याची संधी मिळते. तरीपण डॉ. सुब्बय्यांवर पाश्चात्य विचाराचा पगडा असल्याने शक्यतोवर नातेवाइकाचे उपकार न घेता सरळ हॉटेलात उतरण्यावर त्याचा भर असतो. ( वस्तुत श्री भीमय्यांची मुलगी डॉ. सुब्बय्याच्या घरी मैसूरला शिक्षणासाठी राहात असल्याने उपकाराचा प्रश्न नव्हता. उलट त्याना आनदच झाला असता. ) म्हणून बस स्टँडजवळच्या कावेरी या आलीशान हॉटेलात आम्ही गेलो. तेथे एकही खोली अथवा खाट शिल्लक नव्हती. कारण मुंबईचे सिनेमावाले शूटिंगसाठी आले होते. एवढेच नव्हे तर मरकाऱ्यातील सगळी हॉटेले त्यानी भरून टाकली आहेत असे समजले. डॉ. सुब्बय्या प्रवासी बगल्यात जागा मिळविण्याची खटपट करू इच्छीत होते, पण मग मीच जरा आग्रह धरला आणि श्री भीमय्या याच्या घरी आम्ही जाऊन पोचलो. मध्यमवर्गीय भारतीयाची घरे जशी असावयाची तसेच ते होते. माणसाची व सामानाची गर्दी, अस्ताव्यस्तपणा, त्यातून येणारा गलिच्छपणा वगैरे. पण मोकळी हवा व निवांत परिसर यामुळे मला ते घर हॉटेलपेक्षा हजारपटींनी बरे वाटले. घरची मालकीण दिवसभर राबत असूनही हसतमुख व पाहुण्याच्या आगमनाने आनदित होणारी होती. श्री भीमय्यानीही ग्रामीण मनमोकळेपणाने आमचे स्वागत केले.

### राजाची बैठक

स्नान वगैरे उरकून आम्ही जवळच असलेली राजाची बैठक (Raja's Seat) पाहाण्यास गेलो. एक दगडी ओटा व त्यावर चार दगडी खांबावर आधारलेली

छत्री असे तिचे अगदी साधे स्वरूप आहे. लिंगाराजा ( लिंगराजेंद्र ) ने आपल्या मनोरंजनासाठी हा मंडप बांधला होता. येथून पश्चिमेकडे एक भयंकर खोल दरी असून क्षितिजापर्यंत अनेक डोंगर व दऱ्याखोरी पसरलेली आहेत. येथून दिसणारे दृश्य अद्‌भुत आहे. भातशेताचे रंगीबेरंगी गालिचे, नद्यानाल्यांची रांगोळी, दाट जंगलाची चित्रकारी आणि मंगळूरकडे जाणाऱ्या डांबरी रस्त्याची सळसळ हे सारे पाहातच राहावेसे वाटते. सूर्यास्ताच्या वेळी या सबंध रम्य देखाव्यावर ( लँडस्केपवर ) सोन्याची पखरण होते; आणि मन अननुभूत अशा कल्पनासृष्टीत रमून जाते.

पण या दगडी मंडपाचा उपयोग राजा कोणत्या कामासाठी करीत असे त्याचे स्मरण झाले की या आनंदावर जणू विरजण पडते, काळोख पसरतो. या राजाला मानव हत्येचा खेळ फार प्रिय होता. गुन्हेगारांना समोर उभे करून स्वतःच्या हाताने त्यांची मुंडकी उडवायची आणि त्यांची धडे दरीतून खाली फेकावयाची, व ती कशी गडगडत जातात ते पाहावयाचे हा त्याचा खास षोक होता. लिंग राजाचा मुलगा चिक्कवीरराजेंद्र किंवा वीरराजा हाही बापासारखाच क्रूर होता. अशा या राजाची राजवट संपविल्याबद्दल कूर्गच्या जनतेने ब्रिटिशांना मनोमन आणि उघडपणे धन्यवाद दिले असल्यास नवल नाही.

जुन्या राजांनी शहराच्या संरक्षणासाठी खोदलेला खंदक येथे पाहावयास मिळतो. पण तो इतका अरुंद आहे की प्रत्यक्ष संरक्षणाच्या वेळी त्याचा काय उपयोग होत असेल, याविषयी शंकाच वाटते.

हा सारा भाग उंचावर असून तेथे विस्तृत पटांगण आहे. यामुळे सायंकाळी फिरायला येणाऱ्यांची येथे खूप गर्दी असते.

## स्मशानातून उद्यानाची निर्मिती

राजाच्या बैठकीला लागूनच सार्वजनिक बाग आहे. बागेतील झाडे अजून लहानच आहेत. त्यातल्या त्यात गुलाबाचा ताटवा विशेष आकर्षक वाटला. तसे हे उद्यान नवीनच आहे; कारण या जागी गोऱ्या लोकांची दफनभूमी होती. स्वातंत्र्यानंतर मरकारा नगरपालिकेने तेथे पार्क बनविण्याचे ठरविताच जगातील — म्हणजे ब्रिटन, युरोप व अमेरिका—येथील गोऱ्या साहेबांनी व त्यांच्या धर्मपीठांनी त्या योजनेला कडाडून विरोध केला. कारण तो त्यांच्या धार्मिक भावनांचा अपमान

होता. अखेर भारत सरकारने खंबीर भूमिका घेतल्याने हे उद्यान अस्तित्वात आले. (बहुधा श्री चेप्पुडिर पूणच्च — सी. एम. पुनाचा – हे त्यावेळी मध्यवर्ती सरकारात मंत्री असावेत!) सगळी थडगी उकरून काढून त्या जागी नवीन झाडे लावण्यात आली. हा इतिहास समजल्यावर माझ्या डोळ्यासमोर फुलझाडा-ऐवजी हाडांचे सापळेच तरळू लागले.

या उद्यानासमोरच कोरा-करकरीत गांधीमंडप आहे. त्याच्या खाली गांधीजींची रक्षा पुरलेली आहे. सभोवती भरपूर मोकळी जागा असल्याने शहरातील सर्व जाहीर सभा येथेच होतात, आणि गांधी मंडपाचा उपयोग व्यासपीठासारखा केला जातो.

**ओंकारेश्वर मंदिर**

मरकाऱ्यातील ओंकारेश्वराचे मंदिर दीर्घकाळ लक्षात राहाण्यासारखे आहे. मशिदीसारखे दिसणारे असे देऊळ दक्षिण भारतातच काय पण उत्तर भारतातही क्वचितच पाहावयास मिळते. गाभाऱ्यावर शिखराऐवजी एक प्रचंड घुमट आणि मंदिराच्या चार कोपऱ्यात चार मनोरे हे त्याचे बाह्य स्वरूप दुरून पाहिले असता ती मशीदच असावी असे वाटते. लिंगराजेंद्र राजा किंवा लिंगाराजा याने हे असे विचित्र देऊळ का बांधले असावे? कोणी म्हणतात, त्याच्या स्वभावातील चक्रमपणा किंवा विक्षिप्तपणा या मंदिराच्या रूपाने साकार बनला आहे; तर कोणी म्हणतात, हा लिंगायत राजा इस्लामी स्थापत्याचा भोक्ताच होता. त्यामुळे भारतीय (हिंदू) व इराणी (इस्लामी) स्थापत्याचे हे मिश्रण त्याने या देवळाच्या बांधकामात घडवून आणले.

एरव्ही मंदिर छानच आहे. एवढे भव्य व प्रचंड मंदिर कूर्गमध्ये दुसरे नाही. भव्यतेच्या बाबतीत त्याने दाक्षिणात्य मंदिराची परंपरा चालविली आहे. तेथील स्वच्छता व टापटीपही वाखाणण्यासारखी आहे. सुमारे दीडशे वर्षांपूर्वी (१८१९ साली) बांधण्यात आलेले हे मंदिर आजही कसे ताजे टवटवीत दिसते. देवळा-समोरचा तलावही देवळाला शोभेल असाच भव्य आहे. संपूर्णपणे दगडाने बांधलेला एवढा ऐसपैस चौरस व इतका खोल मंदिर-तलाव क्वचितच पाहावयास मिळतो. (या तलावात वर्षातून २।३ माणसे तरी जीव देतात असे ऐकले!) या तलावाच्या मध्यभागी एक लहानशी दगडी घुमटी किंवा 'मंटप' असून

एका दगडी पुलाने तो काठाशी जोडलेला आहे. येथुन ओंकारेश्वराच्या गाभाऱ्याचे दृश्य मोठे मोहक दिसते. त्याचे तळ्यात पडणारे प्रतिबिंबही छान दिसते.

## ब्रह्महत्येच्या पापाचे क्षालन

एवढी भव्य व शानदार वास्तू पाहिल्यानतर त्याच्या निर्मात्याविषयी आपो-आपच आपल्या मनात एक प्रकारची आदराची भावना निर्माण होते पण त्या मंदिराचा पूर्वेतिहास समजला की ती भावना आपोआप गळून जाते.

लिंगाराजाच्या सल्लागारामध्ये एक विद्वान, सालस व शुचिष्मत ब्राह्मण होता. तो लिंगाराजाला विषयासक्तीपासून दूर राहाण्याचा उपदेश करून त्याच्या पाशवी वासनाच्या परिपूर्तीत अडथळे निर्माण करी. म्हणून लिंगाराजाने त्या ब्राह्मणाला ठार मारले. पुढे तो ब्राह्मण ब्रह्मराक्षस बनून लिंगाराजाला अहोरात्र छळू लागला. तेव्हा त्याच्या आत्म्याला संतुष्ट करण्यासाठी लिंगाराजाने हे प्रचड मदिर उभारले आणि वाराणशीहून खास तयार करविलेले गोजिरे शिवलिंग आणून त्याची प्राण-प्रतिष्ठा केली. त्यानंतर त्या ब्रह्मराक्षसाचा त्रास संपला, अशी आख्यायिका आहे.

## देखणा किल्ला व राजवाडा

ज्या मुद्दूराजाने मरकारा वसविले त्याने येथे एक मजबूत किल्ला बाधला होता. तो मातीचा होता. सध्याचा दगडी किल्ला टिपूने बांधला व त्याला ‘ जाफराबाद ’ असे नाव दिले. लिंगाराजाने या किल्ल्यामध्ये १८१२-१४ मध्ये नवा राजवाडा बाधला. तो दुमजली व चौकोनी असून आजही उत्तम स्थितीत आहे. वाड्याच्या आतील भागात एक चौक असल्याने सर्व खोल्यामध्ये प्रकाश व हवा खेळत राहातात. या किल्ल्यातील वीरभद्राचे देऊळ काढून टाकून त्या जागी इंग्रजानी एक चर्च उभारले. ते आजही प्रेक्षणीय वाटते. सध्या या राजवाड्यात सरकारी कचेऱ्या आहेत.

किल्ल्याच्या आवारात सुमारे दोनअडीच पुरुष उंचीचे दोन हत्ती आहेत. ते चुनेगच्चीचे असून त्याना काळसर रग दिलेला आहे. लाबून ते खरेखुरे हत्ती असल्याचा भास होतो.

## जनरल कार्यप्पांची देणगी

येथील पुराणवस्तु-संशोधन खात्याचे संग्रहालय पाहाण्यासारखे असून त्यात

कोडव लोकांच्या जीवनाशी संबद्ध वस्तू ठेवलेल्या आहेत. काही मोठी चित्रेही आहेत. या संग्रहालयाला जनरल कार्यप्पा ( करिअप्पा ) यानी आपल्या खासगी संग्रहातील काही अद्‌भुत व दुर्मिळ वस्तू भेट म्हणून दिल्या असून त्याच्यासाठी एक खास दालन उघडण्यात आले आहे. चीन, जपान, ऑस्ट्रेलिया नेपाळ, आफ्रिका, अमेरिका वगैरे जगातील अनेक भागातून जमविलेल्या त्या वस्तू खरोखरीच प्रेक्षणीय आहेत.

* * *

# ११

# भागमंडल ऊर्फ भगंडेश्वर क्षेत्र

मरकाऱ्याहून तलकावेरीला म्हणजे कावेरीच्या उगमापाशी जावयाचे तर भाग-मडलला जावे लागते हे गाव मरकाऱ्याहून २५ मैल दूर आहे. मरकाऱ्याची समुद्रसपाटीपासून उंची ३९०० फुट आहे, तर भागमडलची उची २८७५ फूट आहे. म्हणजे हे गाव मरकाऱ्याहून एक हजार फूट खालीच आहे. शिवाय येथून समुद्र खूप जवळ म्हणजे सुमारे ३० मैलावर असल्याने तेथे जाताच कोकणा-तल्याप्रमाणे उकाडा जाणवू लागतो. गाव लहानसाच आहे. लोकवस्ती सुमारे दोन हजार असावी. तरी पण तलकावेरीच्या पायथ्याशी हे गाव वसलेले असल्याने आणि येथे एक त्रिवेणी संगम असल्याने धार्मिक क्षेत्र म्हणून या स्थानाला माहात्म्य प्राप्त झाले आहे.

## दौर्बल्याचा दुष्परिणाम

माझे जावई डॉ. के. के. सुब्रय्या याच्याबरोबर ता. १८–४–७५ रोजी मरकाऱ्याहून सकाळच्या ७–४५ च्या बसने निघून मी ९–१५ ला भागमडलला पोचलो. तेथून तलकावेरी सुमारे ५ मैल ( ८ कि मी ) डाबरी रस्त्याने पडते, पण मधल्या वाटेने हे अतर सुमारे ३ मैल पडते एरव्ही मी एका दमात ३–४ मैल अतर आजही सहज चालून जाऊ शकतो. पण डोंगर चढण्याचे सामर्थ्य आणि तेही ऐन उन्हाळ्यातील उन्हाच्या वेळी—आता उरलेले नाही. (आमच्या बरोबर मरकाऱ्याहून आलेले एक तरुण जोडपे बसमधून उतरताच भरभर डोंगर चढू लागले; आणि आम्ही पुढच्या बसची प्रतीक्षा करीत असताना ते तल-कावेरीहून परतही आले!) या शारीरिक दौर्बल्याचा दुष्परिणाम म्हणून जो

कार्यक्रम अर्ध्या दिवसात आटोपला असता त्यासाठी सबंध दिवस घालवावा लागला. उन्हाचा त्रास व प्रतीक्षेची दगदग सोसावी लागली ती वेगळीच. येथे जीपही भाड्याने मिळते. पण एक-दोन व्यक्तींना ती परवडत नाही. जीपवाला पचवीस रुपये मागत होता ते आम्हाला परवडणारे नसल्याने आम्ही १२-४५ ला येथून तलकावेरीला जाणाऱ्या 'श्रीतलकावेरी' या देवस्थानच्या बसची वाट पाहावयाचा निर्णय घेतला. म्हणजे आम्हाला साडेतीन तास घालवावयाचे होते. एका दृष्टीने हे बरेच झाले असे म्हटले पाहिजे. कारण त्यामुळे आम्हाला भाग-मंडल निवांतपणे पाहता आले

## मधुबनातील फेरफटका

बिरुनाणीप्रमाणेच भागमंडलच्या आसपासचा प्रदेशही मधमाशापालनासाठी प्रख्यात आहे. येथे एक मोठे मधुबनच आहे असे म्हणण्यास हरकत नाही. जागजागी मधमाशाच्या लाकडी पेट्या पाहावयास मिळतात. मधउत्पादकाकडून त्याचा मध विकत घेणे, त्यावर प्रक्रिया करणे व तो लहान-मोठ्या बाटल्यात भरून देशात व परदेशात रवाना करणे हे काम येथे मोठ्या प्रमाणावर चालते. ते सहकारी पद्धतीने चालते. त्याची माहिती मिळविण्यासाठी आम्ही मध सह-कारी संस्थेत गेलो. खेड्यापाड्यातून दूध गोळा करणाऱ्या संकलन-केंद्रात आस-पासच्या भागातील शेतकरी आपापले दूध कासड्या, चरव्या, बरण्या यातून घेऊन येत असतात त्याप्रमाणे येथे आपल्या घराभोवताली किंवा बागायती शेतात ठेवलेल्या पेट्यातील मध लहानमोठ्या कासड्यातून विकण्यासाठी आणणारे शेतकरी येथे पाहावयास मिळाले. या मध उत्पादकाना दर किलो ग्रामला ७ रुपये असा दर मिळतो. हाच मध शहरातील ग्राहकाना १५ ते २५ रुपये किलो या दराने विकला जातो.

येथून जवळच एक मधुमक्षिका पालन प्रशिक्षण केंद्र आहे. तेथे वर्षातून २ वर्ग चालतात. दक्षिण भारतातील हे एकमेव प्रशिक्षण केंद्र होय. उत्तर भारता-साठी असणारे प्रशिक्षण केंद्र पुण्यास आहे. या केंद्रातील वस्तुसंग्रहालय छोटेसेच पण उपयुक्त आहे. मधमाशापालनाशी संबंधित अवजारे उपकरणे, चित्रे, नकाशे, तक्ते इत्यादींचा सुव्यवस्थित संग्रह येथे पाहावयास मिळतो.

## त्रिवेणी संगम

या ठिकाणी कावेरी नदी दक्षिणेकडून येते व कनिके (कनक अथवा कण्णक) नदी पश्चिमेकडून येऊन कावेरीला मिळते. या संगमानतर कावेरी पूर्वेकडे वाहू लागते ज्याप्रमाणे प्रयागच्या त्रिवेणीसगमामध्ये गगा व यमुना या दृश्य नद्याना सरस्वती ही अदृश्य किंवा काल्पनिक नदी येऊन मिळते असे गृहीत धरण्यात आले आहे त्याप्रमाणे येथे कावेरी व कनिके याना सुज्योती नावाची एक अदृश्य नदी (सुज्योती हे बहुधा सरस्वतीचेच परिवर्तित रूप असावे.) येऊन मिळते, असा भाविक लोकाचा समज आहे.

दोन्ही नद्या या ठिकाणी खळखळा वाहणाऱ्या लहानशा ओढ्यासारख्या दिसतात. पाणी स्वच्छ, निर्मळ आहे. सर्वांत जास्त म्हणजे गुडघाभर खोल पाणी संगमाच्या जागी होते. त्या ठिकाणी पाणी गरम लागते अशी समजूत आहे. पण प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन पाहिल्यावर मला मात्र ते पात्रातील इतर पाण्यासारखे गारच लागले.

सगमावर सिमेंटचा छान घाट आहे. तेथे पादत्राणे काढून जावे लागते. स्वच्छतेच्या दृष्टीने हा नियम मला स्वागतार्ह वाटला. पण घाटावर साबण लावून कपडे धुणारी मडळी पाहिल्यावर वरील नियम स्वच्छतेसाठी नसून सोवळेपणा टिकविण्यासाठी असला पाहिजे, हे लक्षात आले.

## भगंडेश्वराचे टुमदार मंदिर

ज्या भगड ऋषींच्या नावावरून या गावाला भगडमडल, भगडेश्वर क्षेत्र, भागमडल किंवा भागमडलक्षेत्र अशा विविध सज्ञा मिळाल्या त्या ऋषींनी स्थापन केलेले भगंडेश्वर मदिर सगमाच्या वरच्या बाजूलाच आहे. या मंदिराच्या आवारात महादेव, सुब्रह्मण्यस्वामी (कार्तिकेय) व विष्णू याची तीन मदिरे आहेत. सगळीच मंदिरे अगदी बुटकी आहेत. त्यातही पुन महादेवापेक्षा सुब्रह्मण्य-स्वामीचे व सुब्रह्मण्यस्वामीपेक्षा विष्णूचे देऊळ लहान आहे. मरकाऱ्याचे प्रचंड ओंकारेश्वर मदिर पाहून आल्यावर हे भगडेश्वराचे चिमुकले मंदिर पाहाताना हत्तीशेजारी लहानसे कोकरू उभे असावे, असा भास होतो. इतकी बुटकी मदिरे दक्षिणेत बहुधा फारशी नसावीत. गाभारे तसे प्रशस्त आहेत. पण मंदिराचे दरवाजे इतके लहान आहेत की कमरेत पूर्ण नव्वद अशाचा कोन केल्याखेरीज

आत प्रवेशच करता येत नाही. अर्थात पुजाऱ्याखेरीज आत कोणाला प्रवेश नसावा; यामुळे मूर्तीचे दर्शन दीपज्योतींच्या साह्याने किंवा आरशाचा कवडसा पाडूनच घ्यावे लागते.

यातील शंकराचे देऊळ प्रमुख असून त्यातील शिवलिंग तुकतुकीत आहे. त्याच्या सभोवती सोन्याचांदीच्या पत्र्याची मखरासारखी आरास आहे शिवाय सोन्याची उत्सवमूर्ती असून मंदिराच्या आवारात रोज दुपारी व रात्री या मूर्तीची वाजंत्र्यासह मिरवणूकही काढली जाते. यावेळी एक ब्राह्मण मूर्तीला डोकीवर घेऊन प्रदक्षिणा घालतो.

हे भगंडेश्वराचे मंदिर दहाव्या किंवा अकराव्या शतकातील असावे, असे समजले जाते त्यामुळे ऐतिहासिकदृष्ट्या ते खूप महत्त्वाचे आहे. त्याचे आवार चांगले प्रशस्त असून सभोवती चांगली ओवरी आहे. मात्र मंदिराचे व ओवरीचे छप्पर इतके खाली आहे की त्याच्याजवळून जाताना नतमस्तक न झाल्यास कपाळमोक्षच होण्याची भीती असते. येथील सगळी छपरे ताब्याच्या पत्र्यांनी मढविलेली आहेत. यातील दोन देवळावर वळचणीच्या त्रिकोणात देवदेवतांची मजेदार चित्रे कोरलेली व बसविलेली आहेत. ती बहुधा चुन्यात कोरलेली व चुन्याचीच असावीत. त्यांच्यातील ओबडधोबडपणा व कलेचा अभाव यांवरून ती अलीकडील काळातील असावीत हे सहज लक्षात येते. एकूण देवळाच्या पुरातन स्थापत्याशी त्याचा मेळ बसत नाही.

## टिपूचे अफझलाबाद

धर्मांध टिपू सुलतानाने कूर्गवर ताबा मिळवून स्वतःला ' कूर्गचा बादशहा ' हा किताब घेतला होता. त्याच्या तावडीतून भागमंडल कसे सुटणार? त्याने १७८५ साली हे गाव जिंकून घेतले आणि त्याचे नाव अफझलाबाद असे ठेवले त्याने भगंडेश्वराचे देऊळ उध्वस्त केले नाही. मात्र त्याने या देवळासभोवतालच्या भागाचे एका किल्ल्यात रूपांतर केले आणि तेथे थोडेबहुत सैन्यही ठेवले. परंतु १७९० साली दोड्डा वीरराजेंद्र या कूर्गराजाने या किल्ल्याला पाच दिवस वेढा घालून तो सर केला. यावेळी किल्ल्यावर तोफा डागावयाच्या म्हणजे मंदिराला धक्का लावण्याचा धोका होता. तो धोका पत्करण्यास कोणी तयार नव्हते. म्हणून खुद्द दोड्डा वीरराजेंद्राने पहिली तोफ स्वत डागली. त्या तोफेच्या

गोळ्याने मंदिराच्या छपरावरील ताब्याची तीन कौले फुटली; म्हणून दोड्ड वीरराजेंद्राने त्याच्या जागी चांदीची चार कौले बसविली.

एवढ्या मोठ्या आवारासाठी ताब्याचा पत्रा मातीच्या कौलांऐवजी वापरला जावा, यात आधुनिकाना उधळपट्टी दिसेल. पण नवश्रीमंताची व सत्ताधाऱ्याची उधळपट्टी ज्यानी पाहिली आहे त्याना हा अपव्यय अगदीच नगण्य वाटेल यात शका नाही।

## सुज्योतीची जन्मकथा

सुज्योतीची जन्मकथा ' मूल कावेरि पाट ' या कोडगू भाषेतील लोकगीतात विस्ताराने वर्णिलेली आहे. श्री वी. डी. गणपती यांच्या ' कोडवाज ( कूर्ग्स ) देअर कस्टम्स अँड कल्चर ' या पुस्तकातून पुढील सारांश उद्धृत केला आहे.

सुयोजन नावाच्या ब्राह्मणाने वात्रीपूर या ठिकाणी तपश्चर्या करून विष्णूला प्रसन्न करून घेतले. विष्णूने जेव्हा त्याला वर मागण्यास सागितले तेव्हा सुयोजन म्हणाला, " मृत्यूनंतर मला मुक्ती मिळावी आणि जिवंत असेपर्यंत जगाची सेवा माझ्या हातून घडावी. " यावर विष्णूने त्याला सुज्योती नावाची एक देखणी मुलगी दिली आणि सागितले, " कालातराने ही मुलगी नदीच्या रूपाने वाहू लागेल, आणि जगावर उपकार करील. तू तिचा पिता असल्याने तिच्याकडून घडणाऱ्या या पुण्याच्या बळावर तुला मोक्ष प्राप्त होईल. मात्र तू हिला अग्नि-पर्वतावरील देवेंद्राची उपासिका कनिके हिच्याजवळ ठेव." त्याप्रमाणे सुयोजनाने तिला कनिकेजवळ ठेवून दिले, आणि आपला काळ तो ईशचिंतनात व लोकसेवेत घालवू लागला.

एकदा देवेंद्र कनिकेकडे आला असता त्याची नजर सुज्योतीवर पडली; आणि तिच्या रूपाला भाळून त्याने तिला लग्नाची मागणी घातली. सुज्योतीला लग्नच करावयाचे नव्हते. तरीपण इंद्राला विरोध करण्याची हिंमत न झाल्याने आपण लग्नाला तयार असल्याचे तिने वरवर कबूल केले. नतर तिने कनिकेला सारी हकीगत सागितली, आणि म्हटले, " मानवजातीच्या कल्याणासाठी नदी बनून वाहण्याची माझी इच्छा आहे." कनिकेलाही तिची कल्पना आवडली आणि त्या दोघी नद्यांच्या रूपाने वाहू लागल्या. देवेंद्राला सुज्योतीने केलेल्या प्रतारणेचा भयकर राग आला आणि त्याने तिला शाप दिला की, " तुझं सारं पाणी आटून

जाईल." यावर तिने देवेंद्राची दया भाकली. देवेंद्रालाही करुणा आली आणि त्याने असा उ:शाप दिला की, "तुझं पाणी जरी लोकांना दिसलं नाही तरी तू गुप्तरूपानं वाहात राहशील; आणि कनिके व कावेरी यांच्या संगमात मिसळून समुद्राला जाऊन मिळशील."

अशी ही सुज्योतीची कथा. स्त्रीला विवाहाखेरीज गत्यंतर नाही, या समजुतीला पुष्टी देणारी. स्त्रीला पुरुषाप्रमाणेच अविवाहित राहून लोकसेवा करण्याचा अधिकार आहे, असे मानणाऱ्या तेजस्विनी महिला प्राचीन काळीही अस्तित्वात होत्या, हे देखील या कथेतूनच निष्पन्न होते; आणि पुरुषाने स्त्रीची कशी सतत कोंडी केली आहे त्याचेही यातून दर्शन घडते.

* * *

# १२

# जय कावेरी !

उत्तर प्रदेश-विहारला जशी गंगा, मध्यप्रदेश-गुजरातला नर्मदा, महाराष्ट्र-आंध्रला जशी कृष्णा तशी कर्नाटक-तामिळनाडूला कावेरी ! शेतीला पाणी पुरवून आणि विद्युत् निर्मिती करून कावेरीने या दोन राज्यांना खूपच दिलासा दिला आहे. अशा या लोकमातेचा उगम पवित्रतम क्षेत्रात गणला जात असेल तर ते स्वाभाविकच म्हटले पाहिजे. ज्या कूर्गमध्ये कावेरीचा उगम होतो तेथे तर ती घरोघरी कुलदेवतेसारखी पवित्र व पूजनीय समजली जातेच, पण केरळ, कर्नाटक व तामिळनाडू या राज्यातही कावेरीचे भक्त खूप मोठ्या प्रमाणा-वर पसरलेले आहेत. तेव्हा या जीवनदायिनी नदीचा उगम पाहाणे हा कूर्ग-दर्शनातील एक महत्त्वाचा कार्यक्रम आपोआपच ठरतो. या उगमस्थानाला तल-कावेरी असे म्हणतात. तळकावेरीला जाण्यासाठी मरकाऱ्याहून २५ मैलावर असलेल्या भागमंडल या गावी आम्ही आलो आणि तलकावेरीला जाणाऱ्या गाडीची प्रतीक्षा करू लागलो.

## पाच मैलांना सव्वा रुपया

तलकावेरीला जाणारी बस मरकाऱ्याहून सकाळी अकरा वाजताच भागमंडलला पोचली होती. परंतु ती तेथे दोन तास विश्रांती घेऊन मगच पुढे जाणार होती. बहुधा मरकाऱ्याहून आलेल्या लोकांना भागमंडल पाहाण्यास संधी मिळावी हाच यातील उद्देश असावा. आम्ही सकाळच्या पहिल्या गाडीनेच भागमंडलला पोचलो होतो, आणि अकरा वाजेपर्यंत आमचे भागमंडल पाहून झाले होते. त्यामुळे आम्हांला दोन तास सक्तीची विश्रांती घ्यावी लागली. जेवणाची चांगली

सोय नसल्याने आम्ही अननस खाऊनच दुपारची वेळ भागविली. इतके गोड अननस मी तर कधी खाल्लेच नव्हते, पण माझे जावई डॉ. सुब्बय्या यांनीही आपण इतके मधुर अननस पूर्वी कधी चाखले नसल्याचे सांगितले. मग एका अननसाच्या फोडी करून घेतल्या आणि तलकावेरीला गेल्यावर त्या खाल्ल्या.

या मार्गावर आम्ही गेलो त्यावेळी श्रीतलकावेरी ही देवस्थानाची एकच बस चालू होती. ती एकदाच वर जाते आणि परत येते. उत्सवाचे दिवस नसल्याने त्या एका खेपेतही उतारू फार कमी असतात. बहुधा यामुळे भागमंडल ते तलकावेरी या पाच मैल अंतराला रु. १ = २० असे जबरदस्त भाडे आकारले जात असावे. सर्वसामान्य भाड्याच्या हे सुमारे तिप्पट आहे.

### भीमाची शिळा

भारतातील बहुतेक सर्वच ऐतिहासिक व धार्मिक महत्त्वाच्या ठिकाणी श्रीराम व पांडव त्यांच्या वनवासाच्या काळात गेलेले असतात. अगदी पार पूर्वोत्तर सीमेवरील अरुणाचलापासून दक्षिण-पश्चिमेच्या केरळपर्यंत ! तेव्हा कावेरी मातेच्या दर्शनाला पांडव आले नसतील असे कसे घडणार ? त्यांच्या येथील आगमनाची व वास्तव्याची आठवण किंवा खूण म्हणून तलकावेरीच्या मार्गावर एक प्रचंड शिळा दाखविली जाते. तिला भीमकल्लू ( भीमाचा दगड ) असे म्हणतात. भीम जेवत असताना त्याच्या भातात एक बारीकसा खडा आला. तो त्याने तोंडातून काढून बाहेर फेकून दिला. तो बारीक खडा म्हणजेच ही प्रचंड शिळा होय. जत्रेच्या वेळी साधू-बैरागी या शिळेखाली मुक्काम करतात. पायी डोंगर चढणाऱ्यानाही येथे विश्रांतीची चांगली सोय आहे.

### सलाम कल्लू

उगमापासून अलीकडे ३ फर्लांग अंतरावर आणखी एक शिळा आहे. येथून कावेरीच्या उगमस्थानाचे प्रथम दर्शन घडते. म्हणून जाताना-येताना या ठिकाणी क्षणभर थांबून भक्तमंडळी कावेरी मातेला प्रणाम करतात. त्यावरून त्या दगडाला सलाम कल्लू असे नाव प्राप्त झाले आहे. याच्या मुळाशीही एक दंतकथा आहे. टिपू सुलतानाने भागमंडल जिंकून घेतल्यावर तलकावेरीवर स्वारी करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे तो आपल्या सैन्यासह या ठिकाणापर्यंत येऊन पोचला असता कावेरी मातेने आपल्या तप.सामर्थ्याने सैन्य निर्माण करून टिपूच्या सैन्याचा पाडाव केला.

तेव्हा टिपूने तेथूनच कावेरीला सलाम केला आणि तो माघारी वळला. तेव्हा-पासून त्या शिळेला सलाम कल्लू हे नाव मिळाले. ( गॅझेटियर ऑफ इंडिया, मैसूर स्टेट, कूर्ग डिस्ट्रिक्ट, १९६५, पृ. ५२५–५२६)

**सृष्टिदर्शन स्थान**

या मार्गावर समुद्रसपाटीपासून ३७०० फुटावर एक मोक्याचे ठिकाण आहे. येथून सभोवतालच्या परिसराचे दृश्य अत्यंत आकर्षक दिसते. त्या ठिकाणी मैसूर सरकारतर्फे 'View Point' अशी पाटी लावण्यात आली आहे. टेकड्या दऱ्या, जंगलाचे पुजके क्षितिजापर्यंत पसरलेले पाहून मन अत्यंत प्रसन्न होते. अशी मोक्याची ठिकाणे शोधून काढून प्रवाशाच्या माहितीसाठी तेथे पाट्या लावण्याची दाक्षिणात्य सरकारची ही पद्धत निश्चितच अनुकरणीय आहे. रस्त्या-वर इतर अवजड वाहनाची रहदारी नसल्याने तो चांगल्या स्थितीत राहिलेला आहे. बस थेट उगमाजवळ जाऊन उभी राहते. त्या ठिकाणी लहानसे पटांगण तयार करण्यात आले आहे. मात्र बस गिरकी घेऊन वळू शकेल एवढे मोठे ते नाही.

**कावेरीची जन्मकथा**

प्रळयात अमृतमथनानंतर त्या अमृताचा कलश चलाखीने देवाना नेऊन देणारी मोहिनी ( म्हणजे खुद्द विष्णू ) आपले कर्तव्य पार पाडून कूर्गमधील ब्रह्मगिरी टेकडीवर गेली आणि तेथे एका गुहेच्या रूपाने राहू लागली. तेव्हा लक्ष्मीने पतीच्या शोधासाठी पार्वतीचेच एक रूप असलेल्या लोपामुद्रा नावाच्या मुलीला भूलोकी पाठविले. तीही ब्रह्मगिरीवर निवास करू लागली. तिच्यावर प्रसन्न होऊन ब्रह्माने तिला आपली मुलगी मानले. कालांतराने कवेर नावाचा एक ऋषी आपल्या पत्नीसह येऊन तेथे राहिला व अपत्यप्राप्तीसाठी तपश्चर्या करू लागला. ब्रह्माने त्याला सांगितले की, "तुझ्या पूर्वजन्मीच्या पापामुळे तुला या जन्मी मूल होणे शक्य नाही. तरीपण तुझ्या तपस्येवर प्रसन्न होऊन मी तुला माझी मानलेली मुलगी लोपामुद्रा देऊन टाकतो." अशा प्रकारे कवेर ऋषीची कन्या बनल्यावर लोपामुद्रेचे नाव बदलून कावेरी असे करण्यात आले. आपल्या नव्या पित्याची सर्व पापे नष्ट होऊन त्याला मोक्षप्राप्ती व्हावी आणि कालांतराने लोकसेवेसाठी जेव्हा आपण नदीचे रूप घेऊ तेव्हा त्या नदीत स्नान करणाऱ्याची

सर्व पापे धुतली जावीत, असा वर कावेरीने ब्रह्मदेवाकडून मागून घेतला. दरम्यानच्या काळात ती शुक्ल पक्षातल्या चंद्राप्रमाणे कलेकलेने विकसित होऊ लागली.

एकदा अगस्ती ऋषी कवेर ऋषींच्या आश्रमात आला असता कावेरीचे रूप पाहून तिच्यावर लुब्ध झाला, आणि त्याने तिला लग्नाची मागणी घातली. कावेरीला वस्तुत लग्न करण्याची इच्छा नव्हती. तिला नदी बनून वाहात राहावयाचे होते. तरीपण अगस्तीचा आग्रह तिच्याने मोडवेना. तेव्हा तिने एका अटीवर त्याच्याशी लग्न करण्याचे कबूल केले. ती म्हणाली, " तुम्ही माझ्याशी एकनिष्ठ राहिलं पाहिजे. तुम्ही मला सोडून कुठंही दूर जाता कामा नये." अगस्तीने ती अट मान्य करून कावेरीशी लग्न केले.

पुढे एके दिवशी अगस्ती जवळच असलेल्या कनिके नदीवर स्नानास गेला. (या कनिके नदीचा उगम येथून थोड्या अतरावर आहे) जाताना त्याने कावेरीला आपल्या कमंडलूत बद करून ठेवले आणि आपल्या शिष्याना तिच्यावर पहारा देण्यास सागितले. स्नानानंदात मग्न झाल्याने अगस्त्याला वेळेचे भान राहिले नाही. इकडे बराच वेळ झाल्याने कावेरीला पतीच्या निष्ठेबद्दल सशय वाटू लागला; आणि तिने रागारागाने कमडलूतून बाहेर उडी मारून नदीच्या रूपाने वाहण्यास सुरुवात केली अगस्त्याच्या शिष्यानी तिला अडविण्याचा प्रयत्न करताच ती गुप्त झाली. ( उगमानंतर थोडेसे अतर ती गुप्तगामिनी या नावाने ओळखली जाते. )

अगस्त्याच्या शिष्यानी धावत जाऊन आपल्या गुरूला बोलावून आणले. कावेरीचा तो प्रताप पाहाताच अगस्त्याला आपली चूक कळून आली, आणि त्याने पश्चात्तापदग्ध अत करणाने तिची क्षमा मागितली. तो तिच्या प्रवाहाबरोबर शोक करीत चालत राहिला. अखेर कावेरीला त्याची दया आली आणि तिने आपले नदीरूप कायम ठेवून पुन· पूर्वीचे रूपही धारण केले आणि ती अगस्ती-जवळ राहू लागली. ( काही दतकथाप्रमाणे तिने आपले अर्धे अग नदीच्या रूपाने वाहत ठेवले व दुसरे अर्धांग अगस्ती ऋषीजवळ राहू लागले ! )

### ब्राह्मणाची कबक्ती

ही सगळी घटना घडत असता अगस्त्याच्या ब्राह्मण शिष्यानी त्याच्या बेपर्वाई-

बद्दल त्याला दोष देण्याचा सपाटा लावला. कावेरीच्या रूपपरिवर्तनाने आधीच वैतागलेला अगस्ती त्या ब्राह्मणाच्या दोषारोपाने जास्तच भडकला; आणि त्याने त्याना असा शाप दिला की, यापुढे इथले लोक तुम्हाला जवळ करणार नाहीत, आणि तुम्ही सदा दारिद्र्यातच राहाल." (कूर्गमध्ये ब्राह्मणाना तुच्छ लेखले जाते; आणि त्याची आर्थिक स्थिती बहुधा हलाखीची असते. या वस्तुस्थितीला आधार देण्यासाठीच बहुधा ही कथा रचण्यात आली असावी !) यावर ते ब्राह्मण शिष्य कावेरीला शरण गेले. तेव्हा कावेरीने त्याचे मोठ्या खुबीदार शब्दांत सात्वन केले. ती म्हणाली, "हा शाप काही मला बदलता येणार नाही; पण तुम्ही एकनिष्ठपणानं माझी भक्ती करीत राहिलात तर तुमचं दारिद्र्य तुम्हाला तापदायक ठरणार नाही. त्यातही तुम्ही आनदी राहाल !" बिचारे ब्राह्मण !

### तीर्थोद्भवाची कहाणी

आपल्या उगमापासून निघून ४७५ मैलाचा प्रवास करीत बगालच्या उपसागराला मिळण्यासाठी कावेरी जेव्हा वाहू लागली तेव्हा तिच्या कोडव भक्ताला अशी भीती वाटली की ही आपली रक्षणकर्ती देवता आपल्याला कायमची सोडून जाणार ! म्हणून त्यानी तिला तेथून न जाण्याची विनती केली. पण तृषार्त भूमी व जनता याच्या सेवेचे कंकण बाधलेल्या कावेरीला ती विनंती कशी मान्य करता येणार ? म्हणून तिने आपल्या भक्ताता असे आश्वासन दिले की, "मी जरी आज येथून जात असले तरी कायमची जात नाही. दर वर्षी तुला सक्रमणाच्या क्षणी-म्हणजे सूर्य ज्यावेळी तूळ राशीत प्रवेश करतो त्यावेळी मी येथे पुन: प्रकट होत जाईन." त्याप्रमाणे तुला संक्रमणाच्या वेळी (ऑक्टो-बर मध्ये) विशिष्ट क्षणी कावेरी प्रकट होते. या तिच्या प्रकटीभवनाला तीर्थोद्भव असे म्हणतात.

या तीर्थोद्भवाची आणखी एक कहाणी आहे. एकदा अगस्ती ऋषी आपल्या कमंडलूत कावेरीचे पाणी घेऊन सध्या करीत बसला असता एका कावळ्याने त्या कमडलूवर बसून तो लवंडून टाकला. अगस्ती रागाने लाल झाला आणि तो त्या कावळ्याला व साऱ्या चराचराला शापाने भस्म करणार इतक्यात तेथे ब्रह्मा प्रकट झाला आणि त्याने त्याला त्याच्या रागाचे कारण विचारले. अगस्त्याने क्रोधाचे कारण सागितले. तेव्हा काय केले असता त्याचा क्रोध शात होईल ते ब्रह्माने

विचारले यावर तो म्हणाला, "ज्या जागी माझा कमंडलू लवंडला आहे, त्याच जागी दरसाल नियमाने कावेरीचं आगमन व्हावं, आणि हे स्थान तीर्थक्षेत्र बनावं." ब्रह्याने ती विनती ताबडतोब मान्य केली. एवढेच नव्हे तर, "तुला संक्रमणाच्या वेळी तीर्थोद्‌भव होत असताना गंगेसह देशातील सारी पवित्र तीर्थं येथील कुंडात एकत्रित होतील," असाही वर दिला.

## भूगर्भशास्त्रीय चमत्कार

तलकावेरी या कावेरीच्या प्रत्यक्ष उगमस्थानी जमिनीलगत एक लहानसे कुंड आहे. त्या कुंडात एक झरा आहे. तोच कावेरीचा मूलस्रोत. या कुंडाला जोडूनच एक मोठे कुंड किंवा लहान तळे आहे. त्यात दुसरा एक झरा आहे असे म्हणतात. त्याला पायऱ्या आहेत. लहान कुंडातले पाणीही या मोठ्या कुंडात जमा होते आणि तेथुन ते झिरपून थोड्या अंतरावर थेंब-थेंब पडते. तेथून कावेरीचा प्रवाह सुरू होतो. लहान कुंडातील पाणी तीर्थ म्हणून ब्राह्मणाकडून घेतले जाते व त्याबद्दल त्याला यथाशक्ती दक्षिणा दिली जाते. मोठ्या कुंडात स्नान केले जाते. तुळा संक्रातीच्या वेळी ( १७ किंवा १८ ऑक्टोबरला ) लहान कुंडात प्रथम बुडबुडे उठतात आणि थोड्याच वेळाने पाणी उसळी मारून वर येऊ लागते. हे पाणी तसेच मोठ्या कुंडात पडणे अशुभ समजले जाते. म्हणून अनेक भटजी घागरींनी ते पाणी उपसून मोठ्या कुंडात टाकतात. त्या तीर्थाचा शरीराला स्पर्श झाल्यास सारी पापे धुतली जातात व मोक्षप्राप्ती होते अशी भाविकाची समजूत आहे. त्यामुळे हजारो लोक त्या क्षणी स्नानासाठी मोठ्या कुंडात उतरतात. कितीही माणसे कुंडात उतरली तरी तेथे गर्दी होत नाही किंवा कुंड भरून जात नाही. थोडी जागा शिल्लक उरतेच असे लोक सांगतात. स्नान करून लोक येथील तीर्थ घरोघरी घेऊन जातात. सूर्य वृश्चिक राशीत प्रवेश करीपर्यंत एक महिनाभर हा तुलासंक्रमणाचा उत्सव चालतो.

वर्षातील विशिष्ट दिवशी व विशिष्ट क्षणी हा जल-प्रवाह कसा उसळतो ? याच्या मागे ब्राह्मणाची काही लबाडी असेल म्हणून—एखाद्या नळीतून ते पाणी ओतीत असतील या कल्पनेने—डोंगराच्या सभोवती पाळतही ठेवण्यात आली. पण तसे काही आक्षेपार्ह आढळले नाही. यावरून राजापुरी गंगेसारखा किंवा

जपानमधील बेप्पू या गावी दर सतरा मिनटांनी उडणाऱ्या व तीन मिनिटे उडत राहाणाऱ्या तात्सुमाकी या गरम पाण्याच्या कारंज्यासारखा तो एक नैसर्गिक अथवा भूगर्भशास्त्रीय चमत्कार असावा, असे वाटते.

**देवाचा कोप की योगायोग ?**

तलकावेरीच्या लहान कुंडावर मोठ्या कोनाड्याच्या आकाराचे एक इवलेसे देऊळ आहे. त्यात दगडी खांबासारख्या वीतभर उंच बैठकीवर एक दिवा ( पणती ) सतत तेवत असतो. दिव्याला या ठिकाणी जे महत्त्व प्राप्त झाले आहे तो कोडव लोकांच्या संस्कृतीचा प्रभाव असावा, असे वाटते. तसे नसते तर येथे एखादी मूर्ती किंवा शिवलिंग दिसले असते.

हे देऊळ जीर्ण झाले होते म्हणून एके काळी इंटरनॅशनल लेबर ऑर्गनाय-झेशन ( आंतरराष्ट्रीय मजूर संघटना I L O ) चे विशेषज्ञ सल्लागार असलेले आणि पुण्याच्या वैकुंठलाल सहकार संशोधन संस्थेचे काही काळ संचालक म्हणून काम केलेले श्री पी. एम. चेंगप्पा यांनी लोकांचा विरोध न जुमानता एका रात्रीत त्याच्या जागी १९७२ साली नवे सिमेंटचे देऊळ बांधले. लोकांनी त्याबद्दल विरोधाचे खूप काहूर माजविले. श्री सी. पी. कुशालप्पा नावाच्या एका धनिकांनी संगमाच्या वरच्या बाजूस सिमेंट कॉंक्रीटचा एक भव्य मंडप उभारला आहे. श्री चेंगप्पांचे ते समर्थक होते. एके दिवशी एका जाहीर सभेत ते म्हणाले, " देवासाठी जुन्या इमारतीच्या जागी नवी इमारत बांधणे हे देशाचेच काम आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्याऐवजी तुम्ही त्यांचा निषेध का करता ?"

आता याचा परिणाम काय झाला पाहा !

या सभेनंतर दुसऱ्याच दिवशी श्री कुशालप्पा यांचा धाकटा मुलगा जीप अपघातात ठार झाला, आणि देऊळ बांधल्यानंतर दोन वर्षांच्या आतच श्री चेंगप्पाही निधन पावले. या योगायोगाचा कूर्गच्या लोकांनी देवाच्या कोपाशी संबंध जोडून लोकभ्रम पसरण्यास मदत केली.

असाच आणखी एक योगायोग !

या कुंडाच्या वरच्या बाजूस एक अश्वत्थ वृक्ष होता. तो पुरुषभर उंचीचा वृक्ष किमान एक हजार वर्षांचा तरी जुना होता. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या

लोकांनी येथील दुरुस्तीच्या वेळी त्या वृक्षाची मुळे दुखावली. तो वृक्ष मरून गेला. लोकमत खवळले. तेव्हा सरकारने असे जाहीर केले की वृक्ष मेला नसून जिवंतच आहे, आणि लोकाना फसविण्यासाठी त्या जागी दुसरे पिंपळाचे झाड लावले. सदर झाड लावून परत जात असता तो अधिकारी जीपच्या अपघातात मरण पावला.

अशा प्रकारच्या योगायोगावर कूर्गमधील सुशिक्षित लोकही विश्वास ठेवतात, हे पाहून आश्चर्य वाटते.

### अगस्त्येश्वर व गणपती

उगमाच्या वरच्या बाजूस शंकराचे एक व गणपतीचे एक अशी दोन छोटी देवळे आहेत. अगस्त्याने येथे तपस्या केली होती. त्याची आठवण म्हणून शंकराच्या देवळाला अगस्त्येश्वर मंदिर असे म्हणतात. येथील शिवलिंग गोजिरे असून त्यावर पितळेचे झाकण आहे. जवळच यात्रेकरूंसाठी एक प्रशस्त मंडप व धर्मशाळा आहे. थोड्याच अंतरावर एक नवा कोरा आश्रम बांधण्यात आल आहे. जवळपास मानव वस्ती मुळीच नसल्याने ध्यान-चिंतनाला हे स्थान उत्तम आहे, यात मुळीच शंका नाही.

### सप्तर्षि-मंडल

या उगमाच्या वरच्या बाजूस दृष्टिक्षेप केला असता दोन टेकड्यांच्या एकत्र येण्याने बनलेल्या घळीतील पाणी उगमाच्या रूपाने बाहेर पडत असावे, असा कयास करता येतो. यापैकी एक टेकडी सुमारे ३०० फूट उंच आहे. तिला ब्रह्मगिरीचे शिखर असे म्हणतात. त्या ठिकाणी जमिनीत सात लहान-लहान खळगे आहेत. त्याना सप्तर्षि-मंडळ असे म्हणतात. आईबाप हयात असणाऱ्यानी या टेकडीवर चढू नये, असे का समजले जाते हे मात्र कळले नाही. तेथे कसलेही बांधकाम नाही. मात्र तेथून सभोवतालचे दृश्य अत्यंत रमणीय दिसते; आणि तासन् तास पाहात राहिले तरी मन तृप्त होत नाही. तेथून कुद्रेमुख बेट, मैसूरची चामुंडी टेकडी, मलबारमधील वायनाडचे डोंगर आणि तामिळनाडूतील नीलगिरी पर्वताच्या रांगा दिसतात. सूर्यास्ताच्या वेळी अरबी समुद्रही स्पष्ट दिसतो.

आम्ही ते दृश्य पाहाण्यात किती वेळ घालविला असता कोण जाणे! पण बसवाल्याने शिंग वाजविले; आणि आम्ही वास्तव जगात परत येऊन टेकडी

उतरू लागलो. दीड तास विश्रांती घेऊन बस बरोबर अडीच वाजता सुटणार असल्याचे आधीच जाहीर झाले होते. आम्ही येऊन गाडीत बसलो; इतक्यात एका पॅसेंजरचा निरोप आला की, "आम्ही टेकडीवर जात आहोत. आम्ही आल्याशिवाय गाडी जाता कामा नये." इतर वेळेवर हजर झालेल्या उतारूंना त्या उर्मटपणाचा राग आला. त्यांनी ड्रायव्हरला चांगले फैलावर घेतले. पण तो शांतपणे म्हणाला, "साहेब, ते गृहस्थ सरकारी इंजीनियर आहेत. त्याना दुखविल्यास ते केव्हातरी आमचा काटा काढल्याशिवाय राहणार नाहीत. तुम्ही आज आहात उद्या नाही. आमची त्यांच्याशी रोजची गाठ आहे." बस देवस्थानाची होती, त्यामुळे इतर उतारूंना चडफडत गप्प बसणे भाग पडले.

अखेर एकदाचे सदर साहेब बहादुर सहकुटुंब सहपरिवार येऊन बसमध्ये विराजमान झाले, आणि सभोवतालच्या सुंदर दृश्याचा निरोप जड अंत:करणाने घेऊन आम्ही भागमंडलच्या दिशेने निघालो.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६०२
वा. क्र. 23931
मु-प्रवास
मुंबई शाखा

REFBK-0023131

# संदर्भ सूची


( 1 ) **Kodavas ( Coorgs ) Their Customs and Culture :** B D Ganapathy, Publıshed by the auther, Mercara, N. Coorg ( Karnataka ), 1967, P 224, Rs 10=00

( 2 ) **Side Lights On Kodava Culture :** B D Ganapathy

( 3 ) **Religion ane Society among the Coorgs of South India ·** M N Srinivas, Asia Publıshıng House, Bombay, 1965, P. 266, Rs 26=00

( 4 ) **A tiny model state of South India**
P. M Muthanna, Mysore, 1953

( 5 ) **Coorg and Coorgs ·** P M Muthanna, Coorg, 1931

( 6 ) **Archaeology of Coorg with special reference to megaliths :** K K Subbayya, Geeta Book House, Mysore, 1978 P 269, Rs 75=00

( 7 ) **Articles by Shri D N. Krishnayya, published in ' Coorg ',** ıssued by the Canara Bankıng Corporatıon, Udıpı on the occasıon of the sılver ȷubilee of their Mercara branch, 1960

( 8 ) **Mysore and Coorg : A gazetteer compiled for the Government of India,** by Lewıs Rıce Vols I & III, Bangalore, 1877

( 9 ) **Mysore State Gazetteer** Coorg Dıstrıct : B N. Srı Sathyan, Bangalore, 1965

( 10 ) **Census of India,** 1971,